Reg. No.PHM / SR / 5 / VIII / 06

पुणे, मुंबई, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

वर्ष ३४, अंक १०, ५ रुपये, शहर आवृत्ती

सहदैनिकासह पृष्ठे १८

पुणे, मंगळवार, ९ मार्च २०२१

# लोकसत्ता

लोकमान्य, लोकशक्ती !

| तापमान | कमाल | किमान |
|---|---|---|
| | ३६.६°सें | १४.९°सें |

**हवामानाचा अंदाज**

आकाश मुख्यतः निरभ्र राहण्याची शक्यता.



पान ३

शहर सुविधांवर भर

LOKSATTA.COM FACEBOOK.COM/LOKSATTALIVE TWITTER.COM/LOKSATTALIVE LOKSATTA.COM/APPS

EaseMyTrip.com

FLIGHTS HOTELS BUS CABS TRAINS HOLIDAYS

## GROWING FOR ALL YOUR TRAVEL NEEDS



## 2nd RANKED TRAVEL AGENCY

Ranked 2nd among the Key Online Travel Agencies in India in terms of booking volume*

## FASTEST GROWTH RATE

Grew fastest at 43% in terms of year-on-year growth in gross booking revenues#

## ONLY PROFITABLE PLAYER

Only profitable player among Key Online Travel Agencies in India in Fiscals 2018, 2019 and 2020^

Source: "Assessment of the OTA industry in India" dated February 2021 (the "CRISIL Report") prepared and issued by CRISIL Research, a division of CRISIL Limited. 'Key Online Travel Agencies' refers to key players in the OTA industry based on gross booking revenue and operating revenue as defined in the CRISIL Report. Refer to "Industry Overview – Competitive Assessment of OTA in India – Key Observations" on page 126 of the RHP (as defined below) for further information. #In the nine months ended December 31, 2020 as per CRISIL Report. *In Fiscal 2020 among Key Online Travel Agencies in India as per CRISIL Report. ^In terms of net profit margin as per CRISIL Report

Easy Trip Planners Limited is proposing, subject to receipt of requisite approvals, market conditions and other considerations, to make an initial public offering of its equity shares and has filed a Red Herring Prospectus ("RHP") with the Registrar of Companies, National Capital Territory of Delhi and Haryana at New Delhi ("RoC"). The RHP is available on the website of the Securities and Exchange Board of India ("SEBI") at www.sebi.gov.in and the respective websites of the book running lead managers, Axis Capital Limited and JM Financial Limited at www.axiscapital.co.in and www.jmfl.com, respectively.

Investors should note that investment in equity shares involves a high degree of risk. For details, potential investors should refer to the RHP which has been filed with the RoC, including the section titled "Risk Factors". Potential investors should not rely on the draft red herring prospectus filed with the SEBI in making any investment decision.

The Equity Shares have not been and will not be registered under the U.S. Securities Act of 1933, as amended ("Securities Act") or any state securities laws in the United States, and unless so registered, may not be offered or sold within the United States, except pursuant to an exemption from, or in a transaction not subject to, the registration requirements of the Securities Act and in accordance with any applicable U.S. state securities laws. Accordingly, the Equity Shares are being offered and sold outside the United States in 'offshore transactions' in reliance on Regulation S under the Securities Act and the applicable laws of the jurisdictions where such offers and sales are made. There will be no public offering in the United States.

epaper.loksatta.com

# ‘लोकसत्ता - अर्थब्रह्म’च्या माध्यमातून भविष्यातील गुंतवणुकीचा नवा मार्ग

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई :** करोना-टाळेबंदीच्या संथ अर्थचक्रातून सावरताना नजीकच्या भविष्यातील आपल्या गुंतवणुकीचा पट कसा असावा याबाबतचे मार्गदर्शन ‘लोकसत्ता अर्थब्रह्म’च्या माध्यमातून बुधवारी उपलब्ध होणार आहे. तज्ज्ञांच्या उपस्थितीत या गुंतवणूकपर मार्गदर्शन सत्राच्या निमित्ताने नव्या वित्त वर्षातील आर्थिक नियोजनाची घडी बसवून देणाऱ्या ‘लोकसत्ता अर्थब्रह्म’चा वार्षिकांकही उपलब्ध होणार आहे.

आदित्य बिर्ला सन लाइफ म्युच्युअल फंड प्रायोजित आणि लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि. सह-प्रायोजक असलेला ‘लोकसत्ता-अर्थब्रह्म’ हा गुंतवणूकपर मार्गदर्शन उपक्रम येत्या बुधवारी, १० मार्चला सायंकाळी ६ वाजता होत आहे. गुंतवणूकदार-जागराचा कार्यक्रम हा दूरचित्र-संवाद माध्यमातून होणार आहे. या निमित्ताने गुंतवणूकदारांना सहभागी तज्ज्ञांशी संवाद साधण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

आदित्य बिर्ला सन लाइफ म्युच्युअल फंडाचे सह-मुख्य गुंतवणूक अधिकारी महेश पाटील हे यावेळी मार्गदर्शन करतील. तसेच ‘मालमत्ता विभाजन’ संकल्पनेचा गुंतवणुकीत प्रत्यक्ष वापर करण्याबाबत गुंतवणूक सल्लागार तृप्ती राणे या मार्गदर्शन करतील. ‘लोकसत्ता’च्या अर्थसाक्षर उपक्रमातील ‘अर्थब्रह्म’चे यावेळी प्रकाशन होईल. नव्या वित्त वर्षाच्या अर्थसंकल्पानुरूप बदलते अर्थगणित व त्याचे उत्तर या विशेषांकातून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

‘मालमत्ता विभाजनातून संपत्ती निर्मितीचा यशमार्ग’ या ब्रीदवर आधारित या कार्यक्रमात उपस्थित तज्ज्ञांकडून गुंतवणुकीच्या विविध पर्याय, विषयांवर मार्गदर्शन होईल. तसेच या उपक्रमात सहभागी गुंतवणूकदारांच्या अर्थ-नियोजनाविषयीच्या शंकांचे निरसन केले जाईल. करोना-टाळेबंदीतून सावरत असलेल्या अर्थव्यवस्थेनंतर आपले वित्तीय ध्येय पूर्ण करण्यासाठी आवश्यक उचलावयाच्या पावलांबाबत हा दूरचित्र-संवाद मार्गदर्शक ठरेल.

(Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.)

## गुंतवणूकविषयक विशेष वार्षिक अंकाचे उद्या प्रकाशन

प्रस्तुत

लोकसत्ता अर्थब्रह्म

सहप्रायोजक

प्रायोजक : आदित्य बिर्ला सनलाईफ म्युच्युअल फंड.

सहप्रायोजक : लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप सोसायटी लिमिटेड.

सहभागासाठी
http://tiny.cc/LS_Arthabramha_10Mar येथे नोंदणी आवश्यक

विषय : मालमत्ता विभाजनातून संपत्तिनिर्मितीचा यशमार्ग

सहभाग : तृप्ती राणे (सनदी लेखापाल आणि ‘सेबी’ मान्यताप्राप्त गुंतवणूक सल्लागार)

कधी : बुधवार, १० मार्च २०२१

वेळ : सायंकाळी ६ वाजता

# ‘ठिपकेदार कस्तूर’ पक्ष्याची महाराष्ट्रात प्रथमच नोंद

## मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील पूर्व धारगड वनक्षेत्रामध्ये दर्शन

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**अमरावती :** मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील पूर्व धारगड वनक्षेत्रामध्ये अत्यंत दुर्मीळ अशा ‘ठिपकेदार कस्तूर’ या पक्ष्याची नोंद करण्यात आली आहे.

अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयातील उपायुक्त गजेंद्र बावणे, अजय लहाने, सहाय्यक आयुक्त भूसुधार श्याम मस्के, राहुल गुप्ता आणि मनोज बिंड यांना ७ मार्च रोजी निसर्ग भ्रमंती करताना हा पक्षी आढळून आला. सर्व कस्तूर वर्गीय पक्ष्यांमध्ये हा ठिपकेदार कस्तूर अधिक आकर्षक दिसतो. या पक्ष्याचे इंग्रजी नाव ‘स्केली थ्रश’ असे असून शास्त्रीय नाव ‘झ्यूथेरा डॉमा’ असे आहे. वनभ्रमंती दरम्यान अचानक झाडीतून नदी काठच्या उंच झाडावर हा पक्षी येऊन बसला.

सतत कूजन न करणारा हा पक्षी अतिशय लाजाळू असल्यामुळे फारसा समोर येत नाही. म्हणून तो सहज दृष्टीसही पडत नाही. घनदाट अरण्यात त्याचे अस्तित्व आढळून येते. नर आणि मादी दिसायला सारखेच असून मादी ही छोट्या वाटीसारख्या खोलगट घरट्यात ३-४ राखडी हिरवट रंगाची अंडी घालते. छोटे कीटक आणि कृमी हे त्यांचे खाद्य. या पक्ष्याच्या दुर्मीळतेमुळे फारशी सविस्तर माहिती उपलब्ध होत नाही व याला अद्याप प्रमाणित मराठी नाव सुद्धा प्राप्त झालेले नाही. ई-बर्ड सारख्या जागतिक दर्जाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या माहितीनुसार, या पक्ष्याची ही महाराष्ट्रातील छायाचित्रासह खात्रीशीर अशी प्रथमच नोंद ठरल्याचा दावा पक्षीनिरीक्षकांनी केला आहे.



साधारणपणे या पक्ष्याची लांबी २७ ते ३१ से.मी. असते. याच्या शरीराच्या फिकट पिवळसर रंगावरील छोट्या छोट्या रेषासदृश्य ठिपक्यांची रचना ही त्याची मुख्य ओळखीची खूण आहे. पोटाचा भाग पांढरा असून त्यावरही ठिपके असतात व पाय फिकट नारिंगी गुलाबी असतात. मलेशियासह हा पक्षी भारताच्या केवळ उत्तर भागात हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड येथे आढळून येतो.

> वाघ आणि इतर वन्यजीव याकरिता सुप्रसिद्ध असलेले मध्यभारतातील मेळघाटचे जंगल हे कित्येक दुर्मीळ वनस्पती, विविध प्राणी आणि पक्ष्यांकरिता राष्ट्रीयस्तरावर प्रसिद्ध होत आहे. त्यामुळे व्याघ्रदर्शनाची आस घेऊन येणारे पर्यटक, अभ्यासक आणि संशोधक यांनी मेळघाटच्या या जैवविविधतेची सुद्धा योग्य दखल घेणे गरजेचे आहे.
>
> – मनोज बिंड, पक्षीनिरीक्षक, अमरावती.

# दीडशे ग्रामीण रुग्णालयांत कर्करोग निदान

**संदीप आचार्य, लोकसत्ता**

**मुंबई :** देशात व महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात कर्करोगाचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळत असून योग्य वेळेत या रुग्णांचे निदान करून कर्करोगाला आळा घालण्यासाठी आरोग्य विभागाने एक महत्त्वाकांक्षी योजना आखली आहे. याअंतर्गत तब्बल १५० ग्रामीण रुग्णालयात स्तन, मुख तसेच गर्भाशयाच्या कर्करोगाच्या निदानाची व्यवस्था केली जाणार आहे.

महाराष्ट्रात प्रामुख्याने ग्रामीण भागात तंबाखू सेवनामुळे पुरुष तसेच स्त्रियांमध्ये तोंडाचा कर्करोग होण्याचे प्रमाण मोठे आहे. याशिवाय स्तनाचा तसेच गर्भाशयाच्या कर्करोगाचे प्रमाणही देशात व राज्यात सर्वाधिक आहे. आरोग्य विभागाने २०१७ पासून कर्करुग्णांवरील उपचाराचे काम टप्प्याटप्प्याने हाती घेण्यास सुरुवात केली आहे. काही जिल्हा रुग्णालयात केमोथेरपी व्यवस्था करण्यात आली आहे, तर टाटा कॅन्सर हॉस्पिटलच्या सहकार्याने ‘कॅन्सर वॉरियर्स’ संकल्पनेच्या माध्यामातून काही हजार कर्करुग्णांवर शस्त्रक्रियाही करण्यात आल्याचे आरोग्य विभागाच्या ज्येष्ठ डॉक्टरांनी सांगितले.

शहरी भागातील रुग्णांमध्ये जी जागरुकता व आरोग सुविधा उपलब्ध असते तशी ती ग्रामीण भागात पुरेशा प्रमाणात नसल्यामुळे बहुतेकवेळा शेवटच्या टप्प्यात कर्करोग झाल्याचे रुग्णाच्या लक्षात येते. अशा रुग्णांवर उपचार करणे हे एक आव्हान ठरते. यामुळे वेळेत कर्करोगाचे निदान व्हावे यासाठी आरोग्य विभागाने तब्बल १५० ग्रामीण रुग्णालयांमध्ये कर्करोग निदान केंद्र सुरू करण्याची योजना आखली आहे. यासाठी या सर्व दीडशे रुग्णालयात स्तन, गर्भाशय तसेच तोंडाचा कर्करोगाचे निदान करणारी यंत्रणा लागू केली जाणार आहे. यात सोनोग्राफी मशीनमध्ये ब्रेस्ट प्रोब, बायोप्सी सुविधा, हिस्टोपॅथॉलॉजी सुविधा दिली जाणार आहे. तसेच येथील कर्मचाऱ्यांना यासाठीचे आवश्यक प्रशिक्षण दिले जाणार आहे. १२ कोटी रुपये खर्चाची ही योजना असून याच्या अंमलबजावणीमुळे ग्रामीण भागातील कर्करुग्णांचे वेळेत निदान होईल. तसेच उपचाराचीही व्यवस्था करता येईल.



- जागतिक आरोग्य संघटनेच्या एका अहवालानुसार भारतात जवळपास साडेबारा लाख नवे रुग्ण आढळून आले आहेत.
- सुमारे आठ लाख लोकांचा कर्करोगामुळे मृत्यू झाला असून देशात २५ लाख रुग्णांवर सध्या उपचार सुरू आहेत.
- ‘इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ मॅनेजमेंट रिसर्च’च्या अहवालानुसार देशात वेगाने वाढणारे कर्करुग्णांचे प्रमाण लक्षात घेता आणखी ५५० कर्करोग उपचार केंद्रांची आवश्यकता आहे. पाच हजार कॅन्सरतज्ज्ञाची गरज आहे.
- २०२० मध्ये तंबाखू सेवनामुळे सुमारे सव्वादोन लाख पुरुष व ९३ हजार महिलांना कर्करोग झाला.
- स्तनाच्या कर्करुग्णांची संख्या एक लाख ६५ हजार तर गर्भाशयीच्या कर्करुग्णांची संख्या सव्वा लाख एवढी आहे.



# नागपुरातील विको लेबॉरेटरीजला भीषण आग

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** प्रसिद्ध उद्योगपती पेंढरकर यांच्या मालकीच्या हिंगणा येथील विको लेबॉरेटरीज कारखान्याला रविवारी रात्री आग लागली. आग इतकी भीषण होती की ती विझवण्यासाठी अग्निशामक दलाचे तब्बल दहा बंब बोलावण्यात आले. या आगीत तेथील दोन मजली इमारत जळून खाक झाली. सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही.

हिंगणा एमआयडीसी क्षेत्रात प्लॉट क्र. एस-८९ या भूखंडावर विको लेबॉरेटरीजचा कारखाना आहे. येथे सौंदर्य प्रसाधनांची निर्मिती केली जाते. याच ठिकाणी रात्रीच्या सुमारास आग लागली आणि आग संपूर्ण इमारतीमध्ये पसरली. आगीचे कारण स्पष्ट झाले नसले तरी तेथे असलेल्या ज्वलनशील पदार्थामुळे आगीने रौद्ररूप धारण केल्याचे समजते. आग विझवण्यासाठी नागपूर महापालिकेचे सहा, हिंगणा अग्निशामक केंद्रातून दोन, वाडी नगर परिषदेतून एक तर कळमेश्वर येथून एक असे एकूण दहा पाण्याचे बंब बोलावण्यात आले होते. आग वेगाने पसरत असल्याने तेथे असलेली दोन माळ्याची इमारत जळून खाक झाली. कारखान्यात मोठ्या संख्येने वॅक्स व कच्चे अल्कोहोल असल्याने आग अधिक पसरली. आग विझवण्यासाठी अग्निशामक दलाला मोठी कसरत करावी लागली. सोमवारी पहाटे आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले. यात कोट्यवधींचे नुकसान झाले आहे.

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक

प्रस्तुत

लोकसत्ता स्पर्धा परीक्षा गुरू

९




## यूपीएससी

### यूपीएससी पूर्वपरीक्षा- भारतीय अर्थव्यवस्था

आजच्या लेखामध्ये आपण पूर्वपरीक्षेकरिता भारतीय अर्थव्यवस्था या अभ्यासघटकांतर्गत आर्थिक आणि सामाजिक विकास या घटकांची माहिती घेणार आहोत. पूर्वपरीक्षेमध्ये या विषयामध्ये शाश्वत विकास, दारिद्र्य, समावेशन, लोकसंख्या, सामाजिक क्षेत्र, उपक्रम, इ. उपघटकांचा समावेश होतो. १९९१ च्या आर्थिक सुधारणांनंतर भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रत्यक्ष कार्यामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. या पार्श्वभूमीवर देशाच्या आर्थिक धोरणामध्ये आमूलाग्र बदल करण्यात आले. सर्वसमावेशक वाढ (Inclusive Growth), शाश्वत विकास, सामाजिक क्षेत्र उपक्रम, इ. बाबींना देशाच्या आर्थिक धोरणांमध्ये स्थान मिळाले. यूपीएससीनेही याच धर्तीवर प्रस्तुत घटकांचा अभ्यासक्रमामध्ये समावेश केला आहे.

२०११ ते २०२० पर्यंत झालेल्या परीक्षांमध्ये या घटकावर एकूण १६६ प्रश्न विचारण्यात आले आहेत. यावरून हा घटक UPSC पूर्वपरीक्षेच्या दृष्टीने किती महत्त्वपूर्ण आहे, याची कल्पना येते. या घटकाची तयारी करताना नमूद प्रत्येक घटकाचे परीक्षेच्या दृष्टीने उपयुक्त ठरणारे योग्य आकलन असणे गरजेचे आहे आणि यासाठी गतवर्षीय परीक्षांमध्ये विचारण्यात आलेल्या प्रश्नाचा अभ्यास आणि विश्लेषण करणे गरजेचे आहे. या विषयावर २०१३ पासून साधारणपणे १० ते २८ प्रश्न विचारले आहेत. सन २०२० मधील पूर्वपरीक्षेत या विषयावर साधारणपणे २३ प्रश्न विचारण्यात आलेले आहेत. २०२० मधील पूर्वपरीक्षेत बँकिंग क्षेत्रावर जवळपास ८ प्रश्न, वित्तीय समावेशन (१ प्रश्न), विमा (१ प्रश्न), अर्थसंकल्प (१ प्रश्न), आंतरराष्ट्रीय व्यापार (३ प्रश्न), FDI (१ प्रश्न), वित्तीय अरिष्ट (१ प्रश्न), आंतरराष्ट्रीय करार संघटना (१ प्रश्न), कृषी अर्थव्यवस्था (३ प्रश्न) आणि समग्र आर्थिक निर्देशक (३ प्रश्न) अशा प्रकारे प्रश्न विचारण्यात आल्याचे दिसते.

या घटकांतर्गत अर्थशास्त्रातील पारंपरिक संकल्पना ज्ञात करून घ्याव्यात. समकालीन, आंतरशाखीय व संकल्पनात्मक स्वरूपामुळे या विषयाची व्याप्ती वाढली आहे. परिणामी गतवर्षीच्या प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण करणे श्रेयस्कर ठरते. यामुळे अर्थशास्त्रातील संकल्पना व्यवहारामध्ये कशा वापरल्या जातात, याचा अंदाज बांधता येतो. मागील वर्षीच्या पूर्वपरीक्षेमध्ये डेटा डीक्तात पद्धत काय आहे? असा प्रश्न विचारण्यात आला. याशिवाय जगात तांदळाची सर्वाधिक आयात कोणता देश करतो? जागतिक स्पर्धात्मक अहवाल कोण प्रसिद्ध करते? इ. प्रश्न विचारले गेले आहेत. या प्रश्नांवरून या अभ्यासघटकांची तयारी कशी करावी, याचा अंदाज येतो.

या विषयाचा अभ्यास करताना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय आर्थिक घडामोडींचा आढावा घेणे फायदेशीर ठरते. कारण परीक्षेत प्रश्न विचारताना मूलभूत संकल्पनेला चालू घडामोडीची जोड दिलेली दिसते. तसेच उपरोक्त नमूद मुद्द्यातील अनेक घटक हे ‘आर्थिक विकास’ या सामान्य अध्ययन- मुख्य परीक्षा पेपर तीनमधील विषयाची तयारी करण्यासाठी अभ्यासावा लागतो. म्हणून या घटकाची सर्वंकष तयारी अधिक उपयुक्त ठरते.

अर्थव्यवस्थेशी संबंधित सरकारी धोरणे, निर्णय, केंद्र सरकारचे कार्यक्रम, सामाजिक सुरक्षा योजना याची नियमितपणे टिपणे काढून ठेवावीत. गेल्या काही वर्षांमध्ये जननी सुरक्षा योजना, आशा? (ASHA), आयुषमान योजना, राष्ट्रीय आजीविका मिशन यावर प्रश्न विचारलेले दिसतात. केंद्र सरकारने २०१४ साली देशांतर्गत न्यू डेव्हलपमेंट बँकेची (NDB) स्थापना केली. २०१४ नंतरच्या काळात आयोगाच्या प्रश्नांचा रोख ब्रिक्स संघटनेकडे असल्याचेही दिसते.

या विषयाची तयारी एनसीईआरटीच्या क्रमिक पुस्तकांमधून करावी.अर्थशास्त्रातील मूलभूत संकल्पना व संज्ञा त्यातून स्पष्ट होतील. पुढील वाचनासाठी ‘अंडरस्टँडिंग इंडियन इकॉनॉमी- धिरेंद्र कुमार’, ‘इंडियन इकॉनॉमी- रमेश सिंग’, इ. ग्रंथ वापरावेत. हा विषय चालू घडामोडीशी संबंधित असल्याने कोणताही एक ग्रंथ पुरेसा ठरत नाही, हे विद्यार्थ्यांनी लक्षात घ्यावे. त्याकरिता नियमितपणे वर्तमानपत्रांचे वाचन महत्त्वाचे ठरते. वृत्तपत्रांसोबत अर्थव्यवस्थेच्या सर्वांगीण आकलनासाठी, सरकारची धोरणे, कार्यक्रम जाणून घेण्यासाठी वित्त मंत्रालयाकडून दरवर्षी प्रसिद्ध होणारी आर्थिक पाहणी व केंद्रीय अर्थसंकल्प यांचा काळजीपूर्वक अभ्यास करावा. विशेषतः या आर्थिक दस्तऐवजामध्ये दिलेल्या चौकटी आवर्जून पाहाव्यात.

यासोबत योजना व कुरुक्षेत्र आदी मासिके व पी.आय.बी. संकेतस्थळ, इंडिया इयर बुक, Insight २०२१ इयर बुक, इ.मधील अर्थव्यवस्थेविषयीची प्रकरणे अभ्यासणे उपयुक्त ठरेल.

**किशोर गायकवाड**

## एमपीएससी

### पर्यावरण

या घटक विषयाचा आयोगाने विहित केलेला अभ्यासक्रम आहे- ‘पर्यावरणीय परिस्थितिकी, जैवविविधता आणि हवामान बदलाबाबत विषय पारंगततेची आवश्यकता नसणारे सर्वसाधारण मुद्दे’. हा विषय नेहमीच अर्थव्यवस्था, भूगोल आणि चालू घडामोडी या घटकांतील मुद्द्यांच्या अनुषंगाने अभ्यासला जात असे. मात्र जागतिकीकरणाच्या प्रक्रियेबरोबर आर्थिकच नाही तर पर्यावरणीय मुद्देही जागतिक पातळीवर एकमेकांशी जोडले गेल्याची जाणीव वेगाने वाढत गेली. त्यामुळे एखाद्या घटक विषयाच्या मुद्द्यांचा एक आयाम यापेक्षा जास्त महत्त्व पर्यावरण या विषयास देणे आवश्यक बनले आणि हा विषय केंद्र व राज्य लोकसेवा आयोगाच्या अभ्यासक्रमामध्ये टप्प्याटप्प्याने समाविष्ट होत गेला.

या विषयाचा अभ्यास भौगोलिक (हवामानशास्त्रीय) आणि जीवशास्त्रीय अशा महत्त्वाच्या दृष्टिकोनांतून करणे अपेक्षित आहे. त्यासाठी पुढील पाच उपघटकांचा विचार करता येतो.- परिस्थितिकी (Ecology), जैवविविधता (Bio Diversity), हवामान बदल (Climate Change), प्रदूषण (Pollution), शाश्वत विकास (Sustainable Development). यातील परिस्थितिकी, जैवविविधता आणि प्रदूषण हे मुद्दे मूलभूत व पारंपरिक अभ्यासाचे आहेत. त्यांच्या आधारे पुढचे हवामान बदल व शाश्वत विकास हे दोन मुद्दे व्यवस्थित तयार करता येतात. या दोन मुद्द्यांमध्ये मूलभूत संकल्पना समजून घेतल्या तरी त्यांचा अभ्यास अद्ययावत करत राहणे आवश्यक आहे. उमेदवाराने या विषयातला ‘तज्ज्ञ नसणे’ आयोगाला अभिप्रेत आहे, पण एखाद्या मुद्द्याबाबतच्या पर्यावरणविषयक आयामाची कल्पना मात्र असायला हवी. याचा अर्थ मूलभूत संकल्पनांच्या पुढे जाऊन पर्यावरणीय मुद्द्यांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय पैलूंची समज विकसित करणे आवश्यक आहे आणि अन्य घटक विषयांच्या चालू घडामोडींतील पर्यावरणाशी संबंधित आयाम समजून घेणे गरजेचे आहे. थोडक्यात, विषयाचे बारकावे, common sense आणि चालू घडामोडींचा अभ्यास अशा प्रकारे या घटकाच्या तयारीसाठीचे तीन भाग विचारात घ्यावे लागतील.

पारंपरिक मुद्द्यांचा अभ्यास करण्यासाठी दहावी, अकरावी NCERT जीवशास्त्र आणि ICSE चे पर्यावरणविषयक पुस्तक यांचा खूप उपयोग होतो. मूलभूत संकल्पना संदर्भ साहित्यातून अभ्यासल्या की, झाला या विषयाचा अभ्यास, असे नाही. खरी तयारी इथून पुढेच सुरू होते, कारण या विषयामध्ये नवनव्या संकल्पना आणि मुद्द्यांची वारंवार भर पडत असते आणि ते सारखे अद्ययावत होत राहतात. त्यामुळे चालू घडामोडी ही या घटकाच्या तयारीची गुरुकिल्ली आहे. घडणारी कोणती घटना प्रश्नाचा विषय होऊ शकते हे पूर्णांशाने ठरविता येणे शक्य नाही. मात्र काही महत्त्वाचे निकष लावून अभ्यासाची दिशा आणि चौकट आखता येऊ शकते. हे निकष common sense आणि आजूबाजूच्या परिस्थितीचे भान ठेवल्यास सहज सापडू शकतात. उदाहरणार्थ एखादा पायाभूत सुविधा प्रकल्प किंवा अवजड उद्योग उभारताना त्यास तीव्र विरोध होत असेल तर त्याच्या पर्यावरणविषयक पैलूंचा अभ्यास आवश्यक होतो. अन्य वेळी अशा प्रकल्पांच्या ठळक वैशिष्ट्यांचा आढावाही पुरेसा असतो. आर्थिक विकासाच्या बरोबरीनेच पर्यावरणीय समस्यांचेही जागतिकीकरण झाले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर ज्वलंत ठरू लागलेल्या मुद्द्यांच्या भौगोलिक, हवामानशास्त्रविषयक आणि वैज्ञानिक अशा मूलभूत आयामांचा अभ्यास अत्यंत महत्त्वाचा आहे. याबाबतच्या चालू घडामोडींबाबत संयुक्त राष्ट्रे, जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक व्यापार संघटना, UNPCCC, UNESCO, UNEP या संघटनांचे अहवाल, घोषणा माहीत असणे आवश्यक आहे. अशा आंतरराष्ट्रीय पातळीवरील मुद्द्यांबाबत भारताची भूमिका आणि त्यामागची कारणे माहीत असायला हवीत. सर्वसामान्यांच्या जीवनावर प्रत्यक्ष परिणाम करणाऱ्या आणि त्यांचे जीवनमान व राहणीमान यांवर अप्रत्यक्षपणे प्रभाव टाकणाऱ्या बाबी आयोगाच्या दृष्टीने अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याजोग्या असतात. अशा मुद्द्यांशी निगडित बाबी सर्व बाजूंनी अभ्यासायला हव्यात. विशेषतः दारिद्र्यरेषेखालील लोकांचे उत्पन्न, आरोग्य, पोषण, राहणीमान यांवर परिणाम करणाऱ्या मुद्द्यांच्या पर्यावरणीय घटकांचा अभ्यास आवश्यक आहे. उदाहरणार्थ वन हक्क कायद्याचा आदिवासी व अनुसूचित जमातींवर होणारा परिणाम किंवा शेतातील खोडवा जाळण्यास हरित लवादाने घातलेली बंदी असे मुद्दे.

**पल्लवी थोरात**

Reg. No.PHM / SR / 5 / VIII / 06
पुणे, मुंबई, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध
वर्ष ३४, अंक १०, ५ रुपये, शहर आवृत्ती
सहदैनिकासह पृष्ठे १८
पुणे, मंगळवार, ९ मार्च २०२१

# लोकसत्ता

लोकमान्य, लोकशक्ती !

तापमान | कमाल ३६.६°सें | किमान १४.९°सें

हवामानाचा अंदाज
आकाश मुख्यतः निरभ्र राहण्याची शक्यता.



पान क्रीडा
बजरंगाची कमाल!

LOKSATTA.COM FACEBOOK.COM/LOKSATTALIVE TWITTER.COM/LOKSATTALIVE LOKSATTA.COM/APPS

Vencobb
एक्स फार्म ब्रॉयलर चिकनचा दर*
९५ रु. प्रति किलो
किरकोळ विक्रीचा दर*
जिवंत कोंबडी
१२३ रु. प्रति किलो
ड्रेस्ड (स्किनलेस) दर*
१५२ रु. प्रति किलो
अंड्याचा किरकोळ विक्रीचा दर*
५८ रु. प्रति डझन

# शहर सुविधांवर भर!

## मुद्रांक शुल्कात महिलांना एक टक्का सवलत; कृषिक्षेत्रालाही बळ

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** करोनाच्या संकटामुळे महसुली उत्पन्नावर मर्यादा आल्याच्या पार्श्वभूमीवर सोमवारी उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी सादर केलेल्या राज्याच्या अर्थसंकल्पात आरोग्य, कृषी, महिला सक्षमीकरणाबरोबरच पायाभूत सुविधांच्या विकासावर भर देण्यात आला. शेतकऱ्यांना तीन लाखांपर्यंत बिनव्याजी पीककर्ज, घरखरेदीत महिलांना एक टक्का सवलत जाहीर करतानाच महापालिका निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून मुंबई, पुणे, नागपूर, ठाण्यातील पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणास सरकारने प्राधान्य दिले.

करोनाच्या पार्श्वभूमीवर केंद्राप्रमाणेच राज्याने आरोग्य खात्याची तरतूद वाढवून ही यंत्रणा अधिक सक्षम करण्याचा निर्धार केला आहे. महिलांना मुद्रांक नोंदणीत सवलत दिल्याने होणारे आर्थिक नुकसान दारूच्या किमतीत मोठ्या प्रमाणावर वाढ करून भरून काढण्यात येणार आहे. मद्य वगळता अन्य कोणत्याही वस्तूंच्या किमतीत वाढ होणार नाही.

करोनामुळे आर्थिक नियोजन कोलमडले असताना १० हजार २२६ कोटींचा तुटीचा अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी (पान ४ वर)



**महिला**

- महिलेच्या नावाने घर खरेदी केल्यास पाच टक्क्यांच्या मुद्रांक शुल्कात एक टक्का कपात म्हणजेच मुद्रांक शुल्कापोटीच्या खर्चात २० टक्के दिलासा देणारी राजमाता जिजाऊ गृहस्वामिनी योजना.
- ग्रामीण भागातील मुलींना शाळेपर्यंत मोफत बस प्रवासासाठी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले विद्यार्थिनी प्रवास सवलत योजना.
- घरकाम करणाऱ्या महिलांसाठी कल्याणकारी योजना राबवण्यासाठी संत जनाबाई सामाजिक सुरक्षा व कल्याण योजना.
- राज्य राखीव पोलीस दलात पहिला स्वतंत्र महिला गट स्थापन.

**आरोग्य**

- नागरी आरोग्यसेवांचा दर्जा वाढवण्यासाठी पाच वर्षांत ५ हजार कोटी रुपये खर्च करणार. यंदा ८०० कोटी रुपयांची तरतूद.
- प्रत्येक जिल्ह्यात करोनोत्तर समुपदेशन व उपचारांसाठी केंद्र.

**कृषी**

- शेतकऱ्यांना तीन लाखांपर्यंत बिनव्याजी पीककर्ज.
- कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या बळकटीकरणासाठी २ हजार कोटी रुपयांची योजना.
- भाजीपाल्यातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे यासाठी प्रत्येक तालुक्यात किमान एक याप्रमाणे राज्यभरात एकूण ५०० नवीन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर भाजीपाला रोपवाटिका.

### मुंबई, ठाण्यातील प्रकल्पांना गती

अर्थसंकल्पीय भाषणात अर्थमंत्र्यांनी मुंबईच्या विकास प्रकल्पांचा विशेषत्वाने उल्लेख केला. वरळी-शिवडी उन्नत मार्गाचे काम हाती घेण्यात आले आहे. विरार ते अलिबाग बहुद्देशीय मार्ग प्रकल्पाचे भूसंपादन सुरू आहे. ठाणे खाडीला समांतर १५ किलोमीटर लांबीचा ठाणे किनारपट्टी रस्ता बांधण्यात येत आहे. मुंब्रा बाह्यवळण, शीळ-कल्याण या मार्गांवर उड्डाणपुलांचे काम सुरू आहे. मुंबई, ठाणे व नवी मुंबई या भागांसाठी जलवाहतूक सुरू करण्यात येत असून, त्यासाठी कोलशेत, काल्हेर, डोंबिवली व मीरा-भाईंदर या चार ठिकाणी जेटी बांधण्यात येत आहे, असे अजित पवार यांनी सांगितले.

### आरोग्य यंत्रणा सक्षम करण्याचे लक्ष्य

करोनाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक आरोग्य व्यवस्था सक्षम करण्यासाठी पुढील ४ वर्षांसाठी ७५०० कोटी रुपयांचा प्रकल्प हाती घेण्यात येणार आहे. महानगरपालिका, नगर परिषदा, नगर पंचायतींमध्येही सार्वजनिक आरोग्यसेवा बळकट व्हावी यासाठी ५ वर्षांत ५ हजार कोटी रुपये खर्च करण्यात येणार असून त्यापैकी ८०० कोटी रुपयांची तरतूद या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण विभाग मिळून १४, ४९६ कोटींची तरतूद करण्यात आली.

अर्थसंकल्प विशेष / ८, ९

■ अग्रलेख ■
त्यास ‘देव’ आहे....

# सर्वच राज्यांच्या आरक्षणाची पडताळणी

## मराठा आरक्षणप्रश्नी सर्वोच्च न्यायालयाची नोटीस

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नवी दिल्ली :** मराठा आरक्षणाचा प्रश्न आता देशव्यापी बनला आहे. सामाजिक आणि आर्थिक मागास प्रवर्ग ठरविण्याच्या राज्यांच्या अधिकारावर १०२ व्या घटनादुरुस्तीद्वारे गदा येते का, यासह अन्य मुद्द्यांवर सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी सर्व राज्यांना नोटीस पाठवली. या मुद्द्यावर केंद्रालाही भूमिका स्पष्ट करावी लागणार असून, ५० टक्के आरक्षणाच्या मर्यादेवरही युक्तिवाद होणार आहे. या प्रकरणावरील पुढील सुनावणी १५ मार्चला होणार असून, मराठा आरक्षणानिमित्ताने सर्वच राज्यांच्या आरक्षण धोरणाची पडताळणी होण्याचे स्पष्ट संकेत आहेत.

सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती अशोक भूषण यांच्या नेतृत्वाखाली पाच सदस्यीय पीठापुढे सोमवारी राज्य सरकारच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ मुकुल रोहतगी यांनी, ११ ऑगस्ट २०१८ मध्ये झालेल्या १०२ व्या घटनादुरुस्तीचा मुद्दा उपस्थित केला. १०२ वी घटनादुरुस्ती आणि त्यानुसार समाविष्ट केलेले अनुच्छेद ३४२ (अ) आणि ३३८ (ब) यामुळे सर्व राज्यांच्या सामाजिक आणि आर्थिक मागास प्रवर्ग निश्चित करण्याच्या अधिकारावर परिणाम होत असल्याने मराठा आरक्षणाचा प्रश्न निव्वळ महाराष्ट्रापुरता मर्यादित राहिलेला नाही. आरक्षणाचा प्रश्न व्यापक असून अन्य राज्यांचे म्हणणेही ऐकून घेतले पाहिजे. त्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने राज्यांना म्हणणे मांडण्यासाठी नोटीस पाठवावी, असा युक्तिवाद रोहतगी यांनी केला.

रोहतगी यांच्या युक्तिवादाला मुख्य हस्तक्षेप याचिकाकर्ते राजेंद्र दाते-पाटील यांच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ज्ञ कपिल सिबल यांनीही अनुमोदन दिले. १०२ व्या घटनादुरुस्तीमुळे १६ राज्यांच्या आरक्षण धोरणावर परिणाम झाला आहे. ‘‘राज्यांना आरक्षण देण्यासाठी आयोग नेमण्याचा अधिकार आहे की नाही हे तपासले पाहिजे. या घटनादुरुस्तीद्वारे हा अधिकार फक्त (पान ४ वर)



**केंद्राचा विरोधी युक्तिवाद**

- अनुच्छेद ३३८ (ब) आणि ३४२ (अ) नुसार मागास प्रवर्ग निश्चित करण्याचा अधिकार २०१८पासून राष्ट्रपतींना देण्यात आला असल्याने राज्यांना सामाजिक आणि आर्थिक मागास प्रवर्गाअंतर्गत कोणत्याही समाजाचा समावेश करण्याचा हक्क नाही, असा युक्तिवाद महान्यायवादी के. के. वेणुगोपाल यांनी सर्वोच्च न्यायालयात केला.
- या युक्तिवादाच्या आधारे मराठा आरक्षण देण्याचा राज्याला अधिकार नाही. त्यामुळे तो अवैध ठरत असल्याचे म्हणणे वेणुगोपाल यांनी मांडले.
- इंद्रा साहनी प्रकरणाच्या निकालात न्यायालयाने ५० टक्के आरक्षणाची मर्यादा घातली होती. मराठा समाजाला सामाजिक आणि आर्थिक मागास प्रवर्गात आरक्षण देण्यासाठी अपवादात्मक परिस्थिती कोणती हे राज्य सरकारला न्यायालयात समाधानकारकरीत्या स्पष्ट करावे लागेल, असा युक्तिवाद वेणुगोपाल यांनी केला.

### प्रकरण काय?

महाराष्ट्रातील तत्कालीन काँग्रेस सरकारने शैक्षणिक आणि सामाजिक मागास प्रवर्गाअंतर्गत (ईएसबीसी) मराठा समाजाला १६ टक्के आरक्षणाची तरतूद केली. त्याच्या अंमलबजावणीला उच्च न्यायालयाने स्थगिती दिली. नोव्हेंबर २०१८मध्ये देवेंद्र फडणवीस सरकारने गायकवाड समितीच्या शिफारशीच्या आधारे सामाजिक आणि आर्थिक मागास प्रवर्गाअंतर्गत (एसईबीसी) मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण देणारा कायदा केला. उच्च न्यायालयाने तो वैध ठरवत शैक्षणिक क्षेत्रात १२ टक्के आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये १३ टक्के आरक्षण देण्याचा आदेश दिला. त्यास सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षणाला स्थगिती दिली.

### काय चाललंय काय!

प्रशांत कुलकर्णी



फारच भयंकर स्वप्न! सकाळी मी गॅस सिलिंडर आणला, दुपारी गाडीत पेट्रोल भरलं आणि संध्याकाळी माझी ईडी चौकशी सुरू झाली!!

## अंबानींच्या घराजवळ स्फोटके : तपास ‘एनआयए’कडे

**मुंबई :** उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या निवासस्थानाजवळ स्फोटके आढळल्याप्रकरणाचा तपास केंद्रीय गृह विभागाने सोमवारी राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे (एनआयए) सोपवला. त्यानुसार ‘एनआयए’ने या प्रकरणी स्वतंत्र गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू केली. अंबानी यांच्या निवासस्थानाजवळ सापडलेली स्फोटके, मनसुख हिरेन यांचा संशयास्पद मृत्यू आणि त्यांच्या ताब्यातील स्कॉर्पिओ गाडीची चोरी ही तीन प्रकरणे राज्य सरकारने शनिवारी दहशतवादविरोधी पथकाकडे (एटीएस) सोपवली होती. त्यास ४८ तासही होत नाहीत तोच ‘एनआयए’ने स्फोटकांचे प्रकरण स्वतःकडे घेतले.

## ऑलिव्हिअर दसाँ यांचा हेलिकॉप्टर दुर्घटनेत मृत्यू



**पॅरिस :** राफेल लढाऊ विमाने तयार करणाऱ्या कंपनीचे मालक, फ्रान्सच्या संसदेचे सदस्य ऑलिव्हिअर दसाँ (६९) यांचा रविवारी हेलिकॉप्टर दुर्घटनेत मृत्यू झाला. नॉर्मंडी येथे झालेल्या या दुर्घटनेत वैमानिकाचाही मृत्यू झाला असून, या अपघाताची न्यायालयीन चौकशी सुरू करण्यात आली आहे. वृत्त...१६

## राज्यात करोनाचे ८७४४ नवे रुग्ण

**मुंबई :** राज्यात सोमवारी करोनाचे ८७४४ रुग्ण आढळले. गेल्या २४ तासांत २२ रुग्णांचा मृत्यू झाला तर ९,०६८ रुग्ण बरे होऊन घरी परतले. मुंबई, पुणे आणि नागपूरमध्ये सोमवारी सर्वाधिक रुग्ण आढळले. राज्यात सध्या ९७ हजार ६३७ रुग्णांवर उपचार सुरू आहेत. सर्वाधिक उपचाराधीन रुग्ण पुण्यात असून, त्यापाठोपाठ नागपूर आणि ठाणे जिल्ह्यात आहेत.

## रेल्वेच्या धडकेत वाघाच्या बछड्याचा मृत्यू

**गोंदिया :** गोंदिया-बल्लारशा मार्गावरील नागझिरा व्याघ्र प्रकल्पातून जात असलेल्या रेल्वेमार्गावर सोमवारी सकाळी ६ वाजताच्या सुमारास रेल्वेच्या धडकेने सहा महिन्यांच्या वाघाच्या बछड्याचा मृत्यू झाला. नागझिरा व्याघ्र प्रकल्पातील टी-१४ वाघीण आणि तिचे तीन बछडे रेल्वे रुळ ओलांडत असताना ही घटना घडली.

आरोग्यम् धनसंपदा
आरोग्य विशेष पुरवणी
a RED initiative
आजच्या अंकासोबत ‘आरोग्यम् धनसंपदा’ ही पुरवणी ‘दी इंडियन एक्स्प्रेस ग्रुप’च्या मार्केटिंग सोल्यूशन्स टीमच्या पुढाकाराने सादर करण्यात आली आहे.

## ‘जेईई मेन्स’मध्ये सहा विद्यार्थी अव्वल

**पुणे, मुंबई :** राष्ट्रीय स्तरावरील अभियांत्रिकी, तंत्रज्ञान संस्थांमध्ये प्रवेश घेण्यासाठी अनिवार्य असलेल्या सामाईक प्रवेश परीक्षा साखळीतील मुख्य परीक्षेचा (जेईई मेन्स) निकाल सोमवारी जाहीर करण्यात आला. महाराष्ट्रातील सिद्धांत मुखर्जी याच्यासह देशातील सहा विद्यार्थ्यांनी शंभर पर्सेंटाईल मिळवले आहेत. परीक्षेनंतर केवळ दहा दिवसांत निकाल प्रवेश परीक्षा कक्षाने निकाल जाहीर केला.

करोनाच्या प्रादुर्भावामुळे विद्यार्थ्यांना संधी गमवावी लागू नये यासाठी यंदा चारवेळा परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यातील पहिली परीक्षा राष्ट्रीय परीक्षा कक्षाने २४ ते २६ फेब्रुवारीदरम्यान घेतली. या परीक्षेचा निकाल अवघ्या दहा दिवसांत जाहीर करण्यात आला आहे. राज्यातील (पान ४ वर)

तिसरा स्मृतिदिन



डॉ. पतंगराव कदम साहेब
राज्याचे ज्येष्ठ नेते, पलूस-कडेगांव विधानसभा मतदारसंघाचे भाग्यविधाते,
माजी मंत्री (शिक्षण, महसूल, सहकार, उद्योग, वने, जलसंधारण, संसदीय कार्य आणि मदत व पुनर्वसन), महाराष्ट्र राज्य
संस्थापक-कुलपती, भारती विद्यापीठ व भारती विद्यापीठ (अभिमत विश्वविद्यालय), पुणे
संस्थापक, डॉ. पतंगराव कदम सोनहिरा सहकारी साखर कारखाना लि., वांगी
(८ जानेवारी १९४४ - ९ मार्च २०१८)
संवेदनशीलतेने आणि सकारात्मक वृत्तीने जनसामान्यांसाठी अखंड कार्यरत राहून विकास कामांचे डोंगर उभे करणाऱ्या तुमच्या अजोड कर्तृत्वाला
विनम्र अभिवादन...
प्राचार्य, प्राध्यापक, अधिकारी वर्ग व शिक्षकेतर सेवक
भारती विद्यापीठ, पुणे | भारती विद्यापीठ (अभिमत विश्वविद्यालय), पुणे
Accredited with 'A+' Grade (2017) by NAAC
(१८० शाखा, १०,००० शिक्षक व शिक्षकेतर सेवक, ३ लाख विद्यार्थी)
Steps 090321

‘‘या पॉलिसीमध्ये, गुंतवणुकीच्या पोर्टफोलिओमधील गुंतवणुकीची जोखीम पॉलिसीधारकावर राहील.’’
Sabse Pehle Life Insurance
एकदाच बचत करा ... आणि आपल्या ध्येयांची पूर्तता करा.



ऑनलाईन सुद्धा उपलब्ध
एलआयसी ची
निवेश प्लस
योजना सं. No: 849 UIN:512L317V01
युनिट लिंक्ड, असहभागी वैयक्तिक जीवन विमा योजना
अटी लागू, तपशीलासाठी, तुमच्या एजंट/ नजीकच्या एलआयसी शाखेशी संपर्क साधा.
तुमच्या शहराचं नाव एसएमएस करा 56767474 वर
कॉल सेंटर सेवा (022) 6827 6827
एलआयसी मोबाइल ॲप "MyLIC" डाउनलोड करा
or visit www.licindia.in आम्हाला फॉलो करा: LIC India Forever
कराराच्या प्रथम पाच वर्षांमध्ये युनिटशी संबंधित पॉलिसी समाप्त केल्या जाऊ शकत नाहीत. पाचव्या वर्षाच्या अंतापर्यंत पॉलिसीधारक युनिटशी संबंधित पॉलिसीचे समर्पन करू शकत नाही. अथवा यामध्ये गुंतवलेली रक्कम आंशिक किंवा पूर्ण स्वरुपात काढू शकत नाहीत.
विक्री करण्याच्या निर्णयापूर्वी जोखीम घटक, शर्ती व अटी इ. विषयी अधिक माहितीसाठी कृपया विक्री माहितीपुस्तिका काळजीपूर्वक वाचा.

निवडीचे स्वातंत्र्य
■ बचत धनराशी : आपण कमीत-कमी १ लाख रु. किंवा आयुष्यातील मोठ्या उद्दिष्टांसाठी त्याहून अधिक रकमेची गुंतवणुक करू शकता.
■ ४ फंड विकल्प : आपण ४ फंड विकल्प - बॉन्ड, सुरक्षित, संतुलित आणि वृद्धी यांपैकी कोणताही फंड निवडू शकता.
■ निःशुल्क फंड परिवर्तनः आपण आपली धन राशी एका वर्षामध्ये चार वेळा निःशुल्क एका फंडामधून दुसऱ्या फंडामध्ये परिवर्तित करू शकता.
■ आवश्यकतेनुसार पैसे काढणे : ५ व्या वर्षानंतर आपण अंशत : पैसे काढू शकता
■ जोखीम सुरक्षा विकल्प : भरलेल्या प्रीमियमच्या १.२५ पट किंवा १० पट जोखीम सुरक्षा निवडण्याचा विकल्प
पॉलिसीचे लाभ
● गॅरंटीकृत लाभ : युनिट फंड व्हॅल्यू बरोबरच अतिरिक्त गॅरंटीकृत लाभ.*
● पॉलिसी परिपक्वता - युनिट फंड व्हॅल्यू.
पात्रता
● प्रवेशावेळी वय : किमान वय : ९० दिवस, कमाल वय : ३५ वर्षे / ७० वर्षे (निवडलेल्या जोखीम सुरक्षेच्या अनूसार)
● परिपक्वता वय : किमान वय : १८ वर्षे, कमाल वय : ५० वर्षे/८५ वर्षे (निवडलेल्या जोखीम सुरक्षेच्या अनूसार)
● पॉलिसी मुदत : १०-२५ वर्षे
LIC
भारतीय आयुर्विमा महामंडळ
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA
LIC/AR/19-20/39/MAR
बनावट फोन कॉल्स आणि बनावट / फसव्या प्रस्तावांपासून सावध रहा.
विमा पॉलिसी विक्री, बोनस जाहीर करणे किंवा प्रिमियम गुंतवणुकीमध्ये आयआरडीएआय गुंतलेली नाही. असे फोन कॉल प्राप्त होणाऱ्या लोकांनी पोलिस तक्रार दाखल करावी.
IRDAI Regn No.: 512 प्रत्येक क्षणी तुमच्या सोबत

# ‘एमपीएससी’च्या परीक्षार्थींचे टाळेबंदीमुळे हाल

## औरंगाबाद, पुणे केंद्रावर सर्वाधिक विद्यार्थी

लोकसत्ता खास प्रतिनिधी

**औरंगाबाद :** करोना संसर्ग वाढत असल्याने शनिवार आणि रविवार पूर्णतः टाळेबंदीच्या निर्णयामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची (एमपीएससी) परीक्षा देण्यासाठी शहरात येणाऱ्या हजारो परीक्षार्थीच्या अडचणीत भर पडणार आहे. रविवारी १४ मार्च रोजी सकाळी १० ते १२ आणि दुपारी ३ ते ५ या वेळेत परीक्षा होणार आहे.

गेली अनेक वर्षे ही परीक्षा झालेली नाही. औरंगाबाद आणि पुणे येथे स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी स्वतंत्र खोली करून अभ्यास करणाऱ्यांची संख्या खूप अधिक आहे. या विद्यार्थ्यांचे शिकवणी वर्ग, भोजनालये याची एक स्वतंत्र बाजारपेठ निर्माण व्हावी अशी स्थिती करोनापूर्व स्थितीमध्ये होती.

करोनाकाळात अनेक जण गावी परतले. ते पुन्हा शहरात येण्याचा वेग तुलनेने कमी होता. त्यामुळे परीक्षा देण्यासाठी अनेक विद्यार्थी औरंगाबाद आणि पुणे येथे येणार आहेत.

औरंगाबादसह काही शहरांमध्ये जनता संचारबंदी लावण्यात आली असून परीक्षेच्या दिवशी विद्यार्थ्यांना केंद्रावर पोहोचण्यासाठी आणि परीक्षा दिल्यानंतर जेवणासाठी अडचणींना सामोरे जावे लागणार आहे.

**होणार काय?** शनिवार आणि रविवारी संपूर्ण टाळेबंदी लागू केली असल्याने बाहेरगावाहून परीक्षेसाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना हॉटेल आणि भोजनालये उघडी असणार नाहीत. त्यामुळे घरून शिदोरी बांधून परीक्षेसाठी यावे लागणार आहे. औरंगाबाद जिल्ह्यात ५९ केंद्रांवर १९ हजार ६५६ परीक्षार्थींचे नियोजन करण्यात आले आहे. केवळ औरंगाबादच नव्हे तर विदर्भात आणि पुणे येथे परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनाही संसर्गाच्या वाढत्या भीतीमध्ये परीक्षा द्यावी लागणार आहे.

- राज्यात दोन लाख ६३ हजार २५६ परीक्षार्थी ७६१ केंद्रांवर परीक्षा देणार आहेत.
- वर्धा, रत्नागिरी, पालघर, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा देणाऱ्यांची संख्या कमी आहे.
- पुणे, औरंगाबाद, अहमदनगर, कोल्हापूर, नागपूर, नाशिक, सातारा, ठाणे या जिल्ह्यांमध्ये परीक्षार्थीची संख्या दहा हजारांहून अधिक आहे.
- राज्यात पुणे आणि औरंगाबाद या दोन केंद्रांवर सर्वाधिक म्हणजे अनुक्रमे ३१ हजार १२८ व १९ हजार ६५६ परीक्षार्थी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा देणार आहेत.

# कांद्याला उन्हाचा चटका

## राज्यातील सर्व बाजार समित्यांमध्ये मोठी आवक

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे/ नाशिक / ठाणे :** फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात राज्यात उन्हाचा तडाखा वाढल्याने त्याचा परिणाम नवीन गरवी कांद्यावर झाला. कांदे मोठ्या प्रमाणावर पक्व होऊ लागल्याने नवी मुंबई, नाशिकमधील लासलगाव, पुण्यातील मार्केटयार्डसह राज्यातील सर्व बाजार समित्यांच्या आवारात कांद्याची मोठ्या प्रमाणावर आवक सुरू झाली आहे. कांद्याची आवक वाढल्याने येत्या काही दिवसात कांदा दरात घट होण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

गरवी कांद्याचा (उन्हाळी कांदा) हंगाम सुरू झाला आहे. फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात उन्हाचा तडाखा कांद्याला बसल्याने कांदा पक्व झाला. मार्च महिन्यात अपेक्षापेक्षा जास्त उष्मा वाढल्याने त्याचा परिणाम कांद्यावर झाला आहे. परिणामी घाऊक बाजारात कांदा दरात घट झाली आहे, अशी माहिती श्री छत्रपती शिवाजी मार्केटयार्डातील कांदा व्यापारी रितेश पोमण यांनी दिली. वाशीतील नवी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती, पुण्यातील श्री छत्रपती शिवाजी मार्केटयार्ड, नाशिक येथील लासलगाव बाजार समिती तसेच सोलापूर, नगर येथील बाजार आवारात कांद्याची आवक मोठ्या प्रमाणावर होत आहे.

वाशी, नाशिक, नगर, सोलापूर तसेच पुण्यातील बाजार आवारात शंभर ते दीडशे गाड्यांमधून कांदा विक्रीस पाठविण्यात आला आहे. अचानक कांद्याची आवक वाढल्याने घाऊक बाजारात दहा किलो कांद्याला १८० ते २०० रुपये दर मिळाला आहे. फेब्रुवारी महिन्यात कांदा दरात घट होते. कारण नवीन गरवी कांद्याची आवक बाजारात सुरू होते. मात्र, यंदा वाढत्या उष्म्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर कांदा विक्रीस पाठविण्यास सुरुवात केली आहे. गुजरात तसेच कर्नाटकमधील हुबळी, बंगळुरू भागात कांद्याचे उत्पादन चांगले झाले आहे. महाराष्ट्रातील कांद्याला दक्षिणेकडील राज्यातून मोठी मागणी असते. मात्र, महाराष्ट्रातील कांद्याचे दर कर्नाटकातील कांद्यापेक्षा जास्त असल्याने तेथील व्यापाऱ्यांकडून महाराष्ट्रातील कांद्याला फारशी मागणी नाही. निर्यातदारांकडूनही अपेक्षेएवढी कांदा खरेदी होत नसल्याने कांदा दरात घट झाली आहे.

### वाशीत उन्हाळी कांद्याची मोठी आवक



वाशी येथील नवी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात उन्हाळी कांद्याची मोठी आवक होत आहे. सोमवारी बाजार आवारात १४३ गाड्यांमधून एकूण मिळून १३ हजार ३२९ क्विंटल कांद्याची आवक झाली आहे. घाऊक बाजारात एक किलो कांद्याची विक्री १६ ते २३ रुपये दराने केली जात आहे. मुंबई, ठाणे, डोंबिवली भागात किरकोळ बाजारात एक किलो कांद्याची विक्री ३० ते ४० रुपये दराने केली जात आहे.

### गुजरातच्या पांढऱ्या कांद्याकडे पाठ

गुजरातमधील पांढऱ्या कांद्याची आवक सध्या बाजारात होत आहे. या कांद्याला घाऊक बाजारात प्रतवारीनुसार दहा ते पंधरा रुपये असे दर मिळत आहेत. किरकोळ बाजारात गुजरातमधील पांढऱ्या कांद्याला ३० ते ४० रुपये असे दर मिळत आहेत. या कांद्यापासून भाजी नीट होत नसल्याने किरकोळ ग्राहक तसेच हॉटेल व्यावसायिकांकडून फारशी मागणी नाही. केवळ स्वस्तात कांदा मिळत असल्याने काही ग्राहक या कांद्याची खरेदी करत आहेत.

### लासलगावात दररोज तीन हजार क्विंटल कांदा विक्रीस

नाशिक येथील लासलगाव बाजार समितीत उन्हाळी कांद्याची आवक वाढत असून दररोज तीन हजार क्विंटल कांद्याची आवक होत आहे. यापुढील काळात कांद्याची आवक वाढत जाणार असल्याने दरात घट होण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे. गेल्या आठवडाभरात कांद्याचे क्विंटलमागे दर एक हजार रुपयांनी कमी झाले आहेत. एक मार्चला क्विंटलला अडीच हजार रुपये दर मिळाला होता. सोमवारी (८ मार्च) क्विंटलला दीड हजार रुपये दर मिळाले आहेत, अशी माहिती बाजार समितीकडून देण्यात आली.

> “गेल्या वर्षी अवकाळी पावसाने हळवी कांद्याच्या लागवडीवर परिणाम झाला. अवकाळी पावसाचा फटका कांद्याला बसला होता. पावसाने उघडीप दिल्यानंतर नवीन कांद्याची लागवड करण्यात आली. सध्या बाजारात नवीन कांद्याची लागवड सुरू झाली आहे. नवीन कांदा आकाराने मोठा तसेच त्याची प्रतवारीही चांगली आहे.
> – रितेश पोमण, कांदा व्यापारी, श्री छत्रपती शिवाजी मार्केटयार्ड, पुणे

# राज्यात तापमान वाढ कायम

## विदर्भात काही भागांत पावसाचा इशारा

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** राज्यात सर्वच ठिकाणी दिवसाचे कमाल तापमान सरासरीच्या पुढे असल्याने उन्हाचा चटका कायम आहे. सध्या सर्वाधिक तापमानामुळे उन्हाच्या सर्वाधिक झळा जाणवत असलेल्या विदर्भातील काही भागांत १० मार्चपासून दोन ते तीन दिवस हलक्या पावसाचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात या काळात तापमानवाढ कायम राहणार आहे.

कोरडे हवामान आणि निरभ्र आकाशाच्या स्थितीबरोबरच राज्याकडे येणाऱ्या उष्ण वाऱ्यांमुळे दिवसाच्या कमाल तापमानात वाढ झाली आहे. महाबळेश्वर आणि कोकण विभागातील काही भाग वगळता राज्यात सर्वच ठिकाणी कमाल तापमानाचा पारा ३५ अंशांच्या पुढे नोंदविला जात आहे. विदर्भात काही भागांत ४० अंशांपुढे कमाल तापमानाची नोंद होत आहे. १४ मार्चला विदर्भातील ब्रह्मपुरी येथे ४०.६ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. हे तापमान देशात उच्चांकी ठरले. बहुतांश भागांत रात्रीच्या किमान तापमानातही वाढ झाल्याने रात्री उकाडा जाणवतो आहे.

विदर्भातील कमाल तापमानाचा पारा सध्या वाढलेला आहे. मात्र, १० मार्चपासून तीन दिवस या विभागांत काही ठिकाणी हलक्या पावसाचा अंदाज आहे. त्याचप्रमाणे तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा इशारा देण्यात आला आहे. अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा आदी जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता आहे. पश्चिमी चक्रवाताचा परिणाम म्हणून देशात उत्तरेकडील भागांतही पावसाचा इशारा देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे अरबी समुद्रातील कमी दाबाच्या क्षेत्रामुळे केरळ, तामिळनाडू आदी राज्यांतही पावसाचा अंदाज आहे.

**ब्रह्मपुरी ४०.१ अंश सेल्सिअस**

विदर्भातील ब्रह्मपुरी येथे सोमवारी राज्यातील उच्चांकी ४०.१ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. विदर्भात सर्वच ठिकाणी कमाल तापमानाचा पारा ३७ ते ४० अंश सेल्सिअसच्या दरम्यान आहे. मध्य महाराष्ट्रातील पुणे, जळगाव, सातारा, सांगली, सोलापुरात कमाल तापमान ३६ ते ३८ अंशांवर आहे. कोकण विभागात मुंबई परिसरातील कमाल तापमानाचा पारा सरासरीच्या वाढून ३५ अंशांवर गेला आहे.

# बेळगावात मराठी भाषकांचा धडक मोर्चा

**कोल्हापूर :** बेळगाव महापालिकेसमोर अनधिकृतरीत्या उभारण्यात आलेल्या लाल-पिवळ्या कर्नाटक ध्वजाच्या विरोधात सोमवारी मराठी भाषकांनी बेळगावात धडक मोर्चा काढला.

या आंदोलनात सहभागी होण्यासाठी निघालेल्या कोल्हापुरातील शिवसैनिकांना कर्नाटक सीमेवरील कोगनोळी येथे पोलिसांनी रोखून धरले. बेळगाव महापालिकेसमोर कर्नाटकचा लाल पिवळा ध्वज अनधिकृतरीत्या उभारण्यात आला आहे. याला मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीने जोरदार विरोध केला असून आंदोलन सुरू केले आहे.

# मराठा आरक्षणप्रश्नी राज्य सरकारची भूमिका संदिग्ध

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



**मुंबई :** मराठा आरक्षण प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात राज्य सरकारची भूमिका संदिग्ध असल्याचा आरोप विधान सभेतील विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी केला. आरक्षण विषयक राज्य सरकारच्या समितीचे अध्यक्ष व सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण यांना मराठा आरक्षणाचे काही देणेघेणे नसून केंद्रावर खापर फोडून टीका करायची आहे, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

सर्वोच्च न्यायालयातील सोमवारच्या सुनावणीविषयी फडणवीस म्हणाले, १०२ व्या घटनादुरुस्तीनंतर राज्याला आरक्षणाचा कायदा करण्याचा अधिकार आहे का, हा मुद्दा उच्च न्यायालयातही उपस्थित झाला होता. पण मराठा आरक्षणाचा कायदा घटनादुरुस्ती आधीच केल्याने ती लागू होत नाही, हे राज्य सरकारचे म्हणणे उच्च न्यायालयाने ग्राह्य धरले आहे. हाच युक्तिवाद राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात सोमवारी करणे अपेक्षित असताना तो करण्यात आला नाही. उलट राज्य सरकारकडून ही १०२ व्या घटनादुरुस्तीची बाब निघणे, हे आरक्षणाला धोक्यात टाकण्यासारखे आहे. आर्थिक दुर्बल घटकांसाठीच्या आरक्षणाच्या मुद्द्यावर मला नोटीस काढण्यात आल्याचे ॲटर्नी जनरल नी न्यायालयात सांगितले. त्यामुळे १०२ व्या घटनादुरुस्तीच्या मुद्द्यावर सर्व राज्यांचे म्हणणे ऐकायला हवे, असे ॲटर्नी जनरलनी नमूद केले व राज्य सरकारचीही तीच भूमिका होती.

त्यामुळे राज्य सरकारनेआपले अपयश झाकण्यासाठी अपप्रचार करण्यात अजिबात अर्थ नाही, असे फडणवीस यांनी सांगितले.

## दिनदर्शिका

**मंगळवार, ९ मार्च २०२१**
भारतीय सौर १८ फाल्गुन शके १९४२. मिती माघ कृष्णपक्ष - एकादशी : १५:०३ पर्यंत
नक्षत्र : उत्तराषाढा : २०:४१ पर्यंत.
चंद्र - मकर
**मेष :** सक्षमता वाढेल.
**वृषभ :** शुभ कार्य घडेल.
**मिथुन :** तब्येत सांभाळा.
**कर्क :** आनंदी दिन.
**सिंह :** योग्य शब्दात व्यक्त व्हा.
**कन्या :** उत्तुंग भरारी माराल.
**तूळ :** घरगुती प्रश्न सुटेल.
**वृश्चिक :** भावंडांची भेट होईल.
**धनू :** आर्थिक साध्य गाठाल.
**मकर :** विचार जागृत होतील.
**कुंभ :** मोठेपणाचा ध्यास सोडा.
**मीन :** नवीन ओळख होईल.
**शुभ राशी : वृषभ, कर्क**

## नेटक्लिप्स

लोकसत्ता.COM

- महिला आणि मुलांच्या सकारात्मक विकासासाठी ‘एक नवी भरारी’
- ठाकरे सरकारच्या अर्थसंकल्पाचा अर्थ! गिरीश कुबेर यांचं परखड विश्लेषण

हे व्हिडीओ बघण्यासाठी खालील क्यूआर कोड स्कॅन करा..

## सर्वाधिक वाचकपसंती

- अग्रलेख - ‘बाबूं’च्या डोळ्यांतील कुसळ..
- ‘महाविकासआघाडीचा अर्थसंकल्प म्हणजे घोषणांचा सुकाळ, तरतुदींचा दुष्काळ’
- महाराष्ट्र अर्थसंकल्प २०२१: : दारू महागणार! अर्थव्यवस्था सावरण्याच्या उपाययोजनांमध्ये तरतूद!

### अंबानी यांच्या घराजवळील स्फोटके प्रकरण

# तपास ‘एनआयए’कडे

पीटीआय, नवी दिल्ली



**उद्योगपती मुकेश** अंबानी यांच्या मुंबईतील निवासस्थानाजवळ स्फोटकांनी भरलेली गाडी सापडली होती त्याचा तपास राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) आपल्या हाती घेतला असल्याचे सोमवारी अधिकृत प्रवक्त्याने सांगितले.

केंद्रीय गृहमंत्रालयाच्या आदेशावरून एनआयएने या प्रकरणाचा तपास आपल्या हाती घेतला. या प्रकरणीच्या गुन्ह्याबाबतची फेरनोंदणीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे, असे ‘एनआयए’ने म्हटले आहे.

उद्योगपती अंबानी यांच्या दक्षिण मुंबईतील निवासस्थानाजवळ जिलेटिनच्या २० कांड्या असलेली एक स्कॉर्पिओ गाडी २५ फेब्रुवारी रोजी आढळली होती. ही गाडी ऐरोली-मुलुंड पुलावरून १८ फेब्रुवारी रोजी चोरण्यात आली होती, असे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर या गाडीचा मालक हिरेन मनसुख यांचा मृतदेह शुक्रवारी ठाणे खाडीत सापडला. त्यानंतर या प्रकरणाला वेगळे वळण लागले.

राज्याच्या गृहविभागाने अंबानी यांच्या निवासस्थानाजवळ सापडलेली स्फोटके, मनसुख हिरेन यांचा संशयास्पद मृत्यू आणि मनसुख यांच्या ताब्यातील स्कॉर्पिओ गाडीची चोरी ही तीन प्रकरणे राज्य दहशतवादविरोधी पथकाकडे (एटीएस) शनिवारी सोपवली. त्यानुसार एटीएसने तपास सुरू केला. त्यास ४८ तासही पूर्ण होत नाहीत तोच एनआयए या केंद्रीय तपास यंत्रणेने स्फोटकांचे प्रकरण स्वतःकडे घेतले.

# सर्वच राज्यांच्या आरक्षणाची पडताळणी

(पान ३ वरून) केंद्राकडे देण्यात आला असेल तर राज्यांच्या अधिकारावर गदा येते. त्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे'', असे सिबल म्हणाले. केंद्र सरकारने मात्र राज्यांना सामाजिक आणि आर्थिक मागास प्रवर्गाखाली आरक्षण देण्याचा अधिकार नसल्याची भूमिका घेतली. तरीही, महान्यायवादी के. के. वेणुगोपाल यांनी राज्यांचे म्हणणे ऐकण्यावर सहमती दर्शवली. त्यामुळे न्या. अशोक भूषण यांनी राज्यांना नोटीस पाठविण्यात येत असल्याचे स्पष्ट केले.

राज्य सरकार आणि अन्य हस्तक्षेप याचिकाकर्त्यांच्या विनंती अर्जानंतर या प्रकरणाची सुनावणी पाच सदस्यांच्या पीठाकडे वर्ग करण्यात आली. न्या. अशोक भूषण यांनी ८ मार्चपासून १० दिवस सलग अंतिम सुनावणी घेण्याचा आदेश दिला होता. त्यानुसार सोमवारी सुनावणी घेण्यात आली, मात्र राज्यांना नोटीस बजावल्यामुळे नियमित सुनावणी लांबणीवर पडली आहे.

१०२व्या घटनादुरुस्तीचा वाद

केंद्राने ही घटनादुरुस्ती ११ ऑगस्ट २०१८मध्ये करून राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाला घटनात्मक दर्जा दिला. या घटनादुरुस्तीमध्ये अनुच्छेद ३३८ (ब)चा समावेश करण्यात आला. त्यानुसार राष्ट्रीय मागासवर्ग आयोग स्थापन करण्याचा अधिकार केंद्र सरकारला मिळाला. तसेच, अनुच्छेद ३४२ (अ) नुसार, सामाजिक आणि आर्थिक मागास प्रवर्गात कोणत्या समाजाचा समावेश करायचा याचे अधिकार राष्ट्रपती व संसदेला देण्यात आले. घटनेच्या अनुच्छेद १५ आणि १६नुसार हे अधिकार राज्यांना आहेत. हा अधिकार नाकारला तर राज्यांनी स्थापलेले मागासवर्ग आयोग निरर्थक ठरतील. त्यामुळे राज्यांच्या अधिकारांवर मर्यादा घातल्या जात आहेत का, असा प्रश्नही निर्माण झाला आहे. तसे असेल तर देशाच्या संघराज्य पद्धतीवर त्याचा व्यापक परिणाम संभवतो, असा युक्तिवाद रोहतगी आणि सिबल यांनी केला.

मराठा आरक्षणाच्या प्रश्नातील हा प्रमुख वादाचा मुद्दा ठरला असून आता केंद्र सरकारलाही भूमिका स्पष्ट करावी लागेल. राज्य सरकारने राज्यांच्या अधिकारावर केंद्राने मत मांडले पाहिजे, अशी भूमिका घेतली आहे. या संदर्भात केंद्रीय विधिमंत्री रवीशंकर प्रसाद यांच्याशी चर्चा करण्यासाठी वेळ मागितली होती, मात्र त्यांनी सहकार्य करण्यास नकार दिल्याचे राज्य सरकारतर्फे न्यायालयास सांगण्यात आले.

### आरक्षण मर्यादेचे काय?

मराठा आरक्षणाच्या निमित्ताने सर्वोच्च न्यायालयात ५० टक्के आरक्षण मर्यादेचा मुद्दाही उपस्थित झाला असून इंद्रा साहनी निकालाचा फेरविचार होऊ शकतो का आणि त्यासाठी ११ किंवा त्यापेक्षा अधिक न्यायमूर्तींच्या घटनापीठाकडे हे प्रकरण वर्ग केले जाऊ शकते का, यावरही विद्यमान न्यायपीठ आदेश देऊ शकते. मराठा आरक्षणाला आव्हान देताना याचिकाकर्त्यांनी हे आरक्षण ५० टक्के मर्यादेचे उल्लंघन करत असल्याचा युक्तिवाद केला आहे. इंद्रा साहनी प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या ९ सदस्यीय पीठाने एकूण आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा जास्त असू नये, असा महत्त्वपूर्ण निकाल दिला होता. मात्र, मराठा आरक्षणामुळे राज्यात ही मर्यादा ओलांडली जाते. महाराष्ट्रासह २७ अन्य राज्यांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण दिले जाते. शिवाय, केंद्राने आर्थिक दुर्बल सवर्णांना १० टक्के आरक्षण देण्याचा कायदा केल्यामुळेही इंद्रा साहनी निकालाचा भंग होतो, असाही युक्तिवाद केला गेला. या मुद्द्यावरही राज्यांना आपले म्हणणे मांडण्यास सांगितले पाहिजे आणि त्यांना नोटीस बजावली पाहिजे, असा मुद्दा विधिज्ञ पी. एस. पटवालिया यांनी न्यायालयात मांडला. राज्य सरकारने मराठा आरक्षणाचा खटला ११ न्यायमूर्तींच्या घटनापीठाकडे सुपूर्द करण्याचा विनंती अर्ज केला आहे.

# ‘जेईई मेन्स’मध्ये सहा विद्यार्थी अव्वल

(पान ३ वरून) सिद्धांत मुखर्जीसह राजस्थान येथील साकेत झा, दिल्ली येथील प्रवर कटारिया आणि रंजिम प्रबल दास, गुजरात येथील आदिनाथ किदांबी, चंदिगड येथील गुरमित सिंग यांना शंभर पर्सेंटाईल मिळाले आहेत. मुलींमध्ये तेलंगणाची कोम्मा शरण्या (९९.९९ पर्सेंटाईल) अव्वल ठरली.

ही परीक्षा देशभरातील ३३१ केंद्रावर घेण्यात आली. त्यापैकी नऊ केंद्र परदेशातील होती. फेब्रुवारीच्या परीक्षेसाठी ६ लाख ५२ हजार ६२७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यात १ लाख ९७ हजार ७७१ मुली, ४ लाख ५४ हजार ८५२ मुले आणि ४ तृतीय पंथीयांचा समावेश होता. त्यापैकी ६ लाख २९ हजार ९७८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यंदा इंग्रजी, हिंदी आणि गुजरातीसह पहिल्यांदाच आसामी, बंगाली, गुजराती, कन्नड, मल्याळम, मराठी, ओडिया, पंजाबी, तमिळ, तेलुगू आणि उर्दू मिळून एकूण १३ भाषांमध्ये परीक्षा घेण्यात आली. परीक्षार्थींचे सर्वाधिक प्राधान्य इंग्रजी, त्यानंतर हिंदीला होते.

### यंदापासून १/४ नकारात्मक गुणपद्धती लागू

# राज्यसेवा पूर्वपरीक्षा कमी गुणखर्चीक

लोकसत्ता प्रतिनिधी

**नागपूर :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने पूर्वपरीक्षेसाठी नकारात्मक गुणांची नवीन कार्यपद्धती जाहीर केल्याने १४ मार्चला होऊ घातलेल्या राज्यसेवा पूर्वपरीक्षेमध्ये नकारात्मक गुणांसाठी नेमक्या कुठल्या पद्धतीचा अवलंब केला जाईल, याबाबत परीक्षार्थीमध्ये संभ्रम होता. मात्र १४ मार्चला होणाऱ्या पूर्वपरीक्षेची घोषणा ही डिसेंबर २०१९ला करण्यात आली असली तरी या परीक्षेसाठी नवीन नकारात्मक पद्धती म्हणजे १/४च लागू होईल, अशी माहिती आयोगातील सूत्रांनी दिली.

राज्य लोकसेवा आयोगाने ८ सप्टेंबर २०२०ला वस्तुनिष्ठ बहुपर्यायी परीक्षांकरिता नकारात्मक गुणांच्या अंमलबजावणीसंदर्भात सुधारित कार्यपद्धती जाहीर केली. नकारात्मक गुणांसाठी सुधारित कार्यपद्धतीचे परिपत्र हे सप्टेंबर २०२० मध्ये जाहीर करण्यात आले. शिवाय सदर नकारात्मक गुणांची कार्यपद्धती यापुढे जाहीर होणाऱ्या सर्व लेखी परीक्षांच्या निकालाकरिता लागू राहील, असा स्पष्ट उल्लेख यात करण्यात आला आहे. त्यामुळे १४ मार्चला होणाऱ्या परीक्षेसाठी नवीन पद्धती म्हणजे प्रत्येक चुकीच्या उत्तराकरिता २५ टक्के किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येणार आहेत.




### होणार काय?

प्रत्येक चुकीच्या उत्तराकरिता २५ टक्के किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येणार आहेत. म्हणजे चार चुकीच्या उत्तरांसाठी एक गुण वजा केला जाईल. याआधी नकारात्मक गुणांचा नियम हा १/३ असा होता. यामुळे तीन चुकीच्या उत्तरांसाठी एक गुण वजा केला जात असे.

### टाळेबंदीत विद्यार्थ्यांची कसोटी...

**औरंगाबाद :** शनिवार आणि रविवार पूर्णतः टाळेबंदीच्या निर्णयामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा देण्यासाठी येणाऱ्या हजारो परीक्षार्थीच्या अडचणीत भर पडणार आहे. रविवारी सकाळी १० ते १२ आणि दुपारी ३ ते ५ या वेळेत परीक्षा होतील. संपूर्ण टाळेबंदीमुळे बाहेरगावाहून परीक्षेसाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना हॉटेल आणि भोजनालये उपलब्ध नसतील. त्यांना घरून शिदोरी घेऊन परीक्षेसाठी यावे लागेल.

# शहर सुविधांवर भर!

(पान ३ वरून) विधानसभेत सादर केला. शेतकरी, महिला या वर्गाला दिलासा देतानाच पायाभूत सुविधांवर भर देण्यात आला आहे. मद्यपींच्या खिशाला मोठ्या प्रमाणावर भुर्दंड पडणार आहे. देशी मद्यावर निर्मिती मूल्य २१३ टक्क्यांवरून २२० टक्के प्रस्तावित करण्यात आले आहे. याशिवाय व्हॅट ६० टक्क्यांवरून ६५ टक्के करण्यात आला.

करोना संकटामुळे २०२०-२१ या सरत्या वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजात ७० हजार कोटी रुपयांची तूट आली आहे. केंद्र सरकारकडून ३० हजार कोटी रुपये येणे अपेक्षित आहे. ३१ मार्चपर्यंत ही रक्कम न मिळाल्यास ही तूट एक लाख कोटींवर जाईल, असेही अजितदादांनी सांगितले. पुढील २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात महसुली जमा ३ लाख ६८ हजार ९८७ कोटी रुपये राहील आणि खर्च ३ लाख ७९ हजार २१३ कोटी रुपये राहून १० हजार २२६ कोटी रुपयांची महसुली तूट राहील, असा अंदाज वर्तविण्यात आला. त्याचबरोबर अर्थव्यवस्थेला गती देणे व रोजगार निर्मितीसाठी मूलभूत गोष्टींवरील खर्चासाठी ५८ हजार ७४८ कोटी रुपयांची तरतूद केल्याने राजकोषीय तूट ६६ हजार ६४१ कोटी रुपयांवर जाणार आहे.

करोनाच्या संकटात उद्योग-सेवा क्षेत्रात घसरगुंडी होऊन केवळ कृषी क्षेत्राने अर्थव्यवस्थेला आधार दिला याची जाणीव ठेवत व त्या क्षेत्रात महत्त्व ओळखत राज्यातील शेतकऱ्यांना ३ लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज शून्य टक्के व्याजाने म्हणजेच बिनव्याजी देण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली. यातून सुमारे ४० लाख शेतकऱ्यांना लाभ होणार असून पीककर्जावरील व्याज भरण्यासाठी राज्य सरकारवर सुमारे १२०० कोटी रुपयांचा बोजा पडेल, असा अंदाज आहे. त्याबरोबरच कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये जाणाऱ्या शेतकऱ्यांची सोय व्हावी यासाठी तेथील पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी २ हजार कोटी रुपयांची योजना अजित पवार यांनी जाहीर केली. कृषी विभागासाठी एकूण ३२७४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. कृषी सिंचनासाठी प्रकल्प राबवणाऱ्या जलसंपदा विभागासाठी १२ हजार ९५१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाला रस्ते विकासासाठी १२ हजार ९५० कोटी रुपये तर इमारतींसाठी ९४६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. त्यात समृद्धी महामार्गाला जोड म्हणून जालना-नांदेड द्रुतगती जोड मार्ग या २०० किलोमीटर लांबीच्या ७ हजार कोटी रुपयांच्या नवीन प्रकल्पाचा समावेश आहे.

समृद्धी महामार्गाचा नागपूर ते शिर्डी हा पहिला टप्पा १ मे रोजी सुरू होईल, असेही अजित पवार यांनी जाहीर केले. तसेच मुंबईतील पूर्व मुक्त मार्गाला विलासराव देशमुख यांचे नाव देत असल्याची घोषणाही त्यांनी केली. तर ग्रामविकास विभागामार्फत २०२१-२२ मध्ये १० हजार किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची कामे करण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले.

घरकुल योजनांसाठी ६८२९ कोटी रुपयांची तरतूदही या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. प्राचीन मंदिराच्या संवर्धन योजनेचा पहिला टप्पा अजित पवार यांनी अर्थसंकल्पात जाहीर केला.

### मंदिरांचा विकास

मंदिरांच्या विकासावर अर्थसंकल्पात भर देण्यात आला आहे. धूतपापेश्वर मंदिर (राजापूर, रत्नागिरी), कोपेश्वर मंदिर, खिद्रापूर (शिरोळ, कोल्हापूर), एकवीरा मंदिर, कार्ले (ता. मावळ, पुणे) गोंदेश्वर मंदिर (सिन्नर, नाशिक), खंडोबा मंदिर, भगवान पुरुषोत्तम मंदिर (माजलगाव, बीड), आनंदेश्वर मंदिर (दर्यापूर, अमरावती), शिव मंदिर (चार्मोशी, गडचिरोली) या ८ मंदिरांचा त्यात समावेश असून १०१ कोटी रुपयांची तरतूद त्यासाठी करण्यात आली आहे. याबरोबरच राज्यातील ४ ज्योतिर्लिंगांच्या परिसराच्या विकासासह खंडेरायाची जेजुरी, नीरा नृसिंहपूर, मोझरी, कोंडण्यपूर, आरेवाडी, अष्टविनायक, पोहरादेवी या विविध तीर्थक्षेत्रांचा व धार्मिक स्थळांच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असे अजित पवार यांनी जाहीर केले.

# राज्याच्या अर्थसंकल्पाचे बांधकाम क्षेत्राकडून स्वागत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे/पिंपरी :** नवीन घर घेताना महिला सदस्याच्या नावावर सदनिकेची नोंदणी केल्यास मुद्रांक शुल्कामध्ये एक टक्का सवलत देणाऱ्या राज्य सरकारच्या अर्थसंकल्पाचे बांधकाम क्षेत्राकडून स्वागत करण्यात आले. तरतुदी चांगल्या असल्या तरी अंमलबजावणी होणे गरजेचे असल्याचे मत विविध तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

“ जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत नवीन घर विकत घेताना कुटुंबातील महिला सदस्याच्या नावावर सदनिकेची नोंदणी केल्यास मुद्रांक शुल्कात एक टक्का सवलत मिळणार, या राज्य सरकारच्या घोषणेचे स्वागत करते. या मुळे बांधकाम क्षेत्राला तर मदत होईलच, पण हा निर्णय महिला सबलीकरणाच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल ठरेल.

■ पूनम गोखले, संचालिका, गोखले कन्स्ट्रक्शन्स

“ रिंग रोडसाठी झालेली २४ हजार कोटी रुपयांची तरतूद झाल्याने या भागातील प्राथमिक सोयीसुविधांना चालना मिळेल. पीएमआरडीएच्या आजूबाजूची गावे जोडली जाऊन त्यांचा विकास होईल. नव्या घराची नोंदणी जर घरातील महिला सदस्याच्या नावावर असेल तर सरकारने देऊ केलेली एक टक्का मुद्रांक शुल्कातील सवलत ही क्रेडाई पुणे मेट्रोने केलेली मागणी मान्य झाल्याचा आनंद आहे.

■ सुहास मर्चंट, अध्यक्ष, क्रेडाई पुणे मेट्रो

“ नवीन घर घेताना घरातील महिला सदस्याच्या नावावर नोंदणी केल्यास मुद्रांक शुल्कात एक टक्का सवलतीमुळे ग्राहकांमध्ये घर खरेदीसंदर्भात असलेला उत्साह काही काळ टिकून राहील. गेल्या काही महिन्यांमध्ये ज्या वेळी मुद्रांक शुल्कामध्ये सवलत दिली गेली तेव्हा त्याचा घर खरेदीवर सकारात्मक परिणाम दिसून आला. तसेच रिंग रोडसाठी २४ हजार कोटी रुपयांची केलेली तरतूद ही भविष्यात गृहनिर्माण क्षेत्रात नवीन संधी निर्माण करू शकेल.

■ विनीत गोयल, सह-व्यवस्थापकीय संचालक, कोहिनूर समूह

“ राज्य शासनाची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने शासन जास्त काही देऊ शकत नाही. पुण्याचे रिंग रोड आणि मेट्रोचे काम करण्याचे दिलेले आश्वासन स्तुत्य आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती बळकट करण्यासाठी चार वर्षांमध्ये दोन हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असल्यामुळे अडचणीत असलेल्या बाजार समितीला स्थिरता मिळेल.

■ वालचंद संचेती, माजी अध्यक्ष, फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ ट्रेडर्स (महाराष्ट्र)

“ महिलांसाठी आणि आरोग्य, कृषि आणि पायाभूत सुविधा या क्षेत्रांसाठी केलेल्या घोषणा स्वागतार्ह आहेत. मात्र त्याची अंमलबजावणी अधिक महत्त्वाची. करोनामुळे सूक्ष्म आणि अनौपचारिक उद्योगांना, अनौपचारिक कर्मचाऱ्यांना सर्वाधिक झळ बसली असल्याने रोजगार, उद्योग आणि पायाभूत सुविधांसाठीच्या घोषणांची लवकर अंमलबजावणी व्हायला हवी.

■ प्रशांत गिरबने, महासंचालक, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर

“ करोनाच्या पार्श्वभूमीवर शासनाकडे निधीची चणचण असल्याने शिक्षण क्षेत्रासाठी विशेष नव्या योजना आलेल्या नाहीत. पण, जिल्हा परिषदेच्या शाळांना वर्गखोल्या बांधण्यासाठी निधी, १०० आदिवासी शाळांना आदर्श शाळा म्हणून विकसित करण्यासाठी निधी देण्यात आला आहे. आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठाच्या माध्यमातून क्रीडा क्षेत्रात संशोधन, काही जुन्या देशी खेळांचे पुनरूज्जीवन यासाठी प्रोत्साहन-चालना मिळू शकेल.

■ डॉ. वसंत काळपांडे, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ

“ पुण्याकरिता क्रीडा विद्यापीठ आणि रिंग रोडसाठी केलेली तरतूद स्वागतार्ह आहे. करोना साथीच्या काळात आरोग्य खात्यासाठी भरीव तरतूद आणि नवीन सात वैद्यकीय महाविद्यालयांची स्थापना अशा तरतुदी करून काळाचे भान राखण्यात यश आले आहे.

■ मोहन जोशी, माजी आमदार

“ महाराष्ट्राचा अर्थसंकल्प औद्योगिक आणि कामगारांसाठी निराशाजनक आहे. करोनाच्या काळात फटका बसलेल्या सूक्ष्म आणि लघुउद्योजकांसाठी अनुदानाच्या स्वरूपात मदत जाहीर करायला हवी होती. कामगारांना मदतीचा हात देण्याची गरज होती. अर्थसंकल्पाने त्यांच्या पदरी निराशा पडली आहे.

■ ॲड. अप्पासाहेब शिंदे, अध्यक्ष, पिंपरी चिंचवड चेंबर ऑफ इंडस्ट्रिज कॉमर्स, सर्व्हिसेस आणि ॲग्रिकल्चर.

“ औद्योगिक वसाहतीमधील प्रदूषण कमी करण्यासाठी ३ हजार ४८७ कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात केली आहे. एक जिल्हा एक उत्पादन कार्यक्रमातंर्गत स्थानिक उद्योगातील कामगारांना कौशल्य विकास साहाय्य आणि त्यांच्या उत्पादनांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध करून देण्यास फायदेशीर वातावरण मिळेल. पुणे जिल्ह्यासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतूद केली असली तरी लघु उद्योगांना फारसा फायदा होणार नाही.

■ संदीप बेलसरे, अध्यक्ष, पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटना.

# उद्यम नोंदणीमध्ये महाराष्ट्राची आघाडी

## एकूण नोंदणीपैकी महाराष्ट्रातून सर्वाधिक २४ टक्के एमएसएमईची नोंदणी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** देशभरातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजकांसाठी बंधनकारक करण्यात आलेल्या उद्यम नोंदणीमध्ये महाराष्ट्राने देशात आघाडी घेतली आहे. नोंदणीमध्ये महाराष्ट्राचा सर्वाधिक २४ टक्के वाटा असून, त्या खालोखाल तमिळनाडू, गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश या राज्यांचा क्रमांक लागतो.

एमएसएमई विकास कायदा २००६ नुसार, उद्योजकांना आंत्रप्रेनर्स मेमोरेंडमच्या माध्यमातून नोंदणी बंधनकारक होती. मात्र त्यातील गुंतागुंत लक्षात घेऊन सरकारने २०१५ साली उद्योग आधार मेमोरेंडम (यूएएम) ही ऑनलाइन योजना सुरू केली. केंद्र सरकारने एक जुलै २०२० पासून एमएसएमईच्या व्याख्येत बदल केले. एमएसएमई मंत्रालयाने सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या वर्गवारी, नोंदणीसाठी एक जुलै २०२० पासून उद्यम नोंदणी ही नवी प्रक्रिया सुरू केली. त्यानुसार बदललेली नोंदणी प्रक्रिया उद्यम नोंदणी नावाने ओळखली जाऊ लागली. त्यात एमएसएमईना उद्यम संकेतस्थळावर निःशुल्क नोंदणी करून प्रमाणपत्र मिळते. एमएसएमई मंत्रालयाने डिसेंबर २०२० पर्यंतच्या नोंदणीची आकडेवारी संकेतस्थळावर जाहीर केली आहे. देशभरातील एमएसएमईनी केलेल्या नोंदणीच्या आकडेवारीचा आढावा घेतल्यास १३ लाख ४७ हजार ४९ एमसएमईनी नोंदणी केली आहे. त्यापैकी १२ लाख ४६ हजार ६२६ सूक्ष्म, ८५ हजार ६२९ लघु आणि १४ हजार ७९४ मध्यम उद्योग आहेत.

महाराष्ट्रातील ३ लाख २७ हजार ८५५ उद्योगांनी (२४ टक्के) नोंदणी केली आहे. राज्यातील ३ लाख १० हजार ४१३ सूक्ष्म उद्योगांनी,

१४ हजार ७८० लघु उद्योगांनी आणि २ हजार ६६२ मध्यम उद्योगांचा समावेश आहे. तर तमिळनाडूतील १ लाख ५९ हजार ४९० (१२ टक्के), गुजरातमधील १ लाख २१ हजार ९३१ (९ टक्के), राजस्थानमधील १ लाख ११ हजार ७२४ (८ टक्के), उत्तर प्रदेशातील १ लाख २ हजार १३९ (८ टक्के) एमएसएमईनी नोंदणी केल्याचे दिसून येत आहे.

### पुणे पहिल्या स्थानी

देशात सर्वाधिक नोंदणीमध्ये पुणे जिल्हा पहिल्या स्थानी आहे. एकूण नोंदणीच्या ३.९ टक्के नोंदणी पुणे जिल्ह्यातून झाली आहे. पुण्यानंतर ठाणे (२.९ टक्के), बेंगळूरू-शहर (२.३ टक्के), जयपूर (२.३ टक्के), अहमदाबाद (२.३ टक्के) असा क्रम आहे. तर पहिल्या दहा जिल्ह्यांमध्ये पुणे, ठाणे, मुंबई उपनगर आणि मुंबई या जिल्ह्यांचा समावेश होतो.

“ शासकीय योजनांचे फायदे घेण्यासाठी एमएसएमईनी उद्यम नोंदणी केली पाहिजे. तसेच उद्यम नोंदणी असल्यास भविष्यात बँकांकडून कर्ज प्रक्रिया सुलभ होऊ शकेल. नोंदणीमध्ये महाराष्ट्राची, पुण्याची आघाडी असणे आनंददायी आहे. उद्यम नोंदणीच्या जनजागृतीसाठी एमएससीआयएने पुढाकार घेतला आहे.

– प्रशांत गिरबने, महासंचालक, एमसीसीआयए

# पुण्यात ७५३, पिंपरीत ४०१ नवे रुग्ण

## जिल्ह्यात १३ रुग्णांचा मृत्यू

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सोमवारी जिल्ह्यात करोनाच्या १४१२ नवीन रुग्णांची नोंद झाली. त्यामुळे जिल्ह्यातील रुग्णसंख्या चार लाख २० हजार ८७७ एवढी झाली आहे. दिवसभरात पुणे जिल्ह्यातील १३ रुग्णांचा करोनाने मृत्यू झाला असून, त्यामुळे जिल्ह्यातील मृतांची एकूण संख्या ९३१६ झाली आहे.

दिवसभरात आढळलेल्या १४१२ रुग्णांपैकी ७५३ रुग्ण पुणे शहरातील आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रात ४०१ जणांना करोनाची लागण झाली आहे. पुणे जिल्ह्याच्या उर्वरित भागात २५८ नवे रुग्ण आढळले आहेत. पुणे शहरातील सात, पिंपरी चिंचवडमधील तीन आणि उर्वरित जिल्ह्यातील तीन रुग्णांचा करोनाने मृत्यू झाला आहे.

पुणे शहरात ७०० रुग्ण बरे होऊन घरी गेले असून शहरातील बरे झालेल्या रुग्णांची संख्या १,९७,४५१ झाली आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील ४१४ रुग्ण सोमवारी बरे होऊन घरी गेले.

- ■ पुणे - ७५३ नवे रुग्ण, सात मृत्यू
- ■ पिंपरी-चिंचवड - ४०१ नवे रुग्ण, तीन मृत्यू
- ■ उर्वरित जिल्हा - २५८ नवे रुग्ण, तीन मृत्यू

# क्रीडा विद्यापीठासाठी अर्थसंकल्पात तरतूद

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** पुण्यात साकारणाऱ्या देशातील पहिल्या क्रीडा विद्यापीठासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे ‘ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट’ अशी ओळख असलेल्या पुण्यातील विद्यापीठांमध्ये आता क्रीडा विद्यापीठाचीही भर पडणार आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोमवारी राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. नुकत्याच झालेल्या अधिवेशनात क्रीडा विद्यापीठाच्या विधेयकाला मान्यता मिळाली होती. त्या पाठोपाठ आता अर्थसंकल्पातही स्थान मिळाले आहे. त्यामुळे पुढील काही काळात प्रत्यक्ष विद्यापीठाच्या उभारणीला गती मिळू शकणार आहे. सुरुवातीला बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलाला जोडूनच क्रीडा विद्यापीठ साकारणार आहे. क्रीडा विज्ञान, क्रीडा तंत्रज्ञान आणि क्रीडा प्रशिक्षण अभ्यासक्रम या विद्यापीठाद्वारे राबवले जातील.

गेल्या काही वर्षांमध्ये पुण्यात राज्य विद्यापीठासह खासगी विद्यापीठे आणि अभिमत विद्यापीठे मिळून जवळपास १५ विद्यापीठे निर्माण झाली आहेत. त्यात आता क्रीडा विद्यापीठाची भर पडणार आहे. या क्रीडा विद्यापीठाच्या माध्यमातून राज्यात क्रीडा संस्कृती निर्माण करण्यासह क्रीडा क्षेत्रात संशोधन, नवे खेळाडू घडवण्यासाठी चालना मिळू शकणार आहे.

### अर्थसंकल्पात पुण्यासाठीच्या तरतुदी...

- ■ बर्ड फ्ल्यूसारख्या आजारांना आळा घालण्याच्या दृष्टीने जैव सुरक्षा प्रयोगशाळेची उभारणी
- ■ पुणे, पिंपरी चिंचवडमधील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी वर्तुळाकार मार्ग (रिंग रोड)
- ■ पुणे-नाशिक मध्यम-अतिजलद रेल्वे मार्ग
- ■ पुणे शहरासाठी आंतरराष्ट्रीय विमानतळ
- ■ जागतिक दर्जाचे साखर संग्रहालय
- ■ सारथी आणि बार्टी या दोन्ही संस्थांसाठी १५० कोटींची तरतूद
- ■ साखर संग्रहालयाची उभारणी

# ‘ईडी’कडून अनिल भोसलेंसह चौघांना अटक

## शिवाजीराव भोसले बँक गैरव्यवहार प्रकरण

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** शिवाजीराव भोसले बँक गैरव्यवहार प्रकरणात सक्तवसुली अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) बँकेचे संचालक आमदार अनिल शिवाजीराव भोसले यांच्यासह चौघांना अटक केली.

याप्रकरणी बँकेचे संचालक आमदार अनिल शिवाजीराव भोसले, संचालक सूर्याजी पांडुरंग पिसाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी तानाजी दत्तू पडवळ, मुख्य लेखापाल शैलेश संपतराव भोसले यांना अटक करण्यात आली. गैरव्यवहार प्रकरणी शिवाजीराव भोसले सहकारी बँकेची ‘ईडी’ कडून चौकशी करण्यात येत होती. ‘ईडी’ च्या पथकाने १५ जानेवारी रोजी शिवाजीनगर येथील वाकडेवाडी परिसरात असलेल्या बँकेच्या मुख्य कार्यालयावर छापा टाकला होता. ईडीकडून या प्रकरणात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ७१ कोटी रुपयांच्या गैरव्यवहार प्रकरणात ईडीच्या पथकाकडून छापे टाकून महत्त्वाची कागदपत्रे तसेच डिजिटल पुरावे जप्त करण्यात आले आहेत.

दरम्यान, गैरव्यवहार प्रकरणात फेब्रुवारी २०२० मध्ये पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने भोसले, पडवळ, जाधव यांना अटक केली होती. या कारवाईत भोसले यांच्या महागड्या मोटारी जप्त करण्यात आल्या होत्या.

# शिक्षणाच्या विकासासाठी विचार गटाची नियुक्ती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राज्याच्या शिक्षण क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी विचार गट राज्य शासनाने नियुक्त केला आहे. या विचार गटात राज्यातील उपक्रमशील शिक्षक आणि अधिकाऱ्यांचा समावेश असून, शिक्षण क्षेत्रात आवश्यक सुधारणा, योजनांची शिफारस या विचार गटाकडून करण्यात येईल.

राज्याचे शिक्षण आयुक्त विशाल सोळंकी यांच्या अध्यक्षतेखालील या विचार गटामध्ये राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषदेचे संचालक दिनकर टेमकर, राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषदेचे प्रभारी प्राचार्य विकास गरड, आंतरराष्ट्रीय पुरस्कारप्राप्त शिक्षक रणजितसिंह डिसले, बालाजी जाधव, संदीप गुंड, भाऊसाहेब चासकर, वाबळेवाडी शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय वारे यांच्यासह राज्यभरातील उपक्रमशील आणि प्रयोगशील शिक्षक, शिक्षणाधिकारी यांचा समावेश आहे.

विचार गटाअंतर्गत उपगटांची स्थापना करून बैठका घेण्यात याव्यात, शिक्षण क्षेत्रातील आवश्यक सुधारणा आणि योजनांची शिफारस या विचार गटाकडून शासनाला करण्यात यावी, असे शासन निर्णयाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.

# मार्केटयार्डातील वाय आकाराच्या उड्डाणपुलाची निविदा रद्द

## विरोधामुळे महापालिकेचा निर्णय

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** मार्केटयार्डातील इंग्रजी वाय अक्षराप्रमाणे प्रस्तावित करण्यात आलेल्या उड्डाणपुलाच्या कामाची निविदा रद्द करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. व्यापारी वर्गाचा विरोध असल्यामुळे महापालिका प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. महापालिकेच्या प्रकल्प विभागाने त्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त कार्यालयाला दिला आहे.

उड्डाणपुलाच्या आराखड्यावर मार्केटयार्डातील व्यापारी आणि नागरिकांनी आक्षेप नोंदविला होता. उड्डाणपूल गंगाधाम चौकापर्यंत वाढविण्यात यावा, अशी मागणीही त्यांच्याकडून करण्यात येत होती. बाजार समिती, मार्केटयार्डातील व्यापारी, नागरिक आणि अधिकारी यांची एकत्रित बैठकही स्थानिक आमदार माधुरी मिसाळ यांनी काही महिन्यांपूर्वी घेतली होती. मात्र महापालिकेच्या प्रकल्प विभागाने उड्डाणपुलासाठी काढलेली निविदा रद्द करण्याचा प्रस्ताव आयुक्त विक्रम कुमार यांना दिला आहे. त्यावर येत्या काही दिवसांत निर्णय होण्याची शक्यता आहे.

वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महापालिकेकडून डायस प्लॉट ते गिरिधर भवन चौक या दरम्यान उड्डाणपूल उभारण्याचे काम सुरू आहे. हा उड्डाणपूल ज्या ठिकाणी संपतो, तिथून १०० मीटर अंतरावर वखार महामंडळ चौक आहे. नेहरू रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या जड वाहनांची संख्या मोठी असल्यामुळे उड्डाणपुलानंतरही वखार महामंडळ चौकातील वाहतूक कोंडीचा प्रश्न कायम राहिल, असे आक्षेप घेण्यात येत होते. या चौकातून गंगाधाम रस्त्यामार्गे बिबवेवाडी, कोंढव्याकडे आणि सातारा रस्त्याकडे जाणाऱ्या वाहनांची संख्याही मोठी असल्यामुळे डायस प्लॉट ते गिरिधर भवन चौकादरम्यानच्या उड्डाणपुलाची लांबी गंगाधाम चौकापर्यंत वाढविण्यात यावी, अशी मागणी स्थानिक व्यापारी वर्गाकडून करण्यात आली होती.

त्यामुळे महापालिकेने वखार महामंडळ चौकापासून वाय आकाराचा उड्डाणपूल उभारण्याचे नियोजन केले होते. त्यासाठी निविदा प्रक्रियाही राबविण्यात आली होती. स्थायी समितीने निविदेनुसार कामे करण्यास मान्यता दिली होती. मात्र पुलाच्या आराखड्यावर आक्षेप येत असल्यामुळे महापालिका प्रशासनाकडून निविदा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसा प्रस्ताव प्रकल्प विभागाने आयुक्त विक्रम कुमार यांना दिला आहे. दरम्यान, निविदांना मान्यता मिळाली असली तरी अद्यापही प्रत्यक्ष कार्य आदेश देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे निविदा रद्द करण्यात कोणतीही अडचण येणार नाही, असा दावा वाहतूक प्रकल्प विभागाकडून करण्यात आला आहे.




# बँकिंग क्षेत्रातील तज्ज्ञ विजय भावे यांचे निधन



**पुणे :** जनता सहकारी बँक लि. पुणेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी, बँकिंग क्षेत्रातील तज्ज्ञ विजय पुरुषोत्तम भावे (वय ७८) यांचे हृदयविकाराने नुकतेच निधन झाले. त्यांच्यामागे दोन मुलगे, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

भावे यांच्या पार्थिवावर रविवारी (७ मार्च) वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. या प्रसंगी जनता सहकारी बँक लि.पुणेचे अध्यक्ष माधव माटे, मुख्य कार्यकारी अधिकारी जयंत काकतकर, संचालक मंडळ सदस्य तसेच कर्मचारी वर्ग उपस्थित होता. भावे यांनी ३५ वर्ष स्टेट बँक ऑफ इंडियात विविध पदांवर काम केले. स्टेट बँकेतून वरिष्ठ अधिकारी पदावरून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी जनता सहकारी बँकेत संचालक म्हणून काम पाहिले. त्यानंतर त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारीपद भूषविले. तज्ज्ञ संचालक म्हणून त्यांनी चौदा वर्ष काम पाहिले. या काळात त्यांनी परिश्रम घेऊन बँकेला संकटातून बाहेर काढले. बँकेला प्रगतिपथावर नेण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली. त्यांनी रुपी सहकारी बँकेच्या प्रशासक मंडळात सदस्य म्हणूनही काम केले होते.

**अभ्युदय को-ऑप. बँक लि.**
(मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक)
के.के. टॉवर, ६३, जी. डी. आंबेकर मार्ग, परेल व्हिलेज, मुंबई - ४०० ०१२.

**सूचना**

आमचे सर्व ग्राहक, ज्यांनी त्यांचे केवायसी (KYC) आणि प्रोफाईल (PROFILE) अद्ययावत करण्याकरिता कागदपत्रे जमा केलेली नाहीत त्यांनी बँकेच्या नोंदी अद्ययावत करण्याकरिता त्यांचा नवीन फोटो, ओळखीचा पुरावा, पत्याचा पुरावा आणि पॅन क्र./फॉर्म ६० बँककडे त्वरित जमा करावेत अशी त्यांना पुन्हा एकदा विनंती करण्यात येत आहे.

ज्या ग्राहकांचे खाते वापर न केल्यामुळे **“निष्क्रीय” “DORMANT”** झाले असेल त्यांनी त्यांचे खाते सुरू करण्याकरिता शाखा अधिकाऱ्यांकडे संपर्क साधावा आणि नवीन फोटो आणि केवायसी कागदपत्रे (ओळखीचा पुरावा आणि पत्याचा पुरावा) सादर करावीत.

खात्यामध्ये २ वर्षांपेक्षा जास्त कालावधीकरिता कोणताही व्यवहार झालेला नसल्यास (ग्राहक तसेच त्रयस्थ पक्षाद्वारे क्रेडिट किंवा डेबिट व्यवहार झालेला नसल्यास) असे बचत/चालू खाते निष्क्रीय समजण्यात येईल.

सर्व केवायसी पूर्तता न केलेली खाती आणि निष्क्रीय खात्यांवर आम्ही **“डेबिट फ्रीझ”** लागू करणार आहोत.

तपशील अद्ययावत करण्याकरिता कृपया तुमचा मोबाईल/दूरध्वनी/ई-मेल आयडी सादर करावा. ग्राहकांना उत्तमोत्तम सेवा देण्यासाठी आपल्या सहकार्याची अपेक्षा आहे.

९ मार्च, २०२१, मुंबई
आदेशावरुन
सही/-
व्यवस्थापकीय संचालक






# लोकमानस

loksatta@expressindia.com

## ‘नागरिकां’ची प्रतिष्ठा कुठे आहे?

**‘कोणाची प्रतिष्ठा** पणाला?’ हा महेश सरलष्कर यांचा लेख (लालकिल्ला- ८ मार्च) वाचला. पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणूक केरळ, तमिळनाडू इत्यादी राज्यांतील निवडणुकांपेक्षा अधिक प्रतिष्ठेची झाली आहे, यात शंका नाही. भाजपच्या दृष्टीने ग्रामपंचायतीपासून लोकसभेपर्यंत प्रत्येक निवडणूक इर्षेने आणि त्वेषाने, अमाप ऊर्जेने आणि तनमनधन पणाला लावून खऱ्या अर्थाने ‘लढविली’ जाते. मिरवणुका- सभा, आरोप-प्रत्यारोप यांच्या गदारोळात विधिनिषेध वाहून जात असतो. पश्चिम बंगाल याला अपवाद नाही. अपवाद फक्त भाजपचा. त्यांच्याच पद्धतीने, त्याच आक्रस्ताळेपणाने सामना करणाऱ्या तृणमूल काँगेसचा. विरोधी पक्षातील, राजकीय नेत्यांची भरती किंवा नट- खेळाडू इत्यादी गैरराजकीय मेगा भरती यांचा फार्स वातावरणनिर्मिती करत आहे. त्याच्या जोडीला हातघाईचे प्रयोग चालू आहेत. लोकांनीच आता असे उथळ आणि उठवळ प्रचार आपल्या सकारात्मक कृतींनी नाकारले पाहिजेत. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे अशा हिंसक, विधिनिषेधशून्य गदारोळात राजकीय पक्षांचे कार्यक्रम चर्चेत येत नाहीत. त्यांच्या कारभाराची, कामगिरीची चर्चा होत नाही. तसेच पुढील कामाची दिशा समजत नाही.

निवडणूक जाहीरनामे हास्यास्पद ठरत आहेत. आश्वासने ‘जुमलेबाजी’च्या पातळीवर आली आहेत. राजकीय नेते निवडणुकीतील आश्वासने पाळण्यासाठी नसतात, असे बिनधास्तपणे सांगतात. लोकांनी आश्वासने आणि जाहीरनामे याबद्दल गंभीरपणे प्रश्न उपस्थित केले पाहिजेत. ‘नागरिक’ बनल्याखेरीज दुसरा मार्ग नाही. आर्थिक परिस्थिती, बेरोजगारी, विषमता, महागाई- पेट्रोल डिझेल यांची भाववाढ, करोना साथीची हाताळणी अशा विषयांवर चर्चा न होता- हिंदुत्ववाद, मंदिर वगैरे विषयांवर चर्चा/घोषणाबाजी होणे सामान्य लोकांच्या हिताचे नाही. म्हणून लोकांनीच विचार केला पाहिजे. धर्म, मंदिर-मशीद यांचा किंवा धार्मिक चिन्हांचा वापर हा पक्षांना अधिक आक्रमक, हिंसक बनवतो. असा वापर राज्यघटनाबाह्यच आहे. पण कायद्याच्या कसोटीवर तो सिद्ध करणे कठीण असू शकते. अशा वेळी लोकांनीच अशा पक्षांच्या प्रचाराची दखल घेतली पाहिजे.

या गोष्टी प्रथमतः आदर्शवादी/ स्वप्ने वाटतील; पण कधीतरी नागरिक होण्यासाठी त्या आवश्यक आहेत. पाच वर्षातून एकदा आपला मतदानाचा हक्क जबाबदारपणे वापरणे हे कर्तव्य आहे.

– **अनिल केशव खांडेकर**, पुणे

## ‘परिवर्तन’च्या प्रचारात वर्तनाचा विसर...

**पश्चिम बंगालमधील** ब्रिगेड परेड मैदानावर पंतप्रधानांच्या सभेच्या निमित्ताने भाजपने जोरदार शक्तिप्रदर्शन केले; पण तेथील निवडणूक सोपी नाही हे मोदींच्या भाषणाच्या वृत्तावरून (लोकसत्ता, ८ मार्च) लक्षात येते. या सभेतून मोदींनी ममता बॅनर्जींना लक्ष्य केले. ममतांकडून जनतेचा विश्वासघात झाल्याचा आरोप केला आणि आपल्या भाच्याचे हित पाहिले असाही उल्लेख केला. आम्ही बंगालमध्ये परिवर्तन आणू असेही मोदीजी म्हणाले. या नकारात्मक प्रचारासोबत, त्यांनी याच भाषणात एक सकारात्मक उल्लेख केला तो ९० लाख गॅसजोडण्या दिल्या, याचा. पण त्या गॅसची सबसिडी कुठे गेली आणि आता गॅसची किंमत कुठे पोहोचली? तो आता गरिबांना परवडतो का? यावर त्यांनी बोलण्याचे टाळले. ‘मोदी आपल्या उद्योजक मित्रांना मदत करतात’ या विरोधकांच्या टीकेला उत्तर देताना ते म्हणाले की १३० कोटी जनताच माझे मित्र आहेत. मात्र त्यांनी काही निवडक उद्योगपतींना सहायक होतील असे कित्येक निर्णय घेतले आहेत.

– **लक्ष्मण ज्ञानदेव पौळ**, बार्शी (सोलापूर)

## ... तर यंदा सत्तांतर अटळ...

**‘कोणाची प्रतिष्ठा** पणाला?’ हा महेश सरलष्कर यांचा लेख (८ मार्च) वाचला. दशकभराच्या वर्चस्वानंतर ममता बॅनर्जींच्या सिंहासनाला धक्का देण्यासाठी भाजपने कंबर कसली आहे. काँग्रेस, आप, शिवसेना यासारख्या पक्षांनी दीदींना आपला पाठिंबा जाहीर करून भाजपसमोरील आव्हान तगडे केले आहे. असे असले तरीही प्रतिष्ठेच्या निवडणुकीत ममतादीदींना प्रतिस्पर्ध्याची धास्ती असणार हे निश्चित! राज्यात भाजप कार्यकर्त्यांवर झालेल्या हल्ल्यांमुळे मिळणारी सहानुभूती, ममता यांची साथ सोडून भाजपच्या गोटात गेलेले खंदे समर्थक, मिथुन चक्रवर्ती यांनी ऐन निवडणुकीच्या तोंडावर भाजपमध्ये केलेला प्रवेश आणि मोदींच्या सभांचा करिष्मा चालला तर यंदा सत्तांतर अटळ आहे.

– **श्रीकांत शंकरराव इंगळे**, पुणे

## अपयश नाही, धोरण रोगट नाही; फक्त तांत्रिक चूक!

**‘कोणाची प्रतिष्ठा** पणाला?’या अग्रलेखात (८ मार्च) स्पेक्ट्रम लिलावात अपेक्षेपेक्षा कमी रक्कम सरकारला मिळाली हे केंद्र सरकारचे अपयश म्हटले आहे. लिलाव उघड आणि निष्पक्षपातीपणे झाला असेल तर येणारी रक्कम सरकारचे अपयश कसे म्हणता येईल?

तसेच सरकारला कमी रक्कम देऊन ग्राहकांना अवाच्या सवा बिले आकारून खाजगी कंपन्या अवाजवी नफा कमावत आहेत, अशीही परिस्थिती नाही. भारतातील मोबाइल सेवांचे दर अन्य बहुतेक सर्व राष्ट्रांतील दरांपेक्षा कमी आहेत. अपेक्षा जास्त ठेवल्या गेल्या ही अंदाजातली तांत्रिक चूक आहे पण ते रोगट धोरण म्हणता येणार नाही. पुढच्या वेळी अपेक्षा कमी ठेवून लिलावात जास्त रक्कम मिळाली तर तो विजय मानणे हेही चुकीचे ठरेल. दुसरी गोष्ट ‘एजीआर’ची. यातील पूर्वलक्ष्यी प्रभावाची वसुली देशातील सर्वात शहाणी न्यायसंस्था योग्य ठरवत असेल तर आपण त्यास रोगट कसे म्हणू शकतो? तसेच नियामक एका कंपनीच्या बाजूने पक्षपात करत आहेत हे शेंबडे पोर सांगू शकते एवढ्या उघडपणे होत असेल, तरीही न्यायालयाचे दरवाजे उघडे आहेत. तेथून यावर आळा घालता येईल.

– **श्रीराम बापट**, दादर (मुंबई)

## राज्यांना वाटा नाकारणारे केंद्र...

**‘आत्मनिर्भर भारत’ची** घोषणाबाजी करतानाच, भारतीय संघराज्य ज्यांच्यामुळे बनले त्या राज्यांना पंगू बनविण्याचे धोरण सध्या केंद्र सरकारच्या पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या किमती पाहता दिसत आहे. कच्च्या तेलाच्या बॅरलची किंमत जागतिक बाजारपेठेत १०६.८५ डॉलर असताना पेट्रोलचे भाव ७१.४१ रुपये प्रति लिटर होते; मग आता बॅरलची किंमत ५३ डॉलर्स असताना पेट्रोलने मात्र शंभरी गाठलेली आहे. हे आंतरराष्ट्रीय गणित केंद्रानेच सांगितले तर खूप बरे होईल... उगाच रोज पेट्रोलपंपावर केंद्राच्या नावाने का बरे शंख फुकायचा?

पेट्रोलियम उत्पादनाच्या एकूण ११ टक्के विक्री महाराष्ट्रातूनच- म्हणजेच देशातील एकंदर १,९०,६२६ हजार मेट्रिक टनपैकी २०,७९६ मेट्रिक टन एकट्या महाराष्ट्रातून - झाली. त्यातून राज्याला मिळणार केवळ १२०० कोटी रुपये. ‘जीएसटी’च्या माध्यमातून याआधीच केंद्राने सर्व राज्यांना लुळे-पांगळे केले आहे. आता, पेट्रोल आणि डिझेलच्या करांमुळे राज्यांची आर्थिकदृष्ट्या नाकेबंदी करण्याचा घाट घातलेला आहे. केंद्र प्रति लिटरमागे ३२ रुपये ९० पैसे करस्वरूपात घेते आणि राज्यांना १ रुपया ४० पैसे ‘आत्मनिर्भर होण्यासाठी’ दान देऊन ३१ रुपये ५० पैसे स्वतःला ठेवते. ज्या करांमार्फत राज्यांना हिस्सा द्यावा लागत नाही ते कर वाढवायचे आणि ज्या करांच्या माध्यमातून राज्यांना वाटा द्यावा लागतो ते कर वाढवायचे नाहीत, हे राज्यांची आर्थिक कोंडी करण्याचे धोरण केंद्राने आखलेले आहे.

आर्थिक धोरणाच्या सर्व पातळीवर अपयशी ठरलेल्या केंद्राचे अर्थचक्र दिवसेंदिवस रुतत चालले आहे. त्यात राज्यांची होणारी फरफट ही खरोखरच ‘आत्मनिर्भरते’कडे जाणारी आहे काय?

– **दत्तप्रसाद शिरोडकर**, मुलुंड

## राज ठाकरे यांचे विधान प्रसंगोचितच!

**‘या निधडेपणाचा** अभिमान बाळगायचा?’ (लोकमानस- ८ मार्च), या पत्रात राज ठाकरे हे मुखपट्टी घालत नाहीत यावर रोख आहे. सगळ्यांनी मुखपट्टी लावलेली असताना एकाने जर मुखपट्टी लावली नाही तर काहीही फरक पडत नाही- आणि हे सत्य नाकारता येणार नाही. दुसरे म्हणजे जे जे रुग्ण करोनाबाधित आहेत ते मास्क लावतच नव्हते असे नाही, तरीसुद्धा त्यांना करोना झाला की नाही? आज लोक मास्क लावतात ते करोनाच्या नव्हे, तर दंडाच्या भीतीपोटी! आतापर्यंत फक्त मुंबईत विनामास्क फिरणाऱ्यांकडून कोट्यवधी रुपयांचा महसूल वसूल करण्यात आला असेल, असा माझा अंदाज आहे! आपण ज्या अनेक फॅन्सी प्रकारच्या- कपड्यांना मॅचिंग अशा- मुखपट्ट्या वापरतो त्या खरोखरच ‘करोनारोधक’ आहेत?कुठल्या सरकारमान्य प्रयोगशाळेत आणि आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि प्रादेशिक पातळीवर ज्या वैद्यकीय मानद संस्था आहेत त्यांच्याकडून या मुखपट्ट्या प्रमाणित केलेल्या आहेत? राज ठाकरे यांनी लोकांच्या मनातील भावनाच बोलून दाखवली. त्यामुळे ‘सर्वांनी मास्क घातलाय ना, म्हणून मी घातला नाही...’ हे विधान बेजाबदार नाही तर प्रसंगोचितच ठरते!

– **अनिरुद्ध गणेश बर्वे**, कल्याण पश्चिम

## लालजी देसाई गायक, तबल्यावर शशी झावबा

‘सममित श्रीकांत’ या विशेष संपादकीयातून (८ मार्च) श्रीकांत मोघे यांच्या तसेच वाऱ्यावरची वरात व रविवार सकाळ या सदाबहार अप्रतिम कलाकृतींच्या आठवणी ताज्या झाल्या. सुंदर आढावा घेणाऱ्या या लेखात तपशिलाची एक चूक झाली आहे- रविवार सकाळ या नाटकात तबल्यावर लालजी देसाई असत असा उल्लेख आला आहे. लालजी देसाई गायक होते व ते या नाटकात गायक म्हणूनच, ‘देसाई मास्तर’ या नावानेच काम करीत असत. तबल्यावर शशी झावबा हे असत.

– **राजेंद्र करंबेळकर**, निगडी (पुणे)

## आत्मचरित्रही वाचनीय...

‘ **सममित श्रीकांत!**’ हे विशेष संपादकीय यथोचित शब्दांतले आहे. कसदार अभिनयासह गायन, वादन, वाचन असे अनेक छंद श्रीकांत मोघे यांनी जोपासले. ‘नट रंगी रंगलो’ या आत्मचरित्रात मोघे यांनी आपल्या कारकीर्दीचे रसाळ वर्णन केले आहे. हे आत्मचरित्र आवर्जून वाचण्या सारखे आहे.

– **सुरेश पटवर्धन**,कल्याण

# काँग्रेसची ‘अघोषित आणीबाणी’

**आणीबाणी चूकच असल्याचे सांगताना, देशातील सांविधानिक संस्थांवर कब्जा करण्याचा प्रयत्न रा. स्व. संघ परिवार करीत असल्याचा आरोप काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी अलीकडेच केला. मात्र नेहरू-गांधी परिवाराची मानसिकता हुकूमशाहीचीच असल्याचे दाखले अनेक आहेत आणि काँग्रेसी सत्ताकाळातील एकूण वाटचालही नेहमीच आणीबाणीसारखी राहिली, त्यामुळे राहुल यांचे विधान विश्वासार्ह ठरत नाही...**

पहिली बाजू

केशव उपाध्ये

**काँग्रेसचे ‘युवराज’** राहुल गांधी यांना अलीकडेच अचानक आणीबाणीचे स्मरण झाले. आणीबाणी ही चूकच होती मात्र आणीबाणीत आम्ही गैरफायदा घेतला नाही, असे विधान त्यांनी अत्यंत ‘विचारपूर्वक’ केले आहे. आणीबाणीबद्दल माफी मागून आपण किती उदारमतवादी आहोत, हे दाखविण्याचा त्यांचा हेतू आहे. यानिमित्ताने त्यांना आणीबाणी वगैरे घटना किमान माहिती तरी आहेत याचं माफक समाधान वाटलं; यानिमित्ताने आणीबाणी, काँग्रेस, अभिव्यक्तिस्वातंत्र्य हे सारेच मुद्दे आता पुन्हा चर्चेत आणून राहुल गांधी यांनी काँग्रेसी कारकीर्दीच्या काळ्या इतिहासालाच उजाळा दिला आहे. आणीबाणीमध्येही काँग्रेसने घटनात्मक संस्था आपल्या कब्जात ठेवण्याचा प्रयत्न केला नव्हता, असेही युवराज म्हणतात, त्यामुळे त्या इतिहासाचा आढावा घेणे गरजेचे आहे.

इतिहासावर नजर टाकली तर काँग्रेसने खरे म्हणजे अधिकृतपणे एकदाच आणीबाणी लादली पण स्वतंत्र भारतातील काँग्रेसी सत्ताकाळातील एकूण वाटचालही नेहमीच आणीबाणीसारखी राहिली याचे अनेक दाखले देता येतील. अगदी उदारमतवादाचे खंदे पुरस्कर्ते मानले जाणारे पंडित नेहरूंपासून ही परंपरा सुरू होते.

१९५०-५१ मध्ये नेहरू हे लोकप्रियतेच्या शिखरावर होते. विरोधकांची शक्ती मर्यादित होती. पण तरी नेहरूंनी ‘ऑर्गनायझर’ साप्ताहिकावर सेन्सॉरशिप लादली होती. पश्चिम बंगालमध्ये मोठ्या प्रमाणात निर्वासितांचे लोंढे येत होते, त्याबाबतीत तत्कालीन सरकारच्या भूमिकेविरोधात वार्तांकन ‘ऑर्गनायझर’ने केले होते. या सेन्सॉरशिपच्या विरोधात त्या वेळी ऑर्गनायझरचे संपादक के आर मलकानी हे सर्वोच्च न्यायालयात गेले. मलकानी यांची बाजू त्या वेळी प्रसिद्ध विधिज्ञ आणि सोमनाथ चॅटर्जी यांचे वडील एन. सी. चॅटर्जी यांनी मांडली. त्या वेळी सर्वोच्च न्यायालयाने सरकारची सेन्सॉरशिपची कारवाई घटनाविरोधी असल्याचे सांगून ती थांबविण्यास भाग पाडले होते. या घटनेनंतर टीकेचा भडिमार नेहरूंवर झाला. मात्र तरीदेखील राज्यघटनेतील कलम १९ मध्ये पहिली दुरुस्ती नेहरूंनी केली आणि भाषण व अभिव्यक्तिस्वातंत्र्यावर निर्बंध घालण्यात आले.

नेहरू पंतप्रधान असतानाच ख्यातनाम गीतकार मजरुह सुलतानपुरी यांनी नेहरूंवर टीका करणारी कविता लिहिली म्हणून त्या वेळच्या मुंबई इलाख्याचे मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखालील सरकारने तुरुंगात टाकले गेले होते. त्यांच्या कवितेतील काही ओळी...,

‘‘मन में जहर डॉलर के बसा के
फिरती है भारत की अहिंसा
खादी के केंचुल को पहनकर
ये केंचुल लहराने न पाए
अमन का झंडा इस धरती पर
किसने कहा लहराने न पाए
ये भी कोई हिटलर का है चेला
मार लो साथ जाने न पाए
कॉमनवेल्थ का दास है नेहरू
मार ले साथी जाने न पाए’’




सुलतानपुरी यांनी या कवितेबद्दल माफी मागावी असे त्यांना तत्कालीन काँग्रेस सरकारकडून सांगितले गेले होते. मात्र सुलतानपुरी यांनी माफी मागण्यास नकार दिल्याने एक वर्षभर ते तुरुंगात होते. लोकशाही मूल्ये, अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा जप करणाऱ्या त्या वेळच्या नेहरू समर्थकांनी सुलतानपुरी यांच्या अटकेला विरोध केला नव्हता, हे उल्लेखनीय आहे.

इंदिरा गांधींनी सर्वोच्च न्यायालयासह सर्व घटनात्मक संस्था आपल्या टाचेखाली राहतील यासाठी अनेक प्रयत्न केले होते, याचे इतिहासात अनेक दाखले मिळू शकतील. आणीबाणीच्या आधी १९७५ मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी कार्यालयात (पीएमओ) संयुक्त सचिव असणाऱ्या बिशन एन टंडन यांनी ‘पीएमओ डायरी’ नावाचे पुस्तक लिहिले होते. आणीबाणी उठल्यानंतर २५ वर्षांनी या पुस्तकाचे प्रकाशन झाले. त्यांनी आपल्या पुस्तकात लिहिले आहे की त्या वेळचे कायदामंत्री हरिभाऊ गोखले हे तत्कालीन सरन्यायाधीश ए. एन. रे यांना ३ जून १९७५ रोजी भेटले होते. त्या वेळी इंदिरा गांधी यांच्या लोकसभेवरील निवडीविरोधात राज नारायण यांनी दाखल केलेली याचिका अलाहाबाद उच्च न्यायालयापुढे सुनावणीस होती. जर अलाहाबाद न्यायालयाने इंदिरा गांधी यांच्या विरोधात निकाल दिला तर आपण त्याला स्थगिती देऊ असे सरन्यायाधीश रे यांनी हरिभाऊ गोखले यांना सांगितले होते. या रे यांची सरन्यायाधीशपदी नियुक्ती (१९७३) करताना इंदिरा गांधी यांच्या सरकारने जे. एम. शेलाट, के. एस. हेगडे आणि ए. एन. ग्रोव्हर यांची ज्येष्ठता डावलली होती. ए. एन. रे हे काँग्रेस नेते आणि पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सिद्धार्थ शंकर रे यांचे नातलग होते.

रे यांची सरन्यायाधीशपदी नियुक्ती करताना इंदिरा गांधी यांनी तत्कालीन राष्ट्रपती गिरी यांचा आक्षेपही दुर्लक्षिला होता. त्या वेळी कायदामंत्री असलेले गोखले यांच्याशी टंडन यांनी चर्चा केली होती. त्या वेळी गोखले म्हणाले होते की, पंतप्रधानांच्या निवडणुकीच्या मामल्यात धोका पत्करू नये. हेगडे हे विश्वसनीय नाहीत म्हणून रे यांची सरन्यायाधीशपदी नियुक्ती केली गेली. टंडन म्हणतात की, हेगडे, ग्रोव्हर किंवा शेलाट या तिघांपैकी कोणी सरन्यायाधीश असते तर त्या वेळच्या कायदामंत्र्यांनी म्हणजे हरिभाऊ गोखले यांनी सरन्यायाधीशांना भेटण्याचे धाडस केले असते का असा प्रश्न माझ्या मनात आला होता. टंडन यांनी जे लिहिले आहे त्याचा अजूनपर्यंत काँग्रेसच्या नेतृत्वाने इन्कार केलेला नाही.

राजीव गांधी यांच्या पंतप्रधानपदाच्या काळातही विरोधी आवाज दडपण्याचा प्रयत्न प्रच्छन्नपणे झाला. बोफोर्स तोफा खरेदी व्यवहाराबाबत तत्कालीन ख्यातनाम वृत्तपत्रांत वृत्तमालिका सुरू होती. शिवाय राम जेठमलानी हे राजीव सरकारला बोफोर्सविषयी दररोज प्रश्न विचारीत असत. याने अडचणीत आलेल्या राजीव गांधी सरकारने इंडियन एक्स्प्रेसच्या कार्यालयाचा वीजपुरवठा बंद केला होता. राजीव गांधींच्याच पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात टपाल विधेयक तयार करण्यात आले होते. कोणाचेही टपाल फोडून वाचण्याचा अधिकार सरकारला प्रदान करण्याची तरतूद या विधेयकात होती. विरोधक आणि प्रसारमाध्यमांनी या विधेयकाला प्रखर विरोध केला. त्या वेळचे राष्ट्रपती झैलसिंग यांनी हे विधेयक सरकारकडे परत पाठविले. पुन्हा ते विधेयक आणण्याची हिंमत राजीव गांधी सरकारने दाखविली नाही.

डॉ. मनमोहन सिंग पंतप्रधान असताना, फौजदारी शिक्षा झालेल्या खासदारांची अपात्रता रद्द ठरवणारा वटहुकूम जाहीररीत्या फाडून टाकण्याचा उद्योग युवराजांनी केला होता. आपल्याच पक्षाच्या पंतप्रधानांचा असा जाहीर उपमर्द करण्याचे धाडस युवराजांनी दाखविले होते. हे महाशय आता घटनात्मक संस्थांच्या प्रतिष्ठेबाबत गळा काढत आहेत. युवराजांचे काका संजय गांधी हे आणीबाणीच्या काळात आपल्या पक्षाच्या केंद्रीय मंत्र्यांचा, मुख्यमंत्र्यांचा कसा जाहीर उपमर्द करीत याचे किस्से त्या काळी प्रचलित होते.

पक्ष नेतृत्वाबाबत सोनिया गांधींना पत्र लिहिणाऱ्या कपिल सिब्बल यांच्यावर काँग्रेसच्या कार्यकारिणी बैठकीतच युवराजांनी भाजपशी संधान बांधल्याचा आरोप केला होता, त्यावर सिब्बल यांनी युवराजांना चार गोष्टी सुनावणारे ट्वीट केले होते.

अमिताभ बच्चन, अक्षय कुमारच्या चित्रपटांचे चित्रीकरण महाराष्ट्रात होऊ देणार नाही, अशी गर्जना नूतन प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी अलीकडेच केली आहे. काँग्रेसची मानसिकता दाखविण्यास ही उदाहरणे पुरेशी आहेत. सोनिया गांधी यांना अध्यक्षपदी बसविताना सीताराम केसरी या वयोवृद्ध नेत्याला कसे कोंडून ठेवले गेले होते, याचे स्मरण युवराजांना यानिमित्ताने करून द्यावे लागेल. सोनियांच्या विदेशी नागरिकत्वाला आक्षेप घेणाऱ्या शरद पवार, तारीक अन्वर, पीए संगमा या त्रिमूर्तीला थेट पक्षाबाहेर काढले जाण्याची घटना फार जुनी नाही.

त्यामुळे आता राहुल गांधी आणीबाणी ही चूक असल्याचे सांगत असले तरी प्रत्यक्षात ते नक्राश्रू आहेत आणि विरोधी विचारांना स्थान देण्याच्या केवळ बाता होत्या. आणीबाणीबद्दल माफी मागून विरोधी विचारांच्या सन्मानाचा कितीही आव आणला तरी त्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही.

*लेखक महाराष्ट्र भाजपचे मुख्य प्रवक्ते आहेत*

नवदेशांचा उदयास्त

## फ्रेंच अमलाखालील माली



**आशिया आणि आफ्रिका** खंडांत गेल्या शतकात नव्याने अस्तित्वात आलेले बहुतेक देश हे त्यापूर्वी अनेक शतके युरोपातील विविध साम्राज्यांच्या वसाहतींच्या अमलाखाली होते. या नवदेशांच्या जनतेवर अंमल करणाऱ्या युरोपियन लोकांचा मोठा प्रभाव पडला. या वसाहतींपासून मुक्ती मिळाल्याला साठ-सत्तर वर्षांचा कालावधी लोटला तरीही या नवदेशांच्या लोकांच्या जीवनशैलीवर, भाषेवर या युरोपियनांचा पगडा बसलेला आजही दिसून येतो. बराच मोठा काळ फ्रेंचांची वसाहत असलेल्या पश्चिम आफ्रिकेतल्या माली या देशाच्या बाबतीत हे जाणवते. मालीमधील राजभाषा, प्रचलित भाषा आहे फ्रेंच.

माली या नावापेक्षा या देशातल्या ‘टिंबक्टू’ शहराचे नाव आपण हिंदी चित्रपटांमधून अधिक वेळा ऐकले आहे! पश्चिम आफ्रिकेतल्या या देशाचा उत्तरेतला निम्मा प्रदेश सहारा वाळवंटीय असून मध्ययुगीन काळापर्यंत सहारातून चालणाऱ्या व्यापारावर आफ्रिकेतल्या माली साम्राज्य, घाना साम्राज्य आणि सोनघाई साम्राज्य या प्रबळ सत्तांचे नियंत्रण होते. ही तिन्ही साम्राज्ये त्या काळात मालीचा हिस्सा होती.

एकोणिसाव्या शतकात युरोपातील अनेक देश आफ्रिकेतल्या प्रदेशांमध्ये व्यापार वाढवून सत्ता स्थापण्याच्या प्रयत्नात होते. फ्रेंच राजवटीने १८९२ साली मालीच्या काही प्रदेशात आपली वसाहत स्थापली. फ्रेंचांच्या सुदानमधील वसाहतीला मालीची वसाहत जोडली आणि त्यामुळे मालीतली फ्रेंच वसाहतही फ्रेंच सुदान नावाने ओळखली जाऊ लागली. पुढे फ्रेंचांनी १९५९ साली या फ्रेंच सुदानमध्ये सेनेगल हा देशही समाविष्ट केला आणि १९६० ला फ्रेंच सुदानच्या स्वातंत्र्याची घोषणा करून त्या नवीन देशाचे नाव ‘माली फेडरेशन’ केले. त्यानंतर दोनच महिन्यांमध्ये सेनेगल हे या माली राष्ट्रसंघातून बाहेर पडले आणि मालीच्या नेत्यांनी २२ सप्टेंबर १९६० रोजी मालीमध्ये प्रजासत्ताक सरकार स्थापन करून माली हा सार्वभौम देश अस्तित्वात आल्याची घोषणा केली. सुरुवातीचे हे प्रजासत्ताक एकपक्षीय होते.

१९६० साली तिथल्या लोकांचे सरकार जरी सत्तेवर आले तरी पुढची ३० वर्षे या प्रदेशात दुष्काळ, लष्करी दडपशाही, सरकार आणि लष्कराविरोधात होणारे उठाव, बंड यामुळे मालीत अनागोंदी माजली होती.

– **सुनीत पोतनीस**

sunitpotnis94@gmail.com

अद्वयबोध

## गोफ

**नामदेवरायांच्या संगतीने** तीर्थयात्रा करण्याचा हट्टच ज्ञानदेव धरून बसले आणि पंढरीनाथाचा वियोग होण्याची कल्पनादेखील असह्य होणाऱ्या नामदेवरायांचा नाइलाज झाला, हा या दोन भक्तोत्तमांच्या जीवनातील एक भावमधुर प्रसंग. तीर्थावळ करून पंढरीस परतल्यानंतर, तीर्थाटनाचा वृत्तान्तच जणू एक प्रकारे पांडुरंगाला कथन करतेवेळी, **‘कटीतटीं जेणें कर नाहीं ठेविले । न देखें पाउलें विटेवरी । त्यांतें म्हणता देव लाजे माझे मन । ते कष्ट दारूण कवणा सांगूं’** असे भावगर्भ उद्‌गार नामदेवरायांच्या मुखातून बाहेर पडतात. ज्या देवाच्या गावी वैष्णवांचा मेळा नाही, पताकांचे भार, कुंचे नाहीत, हरिकथेचा सुकाळ जिथे नाही, अशा देवाच्या दिशेने माझी ना पावले वळतात ना माझे हात अशा देवाची पूजा करण्यासाठी सरसावतात, अशी आत्मस्थितीही नामदेवराय प्रांजळपणे कथन करतात. श्रीविठ्ठलाची अशी अव्यभिचारी भक्ती ज्यांच्या अंतःकरणामध्ये सर्वकाळ दाटलेली असे नामदेवराय, **‘नामा म्हणे येथें दुजा नको भाव । विष्णु तोचि शिव शिव विष्णु’** अशी ग्वाही देतात तेव्हा अपूर्व अशा मन्वंतराचे सूचन त्या बिंदूवर घडत असते. उभ्या साधनाविश्वाच्या केंद्रस्थानी शिवासह विष्णुतत्त्वाचीही स्थापना होणे, ही सहजी साध्य होणारी बाब नव्हे. एकाच परतत्त्वाचे हे दोन अवतार असून ते एकरूप होत, हे शाश्वत सत्य, **‘नामा म्हणे शिव विष्णु एकरूप। ताराया अमूप अवतार’** इतक्या नितळ शब्दांत नामदेवरायांसारख्या एकांतिक वैष्णवाने प्रस्थापित केल्याचाच तो परिपाक म्हणायचा. या भूमीत नांदत आलेल्या परंपरागत दर्शनविश्वामध्ये वारकरी दर्शनाचा प्रगल्भ असा जो नूतन प्रवाह खळखळू लागला त्याचा हा उगमबिंदू ठरतो. ज्या रमावराचे ध्यान कैलासीचा राणा अहर्निश ध्यात असतो त्याचाच नामघोष भागवत धर्म करत असल्याने, वस्तुतः, शिव आणि विष्णू या एकाच तत्त्वाच्या दोन प्रगट रूपांचे स्मरण उपासनेच्या या प्रवाहाद्वारे घडत राहते, ही भूमिका लोकमानसामध्ये बिंबली ती शिव आणि विष्णू यांच्या अशा समन्वयामुळेच. शिव आणि विष्णू यांच्या समन्वयाचा आणि त्यातून पुढे बहरलेल्या कृष्ण-विठ्ठलभक्तीचा नामदेवरायांपर्यंतचा प्रवास त्याआधीच्या दोन टप्प्यांचे आकलन करून घेतल्याखेरीज उलगडणार नाही. गहिनीनाथ हा त्या प्रवासाचा आद्य टप्पा. नामसंकीर्तनरूपी यज्ञसाधनेचा पुरस्कार श्रीमद्‌भागवतामध्ये उच्चरवाने करणाऱ्या नारायणांचे उत्तरावतार म्हणजे गहिनीनाथ, अशी परंपरेची धारणा होय. नाथयोगी आणि श्रीमद्‌भागवतातील नवनारायण यांच्या समरूपत्वाचा हा दाखला. साहजिकच, कृष्णभक्तीचा असा गहिनीनाथकृत पुरस्कार निवृत्तिनाथांपासून पुढे क्रमाने पाझरत राहावा यात अतर्क्य असे काहीच नाही. **‘निवृत्तीचे ध्येय कृष्ण हाचि होय। गयनिनाथे सोय दाखविली’** अशा निखळ शब्दकळेद्वारे कृष्णोपासनेचा आपल्या गुरूंकडून लाभलेला वारसा निवृत्तिनाथ प्रगट करतात. ‘यज्ञांमध्ये जपयज्ञ ही माझी विभूती होय’, असे श्रीमद्‌भगवद्‌गीतेमध्ये भगवान श्रीकृष्ण जे कथन करतात त्याची आंतरसंगती आता स्पष्ट व्हावी. ज्याने अर्जुनाला गीताबोध केला तोच कृष्ण परमात्मा पंढरी क्षेत्रामध्ये विटेवर उभा आहे, हे सूत्र, **‘गीता जेणें उपदेशिली । ते हें विटेवरी माऊली’** अशा शब्दांत तुकोबा मांडून दाखवितात, तर **‘निवृत्तीचे गुज विठ्ठल सहज । गयनीराजे मज सांगितले’** असे कथून शिव–विष्णू–कृष्ण–विठ्ठल यांच्या समन्वयाचा गोफ निवृत्तिनाथ गुंफून पूर्ण करतात.

– **अभय टिळक**

agtilak@gmail.com

कुतूहल

## लॉगॅरिदम

**गणकयंत्र किंवा संगणक** नसलेल्या काळात $३६५^{२/३}$ किंवा $७३^{-१/३}$ याचे उत्तर काढणे किती कठीण असेल याची आपण कल्पना करावी. तसेच खगोलशास्त्रात ग्रह, तारे यांच्या अंतरांचा आणि गतीचा अभ्यास करताना मोठ्या संख्यांचे गुणाकार, भागाकार, वर्गमूळ या गणिती क्रियांसाठी किती तरी वेळ खर्ची पडत असे. त्यावर उपाय म्हणून जॉन नेपियर यांनी (१५५०-१६१७) लॉगॅरिदम फलाच्या (फंक्शन) वापराची कल्पना विकसित केली. त्यांनी २० वर्षांच्या परिश्रमाने या फलाची कोष्टके तयार करून ‘डिस्क्रिप्शन ऑफ द मार्व्हलस कॅनन ऑफ लॉगॅरिदम्स’ या ग्रंथात १६१४ मध्ये प्रसिद्ध केली. जलद आणि सोप्या पद्धतीने आकडेमोड करणे त्यामुळे शक्य झाले.




लॉग$_2$१ = ०, लॉग$_2$२ = १, लॉग$_2$४ = २, लॉग$_2$८ = ३ म्हणून आकृतीतील य = लॉग$_2$क्ष या फलाचा आलेख (१,०), (२,१), (४,२), (८,३) या बिंदूतून जातो.

$e^x$ हे ऑयलरनी शोधलेले महत्त्वाचे घातांक-फल (एक्स्पोनेन्शियल फंक्शन) आहे. त्या फलात e हे एक अचल (कॉन्स्टंट) तर घातांक x हे चल (व्हेरिएबल) आहे. या फलाचा व्यस्त (इन्व्हर्स) असणाऱ्या लॉग फलाचा वापर करून नेपियरनी त्याची मूल्ये कोष्टक स्वरूपात e हा पाया घेऊन मांडली. त्या कल्पनेचा विस्तार हेन्री ब्रिग्स यांनी व्यावहारिक सोयीसाठी पाया १० घेऊन केला. त्यावरून लॉग १ = लॉग ($१०^०$) = ०, लॉग १० = लॉग ($१०^१$) = १, लॉग १०० = लॉग ($१०^२$) = २ अशा किमती प्राप्त होतात. त्यामुळे $१०^४ x १०^२ = १०^६$ याचे उत्तर लॉग (१०६) = ६, आणि त्याची विलोम क्रिया म्हणजे प्रतिलॉग (६) = $१०^६$ = १०००००० असे मिळते. दोन संख्यांचा गुणाकार करताना त्यांचे लॉग काढून त्यांची बेरीज करायची आणि भागाकार करताना वजाबाकी करायची. जे उत्तर येईल त्याचा प्रतिलॉग (ॲण्टिलॉग) कोष्टकातून बघून उत्तर मिळते. ६८ x ३९ हा गुणाकार करायचा असेल तर लॉग ६८ + लॉग ३९ = १.८३२५ + १.५९११ = ३.४२३६, आणि प्रतिलॉग ३.४२३६ = २६५२. म्हणून ६८ x ३९ या गुणाकाराचे २६५२ हे उत्तर मिळते.

पूर्वी रणांगणावर तोफेचा मारा अचूक करण्यासाठी तसेच समुद्री सफरीत दिशा मार्गदर्शनासाठीच्या आकडेमोडीसाठी लॉगॅरिदम कोष्टकांचा उपयोग केला जात असे. वैज्ञानिक प्रयोगांतील स्थिरांक मिळवणे, व्याजाची आकारणी वा कर्जफेडीचे हप्ते यांची आकडेमोड करणेही त्यामुळे सुलभ होते. तरी लॉगॅरिदम कोष्टकाचा सराव आजही केला जावा.

**–प्रा. स्वाती देवधर**

**मराठी विज्ञान परिषद,**

**संकेतस्थळ :** www.mavipa.org

**ईमेल :** office@mavipamumbai.org

# त्यास ‘देव’ आहे...

## एकटा महाराष्ट्रच नव्हे तर अनेक राज्य सरकारे नवे काही प्रयोग करण्याच्या मन:स्थितीत आणि परिस्थितीत नाहीत. हेच महाराष्ट्राच्याही अर्थसंकल्पातून दिसले...

**राज्याचे अर्थमंत्री** अजित पवार सोमवारी महाराष्ट्राचा अर्थसंकल्प सादर करत असताना तिकडे बेंगळूरुत अर्थमंत्रिपद सांभाळणारे मुख्यमंत्री बी एस येडियुरप्पा कर्नाटकाचा अर्थसंकल्प मांडत होते. महाराष्ट्रात शिवसेना- राष्ट्रवादी- काँग्रेस यांचे सरकार आहे तर कर्नाटकात भाजपचे. म्हणजे महाराष्ट्रात विरोधी पक्षात असलेला भाजप शेजारील कर्नाटकात सत्तेवर आहे. या दोन अर्थसंकल्पांनंतर उद्योगविश्वात उमटलेल्या भावनांचे वर्णन एका शब्दात करता येईल : निराशा. कर्नाटकात गृहखरेदीवरील मुद्रांक शुल्कात मुख्यमंत्री येडियुरप्पा यांनी सवलत जाहीर केली. पण ती इतकी तुटपुंजी आहे की तिची बरोबरी शेरडाच्या शेपटाशीच होऊ शकेल. इकडे महाराष्ट्रात अर्थमंत्री अजित दादांनी अर्थसंकल्पात अशी कोणतीही घोषणा केली नाही. कारण सहाच महिन्यांपूर्वी महाराष्ट्राने गृहखरेदीवरील मुद्रांक शुल्क काही काळासाठी पूर्ण माफ केले आणि नंतर त्यात मोठी सवलत दिली. त्यामुळे या राज्यात गृहबांधणी क्षेत्रात काही प्रमाणात धुगधुगी निर्माण झाली. ही दोन उदाहरणे येथे उद्धृत करण्याचे कारण त्यातून समान स्थिती दिसते. राज्य सरकारांचे हात करोनाकाळ आणि त्याआधीची अर्थमंदावस्था यामुळे इतके बांधले गेले आहेत की या परिस्थितीवर मात करण्यासाठी त्यांच्या हाती फारसे काहीही नाही. देशातील सर्वच्या सर्व राज्यांची परिस्थिती अशीच आहे. हे वास्तव लक्षात घेऊन महाराष्ट्राच्या यंदाच्या अर्थसंकल्पाचे विश्लेषण व्हायला हवे.

कारण देशातील सर्वात श्रीमंत राज्याचा यंदाचा सकल राष्ट्रीय उत्पन्नवाढीचा दर उणे ८ टक्के इतका जर असेल तर अशा राज्याकडून भरीव काही अर्थ उपाययोजना केल्या जाणे अशक्यच. तेच या अर्थसंकल्पातून दिसून येते. करोनामुळे नव्याने महत्त्व दिसून आलेल्या आरोग्य खात्यासाठी ७५०० कोटी रु., काही नवीन वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्याची घोषणा, विविध २६ पाटबंधारे प्रकल्पांसाठी १३ हजार कोटी रु. इतकी तरतूद, चार नवी कृषी विद्यापीठे, मुंबईकरांसाठी किनारी मार्गासाठी काही तरतूद, स्वातंत्र्य मिळाल्यापासून घोषणा केल्या जात असलेल्या ठाणे-मुंबई जलमार्गास संजीवनी वगैरे काही त्यातल्या त्यात भरीव म्हणता येतील अशा काही घोषणा या अर्थसंकल्पात आढळतात. पण ठणठणगोपाळावस्थेतील पैसा खर्च करण्याची अडचण सरकारने नव्या पण कल्पक योजनांतून भरून काढण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. उदाहरणार्थ ऊस तोडणी कामगार आणि घरकामगार महिला यांच्यासाठी सामाजिक संरक्षण योजना. सामाजिक संरक्षण देऊ शकतील अशा योजनांची अनुपस्थिती गेल्या वर्षातील करोनाकाळात प्रकर्षाने दिसून आली. स्थलांतरित मजूर आणि उच्चमध्यमवर्गीयांनी आपापल्या घराचे आणि मनाचेही दरवाजे बंद केल्याने घरगुती काम करणाऱ्या महिलांवर या काळात शब्दश: उपासमारीची वेळ आली. अनेकांनी या नोकरांबाबत ‘काम नाही तर दाम नाही’ अशी भूमिका घेतल्याने या वर्गाचे अतोनात हाल झाले. करोनाकाळात जी अवस्था शहरी मजुरांवर आली ती ऊसतोडणी कामगारांवर आयुष्यभर येते. कारण कामाप्रमाणे आपला संसार त्यांना ठिकठिकाणी हलवावा लागतो. यात त्यांच्या कुटुंबाचे हाल होतात. त्यामुळे या वर्गासाठी अशा काही सामाजिक योजना आखल्या जाणे आवश्यक होते.

हा अर्थसंकल्प ‘महिलादिनी’ सादर झाला. या अशा दिवसांच्या प्रतीकात्मक साजरीकरणास आताशा फारच महत्त्व आलेले आहे. भाषेची वाट लावण्यात अग्रेसर असलेले ज्याप्रमाणे ‘मराठी भाषा’ दिन अधिक जोशात साजरा करतात त्याप्रमाणे आपल्या वैयक्तिक आयुष्यांत महिलांना फारसे महत्त्व न देणारे शब्दांच्या फुलोऱ्यात रममाण होतात. हे बरे की, या अर्थसंकल्पात असे काही झाले नाही. महिला कल्याणाचा दावा करत अवाच्या सवा घोषणा केल्या जातील, ही भीती खोटी ठरली. महिलांच्या नावे घर खरेदी नोंदणी झाल्यास एक टक्का इतकी सवलत मुद्रांक शुल्कात देण्याची घोषणा अजितदादांनी केली. ती स्वागतार्हच. पण प्रश्न असा की गृहकर्जाचा अर्जदार समजा पती असला आणि गृहनोंदणीत पत्नीही सहअर्जदार असल्यास या सवलतीचा लाभ तिला मिळणार का? हा प्रश्न महत्त्वाचा अशासाठी की अलीकडे बऱ्याचदा पती-पत्नी हे दोघेही गृहकर्जाचे अर्जदार असतात. यामुळे कर्जाची मर्यादा वाढवून मिळते आणि त्याचा फायदा दोहोंतील एक -बऱ्याचदा पतीच- आयकर सवलतीसाठी घेतो. अशा वेळी या एक टक्का सवलतीचा उपयोग महिलांना किती होईल हा प्रश्नच. दुसरी अशीच नवीन घोषणा म्हणजे मुलींना शाळेत जाण्यासाठी मोफत एसटी प्रवास. तिचे वृत्तमूल्य अधिक. पण प्रत्यक्षात तिचा लाभ घेतला जाण्याची शक्यता नगण्यच. कारण ही बससेवा मिश्र इंधनावर चालणारी असावी वगैरे अटी.

> **उत्पन्न वाढेल असे काही करण्यासारखी परिस्थिती नाही, करवाढ करून ते वाढवायची सोय नाही, अशा स्थितीत नवीन काही चौकटीबाहेरची कल्पनाशक्ती अजित पवार दाखवू शकले असते तर त्याची गरज होती...**

याच्या जोडीला मुंबई आणि परिसरासाठी बऱ्याच काही घोषणा झाल्याची टीका झाली. पुढील वर्षी मुंबई महापालिकेच्या निवडणुका आहेत. म्हणजे पुढील अर्थसंकल्प सादर होण्याआधीच पालिका निवडणुका झालेल्या असतील. निवडणूकपूर्व सरबराईची आपल्याकडील परंपरा लक्षात घेतल्यास त्यानुसार मुंबईसाठीच्या या घोषणा समर्थनीय ठरतात. तथापि यात फक्त घोषणांच्या वृत्तमूल्याचाच विचार व्हावा. कारण स्वतंत्रपणे मुंबईसाठी बरेच काही करता येईल अशी राज्याची आर्थिक स्थितीच नाही. त्याचमुळे मुंबईसाठी घोषणा झाल्या, पण त्यात काही तरतुदी वाढल्या असे काही नाही.

महसुलाची आवक आणि जावक यातली राज्य सरकारची केविलवाणी अवस्था अर्थमंत्र्यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पाच्या दुसऱ्या भागातून दिसून आली. अर्थसंकल्पाचे दोन भाग असतात. त्यातील दुसरा भाग हा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष कर याबाबतच्या घोषणांचा असतो. सामान्य जनता, विश्लेषक यांचे दुसऱ्या भागाकडे विशेष लक्ष असते. यात नव्या करांची घोषणा असते. पण अजितदादांकडून हा दुसरा भाग अक्षरश: दोन मिनिटांत संपला. त्यात भारतीय बनावटीच्या मद्यावर त्यांनी काय ती करवाढ जाहीर केली. या भागात फक्त तीन मुद्दे आहेत. यातील एक महिलांच्या नावे घर खरेदी झाल्यास मुद्रांक शुल्कातील सवलतीचा. म्हणजे अन्य फक्त दोन. यावरून करवाढ करण्याबाबतच्या राज्याच्या मर्यादांची जाणीव होईल. उत्पन्न वाढेल असे काही करण्यासारखी परिस्थिती नाही आणि करवाढ करून ते वाढवायची सोय नाही, अशी स्थिती.

अशा स्थितीत नवीन काही चौकटीबाहेरची कल्पनाशक्ती अजितदादा दाखवू शकले असते तर त्याची गरज होती. पण सद्य:स्थितीत या अपेक्षाभंगाची तयारी ठेवायला हवी. कारण एकटा महाराष्ट्रच असे नाही तर अनेक राज्य सरकारे नवे काही प्रयोग करण्याच्या मन:स्थितीत आणि परिस्थितीत नाहीत. संकटच इतके गहिरे आहे की आधी टिकून राहणेच महत्त्वाचे. त्यामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या दरात राज्य सरकारने अर्थसंकल्पात कपात करायला हवी होती अशी अपेक्षा बाळगणे हेच आपमतलबीपणाचे ठरते. नोटा छापायचा अधिकार असलेले केंद्र सरकारच पेट्रोल-डिझेलच्या करांतून मिळणाऱ्या सहज उत्पन्नाचा मोह सोडण्यास तयार नसताना उत्पन्नाची साधने मर्यादित असणाऱ्या राज्य सरकारांनी तो सोडावा असे म्हणणे ही शुद्ध राजकीय लबाडी ठरते. त्यामुळे त्याची दखल घेण्याचे कारण नाही.

ती घ्यावी अशी बाब म्हणजे अर्थसंकल्पात धर्मस्थळे आणि संतस्थळे यांच्यावर केलेली सढळ आर्थिक पखरण. माजी अर्थमंत्री सुधीरभाऊ मुनगंटीवार यांना देवदर्शनांत मोठा रस. त्यामुळे त्यांनी आपल्या अर्थसंकल्पाचा वापर सरकारी पैशातून वैयक्तिक पुण्यसंचयासाठी मोठ्या प्रमाणावर केला. ते ठीक. पण अजितदादांचा लौकिक काही असा धर्मप्रेमी म्हणून नाही. तरीही त्यांच्या या दुसऱ्या अर्थसंकल्पात उल्लेख असलेल्या देवळारावळांची संख्या ३६ इतकी आहे. राज्यातील आठ प्राचीन मंदिरांसाठी त्यात १०१ कोटी रुपयांची तरतूद आहे. जोडीला अन्य २० उल्लेख हे राज्यातील विविधधर्मीय संतांची स्मृतिस्थळे, स्थानिक देवदेवतांची मंदिरे यांचा उद्धार वा सुशोभीकरण यासाठीच्या तरतुदींचे आहेत. आणि वर अष्टविनायक. ही सर्व बेरीज केल्यास हे धर्मघटक ३६ ठरतात. ‘जगी ज्यास कोणी नाही, त्यास ‘देव’ आहे’ ही धर्माधिष्ठित राजकारण करणाऱ्या राजकीय पक्षांना लागू असलेली उक्ती धर्मनिरपेक्ष म्हणवून घेणाऱ्यांनाही तितकीच लागू पडते, असा याचा अर्थ. एरवी हे खपूनही गेले असते. पण तिजोरीत इतका खडखडाट असताना आणि देवस्थानांच्या दानपेट्या मात्र ऊतू जात असताना पुरोगामी म्हणवणाऱ्या सरकारने यावर इतका खर्च करावा का, इतकाच काय तो प्रश्न.

# घसरण... स्वातंत्र्यातही!



## समोरच्या बाकावरून

पी. चिदम्बरम

**अर्थव्यवस्थेतील २०१८-१९ पासूनची घसरण यंदाच्या वर्षी वाढली, ती एकवेळ- मागणीपाठोपाठ आता खासगी गुंतवणूकदेखील वाढल्यास- सावरूही शकेल... पण देशातील विचारस्वातंत्र्य, माध्यमस्वातंत्र्य यांच्या घसरणीचे काय? आंतरराष्ट्रीय संस्थेने या स्वातंत्र्य- घसरणीवर शिक्कामोर्तब केले असताना ‘ती नाहीच’ अशा थाटात वावरणे, हे कशाचे लक्षण?**

**भारतीय अर्थव्यवस्था** प्रगतीच्या मार्गावर आहे की नाही हा चर्चेचा किंवा वादाचा मुद्दा आहे. सरकार सध्या तरी तिसऱ्या तिमाहीत आर्थिक वाढीचा दर ०.४ टक्के राहिल्याचा आनंद साजरा करीत आहे. आर्थिक विकास दराचा आकडा राष्ट्रीय सांख्यिकी संघटनेने दिला आहे. सांख्यिकी त्रुटी गृहीत धरता तो एक तर शून्य टक्के किंवा ०.८ टक्के असावा. राष्ट्रीय सांख्यिकी संघटनेने त्यांच्या प्रसिद्धीपत्रकात असे म्हटले होते की, हा आकडा म्हणजे एक अंदाज असून त्यात मोठ्या प्रमाणात बदल होऊ शकतात. सरकारने या वाक्याचेही उदात्तीकरण करून ते आणखी रंगवून सांगितले आहे.

भारताची अर्थव्यवस्था लवकर रुळावर यायला हवी होती किंवा निदान वार्षिक विकास दर स्थिर तरी असायला हवा होता. वार्षिक देशांतर्गत उत्पन्न किमती स्थिर धरल्या तर २०१८-१९ मध्ये १४०.०३ लाख कोटी होते; ते २०१९-२०२० मध्ये १४५.८९ लाख कोटी होते. ती दोन वर्षे ही आर्थिक वाढीची वेगाने घसरण करणारी ठरली. तरीही आपण ६.१ टक्के व ४.० टक्के वाढीचा दर गाठला. त्यापुढील वर्षी म्हणजे २०२०-२१ मध्ये जेव्हा करोनाची साथ देशात जोरात होती तेव्हा, या आर्थिक जखमा अधिक भळभळत्या झाल्या. त्याला कारण गैर आर्थिक व्यवस्थापन हेच होते. त्यातून पुढे देशात मंदीसदृश स्थिती तयार झाली. गेल्या ४० वर्षांत देशाची आर्थिक स्थिती इतकी वाईट झाली नव्हती. हे आर्थिक वर्ष मार्च २०२१ अखेर संपणार आहे त्या वेळीही -किमती स्थिर धरल्या तर- राष्ट्रीय सांख्यिकी संस्थेच्या आकडेवारीनुसार एकूण राष्ट्रीय देशांतर्गत उत्पन्न हे १३४.० लाख कोटींच्या आसपास राहील. याचा अर्थ ते गेल्या वर्षीच्या तुलनेत उणे ८.० टक्के राहील. ही स्थिती भयावह असेल यात शंका नाही.

### सुधारणेची शक्यता...

दरम्यान, सध्या तरी आर्थिक विकास दर ०.४ टक्के इतका तिसऱ्या तिमाहीत आला आहे. हा तात्पुरता दिलासा आहे. २०२०-२०२१च्या अंदाजातील अधिकाधिक वजावटी या २०२०-२१ या संपूर्ण वर्षातील अंदाजावर आधारित आहेत.

१) सध्या जो आर्थिक वाढीचा दर दिसतो आहे त्यात कृषी, वन व मत्स्योत्पादन यातील वाटा ३.९ टक्के आहे. बांधकाम क्षेत्राचा वाटा ६.२ टक्के आहे. खाणकाम, उत्पादन, व्यापार, हॉटेल्स, वाहतूक व्यवस्थेत मंदी कायम आहे.

२) एकूण निश्चित भांडवली निर्धारण पाहिले तर ते ४१,४४,९५७ कोटी रुपये असून ते २०१८-२०१९ व २०१९-२०२० या काळापेक्षा निश्चितच कमी आहे. एकूण राष्ट्रीय देशांतर्गत उत्पन्नाच्या ते ३०.९ टक्के आहे.

३) निर्यात २५,९८,१६२ कोटी रुपयांची असून आयात २७,३३,१४४ कोटी रुपयांची आहे. ती २०१८-१९ व २०१९-२०२० पेक्षा कमी आहे. एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या हे प्रमाण अनुक्रमे १९.४ टक्के व २०.४ टक्के आहे.



४) दरडोई राष्ट्रीय उत्पन्न हे एक लाख रुपयांवरून ९८,९२८ रुपये झाले आहे. यातील स्पष्ट निष्कर्ष असा की, प्रत्येक जण काही ना काही प्रमाणात गरीब झाला आहे. त्यात फक्त २०२० मधील अब्जाधीशांचा फायदा झाला असून त्यांची संख्या ४०ने वाढली आहे. लाखो लोक दारिद्र्यरेषेच्या खाली ढकलले गेले. जे आधीच दारिद्र्यरेषेखाली होते ते देशोधडीला लागले आहेत वा त्यांना जगणेच मुश्कील झाले आहे.

### रिझर्व्ह बँक जास्तच सावध

रिझर्व्ह बँकेने केलेले देशाच्या अर्थव्यवस्थेचे मूल्यमापन पाहिले तर ते जास्त प्रामाणिक आहे. त्यात अर्थसंकल्पावर टीकाटिप्पणी केलेली नाही किंवा सरकारने ज्या योजना आखल्या आहेत त्यावर काही भाष्य केलेले नाही तरी फेब्रुवारी २०२१च्या रिझर्व्ह बँकेच्या वार्तापत्रात काही निष्कर्ष काढण्यात आले आहेत. त्यानुसार मागणी व खप यावर विसंबून अर्थव्यवस्था पुन्हा पूर्वपदावर येऊ पाहात आहे, अशा प्रकारचे बदल सूक्ष्म व कमी काळ टिकणारे ठरू शकतात. या संदर्भात गुंतवणुकीचा विचार गांभीर्याने करण्याची गरज आहे. आर्थिक स्थिती चांगली नसली तरी गुंतवणूकदारांची दिशा व वागणूक या कामी महत्त्वाची ठरणार आहे. मागणीची काही इंजिने सुरू झाली आहेत. खासगी गुंतवणुकीचा तेवढा अभाव आहे. खासगी गुंतवणुकीला चालना मिळण्याची गरज आहे. भारतीय उद्योग व उद्यमशील लोक हे आव्हान पेलू शकणार का, हा खरा प्रश्न आहे.

उथळ व कमी काळ टिकणारी आर्थिक स्थितीतील सुधारणा दृश्यमान होत असली तरी खासगी गुंतवणूक वाढताना दिसत नाही. त्यामुळे ही बाब साजरी करणे अतिउत्साहीपणाचे होईल. त्यासाठी चौथ्या तिमाहीची वाट पाहावी लागेल. त्यात शिक्षण व आरोग्य या घटकांचाही विचार महत्त्वाचा ठरणार आहे.

### स्वातंत्र्याचीही घसरण

आर्थिक परिस्थिती सध्या तरी आपल्यासाठी हातावर हात धरून बसण्यासारखी आहे. दुसरीकडे स्वातंत्र्याच्या आघाडीवर एक प्रतिकूल अशी बातमी आहे. भारताचा क्रमांक ‘स्वातंत्र्याच्या निर्देशांका’त घसरला आहे.

जागतिक वृत्तपत्र माध्यम स्वातंत्र्य निर्देशांकात भारत १८० देशात १४२व्या स्थानावर आहे.

मानवी स्वातंत्र्य निर्देशांकात १६२ देशात १११वा आहे.

भारतातील स्वातंत्र्य कमी होत आहे असा याचा अर्थ असल्याचे अमेरिकेच्या ‘फ्रीडम हाऊस’ या वैचारिक संघटनेने म्हटले आहे. भारताचे गुण हे १०० पैकी ७१ होते; ते आता १०० पैकी ६७ झाले आहेत. भारताचा समावेश मुक्त स्वातंत्र्याचा सन्मान करणाऱ्या देशातून ‘अंशत: मुक्त’ (पार्टली फ्री) देशात झाला आहे. ही एक घसरणच आहे.

येथे आपण ‘१०० पैकी ७१ ऐवजी १०० पैकी ६७’, ‘१६२ ऐवजी १११’ या आकड्यांना फार महत्त्व द्यायचे नाही असे ठरवले तरी घसरणीचा कल घातक आहे. त्याचा परिणाम देशातील लाखो लोकांवर होत आहे. भारतात प्रसारमाध्यमांना झुकायला लावण्यात आले. दावणीला बांधण्यात आले; अनेक माध्यम समूह यांची गत ‘एचएमव्ही’ अर्थात ‘हिज मास्टर्स व्हॉइस’सारखी झाली आणि सत्ताधारी पक्ष वा सरकार जे म्हणेल तेच बोलू लागली; महिला, मुस्लीम, ख्रिश्चन, दलित, अनुसूचित जाती/जमाती यांच्याविरोधातील गुन्हे राष्ट्रीय गुन्हे नोंदणी संस्थेच्या आकडेवारीवरून वाढलेले दिसत आहेत; गुन्हे करणाऱ्या काही निवडक व्यक्तींना शिक्षेतून सूट मिळू लागली... हे नाकारता येणार नाही. मुस्लीम समाजाला दहशतवादापासून करोनाच्या प्रसारापर्यंत सर्व प्रकरणांत बळीचा बकरा करण्यात आले.

केंद्र सरकार जास्त अधिकारशाहीने वागू लागले, गुन्हेगारी कायदे जास्त दडपशाहीचे झाले. कर कायदे व कर प्रशासन जास्तच सक्रिय झाले. पोलीस व चौकशी संस्था जास्त दडपशाही करू लागल्या. आर्थिक धोरणे श्रीमंतांना अनुकूल राहिली व त्यांची मक्तेदारी निर्माण झाली हे सत्य नाकारता येणार नाही. देशात सर्वदूर भीतीची भावना लोकांच्या मनात घर करू लागली. ‘सरकारविरोधी लिहिणारे व खोट्या बातम्या पसरवणारे लोक’ यांना गप्प करण्यासाठी दिल्लीत कट रचले गेले.

घसरती अर्थव्यवस्था व झाकोळत चाललेले स्वातंत्र्य -मग ते कुठल्याही प्रकारचे असो- ही अत्यंत चिंताजनक स्थिती आहे. ही घसरण रोखायला हवी. पंजाब, हरयाणा, उत्तर प्रदेश या राज्यांतील शेतकऱ्यांनी विरोधाचा मार्ग पत्करला. आसाम, पश्चिम बंगाल, केरळ व पुडुचेरी तसेच तमिळनाडू येथील लोकांपुढे आता वेगळा मार्ग उपलब्ध आहे; पण तो ते वापरतील का... बघू या.

लेखक भारताचे माजी अर्थमंत्री आहेत.
संकेतस्थळ : pchidambaram.in
ट्विटर : @Pchidambaram_IN

अन्वयार्थ

# अनावश्यक अधिक्षेप

**दर दोन** वर्षांनी भरवली जाणारी संयुक्त सैन्यदलांची सेनापती परिषद (कम्बाइन्ड कमांडर्स कॉन्फरन्स - सीसीसी) भारतासाठी सामरिकदृष्ट्या अतिशय महत्त्वाची मानली जाते. या परिषदेमध्ये उद्घाटनपर भाषण बहुतेकदा पंतप्रधान करतात. भारताच्या भूराजकीय सामरिक स्थितीवर आणि दृष्टिकोनाविषयी मौलिक मार्गदर्शन करून पंतप्रधान निघून जातात आणि मग लष्कर, नौदल आणि हवाई दलांचे अत्युच्च अधिकारी एकत्रित व्यूहरचना, समस्या आणि संबंधित विषयांवर सखोल चर्चा करतात. या परिषदा गेली अनेक वर्षे राजधानीत साउथ ब्लॉक येथील लष्कर व नौदलाच्या मुख्यालयांमध्ये भरवल्या जात. पंतप्रधान नरेंद्र मोदी पहिल्यांदा सत्तेवर आल्यानंतर म्हणजे २०१४पासून ही परिषद कोठे भरवावी याविषयी त्यांचे कार्यालय सूचना करू लागले होते. ते अनावश्यक होते, कारण इतक्या किरकोळ बाबींमध्ये पंतप्रधान कार्यालयाने लक्ष घालण्याचे तसे काही प्रयोजन नव्हते. तरीही काहीतरी वैविध्यपूर्ण हवे याविषयी पंतप्रधान कार्यालय आग्रही होते. याअंतर्गत २०१५मध्ये आयएनएस विक्रमादित्य या भारताच्या एकमेव विमानवाहू युद्धनौकेवर ही परिषद झाली. २०१७मध्ये डेहराडून येथील भारतीय लष्करी अकादमी (आयएमए), २०१९मध्ये जोधपूर येथील हवाई दल तळ ही परिषदेची ठिकाणे होती. तिन्ही सैन्यदलांना तिचे यजमानपद भूषवण्याची संधी मिळावी म्हणून हे बदल असतील, तर त्यांचे स्वागतच. पण यंदा गुजरातमधील केवडिया या पर्यटनस्थळी ही परिषद भरवली गेली. त्याचे कारण काय? इतकेच नव्हे, तर या परिषदेसाठी अधिकाऱ्यांबरोबरच जवान आणि बिगर-अधिकारी असलेल्यांनाही सहभागी करून घेण्यात आले. हाही निर्णय पंतप्रधान कार्यालयाने घेतला आणि तो घेण्यापूर्वी तिन्ही सैन्यदलांशी किंवा सैन्यदलप्रमुख जनरल बिपीन रावत यांच्याशी कोणतीही सल्लामसलत करण्यात आली नव्हती, अशी माहिती उघड झाली आहे. सैन्यदलांतील अधिकारी व बिगर-अधिकारी हे विभाजन, तसेच हुद्द्यांची उतरंड यांमागे निव्वळ इतिहास आणि परंपरा नाही, तर व्यूहात्मक आणि व्यावहारिक संगती आहे. मुलकी सेवा आणि पोलीस सेवांप्रमाणेच अधिकारी म्हणून सैन्यदलांमध्ये दाखल होणाऱ्यांना प्राधान्याने काही अधिकार बहाल होतात. थेट अधिकारी म्हणून निवड झालेल्यांमध्ये बौद्धिक क्षमता, शारीरिक क्षमता आणि निर्णय क्षमता उच्च दर्जाच्या असतात. हे अशा प्रकारे वर्गीकरण आपल्या आजूबाजूला सर्वत्र होत असते आणि ते विधिसंमतही आहे. सरसकट कोणीही डॉक्टर, अभियंता वा वैमानिक होत नसतो. सार्वत्रिक सहभागाच्या नावाखाली आपण शल्यचिकित्सा दालनात बिगरशल्यकाला शस्त्रक्रिया करायला सांगत नाही किंवा वैमानिकाचे प्रशिक्षण आणि अनुज्ञप्ती न मिळालेल्यास कॉकपिटमध्येही बसवत नाही! तसेच, कॉकपिट किंवा शल्यचिकित्सा दालनात अनुक्रमे बिगरवैमानिक वा बिगरशल्यक कोण जाऊ शकते याचेही नियम ठरलेले आहेत. तेथे सरसकट साऱ्यांना प्रवेश नसतो. सरकार म्हणते त्यानुसार जवान आणि अधिकाऱ्यांना एकत्र आणून वैचारिक देवाणघेवाणीची व्याप्ती वाढवण्याचे प्रयत्न सैन्यदलांच्या पातळीवर वर्षभर होतच असतात. उद्या मंत्रिमंडळ बैठका जनता दरबारासारख्या जाहीरपणे घेतल्या जाणार आहेत का? या प्रश्नाचे उत्तर ‘नाही’ असेच द्यावे लागते, कारण अशा बैठका गोपनीयता आणि शिस्तीच्या चौकटीमध्येच घेण्याचे संकेत आहेत. सैन्यदलांनी जुनाट परंपरा सोडून द्याव्यात, असे आवाहन पंतप्रधानांनी त्या परिषदेत केले. तत्त्वत: अशा भूमिकेला विरोध होऊ नये; पण अशा ‘जुनाट परंपरा’ नेमक्या कोणत्या आहेत आणि त्या सध्या पूर्णत: कालबाह्य आहेत किंवा कसे, याविषयी सरकारने तिन्ही सैन्यदलांकडून ऐकण्याचीही तयारी ठेवावी. सैन्यदलांतील अनेक प्रथा चाकोरीबद्ध आणि कालबाह्य आहेत हा झाला एक विचार. खुद्द सैन्यदलांमध्ये या प्रथांविषयी विलक्षण संवेदनशीलता असते. अशा प्रथांना चर्चेतूनच पूर्णविराम दिला जावा, त्यासाठी एकतर्फी अधिक्षेप अनावश्यक ठरतो.



व्यक्तिवेध



रवींद्र साळवे

**‘तुमची चित्रे** पाहून आधी वाटले तुम्ही बंगाली असाल!’ यासारख्या स्तुती-म्हणू-की-निंदा प्रकारच्या अभिप्रायानंतर, चित्रकार रवींद्र साळवे यांचा मूळचा हसतमुख चेहरा अधिक हसरा होई. हा अभिप्राय देणाऱ्याकडे खट्याळ, पण जरबदार कटाक्ष त्या हसऱ्या डोळ्यांतून टाकला जाई. प्रकृती खालावत असताना, वजन उतरले असतानाही अशा नजरेमुळे रांगडेच भासणारे रवींद्र साळवे रविवारी, ७ मार्च रोजी अल्प आजाराने निवर्तले.

कलाशिक्षण जरी महाराष्ट्रातच घेतले असले, तरी देशभरातील कला पाहून, अनुभवून मगच रवींद्र साळवे यांच्या स्वतंत्र कारकीर्दीला सुरुवात झाली होती. हेही एक कारण असेल; पण शैलींचे प्रभाव कसे टाळावे हे त्यांना माहीत होते. त्यामुळेच त्यांच्या चित्रांतील मानवाकृतींचे ओठ, नाक, डोळे हे बंगाली कलावंतांची आठवण करून देणारे, पण लयदारपणाला अलंकारिकतेची जोड देताना जराही न कचरण्याचा गुण थेट दाक्षिणात्य नवचित्रकारांशी जुळणारा. तुटक रेषांचा वापर अलंकरणासाठी- किंबहुना सजावटीसाठी रवींद्र साळवे यांनी जरूर केला; पण मुख्य आकृती मात्र सलग रेषेने चित्रित करून दिवंगत मोहन सामंतांची आठवण दिली. पांढऱ्या पार्श्वभूमीवर ठळक रेषा आणि तजेलदार रंगांमध्ये रंगवलेली रवींद्र साळवे यांची चित्रे जरी कॅनव्हासवर ॲक्रिलिक रंगांनी रंगवलेली असली, तरी भिंतीवरील उठावदार चित्रे (म्यूरल्स) चा भास या चित्रांच्या एकंदर रचनेतून होई. रवींद्र साळवे यांचा जन्म १९५६ सालचा, श्रीरामपुरातला. शिक्षणासाठी पुण्या-मुंबईत ते आले आणि पुढे विख्यात चित्रकर्ती प्रफुल्ला डहाणूकर यांचे स्टुडिओ-सहकारी झाले. ‘जहांगीर आर्ट गॅलरी’त त्यांची एकल प्रदर्शने १९८२ पासून साधारण दर दोन-तीन वर्षांनी भरली आणि याच काळात त्यांना बॉम्बे आर्ट सोसायटी, महाराष्ट्र राज्य कलाप्रदर्शन आदी वार्षिक प्रदर्शनांत बक्षिसेही मिळत राहिली. मात्र खासगी कलादालनांत ते १९९९ नंतरच आले. तोवर मुंबईतील बॉम्बे आर्ट सोसायटी आर्टिस्ट्स सेंटर या कलासंस्थांखेरीज, दिल्लीच्या (केंद्रीय) ‘ललित कला अकादमी’चे कार्यकारिणी सदस्यपदही त्यांना मिळाले होते. या संस्थाजीवनात एरवी भल्याभल्यांचा श्वास कोंडतो, पण रवींद्र साळवे यांनी गांभीर्य किती पाळायचे आणि किती ‘लाइटली’ घ्यायचे, याचा समतोल राखून सारेच निभावून नेले. इतके की, सत्तापालटानंतरही ते ‘ललित कला अकादमी’साठी महत्त्वाचेच राहिले.

उलटा चष्मा

# पक्षाचे धोरण लवचिकच हवे!

*‘‘**पक्षाच्या धोरणविषयक** सभेसाठी जमलेल्या सैनिकांनो, पाठिंबा आणि विरोध ही आपल्या धोरणातील दोन ठेवणीची अस्त्रे आहेत. त्याचा वापर केव्हा, कुठे आणि कसा करायचा याचे अमर्याद अधिकार निर्विवादपणे साहेबांना देण्यात आले आहेत. साहेबांचा कुंचला जसा वळणदारपणे फिरतो, तशी पक्षाची धोरणेही फिरली तर काय हरकत? कुणाची हरकत असलीच तर त्यांना कसे चूप करायचे याचा ‘कानमंत्र’ आम्ही सभेनंतर प्रत्येकाला देणारच आहोत. आता नाणारचाच विषय घ्या. १२ व १३ जानेवारी २०१८ ला साहेबांनी कोकणात जी भूमिका घेतली त्याला आताचे विधान छेद देणारे आहे असे तुमच्यापैकी अनेकांना वाटू शकेल. प्रत्यक्षात तसे नाही. तेव्हा साहेबांनी ठोस भूमिका घेतली नव्हती, जी आता घेतली आहे. साहेब नेहमी रोखठोक बोलत असले तरी पक्ष चालवताना अनेकदा संदिग्ध भूमिका घ्यावी लागते. हा संदिग्धपणा सुद्धा धोरणाचाच भाग असतो हे लक्षात घ्या. राजकारणात आपण आलो ते स्वत: निवडून येण्यासाठी, सत्ता मिळवण्यासाठी. ते शक्य होत नाही असे लक्षात येताच आपण धोरण बदलले. मग दुसऱ्याला सत्ता मिळावी म्हणून तिसऱ्याच्या व्यासपीठावर जाऊन चौथ्यावर शरसंधान करत ‘लाव रे तो...’ चा प्रयोग एक धोरण म्हणून आपण केला व तो भलताच यशस्वी झाला. नंतर राज्यांतर्गत परिस्थिती झपाट्याने बदलल्याने पुन्हा आपल्याला धोरणात बदल करावा लागला. नाणारच्या या ताज्या भूमिकेकडे या नव्या धोरणाचा परिपाक म्हणूनही तुम्हाला पाहता येईल. सध्या देश व राज्य पातळीवरील राजकारणात एकमेकांना ‘ब संघ’ म्हणून हिणवण्याची प्रथा सुरू झाली आहे. राज्यात अपघाताने सत्तेत आलेले काही आपलेच पूर्वाश्रमीचे बांधव यावरून आपल्यावर खार खात आहेत. त्याकडे फार लक्ष देऊ नका. कधीकाळी तेही कुणाचे तरी ब संघ म्हणूनच २५ वर्षे वावरत होते. अ चा ब कधी झाला हे त्यांना कळलेच नाही. या संघ निवडीच्या नादात न पडता त्यांना खाली कसे खेचता येईल यावर विचार करा. या शत्रूला संपवणे हेच आपले मूळ धोरण. ते यशस्वी होत नाही म्हणून या धोरणाला नाइलाजाने फाटे फोडावे लागले. राजकीय धोरण हे सातत्याने बदलणारेच हवे. जे बदलत नाही त्यांचा ‘डावा’ होतो. ऋतूप्रमाणे बदलणे हा नियम ‘पक्ष्यांना’ नाही तर पक्षाला सुद्धा लागू आहे यावर आमचा ठाम विश्वास आहे. शत्रूला नमवण्यासाठी त्याच्या शत्रूशी संधान बांधण्यात काहीही गैर नाही. आता कुणी याला घूमजाव म्हणत असेल तर त्याला ‘शांत’ कसे करायचे हे तुम्हाला चांगले ठाऊक आहे. आपण कितीही धरसोडपणा केला तरी आपला एक डोळा कलानगराकडे कायम रोखलेला असतो. त्यावरच आपले धोरण ठरत असते. आता याला कुणी प्रतिक्रियावादी म्हणत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करा. सध्या एक पक्ष सोडला तर सारेच या मार्गाने निघाले आहेत हे वास्तव ध्यानात घ्या. काहीही करून शत्रूला अडचणीत आणणे हेच आपले ध्येय असल्याने परिस्थितीनुसार आपल्या धोरणात बदल होतच राहतील. तेव्हा या प्रत्येकवेळच्या बदलाचे समर्थन करताना विचलित होऊ नका. तरीही समोरचा ऐकत नसेल तर ‘खळ्ळ्खटॅक’ हा पर्याय वापरण्याची मुभा आहेच. शेवटी हे सारे जनता व आपल्या पक्षाच्या हितासाठीच आहे एवढे बोलून मी माझे धोरणविषयक विचार संपवतो. यातले काही कुणाला समजले नसेल तर त्याला साहेबांना येऊन भेटण्याची मुभा आहे. फक्त या भेटीसाठी लागणारा चिवटपणा अंगी बाळगावा ही विनंती.’’*

# अर्थसंकल्प २०२१-२०२२

लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM





## महाराष्ट्राला पुढे नेणारा अर्थसंकल्प : मुख्यमंत्री

करोनामुळे स्थूल राज्य उत्पन्नात ८ टक्के घट होऊनही कृषी, पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांना चालना देणारा, आरोग्य यंत्रणेला मजबूत करणारा असा महाराष्ट्राला पुढे नेणारा अर्थसंकल्प आहे, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केली. सर्व क्षेत्रात घसरण होत असतांना ११.७ टक्के इतकी विक्रमी वाढ नोंदवणाऱ्या कृषी क्षेत्राला अधिक बळकटी देण्यासाठी शेतकऱ्यांना बिनव्याजी पीककर्ज देण्यात येईल. हा अर्थसंकल्प पायाभूत सुविधांच्या विकासाला गती देताना समाजातील सर्व घटकांना दिलासा देणारा आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

**५,००० कोटी**
रस्ते विकासाच्या कामांसाठी तरतुद.

**१०,६३५ कोटी**
अनुसूचित जाती घटक योजनांसाठी.

### रस्ते, महामार्ग

- पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गाच्या क्षमता वाढीचे कामही सुरू असून ते डिसेंबर २०२२ पर्यंत पूर्ण करण्याची ग्वाही.
- मुंबई पारबंदर प्रकल्पही पुढच्या वर्षी पूर्ण करण्याचे लक्ष्य.
- रायगडमधील रेवस ते सिंधुदुर्गातील रेडी या ९५७३ कोटी रुपयांच्या सागरी महामार्गाचे कामही हाती घेण्यात येत आहे.
- समृद्धी महामार्गाचा नागपूर ते शिर्डी हा पहिला टप्पा १ मे रोजी सुरू होईल. पुणे चक्राकार मार्ग या २६ हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पाचे कामही हाती घेण्यात आले आहे.
- राज्यातील रस्त्यांच्या सुधारणा व देखभाल दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत वित्तीय विकास महामंडळ स्थापन करण्याची अर्थमंत्र्यांची घोषणा.
- विद्युत वाहनांना प्रोत्साहन देण्याचे धोरण आहे. सीएनजी-हायब्रिड बस घेण्याचे व समृद्धी महामार्ग, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग, मुंबई-नाशिक महामार्गावर विद्युत वाहनांच्या चार्जिंगसाठी मोठी सुविधा उभारणार.
- उद्योगांना प्रोत्साहन देण्यात येत असून रायगडमध्ये औषधनिर्माण पार्क व औरंगाबादमध्ये वैद्यकीय उपकरण पार्कमध्ये २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित.

### महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर

# शहरी पायाभूत सुविधांना प्राधान्य

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** करोनामुळे आलेल्या मंदीचे सावट कमी होऊन राज्यातील अर्थव्यवहाराला चालना देण्यासाठी रस्ते, विमानतळ, मेट्रो, रेल्वे अशा पायाभूत सुविधा प्रकल्पांवर आणि ऊर्जा क्षेत्रातील कामांवर अर्थसंकल्पात भर देण्यात आला आहे.

जालना-नांदेड २०० किलोमीटरच्या सात हजार कोटी रुपयांच्या महामार्गासह मुंबईतील वरळी-शिवडी उन्नत मार्ग, पुणे चक्राकार मार्ग, मुंबई-गोवा सागरी महामार्ग, नागरी भागातील मुख्य बाजारपेठांच्या रस्त्यांचे रुंदीकरण अशा विविध योजनांना गती देण्याची घोषणा करत सरकार विकास प्रकल्पांसाठी प्रयत्नशील असल्याचा संदेश मुंबईसह राज्यातील विविध महानगरपालिकांच्या निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून देण्यात आला आहे.

मुंबई, पुणे, नागपूरसह विविध महानगरपालिकांच्या निवडणुका पुढील वर्षी होत आहेत. या निवडणुकांच्या तोंडावर राज्यातील नागरी भागातील विकासकामांना चालना देण्याचे महाविकास आघाडी सरकारचे धोरण आहे हा संदेश यानिमित्ताने देण्यात आला. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासाठी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासाठी पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका महत्त्वाच्या असल्याने या सर्व पालिकांचा उल्लेख करण्यात आला आहे. राज्यातील रस्त्यांच्या सुधारणा व देखभाल दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत वित्तीय विकास महामंडळ स्थापन करण्यात येईल, अशी घोषणा अर्थमंत्री अजित पवार यांनी केली. आशियाई विकास बँक साहाय्यातून रस्ते विकासाची ५ हजार कोटी रुपयांची कामे २०२१-२२ मध्ये हाती घेण्यात येणार आहेत.

उद्योगांना प्रोत्साहन देण्यात येत असून रायगडमध्ये औषधनिर्माण पार्क व औरंगाबादमध्ये वैद्यकीय उपकरण पार्कमध्ये २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. तर ऊर्जा विभागांतर्गत विद्युत वाहनांना प्रोत्साहन देण्याचे धोरण आहे. सीएनजी-हायब्रिड बस घेण्याचे व समृद्धी महामार्ग, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग, मुंबई-नाशिक महामार्गावर विद्युत वाहनांच्या चार्जिंगसाठी मोठी सुविधा उभारण्यात येईल, असेही अजित पवार म्हणाले. सौरकृषीपंपही मोठ्या प्रमाणात देण्यात येणार आहेत.

**सुरू असलेल्या प्रकल्पांचाच उल्लेख**

पायाभूत सुविधांसाठी विविध प्रकल्पांची यादी सादर करण्यात आली. प्रत्यक्षात यातील काही प्रकल्प अनेक वर्षे कागदावर आहेत किंवा सध्या कामे प्रगतीपथावर आहेत.

शिवडी-न्हावाशेवा हा सागरी पूल दोन दशके चर्चेत आहे. त्याचे काम सुरू झाले आहे. या प्रकल्पांना सरकारच्या तिजोरीतून निधी दिली जाणार नाही. खासगीकरण किंवा सरकारी प्राधिकरणाच्या माध्यमातून हे प्रकल्प उभारण्यात येणार आहे.



### मुंबई महानगर परिसरासाठी काय?

- मुंबईच्या विकासाच्या प्रकल्पांचा विशेष उल्लेख अर्थसंकल्पीय भाषणात करण्यात आला. वरळी-शिवडी उन्नत मार्गाचे काम हाती घेण्यात आले आहे. विरार ते अलिबाग बहुद्देशीय मार्ग प्रकल्पाचे भूसंपादन सुरू झाले आहे.
- ठाणे खाडीला समांतर असा १५ किलोमीटर लांबीचा ठाणे किनारपट्टी रस्ता बांधण्यात येत आहे. मुंब्रा बायपास, शिळ-कल्याण या मार्गांवर उड्डाणपुलांचे काम सुरू आहे.
- मुंबई, ठाणे व नवी मुंबई या भागासाठी जलवाहतूक सुरू करण्यात येत असून त्यासाठी कोलशेत, काल्हेर, डोंबिवली व मीरा-भाईंदर या चार ठिकाणी जेटी बांधण्यात येत आहे.
- मुंबईतील मेट्रोमार्ग २ अ, ७ ही कामे २०२१ अखेर पूर्ण करण्याची ग्वाही अजित पवार यांनी दिली.
- हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्मारकासाठी ४०० कोटी रुपये, मुंबई पूर्व व पश्चिम द्रुतगती मार्गावर सायकलीसाठी स्वतंत्र मार्ग तयार करण्याचे काम वर्षभरात हाती घेण्यात येईल.
- समुद्रातील पाणी गोडे करण्याचा प्रकल्प मालाडजवळ मनोरी येथे उभारण्यात येत असून डिसेंबर २०२१ मध्ये प्रकल्प अहवाल अपेक्षित आहे. मिठी नदी पुनरुज्जीवन प्रकल्पही लवकरच सुरू होणार आहे.

# दोन लाख शिकाऊ उमेदवारांना पाच हजारांपर्यंत पाठ्यवृत्ती

## कौशल्य विकास विद्यापीठामार्फत रोजगाराला चालना देण्याचा संकल्प

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी तसेच फसव्या विज्ञानाचा प्रसार रोखण्याकरिताच राज्यात सहा ठिकाणी राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान पार्कची उभारणी करण्याची घोषणा उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी केली. त्यासाठी प्रत्येकी ५० कोटी रुपयांप्रमाणे ३०० कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात आली आहे.

शिकाऊ उमेदवारांना विद्यावेतनाच्या ७५ टक्के किंवा पाच हजार रुपयांपर्यंतची रक्कम राज्य शासन देणार असून योजनेचा लाभ दोन लाख उमेदवारांना मिळणे अपेक्षित आहे. ही योजना १५ ऑगस्टला २० ला सुरू होणार होती, पण करोनामुळे ती न झाल्याने आता १ मे पासून सुरू होईल.

राज्यात शासकीय कौशल्य विकास विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यात रोजगारनिर्मिती प्रशिक्षण दिले जाईल व रोजगारनिर्मितीला चालना मिळेल. आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्याची घोषणा राज्य सरकारने केली असून त्यात २०० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल. क्रीडा विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, प्रशिक्षण असे चार अभ्यासक्रम त्यात शिकविले जाणार आहेत. उच्च व तंत्रशिक्षण विभागाला कार्यक्रम व उपक्रम राबविण्यासाठी एक हजार ३९१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

बारावीपर्यंतच्या शालेय शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी अध्ययन, अध्यापन व अन्य बाबींसाठी जागतिक बँकेच्या सहकार्याने ९७६ कोटी ३९ लाख रुपयांचा स्टार्स प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राजमाता जिजाऊ शैक्षणिक गुणवत्ता विकास अभियानांतर्गत शासन व जिल्हा परिषदांच्या जीर्णावस्थेतील शाळांच्या इमारतींची पुनर्बांधणी व दुरुस्ती करण्यात येते. त्यासाठी तीन हजार कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला असून २०२१-२२ मध्ये त्यासाठी आवश्यक तरतूद करण्यात येणार आहे. देशातील पहिल्या सैनिकी शाळेची उभारणी १९६१ मध्ये सातारा येथे करण्यात आली होती. या शाळेसाठी पुढील तीन वर्षांत ३०० कोटी रुपये निधी दिला जाणार असून यंदासाठी १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाला विविध कार्यक्रम राबविण्यासाठी दोन हजार ४६१ कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात आली आहे.



### फसव्या विज्ञानाचा प्रसार रोखण्यासाठी सहा 'तंत्रज्ञान पार्क'

फसव्या विज्ञानाचा प्रसार होत असल्याने अभिजात विज्ञानाचा दृष्टिकोन मुलांमध्ये तयार होण्यासाठी प्रत्येक महसुली विभागात एक याप्रमाणे राज्यात सहा राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान पार्कची स्थापना केली जाणार आहे. सध्या फसव्या विज्ञानाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होत असल्यानेच हा निर्णय घेण्यात आल्याचेही अजित पवार यांनी स्पष्ट केले. दरम्यान, फसवे विज्ञान म्हणजे नक्की काय, असा प्रश्न पत्रकार परिषदेत अजित पवार यांना विचारण्यात आला असता त्यांनी, आंबा खाऊन मुलगा होतो, असा काही जण दावा करतात हे फसवे विज्ञान, असे उत्तर त्यांनी दिले. संभाजी भिडे यांनी हा दावा केला होता.

### तरतुदी...

- मुंबईतील नेहरू सेंटरला अत्याधुनिक यंत्रांची खरेदी, आधुनिकीकरण व नूतनीकरणासाठी १० कोटी रुपये
- अमरावती येथील विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेच्या शताब्दीनिमित्ताने पायाभूत सुविधा विकासासाठी १० कोटी रुपये
- मुलुंड येथील कुणबी समाजोन्नती संघाच्या वसतिगृहासाठी पाच कोटी रुपयांची तरतूद.

### सामाजिक न्याय...



**सीबीएसई अभ्यासक्रम**

अनुसूचित जाती आणि नवबौद्ध विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात एक या प्रमाणे शासकीय निवासी शाळेत पथदर्शी तत्त्वावर सहावीपासून सीबीएसई अभ्यासक्रम सुरू करण्याची घोषणा करण्यात आली. २५ एकलव्य मॉडेल शाळांमध्ये अनुसूचित जामातींमधील सहावी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी सीबीएसई अभ्यासक्रमाचे शिक्षण दिले जाते, आता याच शाळांमध्ये टप्प्याटप्प्याने पहिली ते पाचवीपर्यंत सीबीएसईचा अभ्यासक्रम शिकविण्यात येईल.

### करोनाच्या खडतर परिस्थितीतही...

# मागास, वंचित घटकांसाठी २६ हजार कोटींची तरतूद

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** करोना साथरोगाचा मोठा फटका अर्थव्यवस्थेला बसला असतानाही, राज्याच्या अर्थसंकल्पात समाजातील मागास, कष्टकरी, वंचित घटकांसाठी विविध सामाजिक न्यायाच्या योजनांसाठी सुमारे २६ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. अल्पसंख्याक समाजासाठीही भरीव तरतूद करण्यात आली आहे.

राज्याची आर्थिक परिस्थिती खडतर असतानाही महसुली तुटीच्या अर्थसंकल्पातही अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास वर्ग तसेच अल्पसंख्याक समाजासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्याकरिता निधीची तरतूद करताना कुठेही हात आखडता घेतलेला नाही. तीन-चार नवीन योजना असल्या तरी, पूर्वीपासून चालू असलेल्या योजनांसाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे.

या अर्थसंकल्पात अनुसूचित जाती घटक योजनांसाठी १० हजार ६३५ कोटी रुपये आणि सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागास २ हजार ६७५ कोटी रुपये असे मिळून १३ हजार ३१० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. अनुसूचित जमातीकरिता ९ हजार ७३८ कोटी रुपये, इतर मागास बहुजन कल्याण विभागासाठी ३ हजार २१० कोटी रुपये अशी मोठी तरतूद करण्यात आली आहे. त्याशिवाय खुल्या प्रवर्गासाठी व मागासवर्गीयांसाठी असलेल्या सर्वच आर्थिक विकास महामंडळांना भागभांडवलाच्या निधीतही वाढ करण्यात आली आहे. अल्पसंख्याक समाजाच्या शैक्षणिक व इतर कल्याणकारी योजनांसाठी ५८९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

या अर्थसंकल्पात दिव्यांग व तृतीयपंथी घटकाची विशेष दखल घेण्यात आली आहे. विशेषत तृतीयपंथीयांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देऊन शाश्वत रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी नवीन बीजभांडवल योजना सुरू करण्याचे या वेळी जाहीर करण्यात आले.



**सावित्रीबाई फुले घरकुल** राज्यात धनगर समाजासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याच धर्तीवर विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गीयांसाठी क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले घरकुल योजना राबविण्याची घोषणा करण्यात आली.

### इंग्रजीत मीनाताई तर मराठीत जनाबाई !

अर्थमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्प सादर करताना संत जनाबाई यांच्या नावाने महिला घरकामगारांसाठी कल्याणकारी योजना जाहीर केली. भाषणाच्या मराठी प्रतीमध्येही ही योजना संत जनाबाई यांच्या नावानेच होती. मात्र, भाषणाच्या इंग्रजी प्रतीमध्ये हीच योजना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री दिवंगत मीनाताई ठाकरे यांच्या नावाने छापली गेली. त्यामुळे ही ही कसली प्रिंटिंग मिस्टेक? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

### घरकामगार महिलांसाठी कल्याणकारी योजना

करोना टाळेबंदीचा सर्वात मोठा फटका घरकाम करून संसाराचा गाडा हाकणाऱ्या कष्टकरी महिलांना बसला. त्याची दखल अर्थसंकल्पात घेण्यात आली. त्यांच्यासाठी संत जनाबाई सामाजिक सुरक्षा व कल्याणकारी योजना सुरू करण्याचे जाहीर करण्यात आले. त्यासाठी बीजभांडवल म्हणून २५० कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

### कृषी...

- राज्यातील सिंचन प्रकल्पांसाठी १२ हजार ९५१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.
- राज्यात सध्या 'प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना 'अंतर्गत २१ हजार ६९८ कोटी रुपये खर्चाची कामे सुरू आहेत. चालू आर्थिक वर्षात २६ पैकी १३ प्रकल्प पूर्ण करण्यात येणार आहेत.
- जलसंपदा विभागामार्फत २७८ प्रकल्पांची कामे सुरू असून त्यातून २६ लाख ८८ हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होईल आणि आठ हजार ४७० दशलक्ष घनमीटर पाणीसाठा निर्माण होईल.

# शेतकऱ्यांना खूश करण्याचा प्रयत्न

## शून्य टक्के व्याजदराने तीन लाख रुपयांपर्यंत पीककर्ज

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** करोनाकाळातही राज्याचा कृषी क्षेत्राने ११ टक्के विकासदर गाठल्याने शेतकऱ्यांना आणखी मदत देण्यासाठी आणि कृषी क्षेत्राच्या विकासासाठी राज्य सरकारने काही योजनांवर अर्थसंकल्पात भरीव तरतुदी केल्या आहेत.

नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना शून्य टक्के व्याजदराने तीन लाख रुपयांपर्यंतचे पीककर्ज उपलब्ध करुन दिले जाणार आहे. तर कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या बळकटीकरणासाठी दोन हजार कोटी रुपये निधी देण्यात आला असून शेतीमालाच्या बाजारपेठ व मूल्य साखळ्यांच्या निर्मितीसाठी दोन हजार १०० कोटी रुपये खर्चाचा बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प राबविण्याची घोषणा उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी केली आहे. गोसीखुर्द प्रकल्पासाठी एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून हा प्रकल्प डिसेंबर २३ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे.

करोनाकाळात साऱ्या क्षेत्रांमध्ये पीछेहाट झाली असताना, कृषी आणि कृषीवर आधारित क्षेत्रात ११ टक्के विकासाचा दर होता. कृषी क्षेत्राने राज्याच्या अर्थव्यवस्थेला हात दिला. अन्यथा काही खरे नव्हते, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केली. कृषी क्षेत्रासाठी भरीव तरतूद करतानाच शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न झाला आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढून त्यांच्या आत्महत्या थांबाव्यात, यासाठी निधीची कमतरता असूनही कृषी क्षेत्राला दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे अर्थमंत्री पवार यांनी नमूद केले.

शरद पवार ग्राम समृद्धी योजनेंतर्गत लाभार्थीना गाय किंवा म्हशींचा पक्का गोठा बांधण्यासाठी, शेळीपालन आणि कुक्कुटपालनाची शेड बांधण्यासाठी व कम्पोस्टिंगसाठी अनुदान देण्यात येणार आहे. प्रत्येक तालुक्यात किमान एक याप्रमाणे ५०० नवीन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर भाजीपाला रोपवाटिका उभारल्या जाणार आहेत. राज्य सरकारने कृषी संशोधनावर भर दिला असून चार कृषी विद्यापीठांना संशोधनासाठी तीन वर्षांत ६०० कोटी रुपये दिले जाणार आहेत.



### कृषीपंप थकीत वीजबिलात सूट

कृषीपंपांच्या वीजजोडण्यांसाठी महावितरण कंपनीला दरवर्षी दीड हजार कोटी रुपये भागभांडवल स्वरूपात निधी दिला जाणार आहे. कृषीपंपांच्या थकीत वीजबिलात शेतकऱ्यांना ३३ टक्के सूट देण्यात आली असून उर्वरित थकबाकीपैकी ५० टक्के रकमेचा भरणा मार्च २०२२ पर्यंत केल्यास राहिलेल्या ५० टक्के रकमेची अतिरिक्त माफी दिली जाणार आहे. राज्यातील सुमारे ४४ लाख ३७ हजार शेतकऱ्यांना मूळ थकबाकीच्या ६६ टक्के म्हणजे ३० हजार ४११ कोटी रुपये इतकी वीजबिलाच्या थकबाकीची रक्कम माफ केली जाणार असल्याचे अर्थमंत्र्यांनी नमूद केले.

# रडगाणे गाणारा अर्थसंकल्प!

**■ देवेंद्र फडणवीस**
विरोधी पक्षनेते, विधानसभा



**शेतकरी, तरुण** वर्ग, महिला, मागासवर्गीय अशा सर्वच घटकांचा अपेक्षाभंग करणारा, निराशाजनक व रडगाणे गाणारा अर्थसंकल्प आहे. शेतकरी कर्जमाफीतील नियमित कर्ज भरणाऱ्यांना प्रोत्साहन योजनेसाठी किंवा एकरकमी परतफेड (ओटीएस) योजनेसाठी कोणतीही आर्थिक तरतूद नाही. आधीच मूळ कर्जमाफी योजनेत ४५ टक्के शेतकरी हे कर्जमाफीपासून वंचित राहिले आहेत. ठाकरे सरकारची कर्जमाफी ही सर्वात फसवी कर्जमाफी आहे, हेच यातून सिद्ध झाले. वीज बिलासंदर्भात केलेली घोषणासुद्धा फसवी आहे. सरकारने ५० टक्के सवलत दिली, तरी कमी झालेले देयक ७५ हजारांवर जाते. त्यामुळे आधी बिलातील दुरुस्ती केली पाहिजे, पण ते सरकार करणार नाही.

हा अर्थसंकल्प राज्याचा की मुंबई महापालिकेचा, हाही प्रश्न निर्माण होतो. वांद्रे-वरळी सागरी सेतूसह काही प्रकल्प, तीर्थक्षेत्र विकासाचे सर्व प्रकल्प आमच्या सरकारच्या काळात सुरू झाले आहेत.

पेट्रोल-डिझेलच्या दरांबाबत महाविकास आघाडीचे सदस्य रोज फलक घेऊन येत होते. पण राज्याने पेट्रोलवरील २७ रुपये नफ्यातील एकही रुपया कमी केला नाही.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकासाठी १०० कोटींवरून ४०० कोटी वाढवून देण्यात आले, याचा आनंद आहे, पण इंदु मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, अण्णाभाऊ साठे स्मारक, लहुजी वस्ताद साळवे स्मारक यांचा विसर सरकारला पडला, याचे दुःख आहे.

# कृषी, पायाभूत सुविधांना बळकटी

**■ नाना पटोले**
प्रदेशाध्यक्ष, काँग्रेस



**करोना महासाथीच्या** पार्श्वभूमीवर महाराष्ट्र विकास आघाडी सरकारने विधिमंडळात सोमवारी मांडलेला अर्थसंकल्प आरोग्यसेवेला बळकटी देणारा, तसेच कृषी व पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या माध्यमातून रोजगार निर्मितीला चालना देणारा आहे.

करोनाच्या अभूतपूर्व संकटामुळे राज्याच्या उत्पन्नात मोठी घट झालेली असतानाही आघाडी सरकारने आरोग्य, कृषी, शिक्षण, सिंचन, महिला, तरुण, विद्यार्थी, दलित, आदिवासी, अल्पसंख्याक, ग्रामीण व शहरी पायाभूत सुविधांसह विकास प्रकल्पांसाठी भरघोस निधीची तरतूद केली आहे. यामुळे मागच्या सरकारच्या काळात ठप्प झालेली विकासाची प्रक्रिया सुरू होणार असून महाराष्ट्राची विकासपथावर वेगाने घोडदौड सुरू होईल.

विद्यार्थिनी, गृहिणी, कष्टकरी महिलांसाठी राज्य सरकारने नव्या योजना जाहीर केल्या आहेत. घराची नोंदणी महिलांच्या नावावर केल्यास मुद्रांक शुल्कात सवलत देण्यात येणार आहे. राज्यातील ग्रामीण भागातील मुलींना शाळेत जाण्यासाठी मोफत एसटी प्रवास उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शहरातील महिलांच्या सुरक्षित प्रवासासाठी आणखी तेजस्विनी महिला बस उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. राज्य राखीव पोलीस दलात राज्यातील पहिलीच स्वतंत्र महिला पोलिसांची तुकडी स्थापन करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शिकाऊ उमेदवार प्रोत्साहन योजना सुरू करण्यता येणार असून त्यातून युवक-युवतींना रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत.

# अर्थसंकल्प २०२१-२०२२

लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM



## नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये

सिंधुदुर्ग, उस्मानाबाद, नाशिक, रायगड आणि सातारा येथे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यात येणार असून केंद्र शासनाच्या धोरणानुसार सार्वजनिक व खासगी भागीदारीतून ही रुग्णालये उभी केली जातील.

## १२,९५० कोटी

रस्ते विकासासाठी निधी

## ४० कोटी

पुण्यात जागतिक दर्जाच्या साखर संग्रहालयासाठी

आदिवासी विभागासाठी ९,७३८ कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे. शासकीय आदिवासी शाळांचे आदर्श निवासी शाळांमध्ये रूपांतर करण्यात येणार असून पहिल्या टप्प्यात १०० आश्रमशाळांचे काम हाती घेण्यात येणार आहे. राज्यातील २५ एकलव्य मॉडेल निवासी शाळांमध्ये पुढील तीन वर्षात टप्प्याटप्प्याने सीबीएसई अभ्यासक्रमाचे इयत्ता १ ली ते ५ वीचे वर्ग सुरू करण्यात येणार आहेत.

## अर्थसंकल्प दृष्टिक्षेपात

**४,३७,९६० कोटी**
अर्थसंकल्पाचे आकारमान

**३,६८,९८७ कोटी**
महसुली जमा

**३,७९,५०४ कोटी**
महसुली खर्च

**१०,२२६ कोटी**
महसुली तूट

**६६,६४१ कोटी**
राजकोषीय तूट

**१,३०,००० कोटी**
वार्षिक योजना

**११,०३५ कोटी**
जिल्हा योजना

## वेतन, निवृत्तिवेतन आणि व्याजावर ५७ टक्के खर्च

राज्याच्या अर्थसंकल्पात वेतन, निवृत्तिवेतन आणि कर्जावरील व्याज फेडण्यासाठी एकूण खर्चाच्या ५७ टक्के खर्च होणार आहे. यापैकी वेतन आणि निवृत्तिवेतनावर ४६ टक्के खर्च होईल.

- वेतन - १ लाख २२ हजार, ९९७ कोटी (३३.३३ टक्के)
- निवृत्तिवेतन - ४४,३७३ कोटी (१२.०३ टक्के)
- व्याज - ४२,९९८ कोटी (११.७६ टक्के)
- तिन्ही घटक एकूण - २ लाख, १० हजार, ३६८ कोटी ( ५७.०१ टक्के)
- चालू आर्थिक वर्षात हाच खर्च ५५ टक्के होता. त्यात दोन टक्क्यांच्या आसपास वाढ.

## पूर्व मुक्तमार्गाला विलासरावांचे नाव

मुंबईतील पूर्व मुक्त मार्गाला (ईस्टन फ्री वे) माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे नाव देण्यात येत असल्याची घोषणा अजित पवार यांनी केली. या मुक्त मार्गाचे काम विलासरावांच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात झाले होते.

# आरोग्य विभागाला प्राधान्य, पण तरतूद अपुरी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** महाराष्ट्रात करोनाचे सर्वाधिक रुग्ण व मृत्यू झाल्यानंतर आरोग्य विभागाला प्राधान्य मिळाले असले तरी पुरेशा निधीची तरतूद झालेली नाही. अतिरिक्त निधी मिळेल ही अपेक्षा मात्र फोल ठरली आहे. यामुळेच निधीअभावी सर्व घोषणांची पूर्तता कशी करायची हा प्रश्न आरोग्य विभागाला पडला आहे.

आरोग्य विभागाच्या रुग्णालयांचे बांधकाम व श्रेणीवर्धनासाठी ७५०० कोटी रुपयांचा प्रकल्प तयार केला असला तरीही कर्ज योजना असून हे कर्ज मिळाले तरच रुग्णालयांची बांधकामे व श्रेणीवर्धन होऊ शकते. ही योजना मंजूर झाल्यास जिल्हा रुग्णालये, मनोरुग्णालये, ट्रॉमा केअर सेंटर, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांचे बांधकाम व श्रेणीवर्धन होऊ शकेल. वाढत्या नागरीकरणाच्या पार्श्वभूमीवर आरोग्यविषयक पायाभूत सुविधा नागरी भागात निर्माण करण्यासाठी पाच वर्षांसाठी पाच हजार कोटी रुपये उपलब्ध करून देण्याचे घोषित करण्यात आले असून आगामी वर्षात यापैकी ८०० कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.



अर्थसंकल्पात २,६९१ कोटींचा नियतव्यय मंजूर करण्यात आला असला तरी तो अपुरा असल्याचे आरोग्य विभागातील उच्चपदस्थांचे म्हणणे आहे.

करोना साथीच्या पार्श्वभूमीवर औंध येथे अद्ययावत साथरोग रुग्णालय उभारण्याची घोषणा करण्यात आली असून विभागीय व जिल्हा पातळीवर या रुग्णालयांची उपकेंद्रे टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात येणार आहेत. हृदयविकाराच्या रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेऊन राज्यातील आठ मध्यवर्ती ठिकाणी आठ कॅथलॅब सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. याशिवाय ग्रामीण भागात कर्करुग्णांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन १५० ग्रामीण रुग्णालयांत कर्करोग निदानाची सुविधा उभी केली जाणार आहे. भंडारा जिल्हा रुग्णालयातील आगीच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाच्या सर्व रुग्णालयांत आग प्रतिबंधक उपकरणे बसविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

करोनाचा सामना करताना परिचारिकांची भासलेली कमतरता लक्षात घेऊन ११ शासकीय परिचर्या विद्यालयांचे महाविद्यालयात रूपांतर केले जाणार आहे तर १७ शासकीय महाविद्यालयांना जोडून भौतिकोपचार व व्यवसायोपचार महाविद्यालयांची टप्प्याटप्प्याने स्थापना करण्यात येणार आहे.

करोनातून बऱ्या होणाऱ्या अनेक रुग्णांना फुप्फुस, यकृत, मूत्रपिंड तसेच मानसिक तणावाच्या तक्रारी उद्भवताना दिसतात. त्यामुळे प्रत्येक जिल्हा रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयात कोविड पश्चत समुपदेशन व उपचार केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

- विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय शिक्षण संस्था येथे बाह्यरुग्ण इमारतीच्या बांधकामासाठी ७३ कोटी २९ लाख रुपये तर ससून रुग्णालयातील कर्मचारी निवासस्थानाच्या बांधकामासाठी २८ कोटी २२ लाख रुपये मंजूर करण्यात आले.
- सांगली जिल्हा रुग्णालय व महिला रुग्णालयासाठी ९२ कोटी १२ लाख रुपये तर आटपाडी उपजिल्हा रुग्णालयासाठी २० कोटी ६२ लाख रुपये खर्चाला मंजुरी देण्यात आली आहे.
- मुंबईतील ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय व पुणे येथील बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयांना अभिमत विद्यापीठाचा दर्जा देण्याचा मानसही अर्थमंत्र्यांनी व्यक्त केला.

## बाळासाहेब ठाकरे, शरद पवार यांच्या नावे योजना

**मुंबई:** शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाचा उल्लेख अर्थसंकल्पात तीन वेळा करण्यात आला. त्यांच्या नावे कृषी व्यवयास आणि ग्रामीण परिवर्तन प्रकल्प राबविण्यात येणार आहे. शेतमालाला बाजारपेठ आणि मूल्यसाखळ्यांच्या निर्मितीसाठी २१०० कोटींचा हा कार्यक्रम असेल.

महाविकास आघाडीचे शिल्पकार व राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या नावाने ग्राम समृद्धी योजना सुरू करण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत गायी आणि म्हशींचा पक्का गोठा तसेच शेळीपालन व कु क्कुटपालनाकरिता पक्की शेड बांधण्यासाठी अनुदान दिले जाईल.अर्थसंकल्पावर शिवसेनेची छाप आहे. याशिवाय राष्ट्रवादीच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या योजनांना प्राधान्य मिळाले.

# मराठवाड्याची निराशा

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**औरंगाबाद :** पैठण येथे संतपीठ, लातूर येथील विलासराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयासाठी ७३ कोटी, उस्मानाबाद येथे वैद्यकीय महाविद्यालय, जालना-नांदेड रस्त्यासाठी तरतूद, भगवानबाबा, गहिनीनाथ गड विकासासाठी निधी, प्राचीन मंदिर संवर्धनाच्या यादीत औरंगाबाद शहरातील सातारा भागातील खंडोबा देवस्थानाच्या विकासाचा संकल्प आदी घोषणा करत मराठवाड्यातील मंत्र्यांच्या मतदारसंघात निधीचे धोरण अर्थसंकल्पात जपले असल्याचे निरीक्षण नोंदविण्यात येत आहे. पर्यटन राजधानी अशी ओळख असणाऱ्या औरंगाबादमधील पर्यटनस्थळाऐवजी लोणार विकासावर भर दिसून आल्याने औरंगाबादची बोळवण फार तर फार 'नामांतरा'वर अशी टीका केली जात आहे. मराठवाड्यासाठी अर्थसंकल्पातील तरतुदी जेमतेम असल्याची प्रतिक्रिया उमटत आहे.

महापालिका निवडणुका मार्चमध्ये होतील असे गृहीत धरून शिवसेना मंत्र्यांनी औरंगाबादचे दौरे वाढविले होते. यामध्ये पर्यटनमंत्री आदित्य ठाकरे यांनीही दौरा केला होता.



वॉटर ग्रीड योजना सुरू राहील असे सांगितले पण रक्कमच मंजूर केली नाही. तसेच उद्योगांना दिलेल्या १२०० कोटी रुपयांच्या वीज सवलतीच्या योजनेला फाटा देण्यात आल्याचेच दिसून येत आहे. जलसंधारण आणि पाणी संचय योजनासाठी निधी मिळाला नसल्याची टीका केली जात आहे.

त्यामुळे औरंगाबाद जिल्ह्यातील पर्यटनस्थळांना अधिक वाव मिळेल असे चित्र निर्माण करण्यात आले होते. अनेक मान्यवरांशी चर्चा केल्यानंतर जिल्ह्यातील पर्यटनासाठीही काही तरतुदी जाहीर होतील असे अपेक्षित होते, पण तसे अर्थमंत्र्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणातून दिसून आले नाही. संदीपान भुमरे यांच्या मतदारसंघातील संतपीठाची घोषणा करण्यात आल्याने या वर्षात त्याच्या उभारणीला चालना मिळू शकेल. वैद्यकीय शिक्षणमंत्री अमित देशमुख यांनी लातूरच्या वैद्यकीय महाविद्यालयासाठी तरतूद करून घेतली. मात्र मोजकेच मतदारसंघ वगळता मराठवाड्यातील बहुतांश मतदारसंघाला काही एक लाभ मिळाला नसल्याची टीका भाजप आमदारांकडून होत आहे. या अनुषंगाने बोलताना आमदार हरिभाऊ बागडे म्हणाले, 'हा अर्थसंकल्प मुंबई आणि पुणे या शहरांसाठी आहे. मराठवाड्यासाठी त्यात काही नाही. जे शेतकरी नियमित कर्ज फेडतात त्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान देण्याची घोषणा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली होती. त्याकडे दुर्लक्ष झाले.

# इंधनावरील करात कपात करायची होती, पण...

**मुंबई :** वाढत्या इंधन दराच्या पार्श्वभूमीवर काही प्रमाणात करात कपात करण्याचे सुतोवाच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले होते, पण प्रत्यक्ष अर्थसंकल्पात काहीच घोषणा न करण्यात आल्याने भाजपने टीकेची झोड उठविली, तर सत्ताधारी काँग्रेसनेही नापसंती व्यक्त केली. यावर इंधनावरील करात कपात करण्याची योजना होती, पण शेवटी तिजोरीकडे बघावे लागते, असे स्पष्टीकरण अजितदादांनी दिले.

'इंधनाचे दर गगनाला भिडल्याने करात काही प्रमाणात कपात करण्याची योजना होती. मुख्यमंत्र्यांची तशीच भावना होती. माझेही तसेच मत होते. करोनामुळे आधीच अर्थव्यवस्थेवर परिणाम झालेला. केंद्राकडून निधीही मिळालेला नाही. थकबाकी केव्हा मिळणार याची काही स्पष्टता नाही. इंधनाचे दर वाढत असताना केंद्र सरकारकडून काहीच उपाय योजण्यात येत नाहीत. याउलट कर कमी करण्याचे राज्यांना सल्ले दिले जातात. केंद्र काही पावले उचलत नाही मग राज्यानेच कशाला नुकसान सोसायचे, असा सवाल अजितदादांनी केला. इंधनाचे दर कमी होतील अशी नागरिकांची अपेक्षा होती हे बरोबर पण साऱ्याच अपेक्षांची पूर्तता करणे शक्य होत नाही, असेही अजितदादांनी सांगितले.

इंधन दरवाढीच्या विरोधात काँग्रेसने मोर्चा काढला. सत्ताधारी पक्षाचे सदस्य सभागृहात इंधन दरवाढीच्या विरोधात सभागृहात फलक घेऊन आले होते. तरीही राज्याने पेट्रोल व डिझेलवरील करात कपात का केली नाही, असा सवाल विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.

इंधनावरील करात कपात करून नागरिकांना दिलासा देण्याची काँग्रेसची मागणी होती आणि आजही ती कायम असल्याचे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितले. इंधनावरील करात कपात करण्याचे टाळून महाविकास आघाडी सरकारने भाजपवर कु रघोडी करण्याची संधी दडवली, अशीच भावना काँग्रेस नेत्यांनी व्यक्त केली.



### अठराशे कोटींचे अतिरिक्त उत्पन्न

महिलांना मुद्रांक शुल्कात सवलत दिल्याने एक हजार कोटींचे नुकसान होईल, असा अंदाज आहे. त्याच वेळी मद्यावरील करात मोठ्या प्रमाणावर वाढ करण्यात आल्याने १८०० कोटींचे अतिरिक्त उत्पन्न मिळेल, अशी शक्यता वर्तविण्यात आली. इंधनावरील करात कपात केली असती तर तिजोरीत खड्डा पडला असता आणि ही तूट भरून काढण्यासाठी अन्य वस्तूंवरील करात वाढ करावी लागली असती. यामुळेच सध्या तरी इंधनावरील करात कपात केली जाणार नाही. राजकीय दबाव बघूनच निर्णय घेतला जाईल, असे सांगण्यात आले.

# विकास मंडळे नसली तरी विदर्भाला जादा निधी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** विकास मंडळांना मुदतवाढ नाकारल्याने निधीवाटपात अन्याय होईल, अशी भीती भाजपकडून व्यक्त केली जात असली तरी अर्थसंकल्पात विदर्भाला जवळपास तीन टक्के जादा निधी दिल्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी सांगितले. राज्यपालांच्या निर्देशापेक्षा अधिक निधी दिल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

विकास मंडळे अस्तित्वात असताना कोणत्या भागाला किती निधीची तरतूद करायची याचे सूत्र निश्चित करण्यात आले होते. लोकसंख्येच्या प्रमाणानुसार निधीचे वाटप केले जात होते. विकास मंडळांची गेल्या वर्षी मुदत संपली व त्यांना मुदतवाढ देण्याचा निर्णय अद्याप महाविकास आघाडी सरकारने घेतलेला नाही. यातूनच विदर्भ आणि मराठवाड्याच्या मागास भागांवर अन्याय होण्याची भीती विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस आणि माजी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केली होती.



कोणत्या विभागाला किती निधीची तरतूद. कंसात जुन्या सूत्रानुसार किती निधी देणे अपेक्षित होते.

| | |
|---|---|
| विदर्भ : | २६% (२३.०३%) |
| मराठवाडा : | १८.६२% (१८.७५%) |
| उर्वरित महाराष्ट्र : | ५५.३८% (५८%) |

विकास मंडळे अस्तित्वात असती तर राज्यपालांच्या निकषानुसार विदर्भाच्या वाट्याला एकूण निधीच्या २३.०३ टक्के रक्कम आली असती. महाविकास आघाडी सरकारने २६ टक्के तरतूद केल्याचे पवार यांनी सांगितले. उर्वरित महाराष्ट्रासाठी ५८ टक्के तरतूद करावी लागली असती. पण ५५.३८ टक्के तरतूद करण्यात आली. विदर्भाला अतिरिक्त निधी देण्यासाठीच उर्वरित महाराष्ट्राच्या तरतुदीत कपात करण्यात आली. मराठवाड्याला १८.७५ टक्के निधी मिळणे अपेक्षित असले तरी १८.६२ टक्के तरतूद करण्यात आली आहे.

विदर्भाला अतिरिक्त तर मराठवाड्याला निकषानुसारच तरतूद करून विदर्भ आणि मराठवाड्यावर अन्याय होणार नाही याची खबरदारी घेण्यात आल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

## राज्याचे नियोजन कोलमडले

# केंद्राचा हिस्सा १४ हजार कोटींनी घटला

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** केंद्राकडून अपेक्षित धरण्यात आलेल्या अनुदानात १४ हजार कोटींपेक्षा अधिक घट झाल्याने करोनामुळे अर्थचक्र घसरलेल्या राज्याच्या अर्थव्यवस्थेला फटका बसल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

चालू आर्थिक वर्षात राज्याने केंद्राकडून ४८ हजार ४०९ कोटी रुपयांचे अनुदान अपेक्षित धरले होते. त्यानुसार अर्थसंकल्पात नियोजन करण्यात आले होते. करोनामुळे केंद्राच्या उत्पन्नावर परिणाम झाला. त्यातून केंद्राने राज्याच्या अनुदानात कपात केली. यामुळेच केंद्राकडून महाराष्ट्राला ३३ हजार ७४३ कोटी रुपयांचे अनुदान मिळण्याची चिन्हे आहेत. राज्याला थेट १४ हजार कोटींपेक्षा अधिक फटका बसला. राज्याचे नियोजनच कोलमडल्याचे अजितदादांनी सांगितले.

राज्याच्या महसुली उत्पन्नात आलेली तूट, केंद्राकडून मिळणाऱ्या अनुदानात झालेली कपात यामुळे २०२०-२१ या चालू आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पाचे आकारमान ४ लाख ०४ हजार कोटींवरून ३ लाख ७९ हजार एवढे कमी करावे लागले.

विकासकामांवरील खर्चही साडेसात टक्क्यांनी कमी करावा लागला. अर्थसंकल्पात ४७ हजार अपेक्षित धरण्यात आला होता.

तो खर्च आता ४३,८२८ कोटी होईल. मात्र पुढील आर्थिक वर्षात विकासकामांवरील खर्चात ३४ टक्के वाढ करण्यात आली असून हा खर्च ५८,७४८ कोटी रुपये प्रस्तावित करण्यात आला.

रुपयाच्या तुलनेत भांडवली खर्च हा १२ पैसे दाखविण्यात आला आहे.

### राजकोषीय तूट वाढली

राजकोषीय तूट ही तीन टक्के असावी, अशी कायद्यात तरतूद आहे. करोनामुळे अर्थव्यवस्थेला बसलेल्या फटक्यामुळे राज्याची राजकोषीय तूट ही चार टक्क्यांवर जाईल, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. करोनामुळे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी पुढील दोन वर्षे जास्त खर्च करावा लागणार आहे. चालू आर्थिक वर्षात राजकोषीय तूट ही ६६ हजार कोटींवर गेली.

# राज्यावरील कर्जाचा बोजा सहा लाख कोटींवर

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** पुढील आर्थिक वर्षात राज्यावरील कर्जाचा बोजा हा सहा लाख, १५ हजार कोटींवर जाईल, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. गेल्या तीन वर्षांत राज्यावरील कर्जाचा बोजा हा सुमारे दीड लाख कोटींनी वाढला आहे.

देशात महाराष्ट्रावर सर्वाधिक कर्जाचा बोजा आहे. सकल राज्य उत्पन्नाच्या २५ टक्यांपर्यंत कर्ज असले तरी आर्थिक परिस्थिती योग्य असल्याचे मानले जाते. राज्यावर २० टक्यांच्या आसपास कर्जाचा बोजा असल्याने आर्थिक आघाडीवर कर्ज वाढले तरी तेवढा धोका नसल्याचे वित्त विभागाच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. चालू आर्थिक वर्षाच्या अखेरीस म्हणजेच ३१ मार्चपर्यंत ५ लाख ३८ हजार कोटींचे कर्जाचे प्रमाण असेल. पुढील आर्थिक वर्षात कर्जाची रक्कम ही सहा लाख कोटींवर जाईल, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

### वर्षनिहाय कर्जाचे प्रमाण

| | |
|---|---|
| २०१०-११ | २.०३ हजार कोटी |
| २०११-१२ | २.२५ हजार कोटी |
| २०१२-१३ | २. ४६ हजार कोटी |
| २०१३-१४ | २.६९ हजार कोटी |
| २०१४-१५ | २.९४ हजार कोटी |
| २०१५-१६ | ३.२४ लाख कोटी |
| २०१६-१७ | ३.६४ लाख कोटी |
| २०१७-१८ | ४.०२ लाख कोटी |
| २०१८-१९ | ४.०७ लाख कोटी |
| २०१९-२० | ४.५१ लाख कोटी |
| २०२०-२१ | ५.३८ हजार कोटी |
| २०२१-२२ | ६.१५ हजार कोटी अपेक्षित |

करोनामुळे यंदा सारेच आर्थिक नियोजन फसले. यंदा राज्याला सुमारे ७० हजार कोटींपेक्षा अधिक कर्ज खुल्या बाजारातून उभे करावे लागले. पुढील आर्थिक वर्षातही अधिक कर्ज काढावे लागणार आहे.

# पुण्यातील जागतिक दर्जाच्या साखर संग्रहालयासाठी ४० कोटी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** साखर उद्योगाची माहिती सर्वांना होण्यासाठी शिवाजीनगर येथील साखर संकुल परिसरात प्रस्तावित केलेल्या जागतिक दर्जाच्या साखर संग्रहालयासाठी ४० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. याबाबतची घोषणा राज्याचे उपमुख्यमंत्री आणि वित्तमंत्री अजित पवार यांनी सोमवारी विधिमंडळात केली.

जगात बर्लिन, मॉरिशस आणि ऑस्ट्रेलिया येथे साखर संग्रहालये आहेत. जगात ब्राझीलनंतर भारत देश साखर उत्पादनात दुसऱ्या क्रमांकावर आहे. या सर्वाधिक उलाढाल असलेल्या उद्योगाची माहिती सर्वांना होण्यासाठी साखर संकुल येथे पाच एकर जागेत हे संग्रहालय उभारण्याचा प्रस्ताव साखर आयुक्त शेखर गायकवाड यांनी राज्य सरकारला पाठवला होता. याबाबतचे सादरीकरण वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत गायकवाड यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या उपस्थितीत केले होते.



या संग्रहालयात ऊस उत्पादन, साखरेचे उत्पादन, गूळ, साखरेपासून तयार होणारे उपपदार्थ यांची प्रत्यक्ष माहिती मिळणार आहे. त्याकरिता संग्रहालयात छोटेखानी साखर कारखाना उभारण्यात येणार आहे. कारखान्यांमधील आसवनी प्रकल्प, इथेनॉल, कंपोस्ट खत, सहवीज निर्मिती कशी होते? याची माहिती नागरिकांना मिळणार आहे. याशिवाय जागतिक व देशांतर्गत साखरेसंबंधी माहिती, गूळ व साखर कारखान्यांची सूक्ष्म प्रतिकृती, साखर उद्योगाबाबत डिजिटल प्रदर्शनी, प्रेक्षागृह, कॅफे, ग्रंथालय, कलादालन, सभागृह या गोष्टींचा समावेश असणार आहे.

### ...म्हणून पुण्यातच संग्रहालय

पुणे जिल्हा ऊस लागवडीमध्ये राज्यात अग्रणी आहे. जिल्ह्यातील ऊस संशोधन केंद्रात नवीन उसाच्या वाणांची निर्मिती, अद्ययावत ऊस लागवड तंत्रज्ञानाबाबत संशोधन केले जाते. वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटमध्येही उस लागवड, उत्पादन व संशोधन होते. साखर आयुक्तालय पुण्यात असून या ठिकाणी संग्रहालयासाठी मुबलक जागा उपलब्ध असल्याने पुण्यातच साखर संग्रहालय उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### ऊसतोड महामंडळास भरीव रक्कम

औरंगाबाद : गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळास आकार देत प्रति क्विंटल दहा रुपयाप्रमाणे जमा होणाऱ्या निधीमध्ये तेवढाच निधी राज्य सरकार तिजोरीतूनही देईल, या घोषणेसह गहिनीनाथ गड, भगवान गड या धार्मिक स्थळ विकासास निधी देण्याची अर्थमंत्री अजित पवार यांनी केलेल्या घोषणा समाज कल्याण मंत्री धनंजय मुंडे यांचे राजकीय वर्चस्व वाढविणाऱ्या असल्याचा संदेश मराठवाड्यात गेला आहे. राज्यातील बहुतांश साखर कारखान्यावर ऊसतोडणीसाठी बीड जिल्ह्यातून तोडणीसाठी मजूर जातात. त्यांच्या कल्याणासाठी महामंडळ स्थापन करण्याची घोषणा भाजप सरकारने केली होती. ती देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना पंकजा मुंडे यांना करता आली नव्हती.

## जाहीर नोटीस

याद्वारा आम जनतेस सूचना देण्यात येते की **ईश्वर हश्मतराय थाडानी,** राहणार- २००१ स्टर्लिंग टॉवर, एच. गोरेगावकर मार्ग, गामदेवी, मुंबई-४०० ००७, त्यांच्या मालकीच्या असलेल्या मालमत्तेसबंधीत माझ्या अशिलांशी वाटाघाटी करीत आहेत, ज्याचे अधिक तपशीलवार वर्णन याखालील अनुसूचीमध्ये देण्यात आले आहे.

मालक यांचिक माझ्या अशिलास असे दर्शवित आहेत आणि हमी देत आहेत आहेत की उक्त मालमत्ता सर्व भारमुक्त आणि/किंवा नामाधिकाराबाबत दोषमुक्त आहे. कोणतीही व्यक्ती विक्री, गहाणवट, भाडेपट्टा, धारणाधिकार, भेट, सुविधाधिकार, देवघेव, ताबा, वारसा, उत्तराधिकार किंवा अन्य जे काही असेल त्या कोणत्याही तऱ्हेने मालमत्तेवर कोणताही दावा असलेल्या सदर व्यक्तीने जाहीर सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत त्याकरिता पुराव्यानिशी एकत्रीत निम्नस्वाक्षरीकारांना तसे लेखी कळविणे आवश्यक आहे, त्यास असमर्थ ठरल्यास माझे अशिल सदर विक्री प्रक्रिया/व्यवहार पूर्ण करतील आणि सर्व दावे, जर असल्यास, सोडून दिल्याचे आणि/किंवा परित्याग केल्याचे समजण्यात येईल.

**अनुसूची**
**मालमत्तेचे वर्णन असलेली**

पुढील रिक्त जमीन व मैदानाचे सर्व खंड व तुकडेः धारण केलेला प्लॉट नं. ३६, हिल टॉप कॉलनी खंडाळा, एरिआ १२२० चौ.यार्डस, १०१९.९२ चौ.मी. शी तुल्य मोजमापाचा, हिल टॉप कॉलनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या योजनेतील, सिटी सर्व्हे नं.५७७ अंतर्गत, खंडाळा, तालुका- मावल, जिल्हा- पुणे येथे पडून असलेला/ असलेला/ स्थित असलेला, लोणावळा, म्युनिसिपल काउंसिलच्या मर्यादित. **पूर्वेला किंवा त्या दिशेने :** ३०' फू.रुंद रोड, **दक्षिणेला किंवा त्या दिशेने :** प्लॉट नं. ३४, **पश्चिमेला किंवा त्या दिशेने :** प्लॉट नं. ३७, **उत्तरेला किंवा त्या दिशेने :** प्लॉट नं. ३८.

**५५ नाकोडा कॉम्प्लेक्स,**
**लोणावळा बाजार, पीन नं. ४१०४०१**
**टेलि नं. : ९८२२२७६३४४**
**तारीख : ०९ मार्च, २०२१**

**अॅडव्हो. बी. एल. घोलप**
**अॅडव्होकेट व नोटरी**

---

## भारत सरकार टकसाल, मुंबई

आयएसओ 9001:2015 आयएसओ 14001:2015 एनएबीएल/ आयएसओ 17025:2017 प्रमाणित युनिट
भारत प्रतिभूति मुद्रण व मुद्रा निर्मिती महामंडळ मर्यादित चा घटक
सीआयएन: U22213DL2006GOI144763
लघु रत्न श्रेणी- I सीपीएसई (पूर्णपणे भारत सरकारच्या मालकीचा)
शहीद भगत सिंग रोड, फोर्ट, मुंबई-400 001.
दुरध्वनी: 022 -22663199 विस्तारीत:132/219 फॅक्स: 022 - 22661450
ईमेल : igm.mumbai@spmcil.com वेब : igmmumbai.spmcil.com

सूचना का अधिकार RIGHT TO INFORMATION

**सूचना**
**स्मरणार्थ नाणे संचांचे बुकींग**

भारत सरकार टकसाल, मुंबई (भारत प्रतिभूति मुद्रण व मुद्रा निर्मिती महामंडळ मर्यादित चा घटक) यांना, खालील विषयांच्या प्रमाणे प्रुफ आणि यूएनसी स्मरणार्थ नाणे संचांच्या बुकींगची सूचना देण्यास आनंद होत आहे.

| विषय | प्रुफ (रु.) | यूएनसी (रु.) |
|---|---|---|
| श्री. श्यामाचरण लाहिरी महाशय यांचा 125 वा प्रस्थान वर्धापन दिन ('125 च्या परिमाणात) - ब्लिस्टर पॅकींग | 3775.00 | 3255.00 |
| लाकडी पेटीमध्ये मर्यादित आवृत्ती | **लाकडी पेटी (रु.)** | **लाकडी पेटी (रु.)** |
| श्री. श्यामाचरण लाहिरी महाशय यांचा 125 वा प्रस्थान वर्धापन दिन ('125 च्या परिमाणात) | 4930.00 | 4410.00 |

बुकींगचा कालावधी 09-03-2021 ते 30-04-2021 असा असेल. आमच्या igmmumbai.spmcil.com या वेबसाईटवर नाणे संचांचे आरक्षण केले जाऊ शकेल. वैकल्पिकरित्या आमच्या वेबसाईटवर उपलब्ध असलेला मागणी नमुना/ ऑर्डर फॉर्म सादर करुन किंवा साध्या कागदावर पूर्ण तपशील देऊन म्हणजेच ठळक अक्षरात नाव आणि पूर्ण पत्ता, वर नमुद केल्याप्रमाणे विहित करण्यात आलेल्या किमतीसह आवश्यक असलेल्या नाणे संचांचा तपशील देऊन, सदर नाणे संचांची ऑफलाईन ऑर्डर दिली जाऊ शकते.

ऑफलाईन आरक्षणाची/बुकींगची रक्कम कोणत्याही शेड्युल्ड बँकेच्या `INDIA GOVERNMENT MINT (UNIT OF SPMCIL) COLLECTION A/C` च्या नांवे डिमांड ड्राफ्ट द्वारे भरणे आवश्यक आहे. बुकींग बंद होण्याच्या दिनांकापासून सहा (6) महीन्यांच्या आत सदर नाणी भारतीय डाकेद्वारे वितरित करण्यात येतील आणि ६ महीन्यांच्या अगोदर हे रद्द करण्याची परवानगी नाही. नाणी न मिळाण्याची तक्रार लवकर निराकरण करण्यासाठी एका वर्षाच्या आत संबंधित विभागाच्या निदर्शनास आणली पाहिजे.

अन्य सविस्तर अटी आणि शर्तींसाठी आणि ऑनलाईन बुकींगसाठी आमच्या igmmumbai.spmcil.com या आमच्या वेबसाईटच्या ग्राहक कॉर्नर विभागास भेट द्यावी.

सही/-
उप-महाव्यवस्थापक (विपणन) करिता
मुख्य महाव्यवस्थापक

---

TASTY BITE

## TASTY BITE EATABLES LTD.

**Regd Off: 201-202, Mayfair Towers, Wakdewadi, Shivajinagar, Pune 411 005**
**Tel: 020 3021 6000; Fax: 020 3021 6048; CIN: L15419PN1985PLC037347,**
**Website: www.tastybite.co.in, E-mail ID : info@tastybite.com**

NOTICE is hereby given that the registered holder of the following Share Certificate for equity shares of the Company, reported as lost/ misplaced/ not traceable, have applied to the Company for issue of Duplicate Share Certificate:

| Sr. No. | Folio No. | Name of Shareholders | Distinctive Nos. | Certificate Nos. | No. of Shares |
|---|---|---|---|---|---|
| 1 | C 001006 | CHARANBIR SINGH JOLLY | 1309951-1311650 | 10601–10617 | 1700 |
| 2 | K 001023 | KAWAL BIR SINGH JOLLY | 1433001-1433100 | 11832–11832 | 100 |
| | | | 1434501-1435500 | 11847–11856 | 1000 |

The public are hereby cautioned against purchasing or dealing in any way with the above listed share certificate. Any person having any claim in respect of this certificate should write to the Company Secretary at the address given above within 15 days from the date of publication of this Notice. In case where no objection is received within the said 15 days, the Company will proceed to issue duplicate certificate.

**Pune**
**March 8, 2021**

**For Tasty Bite Eatables Limited**
**Company Secretary**

---

बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

**पुणे शहर अंचल कार्यालय :**
११८३/ए, यशोमंगल, एफ. सी. रोड, शिवाजीनगर, पुणे-५, फोन : ०२० -२५५७३४०२/३३०३

## ताबा नोटीस
[अॅक्ट रुल८(१) अंतर्गत अॅपेंडिक्स IV)]

ज्याअर्थी खाली सही करणार **बँक ऑफ महाराष्ट्रचे** अधिकृत अधिकारी यांनी दि सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अॅसेटस् अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ (२००२ चा ५४ ) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या सेक्शन १३(१२) व रुल ३ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून कर्जदार **श्री. श्रीधर शंकर सकपाळ (मयत असल्यामुळे कायदेशीर वारसदारांमार्फत प्रतिनिधित्व, श्रीमती जयश्री श्रीधर सकपाळ, श्री. अनंत श्रीधर सकपाळ, विजय श्रीधर सकपाळ)** यांना **दि. २०/१०/२०२०** रोजी **मागणी नोटीस** बजावली होती की, त्यांनी सदर नोटीसीत नमूद केलेली बँकेला येणे असलेली एकूण रक्कम **रु. २२,२६,१७१.६१/- अधिक त्यावरील ९.४०% दराने व्याज दि. ३०/०६/२०१९ पासूनच्या मासिक येण्यासहित तसेच त्यावरील दंडात्मक व्याज, किंमत आणि खर्च इ.** अशी सर्व रक्कम सदर नोटीसीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परत करावी.

कर्जदार **श्री. श्रीधर शंकर सकपाळ (मयत असल्यामुळे कायदेशीर वारसदारांमार्फत प्रतिनिधित्व, श्रीमती जयश्री श्रीधर सकपाळ, श्री. अनंत श्रीधर सकपाळ, विजय श्रीधर सकपाळ)** सदर रक्कम परत करण्यास असमर्थ ठरल्याने, विशेषत: कर्जदार आणि सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते की, खाली सही करणार यांनी सदर कायद्याच्या सेक्शन १३(४) व रूल ८ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खाली नमूद केलेल्या मालमत्तेचा **दि. ०५/०३/२०२१ रोजी प्रतिकात्मक ताबा** घेतला आहे.

विशेषत: कर्जदार व सर्वसाधारण जनता यांना सावध करण्यात येते की, त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात कोणताही व्यवहार करू नये. असा व्यवहार केल्यास तो **बँक ऑफ महाराष्ट्र, नऱ्हे शाखा, पुणे** यांना वर नमूद केलेल्या येणे असलेल्या रक्कमेच्या अधीन राहील.

सुरक्षित आस्ति सोडविण्यासाठी संलग्न उपलब्ध वेळेमध्ये कर्जदाराचे लक्ष सदर कायद्याच्या सेक्शन १३(८) अंतर्गत तरतुदींकडे वेधून घेतले जात आहे.

सदर नोटीस ही प्रादेशिक भाषेमध्ये सुद्धा प्रसिद्ध करण्यात येते. कोणत्याही प्रकारच्या स्पष्टीकरणासाठी मूळ इंग्रजी नोटीस ग्राह्य धरली जाईल.

बँकेकडे गहाण असलेल्या आणि बँकेने ताब्यात घेतलेल्या मालमत्तेचा तपशील पुढीलप्रमाणे:

फ्लॅट नं. १०९, पहिला मजला, सिद्धांत सप्तरंग बिल्डिंग, स. नं. ४३/४०, गणेश मंदिराजवळ, मानाजी नगर, नऱ्हे, पुणे – ४११०४१

**दिनांक : ०५/०३/२०२१**
**ठिकाण : नऱ्हे, पुणे**

**अधिकृत अधिकारी व मुख्य प्रबंधक,**
**बँक ऑफ महाराष्ट्र**

---

19th Celebrating Cinema
**Pune International Film Festival**
PIFF
महाराष्ट्र शासन
Jointly Organized by:
Pune Film Foundation
११ ते १८ मार्च २०२१

# PIFF होतंय
In Theatre Online

**ऑनलाईन नोंदणी**
**www.piffindia.com**

आपल्या प्रवेशिका मिळवण्यासाठी
दि. १ मार्च २०२१ पासून
(सकाळी ११ ते सायं. ७:३० वाजेपर्यंत)
प्रवेशिका खालील नोंदणी क्रमांकावर उपलब्ध
PVR (सेनापती बापट मार्ग)
NFAI (लॉ कॉलेज मार्ग)
INOX (कॅम्प)
प्रवेशिका प्राप्त करण्यासाठी फोटो आयडेंटिटी, वयाचा दाखला आवश्यक. ऑनलाईन नोंदणी केली असल्यास नोंदणी क्रमांक आपल्या सोबत आणणे आवश्यक आहे.
१० मार्च २०२१ रोजी १८ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे

**डेलिगेट कार्ड**
Virtual Screening- ५०० रुपये सर्वांसाठी
In Theatre - ६०० रूपये सर्वांसाठी.
ऑनलाईन व रोख पद्धतीने पैसे स्विकारले जातील.

अधिक महितीकरिता संपर्क साधा
delegate.piff@gmail.com | 020- 24265161

---

## जुन्नर नगरपरिषद, जुन्नर

कार्यालयीन फोन : (०२१३२) २२२०२२
ई-मेल : junnarmunicipal@gmail.com

जा. क्र. प्रशा/वशी/२३९६/२०२१ — दिनांक ०८/०३/२०२१

**नगरपरिषद जुन्नर खालील कामाकरिता सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी द्वि-लिफाफा पद्धतीने सीलबंद निविदा मागवित आहे.**

| अ. क्र. | कामाचे नाव | अनामत रक्कम | बयाणा रक्कम | निविदा शुल्क | कामाची/ पुरवठ्याची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १. | स्टेशनरी खरेदी करणे | प्रत्येक बिलातून १०% | ५००/- | १००/- | कामाच्या आदेशापासून एक वर्ष |
| २. | विविध नमुन्यातील रजिस्टर/ फॉर्म व इतर छपाई करणे. | रु. २०००/- | ५००/- | १००/- | कामाच्या आदेशापासून एक वर्ष |

**नियम व अटी**

१. वरील कामासंबधात अधिक माहिती नगरपरिषदेचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध होऊ शकेल.
२. कोऱ्या निविदा विक्री ही जाहिरात प्रसिद्धी झाल्याच्या तारखेपासून दि. १५/०३/२०२१ पर्यंत सायं. ५.०० वाजेपर्यंत करण्यात येईल. भरलेल्या निविदा दिनांक १६/०३/२०२१ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. वरील सर्व बाबीच्या निविदा दिनांक १७/०३/२०२१ रोजी सायंकाळी ४.०० वाजता पहिला लिफाफा न. पा. कार्यालयात उघडण्यात येईल.
३. पहिल्या लिफाफामध्ये अधिकृत असल्याची कागदपत्रे, पॅनकार्डची झेरॉक्स दाखल करणे आवश्यक राहील. लिफाफा क्रमांक २ मध्ये दर भरून देणे आवश्यक राहील.
४. अटीयुक्त निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.
५. निविदासोबत असलेल्या अटी व शर्ती आपणास बंधनकारक राहतील.
६. कोणतेही कारण न देता सर्व किंवा एक निविदा नाकारण्याचा हक्क नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.
७. निविदा मंजूर झाल्यानंतर योग्य त्या रकमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल. तसेच देय बिलातून शासकीय कर कपात करण्यात येतील.

**मच्छिंद्र घोलप** — मुख्याधिकारी
**दिपेशसिंग परदेशी** — उपाध्यक्ष
**श्याम पांडे** — अध्यक्ष

**जुन्नर नगरपरिषद, जुन्नर, जि. पुणे** (शिक्का)

---

TATA

## टाटा कॅपीटल हाउसिंग फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत पत्ता : ११वा मजला, टॉवर 'ए', पेनीनसुला बिझिनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परळ, मुंबई - ४०० ०१३.
शाखेचा पत्ता : पहिला मजला, एफसी अॅनेक्स बिल्डिंग, फर्गुसन कॉलेज समोर, शिरोळे रोड, धाम्बुर्डा, पुणे-४११००५.

**सुरक्षा हीत (अंमलबजावणी) नियम, २००२च्या नियम ९ यासह वाचलेल्या नियम ८ अंतर्गत खाजगी कराराद्वारा विक्रिची सूचना**

आम जनतेस आणि विशेषकरुन ऋणको / सह-ऋणको ("ऋणको") यांना याद्वारा सूचना देण्यात येते की याखाली वर्णिलेली सुरक्षित मत्ता जी टाटा कॅपीटल हाउसिंग फायनान्स लिमिटेडकडे ("सुरक्षित धनको") गहाण आहे, सदर सुरक्षित मत्तेचा ताबा प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारा घेण्यात आला आहे व तिची विक्रि "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे" व "जे काही आहे तेथे आहे" तत्वावर खाजगी कराराद्वारा करण्यात येणार आहे. विक्रि या जाहीरातीच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून पंधरा (१५ दिवस) दिवसानंतर कोणत्याही दिवशी खाजगी कराराद्वारा करण्यात येणार आहे. तपशील अधिक सविस्तररीत्या याखाली देण्यात आला आहे.

| लोन अकाउंट नं. | ऋणकोचे नाव | मागणी सूचनेची तारीख व रक्कम | राखीव किंमत (आरपी) | इसारा रक्कम ठेव (इरठे) |
|---|---|---|---|---|
| ९५९२७७९ | श्री प्रमोद दिक्षित (ऋणको) श्रीमती उज्वल दिक्षित (सह-ऋणको) | रु २८,६९,८४१/- ०६.०९.२०१७ रोजी प्रमाणे | रु. १२,१५,०००/- | रु. १,२१,५००/- |

**सुरक्षित मत्ता / स्थावर मालमत्तेचा तपशील : अनुसूची "ए"** :- मालमत्तेची पहिली अनुसूची :- पुढील जमीन मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे : मोजमापाचा ०० एच ०५ आर्स धारण केलेल्या जुना सर्व्हे क्र. १५४ जमिनीपैकी आणि त्यामधून, तिचा नवीन सर्व्हे क्र. १८३, हिस्सा क्र. १ए + १बी/८ए/७ असलेला, ०० एच १५ आर्स मोजमापाचा एकूण एरिआ मूल्यमापन केलेले रु ००.१० पैसे व येथे स्थित :- व्हिलेज फुरसुंगी, ता. हवेली, जि. पुणे आणि सदर जिल्हा परिषद पुणे, तालुका पंचायत समिती हवेलीच्या मर्यादित आणि ग्रामपंचायत फुरसुंगीच्या स्थानिक मर्यादेत आणि सब-रजिस्ट्रार हवेली नं. I ते XXVII पुणेच्या अधिकारितेत आणि खालीलप्रमाणे सिमित : पूर्व : श्री विलास गणपत हरपळे यांच्या मालमत्तेद्वारा, दक्षिण : श्री विलास गणपत हरपळे यांच्या मालमत्तेद्वारा, पश्चिम : रोड द्वारा, उत्तर : मुक्ताई रेसिडेंसीच्या मालमत्तेद्वारा.
उक्त मालमत्तेकरिता लागू असलेल्या सर्व नामाधिकार व हीतासह
अनुसूची "बी" :- मालमत्तेची दुसरी अनुसूची :- फ्लॅट नं. ०१, पहिल्या मजल्यावरील, सुमारे ९५६ चौ.फू. म्हणजेच ८८.८४ चौ.मी.
(बिल्ट-अप) मोजमापाचा, बिल्डिंग नं. "ए" मधील, "शिव प्लाझा" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रकल्पामधील, येथे स्थित :- उक्त फ्लॅटकरिता लागू असलेले सर्व हक्क, नामाधिकार व हीत यासह त्यातील फिक्सचर्स, फिटिंग्ज, सुविधा यासह यावरील अनुसूची "ए"मध्ये अधिक तपशीलवारपणे वर्णिलेली मालमत्ता

**खाजगी करारनाम्याद्वारा सुरक्षित मत्तेच्या विक्रिकरिता शर्ती व अटी :**
१. स्वारस्य असलेल्या पक्षकारानी खाजगी करारनाम्यात सहभागी होतेवेळी खालील कागदपत्रे सादर करावीत. (i) विहित प्रपत्रातील त्याच्या / तिच्या प्रस्तावासमवेत केवायसी कागदपत्रांच्या स्वयं-साक्षांकित प्रती आणि (ii) खाली नमूद केल्यानुसार शहर शाखेला देय "टाटा कॅपिटल हाउसिंग फायनान्स लिमिटेड" च्या नावे इरठेचा डिमांड ड्राफ्ट. २. स्वारस्य असलेल्या पक्षकारानी सुरक्षित धनकोद्वारा आवश्यकतेनुसार सदर कागदपत्रे / विक्रिच्या अटींचे अनुपालन करावे. ३. सुरक्षित धनकोद्वारा उच्चत्तर प्रस्तावाच्या लेखी स्वीकृतीनंतर आणि खरीददार म्हणून घोषित झाल्यावर, खरीददार स्वीकृती पत्राच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत उर्वरित विक्रि विचाराधीन किंवा लेखी स्वरुपात सुरक्षित धनको व खरीददार यांच्या दरम्यान मान्य केल्यानुसार प्रदान करतील. जर सुरक्षित धनकोद्वारा नामंजूर झाल्यास स्वारस्य असलेल्या पक्षकाराद्वारा दिलेली प्रस्तावाबाबत डिमांड ड्राफ्ट परत केली जाईल. एकदा डिमांड ड्राफ्ट परत केली गेल्यास स्वारस्य असलेल्या पक्षकाराचा कोणताही हक्क असणार नाही किंवा सुरक्षित धनकोद्वारा त्याचा / तिचा प्रस्ताव स्वीकारला जाणार नाही. ४. मान्य झालेल्या अटींच्या अनुसार विक्रि विचाराधीन उर्वरित रक्कम किंवा त्यावरील कोणतीही भागशः रकमेचे प्रदान करण्यास असमर्थ ठरल्यास सुरक्षित धनको कसूरदार खरीददाराद्वारा आधीच प्रदान केलेली रक्कम जप्त करतील आणि तो / ती सुरक्षित मत्तेवरील सर्व दावे गमावेल किंवा जप्त केलेली रक्कम किंवा कोणतीही भागशः रक्कम, ज्याकरिता सुरक्षित मत्तेची तदनंतर विक्रि करण्यात येईल. ५. सुरक्षित मत्तेची विक्री सुरक्षित धनकोला ज्ञात असलेल्या किंवा ज्ञात नसलेल्या सर्व विद्यमान व भावी भारासह करण्यात येत आहे. प्राधिकृत अधिकारी / सुरक्षित धनको किंवा त्यांचा कोणताही अधिकारी कोणत्याही त्रयस्त पक्षकारांचे दावे / हक्क / देणी, इ. करिता जबाबदार असणार नाहीत. ६. स्वारस्य असलेल्या पक्षकाराने त्याच्या / तिच्या उत्तम समाधानाखातीर सुरक्षित मत्तेसंबंधीत स्वतः योग्य व्यासंगाने चौकशी करावी. स्वारस्य असलेले पक्षकार / खरीददार नंतरच्या स्तरावर या संबंधीत प्राधिकृत अधिकारी / सुरक्षित धनको किंवा त्यांच्या कोणताही अधिकाऱ्याच्या विरोधात कोणत्याही स्वरुपाचा, कोणताही दावा करण्यास हक्कदार नसतील. ७. खरीददाराच्या नावे विक्रि प्रमाणपत्राच्या निष्पादनापूर्वी कोणत्याही वेळेस विक्रि रद्द करण्याचा प्राधिकृत अधिकाऱ्याच्या स्वेच्छाधिकारावर असेल. ८. खरीददाराने सुरक्षित मत्तेसंबंधीत स्टॅम्प ड्यूटी, नोंदणी शुल्क, सोसायटी आकार, म्युनिसिपल कर, सरकारी देणी आणि सर्व आकस्मिक आकार, कर व खर्च सोसावयाचा आहे आणि सुरक्षित धनको कोणत्याही देणींच्या प्रदानाकरिता पात्र नसतील. ९. सरकारी मार्गदर्शकसुत्रानुसार टीडीएस लागू असेल आणि विक्रि विचाराधीन खरीददाराद्वारा देय असेल. रक्कम मालक / ऋणकोच्या पॅन नंबरवर खरीददाराद्वारा भरावयाची आहे आणि चलनाची प्रत सुरक्षित धनकोकडे सादर करावयाची आहे. १०. विक्रि सर्फेसी कायदा / नियमांच्या तरतुदींच्या अनुसार असेल. ११. विक्रिच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता कृपया **https://bit.ly/3qvKCvn** या सुरक्षित धनकोंच्या वेबसाईटमधील लिंक पहावी.
स्वारस्य असलेले पक्षकार अधिक स्पष्टिकरणाकरिता निम्नस्वाक्षरीकार प्राधिकृत अधिकारींशी संपर्क साधू शकतील : प्राधिकृत अधिकारी अरिजीत भट्ट,ईमेल आयडी: **Arijit.bhatt@tatacapital.com** संपर्क क्र.: ९०२९०७३२८०.

**स्थळ : पुणे**
**तारीख : ०९.०३.२०२१**

स्वाक्षरी/-श्री अरिजीत भट्ट, प्राधिकृत अधिकारी
टाटा कॅपिटल हाउसिंग फायनान्स लि.

---

## आयनॉक्स लिजर लिमिटेड
**(CIN: L92199MH1999PLC353754)**

नोंदणीकृत कार्यालय: पाचवा मजला, विराज टॉवर्स, अंधेरी उड्डाण पुलाच्या बाजूला, पश्चिम द्रुतगती मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०००९३.
दूरध्वनी क्र.: (+९१२२) ४०६२६९०० फॅक्स: (+ ९१ २२) ४०६२६९९९ संकेतस्थळ: www.inoxmovies.com ई-मेल आयडी: contact@inoxmovies.com

## सूचना
**(कंपनीच्या समभाग धारकांनी कृपया लक्ष द्या)**

विषय: कंपनीच्या समभागांचे गुंतवणूक प्रशिक्षण आणि संरक्षण निधी (आयईपीएफ) डिमॅट खात्यामध्ये हस्तांतरण.

सदर सूचना कंपनी व्यवहार मंत्रालयाद्वारे अधिसूचित गुंतवणूक प्रशिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरण (लेखा, लेखापरीक्षण, हस्तांतरण आणि परतावा) नियमावली, २०१६ ज्याची अंमलबजावणी ७ सप्टेंबर, २०१६ पासून सुरु झाली आणि त्यानंतरच्या वाचल्या जाणाऱ्या फेरफारासह (संयुक्तपणे "नियम" असा संदर्भ असलेले) च्या तरतुदींच्या अनुसार सदर सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

नियमांच्या सह वाचल्या जाणाऱ्या कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १२४ (६) च्या अनुसार, ज्याच्या लाभांशाचे प्रदान करण्यात आलेले नाही किंवा सलग सात वर्षे किंवा अधिक कालावधीसाठी दावा करण्यात न आलेल्या समभागांच्या संदर्भात सर्व समभागांचे कंपनीद्वारे गुंतवणूक प्रशिक्षण आणि संरक्षण निधी (आयईपीएफ) प्राधिकरण च्या डिमॅट खात्यामध्ये हस्तांतरीत करण्यात येणार आहेत.

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १२४ (५) च्या तरतुदींच्या मान्यतेच्या अनुसार कंपनीने आर्थिक वर्ष २००६-०७ आणि आर्थिक वर्ष २००७-०८ साठी जाहीर करण्यात आलेल्या लाभांशाची रक्कम ज्यांचे सात वर्षांच्या कालावधीसाठी प्रदान करण्यात आलेले नाही/ दावा करण्यात आलेला नाही ते आयईपीएफला हस्तांतरीत करण्यात आले आहेत.

असा दावा न करण्यात आलेल्या लाभांशाचा तपशिल कंपनी व्यवहार मंत्रालयाच्या (एमसीए) तसेच कंपनीच्या www.inoxmovies.com या संकेतस्थळावर वेळोवेळी उपलब्ध करण्यात आलेले आहे.

नियमावली मध्ये नमूद करण्यात आल्या नुसार कंपनीने समभागधारकांशी ज्यांच्या लाभांशाचा दावा सात वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी करण्यात आलेला नाही त्यांच्याशी त्वरित लाभांशाचा दावा करण्यासाठी वैयक्तिक पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

कृपया नोंद घेण्यात यावी की दावा न करण्यात आलेल्या लाभांशाच्या संदर्भात कंपनीच्या विरुध्द कोणताही दावा करता येणार नाही आणि आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यात आलेले समभाग हे नियमांच्या नुसार करण्यात आले आहेत.

आयईपीएफ कडे हस्तांतरीत करण्यात आलेल्या लाभांशाचा दावा आयईपीएफ प्राधिकरणाकडून www.iepf.gov.in ह्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विहित ई-फॉर्म आयईपीएफ-५ च्या स्वरूपात करता येईल.

नियमावली आणि आवेदन अर्ज (ई-फॉर्म आयईपीएफ-५), जे एमसीएद्वारे लाभांशाचा दावा करण्यासाठी विहित करण्यात आले आहे ते कंपनीच्या संकेतस्थळावर (www.inoxmovies.com) तसेच एमसीए च्या (www.iepf.gov.in) ह्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

जर ९ जून, २०२१ पर्यंत लाभांशाचा दावा करण्यात आला नाही तर कंपनी नियमांच्या अनुसार वरील समभाग आयईपीएफकडे हस्तांतरीत करण्यासाठी आवश्यक ती कारवाई पूर्ण करेल.

आयईपीएफकडे समभाग हस्तांतरीत करण्यात आल्या नंतर आयईपीएफ प्राधिकरणाकडून नमूद समभागांचा दावा नियमांच्या अंतर्गत विहित करण्यात आल्यानुसार ई-फॉर्म आयईपीएफ-५ भरुन करता येईल.

ह्यासंदर्भात जर कोणतीही चौकशी किंवा सहाय्य हवे असल्यास, कृपया संपर्क करा:

**केफिन टेक्नोलॉजीस प्रायव्हेट लिमिटेड, युनिट: आयनॉक्स लिझर लिमिटेड**, सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१-३२ गचीबोवली, फायनॅन्शियल डिस्ट्रिक्ट, नानाक्रमगुडा, हैदराबाद, ५०००३२, टोल फ्री क्र.: १८००- ४२५८- ९९८, ई- मेल आयडी: einward.ris@kfintech.com वर संपर्क करता येईल. स्पष्टीकरणासाठी तुम्ही कंपनीच्या contact@inoxmovies.com या ई-मेल वर देखील संपर्क करू शकता.

**आयनॉक्स लिजर लिमिटेडकरीता**
**सही/-**
**पार्थसारथी अय्यंगार**
**कंपनी सचिव**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ८ मार्च, २०२१**

---

## SBI

**भारतीय स्टेट बँक, रिटेल अॅसेट सेंट्रल प्रोसेसिंग सेंटर–II,** तारा चेंबर्स, मरिआई गेट जवळ, वाकडेवाडी, मुंबई–पुणे रोड, पुणे– ४११००३. फोन (०२०) २५६१८४००, ई–मेल: agmracpc2.pune@sbi.co.in

### तारण मिळकतीचा ताबा घेतल्याची नोटीस (सरफेसी कायदा २००२ च्या कलम १३(४)अन्वये)

नोटीस देण्यात येते की, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल अॅसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ (२००२ चा ५४) च्या कलम १३(१२) व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ मधील नियम ३ आणि ९ अन्वये प्राप्त अधिकारात खाली नमूद केलेल्या कर्जदारांचे समोर दर्शविलेल्या तारखांना **मागणी नोटीस** पाठवून मागणी नोटीस मिळाल्या तारखेपासून ६० दिवसांचे आत बँकेस देणे असलेली संपूर्ण रक्कम भरण्याची मागणी केलेली होती.

कर्जदार/जामीनदार मागणी केल्याप्रमाणे भरणा करण्यास असमर्थ ठरले आहेत. सर्वसाधारण जनता व विशेषकरुन कर्जदार/जामीनदार यांना ही जाहीर नोटीस देण्यात येते की खाली सही करणार यांनी सदर कायद्याच्या कलम १३(४) व सदर नियम क्र. ९ अन्वये खाली नमूद केलेल्या तारखांना तारण मिळकतीचा **प्रत्यक्ष ताबा** घेतलेला आहे.

सर्वसाधारण जनता व विशेषकरुन कर्जदार/जामीनदार यांना सावधान करण्यात येत आहे की त्यांनी सदर मिळकतीसंबंधात कोणत्याही स्वरुपाचा व्यवहार करु नये. असा व्यवहार केल्यास तो भारतीय स्टेट बँकेच्या व्याजासह येणे रकमेच्या बोजासह असेल.

**कर्जदारांचे ध्यान सदर कायद्याच्या कलम १३, उपकलम ८ कडे आकर्षित करण्यात येत असून त्यात कर्जदारास आपल्या तारण मिळकतीवरील बोजा उतरवून घेण्यास उपलब्ध असलेल्या कालमर्यादेची तरतूद आहे.**

| क्र. | कर्जदाराचे नाव व पत्ता | अचल मालमत्तेचा तपशील | मागणी नोटीस तारीख | प्रत्यक्ष ताबा घेतल्याची तारीख | थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | **श्री. शेखर अजित पाटील (कर्जदार) सौ. चेतना शेखर पाटील (जामीनदार)** फ्लॅट नं. ७०२, सातवा मजला, बिल्डिंग नं. सी, ''द्वारका साई वंडर्स'', सर्व्हे नं. १७३/३ए/१+२+३, पिंपळे सौदागर, पुणे– ४११०२७. **मुख्य शाखा – एमआयडीसी हिंजवडी खाते क्र. ३६२९४००६४३१ गृह कर्ज खाते क्र. ३६२९३९९२५१५ टॉप अप खाते क्र. ३६६०१९९२५५३ सुरक्षा** | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील मौजे पिंपळे सौदागर, जि. पुणे येथील स. नं. १७३/३ए/१+२+३, द्वारका साई वंडर्स, फ्लॅट नं. ७०२, सातवा मजला, बिल्डींग नं. सी, क्षेत्रफळ ६३.६७ चौ. मी. अधिक ५.४२ स्क्वे.मीटरची लगतची टेरेस. प्रोजेक्टच्या करारानुसार मालमत्तेच्या चतु:सिमा. **पूर्वेस:** स. नं.१६४, **पश्चिमेस:** स.नं १७३/२, **उत्तरेस:** १२ मीटर रुंद डीपी रोड, **दक्षिणेस:** स.नं. १७३/बी | ०५.११.२०१९ आणि वर्तमान प्रसिद्ध दिनांक १७.१२.२०१९ | ०६.०३.२०२१ | दि. ०५.११.२०१९ रोजी रु. ४७,७०,२०२/- (रु. सत्तेचाळीस लाख सत्तर हजार दोनशे दोन फक्त) व्याज अधिक पुढील व्याज, प्रासंगिक खर्च, शुल्क इत्यादी |

दिनांक : ०९.०३.२०२१
ठिकाण : पुणे

(मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा)

सही /-
अधिकृत अधिकारी,
भारतीय स्टेट बँक, आरएसीपीसी–II

---

## ॲक्सिस बँक लि.

शाखा कार्यालय : ॲक्सिस बँक लि., स्टर्लिंग प्लाझा, तळ मजला, साई सर्व्हिस पेट्रोल पंपासमोर, जे.एम.रोड, पुणे–४११००४.
नोंदणीकृत कार्यालय : त्रिशूल, ३ रा मजला, समर्थेश्वर मंदिरासमोर, लॉ गार्डनजवळ, एलिस ब्रिज, अहमदाबाद – ३८० ००६.

### ताबा नोटीस रुल ८(१)

ज्याअर्थी **ॲक्सिस बँक लि.** चे अधिकृत अधिकारी यांनी, दि सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अॅसेटस् अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ (सदर कायदा) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स् २००२ च्या सेक्शन १३(१२) आणि रुल ३ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खाली नमूद केलेले कर्जदार/जामीनदार/ गहाणदार यांना सदर कायद्याच्या सेक्शन १३(२) अंतर्गत त्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या तारखांना **मागणी नोटीस** बजावली होती की, त्यांनी सदर नोटीसीत त्यांच्या नावासमोर नमूद केलेली, बँकेला येणे असलेली रक्कम सदर नोटीसीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परत करावी.

कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदार/गहाणदार सदर रक्कम परत करण्यास असमर्थ ठरल्याने, विशेषतः कर्जदार/जामीनदार/ गहाणदार व सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते की, खाली सही करणार यांनी सदर कायद्याच्या सेक्शन १३(४) अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून कर्जदार/जामीनदार/गहाणदार यांच्या नावासमोर नमूद केलेल्या गहाण मालमत्तांचा सदर नमूद तारखांना **प्रत्यक्ष ताबा** घेतला आहे.

विशेषत: कर्जदार/जामीनदार/गहाणदार तसेच सर्वसाधारण जनता यांना सावध करण्यात येते की, त्यांनी सदर मालमत्तांसंदर्भात कोणताही व्यवहार करू नये. असा व्यवहार केल्यास तो **ॲक्सिस बँक लि.** यांना खाली नमूद केलेल्या येणे असलेल्या रक्कमेच्या अधीन राहील.

सुरक्षित आस्ति सोडविण्यासाठी संलग्न उपलब्ध वेळेमध्ये कर्जदाराचे लक्ष सदर कायद्याच्या सेक्शन १३(८) अंतर्गत तरतुदींकडे वेधून घेतले जात आहे.

| अ. क्र. | कर्जदार/सह–कर्जदार/गहाणदार/ जामीनदार यांची नावे आणि पत्ते | येणे रक्कम | मागणी नोटीसीची तारीख / ताबा घेतल्याची तारीख |
|---|---|---|---|
| १ | **श्री. कुदरत इब्राहिम कुरणे, सौ. शाहिस्ता कुदरत कुरणे** फ्लॅट नं. सी–३०२, मारुती कृपा, गणेश नगर, मुंढवा, स.नं. ५१/२/३ए, शिर्के कंपनीसमोर, पुणे–४११०३६. **तसेच** : फ्लॅट नं. बी–२०२, २ रा मजला, नवरत्न एक्झॉटीका, स.नं. ५०, हांडेवाडी रोड, हडपसर, पुणे–४११०२८. | रु. ३५,४७,९९१/– (रु. पस्तीस लाख सत्तेचाळीस हजार नऊशे एक्क्याण्णव फक्त), दि. २६/०७/२०१९ रोजी, त्यावरील दि. २७/०७/२०१९ पासूनच्या करारानुसार होणाऱ्या सदर रक्कम परत करेपर्यंतच्या व्याजासहीत | ३१/०७/२०१९ / ०५/०३/२०२१ |
| | **स्थावर मालमत्तेचा तपशील :** पुढील मालमत्तेचा सर्वसामाईक भाग, फ्लॅट नं. २०२, बी विंग, चटई क्षेत्रफळ ५७० चौ.फू., लगतच्या टेरेसचे चटई क्षेत्रफळ ५० चौ.फू., २ रा मजला, पार्किंगसहीत, 'नवरत्न एक्झॉटीका' बिल्डींग, स.नं. ५०/१०+११/१, ५०/१०+११/२/१ वर बांधण्यात आलेली, महसूल गांव हडपसर, ता. हवेली, जि. पुणे येथे. **मालमत्तेच्या चतु:सीमा : महसूल नोंदणीनुसार.** | | |
| २ | **सोपान नाना गुंजाळ, भारती सोपान गुंजाळ** एच. नं. ९१८, मु.पो. सोरतापवाडी, गुंजाळ मळा, नवीन कॅनॉलशेजारी, ता. हवेली, जि. पुणे–४१२११०. **तसेच** : शॉप नं. ६, वरचा तळमजला, ज्योतीप्रकाश, मु.पो. उरूळीकांचन, ता. हवेली, जि. पुणे–४१२२०२. | रु. २३,२८,८६०/– (रु. तेवीस लाख अठ्ठावीस हजार आठशे साठ फक्त), दि. ०५/०९/२०१९ रोजी, त्यावरील दि. ०६/०९/२०१९ पासूनच्यो करारानुसार होणाऱ्या, सदर रक्कम परत करेपर्यंतच्या व्याजासहीत. | २६/०९/२०१९ / ०५/०३/२०२१ |
| | **स्थावर मालमत्तेचा तपशील :** पुढील मालमत्तेचा सर्वसामाईक भाग, शॉप नं. ६, वरचा तळमजला, विक्रीयोग्य सुपर बांधकाम क्षेत्रफळ ३०.७९ चौ.मी., म्हणजेच ३३१.४२ चौ.फू., 'ज्योतीप्रकाश हाईटस्'' बिल्डींग, सीटीएस नं. २८३ वर बांधण्यात आलेली, उरूळी कांचन, ता. हवेली, जि. पुणे येथे स्थित. **मालमत्तेच्या चतु:सीमा : महसूल नोंदणीनुसार.** | | |

दिनांक : ०५/०३/२०२१
स्थळ : पुणे

अधिकृत अधिकारी,
ॲक्सिस बँक लि.

# आरोग्यम् धनसंपदा

आरोग्य विशेष पुरवणी

## ज्येष्ठांचे करोना लसीकरण संभ्रम काय?

**करोनाचा अधिकतर धोका असलेले ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक आणि ४५ वर्षांवरील सहव्याधी असलेले रुग्ण यांच्यासाठी तिसजया टप्प्याअंतर्गत लसीकरण सोमवारपासून सुरू झाले आहे. परंतु यासाठी नोंदणी करणे बंधनकारक केले असून याबाबत अनेक संभ्रम आहेत. या पूर्ण प्रक्रियेची योग्य माहिती समजून घेऊया.**

गेल्या वर्षी याच महिन्यापासून करोना संसर्गाने थैमान घालायला सुरुवात केली. नवीन असलेल्या विषाणूचा प्रसार, प्रतिबंध, उपाययोजना यांबाबत सारेच चाचपडत असताना ज्येष्ठ नागरिक, उच्च रक्तदाब, मधुमेह यांसारख्या सहव्याधीचे रुग्ण यांना करोना विषाणू विळख्यात जायबंदी होत असल्याचे प्रामुख्याने निदर्शनास आले. तेव्हा जोखमीच्या गटातील या व्यक्तींना सावधानतेचा इशारा देत काळजी घेण्याचे आवाहन केले गेले. त्यामुळे करोनाबाधित होण्याच्या भीतीने अनेक ज्येष्ठांनी, सहव्याधीच्या रुग्णांनी स्वत:ला घरात कोंडून घेतले. जवळचे नातेवाईक गमावल्याचा मानसिक आघात झेपवत स्वत:चे या विषाणूपासून रक्षण करण्याची यांची धडपड गेले वर्षभर सुरू आहे. आरोग्य आणि अत्यावश्यक कर्मचाजयांनंतर सरकारने ज्येष्ठ नागरिक आणि ४५ वर्षांवरील सहव्याधीच्या रुग्णांसाठी लसीकरण सुरू केले आणि सर्वत्र लस घेण्यासाठी एकच धावपळ सुरू झाली. परंतु लस नेमकी कशी घ्यायची यासाठी काय करावे याची माहिती योग्य रीतीने जनसामान्यांपर्यंत पोहोचलेली नाही.

**लस कोणासाठी?**

लस ही फक्त ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक आणि ४५ वर्षांवरील सहव्याधी असलेल्या रुग्णांसाठीच सध्या खुली केली आहे. त्यामुळे या अटी-शर्तीमध्ये बसणाजयांनाच ती घेता येणार आहे.

४५ वर्षावरील सहव्याधींमध्ये पुढील रुग्णांचा समावेश आहे

गेल्या वर्षभरात हृदयविकार(हार्ट फ्येल्युअर) झालेले हृदयविकारामुळे केलेले प्रत्यारोपण किंवा एलवॅड जन्मजात हृदयविकार रक्तपुरवठा सुरळीत न झाल्याने हृदयविकार झालेले आणि उच्च रक्तदाब, मधुमेह असलेले उच्च रक्तदाब, मधुमेहाचे रुग्ण फुप्फुसाचा विकार असलेले

पक्षाघात झालेले आणि उच्च रक्तदाब, मधुमेहाचे रुग्ण १ जुलै २०२० नंतर निदान झालेले कर्करोगाचे रुग्ण तसेच कर्करोगाचे उपचार घेत असलेले रुग्ण एचआयव्ही रुग्ण मूत्रपिंड, यकृत प्रत्यारोपण केलेले किंवा प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत असलेले रुग्ण डायलिसिसवर असलेले मूत्रपिंड विकाराचे रुग्ण

बरा न होणारा सिरॉसिस मागील दोन वर्षांत तीव्र श्वसनाचा आजार असल्यास ल्युकेमिया, लिम्फोमा, मायलोमाचे रुग्ण बराच काळ इम्युनोसप्रेस औषध घेत असलेले रुग्ण मतिमंदत्व आलेले, अॅसिड हल्ल्यामुळे श्वसनव्यवस्थेवर परिणाम झालेले, आधाराशिवाय किंवा मदतीशिवाय काहीच करू न शकणाजया अपंग व्यक्ती, कर्णबधिर, अंधत्व यांसह एकापेक्षा अधिक प्रकारचे अपंगत्व असलेल्या व्यक्ती सिकल सेल, बोन मॅरो फ्येल्युअर, तीव्र प्रमाणात रक्तक्षय, गंभीर स्वरूपाचा थॅलेसेमिया …

**नोंदणी स्वत: लस घेणाऱ्यांनीच करणे आवश्यक आहे का?**

नोंदणी करणे क्लिष्ट वाटत असल्यास तुमच्या वतीने कोणीही, कोणत्याही ठिकाणाहून नोंदणी करू शकतात. त्यामुळे नोंदणी करण्यात अडचण येत असल्यास इतरांची मदत घेतल्यास सोयीस्कर होईल.

**नोंदणीचे टप्पे**

या संकेतस्थळावर मोबाइल क्रमांक देणे अनिवार्य आहे. मोबाइलवर आलेला ओटीपी नमूद केल्यानंतर मोबाइल क्रमांक नोंदणी करणाजया व्यक्तीचाच आहे का याची पडताळणी केली जाते. पुढच्या टप्प्यात आधारकार्ड, निवडणूक ओळखपत्र, वाहन परवाना, पॅनकार्ड, सेवानिवृत्ती वेतन पासबुक किंवा पारपत्र (पासपोर्ट) यांपैकी एका ओळखपत्राची माहिती देणे आवश्यक आहे. ओळखपत्राचा क्रमांक आणि ओळखपत्रात नमूद केलेल्या पद्धतीत नाव लिहावे. जन्माचे वर्ष (उदा. १९५७) लिहून पुढे जावे.

पुढच्या टप्प्यात तुमच्या खात्याच्या माहितीमध्ये नाव, लिंग, जन्म वर्ष, फोटो आयडी, आयडी क्रमांक आणि लस घेण्याची वेळ घेतली आहे का (स्टेटस) याची माहिती दिसते. याच्या बाजूलाच छोटेसे कॅलेंडरचे सांकेतिक चिन्ह दिसते. या चिन्हावर क्लिक केल्यावर लस घेण्याची वेळ(अपॉईंटमेंट) घेण्याचा पर्याय दिसतो. यात लस घेण्याचे केंद्र निवडण्यासाठी राज्य, जिल्हा, तालुका, पिनकोड यांची माहिती भरावी. त्यानुसार उपलब्ध केंद्रांची माहिती दिसते. या केंद्रावर क्लिक केल्यानंतर वेळ आणि दिवसाची निवड करावी. संपूर्ण प्रक्रिया झाल्यावर लशीची नोंदणी पूर्ण झाल्याचा संदेश दिसतो.

**नोंदणी न करताही लस घेण्यास जाता येते का?**

राज्यात काही सरकारी आणि खासगी रुग्णालयांमध्ये नोंदणी करून लस देण्याची सुविधाही उपलब्ध केली आहे. तेव्हा आपल्या भागातील अशा रुग्णालयांची माहिती घेऊन तेथे थेट गेल्यास नोंदणी करून लस दिली जाते.

**लस मोफत उपलब्ध आहे का?**

सरकारी रुग्णालयांमध्ये लस मोफत आहे, तर खासगी रुग्णालयांमध्ये एका मात्रेची २५० रुपये याप्रमाणे ५०० रुपये आकारले जातात.

**लस घेण्यासाठी जाताना कोणती कागदपत्रे न्यावीत?**

नोंदणीच्या वेळेस माहिती दिलेले ओळखपत्र, आधारकार्ड न्यावे. तसेच ४५ वर्षांवरील सहव्याधीचे रुग्ण असल्यास उपचार घेत असलेल्या डॉक्टरांचे वैद्याकीय प्रमाणपत्र आणि आजारासंबंधीचे वैद्याकीय अहवाल किंवा कागदपत्रे नेणे आवश्यक आहे.

**लस निवडीचा पर्याय आहे का?**

कोव्हिशिल्ड किंवा कोव्हॅक्सिन यापैकी कोणती लस घ्यावी याच्या निवडीची मुभा नाही. निवडलेल्या केंद्रावर उपलब्ध असलेलीच लस मिळू शकेल.






**दुसरी मात्रा कशी मिळेल?**

पहिली लस घेतलेल्या केंद्राकडूनच दुसरी लस घेण्यासाठीचा संदेश येईल. तुम्ही त्या वेळेस दुसजया राज्यात किंवा अन्य तालुक्यात असल्यास जवळील केंद्रात जाऊन लस घेण्याचा पर्यायही निवडण्याची मुभा असेल.

**लस घेण्याची वेळ बदलता येते का?**

लस घेण्यासाठी निवडलेला दिवस किंवा वेळ बदलण्याची मुभा आहे. फक्त त्या दिवशीच्या आदल्या दिवसापर्यंतच हा पर्याय उपलब्ध असेल.

**लस घेताना काय माहिती देणे गरजेचे आहे?**

लस घेण्यापूर्वी संबंधितांना कोणत्या औषधांची किंवा इतर अॅलर्जी आहे का, इम्युनोसप्रेस औषधे किंवा गोठलेले रक्त पातळ होण्यासाठी औषधे घेत आहेत का किंवा त्या वेळेस ताप किंवा अन्य काही त्रास होत आहे का याची योग्य माहिती देणे आवश्यक आहे.

**– संकलन : शैलजा तिवले**









# दुबई ते पुणे.... आणि नवा प्रवास!

**२०२० च्या सुरुवातीलाच चीनमधून करोना विषाणू संसर्गाच्या बातम्या आपल्यापर्यंत येऊन थडकण्यास सुरुवात झाली. 'हा विषाणू आपल्यापर्यंत पोहोचला तर काय?' हा प्रश्न तेव्हा अनेकांना पडला, मात्र प्रत्यक्षात तो आपल्यापर्यंत येऊन ठेपल्यानंतर आयुष्यात कधीही कल्पना न केलेले अनुभव शहराने घेतले. नऊ मार्च २०२० ला राज्यातील पहिला करोनाचा रुग्ण पुण्यात सापडल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली आणि एक अनामिक भीती जाणवण्यास सुरुवात झाली. दिवसाचे २४ तास आपल्याच धुंदीत वाहतं असलेलं पुण्यासारखं शहर अक्षरशः ठप्प झालं. माणसं घरात बसली. कालांतराने शहरात करोनाने हाहाकार माजवला. रुग्णालयं भरून वाहिली. खाटा कमी पडल्या. अनेकांनी आपल्या जवळची माणसं गमावली. कुणी नोकरी-व्यवसाय गमावले. हसत्या-खेळत्या शहराची रया गेल्याचा अनुभव प्रत्येकाने घेतला. या डोंगराएवढ्या संकटातही डॉक्टर, परिचारिका, पोलिस, स्वयंसेवी संस्था काम करत राहिल्या, त्यामुळे टाळेबंदी आणि संकट काहीसं सुकर झालं. संकटाचं एक वर्ष आज संपलं. शहर आता हळूहळू पूर्वपदावर येतंय... तरी करोना अद्याप संपलेला नाही, त्यामुळे खबरदारी घेणं आलंच... करोना काळातील काही चांगल्या- वाईट आठवणी जागवणारी वृत्तमालिका आजपासून!**

## करोनामय वर्ष

**भक्ती बिसुरे, लोकसत्ता**

**पुणे :** मार्च २०२० मध्ये लग्नाच्या २५ व्या वाढदिवसानिमित्त दुबईची सहल आखली. त्या वेळी परत आल्यानंतर एक नवे आयुष्य आपल्या समोर वाढून ठेवले असेल, याची कल्पना नव्हती. या सहलीहून परत आल्यानंतर आम्हाला झालेले 'व्हायरल' म्हणजे जगभर थैमान घालत असलेला करोना आहे, हे समजले आणि आमचे आयुष्यच बदलले... राज्यातील पहिले करोना रुग्ण ठरलेले जीवंधर आवटी सांगतात. त्या वेळी त्यांच्या त्या मनःस्थितीची कल्पना आज आपण सगळेच करू शकतो.

मागील वर्षी नऊ मार्चला आवटी दाम्पत्याला करोना संसर्ग झाला. राज्यातील ते पहिले करोना रुग्ण असल्यामुळे साहजिकच संपूर्ण राज्याचे लक्ष त्यांच्याकडे वेधले गेले. चीनमध्ये फैलावलेला करोना दुबईमार्गे पुण्यात आणि महाराष्ट्रात आला, त्यानंतरचे संपूर्ण वर्ष अनेक कारणांनी आपल्यासाठी ऐतिहासिक ठरले. या ऐतिहासिक घटनांना एक वर्ष पूर्ण होत असताना जीवंधर आवटी यांनी 'लोकसत्ता' शी संवाद साधत, वर्षभरातील घडामोडींना उजाळा दिला.

आवटी म्हणाले,' दुबईहुन परतलो आणि कणकण, अंगदुखी, थकवा जाणवला. तीन दिवसांनी त्रास कमी झाला. दोन दिवसांनी पुन्हा थोडा त्रास झाला. परदेश प्रवास झाल्यामुळे फॅमिली डॉक्टरांनी करोना चाचणी करण्यास सुचवले. चाचणीचा 'पॉझिटिव्ह' अहवाल हाती आला, त्या वेळी आम्हाला जाणवणारी सर्व लक्षणे संपून आम्ही ठणठणीत होतो, मात्र नियमाप्रमाणे १४ दिवसांचे विलगीकरण महत्त्वाचे होते. प्रत्यक्षात, आम्हाला काहीही त्रास होत नसल्यामुळे ते विलगीकरण ही शिक्षाच होती. प्रत्यक्ष नाव जाहीर झाले नसले तरी एका रात्रीत आम्ही सगळ्या प्रसार माध्यमांच्या 'हेडलाईन' मध्ये होतो. त्याचे दडपण होते, मात्र आजाराचा त्रास नाही हा दिलासाही होता. नायडू रुग्णालयाच्या विलगीकरण कक्षात सर्वच जण आम्हाला दिलासा देत होते. 'तुम्ही लवकर निगेटिव्ह होऊन घरी जाणार' हा विश्वास देत होते. गुढी पाडव्याच्या शुभ दिवशी आम्ही नायडू रुग्णालयातून घरी परत आलो. रुग्णालयातील डॉक्टर, कर्मचाऱ्यांनी फुलांच्या पाकळ्या उधळून, टाळ्या वाजवून आम्हाला निरोप दिला, तेव्हा एका मोठ्या संकटातून सहीसलामत सुटून घरी परतत असल्याची भावना होती. राज्याचे साथरोग सर्वेक्षण अधिकारी डॉ. प्रदीप आवटे यांनी केलेली कविता आमच्यासाठी विशेष आहे, अशी हृद्य आठवण आवटी सांगतात. पुढे रुग्ण वाढले तशी भीती, काळजी, गैरसमज अशा सगळ्याच गोष्टी वाढत होत्या. जवळच्या कोणाला संसर्ग झाल्याचे समजले तर अनेकांनी आमच्याशी संपर्क साधला. मन मोकळे केले. त्या वेळी, 'आम्ही बरे झाले, तुम्हीही औषधोपचार घ्या, नक्की बरे व्हाल!' असे सांगत आम्ही सर्वांना दिलासा दिला. रक्तद्रव - 'प्लाझ्मा' उपचारांना परवानगी मिळताच मी प्लाझ्मा दाता होऊन इतर रुग्णांना बरे करण्यात आपले लहानसे योगदान देण्याचे ठरवले. आजार माहिती नाही, विषाणू दिसत नाही, कसा पसरतो माहिती नाही इथपासून ते देशातील ९६-९७ टक्के रुग्ण बरे होऊन घरी जातात हे पाहणे, देशात तयार झालेली लस वापरून करोना प्रतिबंधात्मक मोहीम सुरू झालेली पाहणे असे अत्यंत नकारात्मक ते अत्यंत सकारात्मक

### खबरदारीचे आवाहन

महामारीला एक वर्ष पूर्ण होत असताना पुन्हा रुग्णसंख्या वाढत आहे. काही नागरिक आजही बेफिकीर आहेत. त्या सगळ्यांना मला आवाहन करावेसे वाटते,की या आजाराने गंभीर रूप धारण केले तर त्याला आवरणे डॉक्टरांना जिकिरीचे ठरते. त्यामुळे परस्परांची काळजी घेण्यासाठी प्रतिबंधात्मक नियम पाळा आणि यंत्रणांना सहकार्य करा. मागील पूर्ण वर्ष आपल्यासाठी जिवाचे रान करणाऱ्या डॉक्टर आणि आरोग्य सेवकांसाठी आपण तेवढेच करू शकतो, अशा शब्दांत आवटी यांनी नागरिकांना खबरदारीचे आवाहन केले.

# पहिल्या आणि दुसऱ्या सत्राची एकत्रच परीक्षा?

## विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाची आज बैठक

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पहिल्या सत्राच्या रखडलेल्या परीक्षा आणि द्वितीय सत्राच्या परीक्षा एकत्रच घेण्याबाबत निर्णय होण्याची शक्यता आहे. विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या मंगळवारी (९ मार्च) होणाऱ्या बैठकीत परीक्षेबाबत ठोस निर्णय होणे अपेक्षित आहे.

विद्यापीठाने २० आणि ३० मार्चपासून प्रथम सत्राच्या परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्याची घोषणा केली होती. मात्र, त्यानंतर परीक्षा घेणारी खासगी कंपनी बदलण्याच्या हालचाली सुरू झाल्या आणि त्यात परीक्षेची प्रक्रिया रखडली. विद्यापीठाने अद्यापही कंपनीची निवड केलेली नाही. विद्यापीठाची एसपीपीयू एज्युटेक फाउंडेशन ही कंपनी परीक्षा घेणार असल्याची चर्चा आहे. प्रत्यक्षात काहीच निर्णय झालेला नसल्याने परीक्षा अजून अधांतरीच आहे. त्यामुळे परीक्षा घेणार कोण हे ठरणे, वेळापत्रक जाहीर करणे यात काही दिवस जाणार असल्याने आधी ठरलेल्या वेळापत्रकानुसार, २० आणि ३० मार्चपासून परीक्षा सुरू होणे शक्य नसल्याचे विद्यापीठातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

विद्यापीठाचे अधिसभा सदस्य डॉ. पंकज मिणियार यांनी करोनामुळे बिघडलेले शैक्षणिक वर्ष पूर्वपदावर आणण्यासाठी पहिल्या आणि दुसऱ्या सत्राची एकत्रच परीक्षा घेण्याची मागणी केली आहे. पहिल्या सत्राची परीक्षा रखडल्यामुळे दुसरे शैक्षणिक सत्र सुरू होणे आणि त्याची परीक्षा होण्यासही उशीर होईल. या सगळ्याचा विचार करता दोन्ही सत्राची एकत्र परीक्षा घेण्याचाही पर्याय आहे. परीक्षा मंडळाच्या बैठकीत सद्यःस्थितीबाबत सारासार विचार करून परीक्षेबाबतचा निर्णय होईल, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

# रुग्णसंख्येचा आलेख पुन्हा वाढीला

## वर्षभरानंतरही चिंता कायम

**लोकसत्ता प्रतिनिधी**

| महिना | रुग्णसंख्या |
|---|---|
| मार्च २० | ५० |
| एप्रिल | १७०० |
| मे | ७८२६ |
| जून | २२,४२९ |
| जुलै | ८६,७६५ |
| ऑगस्ट | १,७०,३१४ |
| सप्टेंबर | २,८४,०२१ |
| ऑक्टोबर | ३,२३,५७७ |
| नोव्हेंबर | ३,४२,९०१ |
| डिसेंबर | ३,६२,९७९ |
| जानेवारी २१ | ३,७९,३५७ |
| फेब्रुवारी | ४,०८,०५३ |
| मार्च | ४,१९,४६५ |

**पुणे :** चीनसारख्या एका दूरच्या देशात सुरू झालेला करोना विषाणूचा संसर्ग पुणे शहरात आणि पर्यायाने महाराष्ट्रात दाखल झाला, त्याला मंगळवार (९मार्च) एक वर्ष पूर्ण होत आहे. करोना विषाणूचे रुग्ण शहरात आढळण्यास सुरुवात झाली, त्यावेळी एक वर्ष ही साथ पहायला मिळेल या शक्यतेचा विचारही कोणी केला नव्हता, मात्र नागरिकांची बेफिकिरी, प्रशासनाची ढिलाई आणि स्वयंशिस्तीचा अभाव पाहाता रुग्णसंख्येची सद्याची स्थिती चिंतेची बाब ठरत आहे.

दुबईहून पर्यटन करून आलेल्या दाम्पत्याला झालेला संसर्ग करोना विषाणूचा आहे, यावर ९ मार्च २०२० ला शिक्कामोर्तब झाले. पाठोपाठ दाम्पत्याच्या नजिकच्या संपर्कात असलेली त्यांची कन्या, त्यांना मुंबईहून पुण्यापर्यंत सोडणारा कॅब चालक अशी रुग्णसंख्या वाढत गेली. मार्च २०२० च्या अखेरीस पुणे जिल्ह्यातील रुग्णसंख्या जेमतेम ५० पर्यंत पोहोचली, मात्र बरोबर एक वर्षानंतर या संख्येने चार लाखांचा टप्पा पार केला आहे. ऑक्टोबर ते जानेवारी अशा मोठ्या कालावधीत करोना रुग्णसंख्या बरीच आटोक्यात आल्यामुळे 'करोनाचा धोका टळला' असे समजून नागरिकांनी पूर्ववत आयुष्य सुरू केले, मात्र वातावरणातील सततचे चढउतार, मुखपट्टी वापरण्यास केलेली टाळाटाळ यांमुळे मार्च महिन्यात पुन्हा रुग्णसंख्येने चढता क्रम स्वीकारला आहे. जानेवारीपर्यंत पुणे आणि पिंपरी शहरात १५०-२०० आणि जिल्ह्यात ३५०-४०० पर्यंत खाली आलेल्या रुग्णसंख्येने जिल्ह्यात पुन्हा दैनंदिन दोन हजारांचा टप्पा गाठला आहे. गर्दी न करणे, शारीरिक अंतराचा नियम न पाळणे, आजाराची लक्षणे दिसल्यास डॉक्टरांचा सल्ला न घेणे अशी बेफिकिरी कायम राहिल्यास करोनाचे संकट टळणे अवघड असल्याची भावना तज्ज्ञ डॉक्टर व्यक्त करतात.

पुणे महापालिकेचे सहायक आरोग्य अधिकारी डॉ. संजीव वावरे शहरात पहिला रुग्ण आढळल्यापासून या संकटाशी दोन हात करत आहेत. डॉ. वावरे म्हणाले, मागील वर्षी बहुतांश काळ टाळेबंदी असल्यामुळे रुग्णसंख्या नियंत्रणात ठेवणे शक्य होते. टाळेबंदीचे सर्व नियम संपूर्ण शिथिल केल्यानंतर रुग्णवाढ अपेक्षित होती, मात्र सध्या दिसणारी रुग्णवाढ अपेक्षेहून अधिक आहे. बाहेरचे चित्र आपण एका मोठ्या महामारीच्या काळात जगत आहोत, असे नाही. सर्व प्रतिबंधात्मक नियम धाब्यावर बसवून नागरिकांनी पूर्ववत जगणे सुरू केले आहे.

## मेट्रोचे काम वेगाने



वनाज ते रामवाडी या मेट्रो मार्गिकेअंतर्गत नदीपात्रातील मेट्रो मार्गिकेचे काम वेगाने सुरू झाले आहे. बालगंधर्व रंगमंदिराच्या मागील बाजूस उन्नत मार्गिकेसाठी खांब उभारण्यात येत आहेत. दरम्यान, वनाज ते रामवाडी या मार्गिकेतील गरवारे महाविद्यालयपर्यंतच्या मार्गिकेवर एप्रिल महिन्यापासून चाचणी घेण्यात येणार आहे.

# एमएसआरडीसी वर्तुळाकार रस्त्याची केवळ घोषणा ; निधीची तरतूद नाही

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (महाराष्ट्र स्टेट रोड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन - एमएसआरडीसी) करण्यात येणाऱ्या वर्तुळाकार रस्त्याची केवळ घोषणा राज्याचे उपमुख्यमंत्री आणि वित्तमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्प मांडताना सोमवारी केली. मात्र, या प्रकल्पासाठी निधीची तरतूद करण्यात आलेली नाही. १४ जानेवारी रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या प्रकल्पाच्या अहवालास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार निधीची तरतूद होण्याची शक्यता वर्तवली जात होती.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूककोंडी फोडण्यासाठी महामंडळाकडून वर्तुळाकार रस्ता केला जाणार आहे. पहिल्या टप्प्यात पश्चिम भागातील खेड-शिवापूर ते उर्से (ता. मावळ) या दरम्यानचा भाग आहे. मावळ, मुळशी, खेड, हवेली, पुरंदर आणि भोर या तालुक्यातून हा रस्ता जाणार आहे. त्यानुसार शासनाने भूसंपादनासाठी संबंधित प्रांताधिकारी यांची नेमणूक केली आहे, तर भूसंपादनाशी संबंधित वाद मिटवण्यासाठी लवाद म्हणून पुणे विभागीय आयुक्त यांची नेमणूक करण्यात आली आहे.

महामंडळाने हाती घेतलेल्या वर्तुळाकार रस्त्याला यापूर्वीच राज्य सरकारकडून मान्यता मिळाली होती. सर्वेक्षण ते सर्व प्रकारच्या मान्यता या रस्त्याला मिळालेल्या आहेत. प्रकल्पाच्या अहवालासही चालू वर्षी १४ जानेवारीच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. मात्र, सोमवारी अर्थसंकल्पात केवळ प्रकल्पाचा उल्लेख करण्यात आला आहे. प्रकल्पाच्या भूसंपादनाचे काम चालू वर्षी हाती घेण्यात येणार असल्याचेही पवार यांनी विधिमंडळात सांगितले.

याबाबत बोलताना जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख म्हणाले, 'प्रकल्पाची मोजणी येत्या आठ दिवसांत सुरू करण्यात येणार आहे. प्रत्यक्ष प्रकल्पासाठी १७ हजार कोटी रुपये, तर चार हजार कोटी भूसंपादनाला खर्च येणार आहे.

### प्रकल्पातील बाधित गावे आणि क्षेत्र

पहिल्या टप्प्यातील पश्चिम भागात भोर तालुक्यातील पाच गावे (१०५.८२ हे.आर), हवेली तालुक्यातील ११ गावे (२२२.३४ हे.आर), मुळशी तालुक्यातील १५ गावे (२६०.६८ हे.आर) आणि मावळ तालुक्यातील सहा गावे (१७४.२८ हे. आर) असे ३७ गावांमधील ७६३.१२ हे. आर क्षेत्र आहे. तर, पूर्व भागात मावळमधील ११ गावे (१४२.७६ हे.आर), खेडमधील १२ गावे (२८६ हे.आर), हवेलीतील १५ (२३५.२६ हे.आर), पुरंदरमधील पाच गावे (१४३.४४ हे.आर) आणि भोरमधील तीन गावे (५२.४२ हे.आर) अशी ४६ गावे आणि ८५९.८९ हे.आर एवढे क्षेत्र आहे.

# मासिक पाळीसाठीच्या कपची निर्मिती

## भारतात पहिल्यांदाच कपचे डिझायनिंग

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**पुणे :** महिलांना मासिक पाळीच्या काळात वापरता येणाऱ्या कपची निर्मिती एमआयटी एडीटी विद्यापीठातील प्रमोद प्रिया रंजन यांनी केली आहे. सॅनिटरी पॅडला पर्याय ठरू शकणारा हा कप महिलांसाठी अतिशय उपयुक्त असून, भारतात पहिल्यांदाच अशा प्रकारचा कप डिझाईन करण्यात आला आहे.

'ऑनपिरी' असे नाव असलेल्या या कपचे अनावरण महिला दिनाच्या औचित्याने सोमवारी करण्यात आले. एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मंगेश कराड, एमआयटी अटल इन्क्युबेशन सेंटरचे सीईओ डॉ. मोहित दुबे, कपचे निर्माते प्रमोद प्रिया रंजन, एमआयटी इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईनचे डॉ. नचिकेत ठाकूर आदी या वेळी उपस्थित होते.

कपविषयी प्रमोद प्रिया रंजन यांनी माहिती दिली. 'आतापर्यंत उपलब्ध असलेले वापरण्यात महिलांना अडचणी येत होत्या. त्यामुळे या समस्येकडे लक्ष देऊन नव्याने कप डिझाईन करण्यात आला. वापरण्यासाठी सोयीस्कर हा घटक लक्षात ठेवूनच त्याचे डिझाईन करण्यात आले. त्यामुळे महिलांना मासिक पाळीच्या काळात हा कप वापरताना कोणताही त्रास होणार नाही. हा कप जवळपास ७५० सॅनिटरी पॅड्सच्या बरोबरीचा आहे. सॅनिटरी पॅड्सचे विघटन ही मोठी समस्या असल्याने हा कप अतिशय महत्त्वाचा आहे,' असे त्यांनी सांगितले.

## नवीन इमारतीत न्यायालयीन कक्षासह प्रशस्त वाहनतळ

# शिवाजीनगर न्यायालयात विस्तारित इमारतीसाठी ९६ कोटी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** शिवाजीनगर जिल्हा सत्र न्यायालयात दाखल होणाऱ्या खटल्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. शहर आणि जिल्ह्यातील पक्षकार तसेच वकिलांचा राबता वाढत असल्याने न्यायालयाच्या आवारात आणखी एका इमारतीसाठी गेल्या काही वर्षांपासून पाठपुरावा करण्यात येत होता. नवीन इमारतीसाठी राज्य शासनाने ९६ कोटी ७९ लाख रुपये निधीची तरतूद नुकतीच केली आहे.



मुंबई उच्च न्यायालयाने याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर केला होता. मंजूर रकमेपैकी ५७ कोटी ३४ लाख ६६ हजार रुपये बांधकाम खर्चासाठी वापरण्यात येणार आहेत. न्यायालयात गॅसवाहिनी, सौरऊर्जा प्रकल्प, पर्जन्य जल पुनर्भरण प्रकल्प, विकलांग व्यक्तींसाठी सरकता जिना तसेच प्रशस्त वाहनतळ असणार आहे तसेच नवीन इमारतीत नवीन १५ न्यायालयीन कक्ष निर्माण करण्यात येणार आहेत. शिवाजीनगर न्यायालयात विशेष न्यायालये आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील अनेक महत्त्वाच्या खटल्यांची सुनावणी न्यायालयात सुरू आहे. दिवसेंदिवस न्यायालयीन यंत्रणेवर पडणारा ताण विचारात घेऊन नवीन इमारतीसाठी पाठपुरावा करण्यात येत होता.

नवीन इमारतीत लिफ्टसह आधुनिक सुविधा असणार आहेत. शिवाजीनगर न्यायालयात कामकाजासाठी येणारे वकील तसेच पक्षकारांना वाहने लावण्यास जागा उपलब्ध होत नसल्याने न्यायालयाच्या बाहेरील बाजूस असलेल्या रस्त्यांवर वाहने लावण्यात येत होती. त्यामुळे या भागातील वाहतूक बऱ्याचदा विस्कळीत व्हायची. राज्य शासनाने नवीन इमारतीसाठी निधी मंजूर केल्याने वकिलांकडून स्वागत करण्यात आले आहे.

> अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मागील बाजूस असलेल्या न्यायालयाच्या आवारात जुनी बराक आहे. या बराकीच्या जागेवर एल आकारात पाच मजली नवीन इमारत साकारण्यात येणार आहे. इमारतीच्या तळमजल्यावर मोटार, दुचाकींसाठी वाहनतळ असणार आहे. इमारतीत आधुनिक सुविधा आहेत. शिवाजीनगर न्यायालयात सध्या ९० न्यायालयीन कक्ष आहेत. त्यापैकी अनेक न्यायालयात अपुऱ्या सुविधा आहे. नवीन इमारतीला निधी मंजूर झाला असला तरी प्रत्यक्ष कामाला लवकर सुरुवात व्हायला हवी.
>
> – ॲड. सतीश मुळीक, अध्यक्ष, पुणे बार असोसिएशन

# पुणे-नाशिक रेल्वे प्रकल्प वेगवान

## भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करण्याच्या सूचना

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**पुणे :** मुंबई-पुणे-नाशिक हा रेल्वे मार्गाचा सुवर्णत्रिकोण पूर्ण करण्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या पुणे ते नाशिक या नव्या मध्यम अतिजलद रेल्वे मार्गाचे काम हाती घेण्यास राज्य शासनाने अर्थसंकल्पात मंजुरी दिली. त्यामुळे हा प्रकल्प आता अधिक वेगवान होऊ शकणार आहे. यापूर्वी या प्रकल्पासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करण्याच्या सूचना विभागीय आयुक्तांकडून देण्यात आल्या होत्या.

पुणे-नाशिकसाठी नव्या रेल्वे मार्गाबाबत १९९२ पासूनच सर्वेक्षण करण्यात येत आहे. रेल्वे बोर्डाकडून यापूर्वी या प्रकल्पाचा आराखडा करण्यात आला होता. मात्र, महाराष्ट्र रेल्वे इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कार्पोरेशनची (महारेल) स्थापना झाल्यानंतर प्रकल्पाबाबत मध्यम अतिजलद रेल्वेच्या दृष्टीने आराखडा सादर करण्यात आला. त्यानुसार या प्रकल्पाचे काम हाती घेण्यास राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. पुणे ते नाशिक या नव्या रेल्वे मार्गाची प्रस्ताविक लांबी २३५ किलोमीटर असून, त्यासाठी १६ हजार ३९ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. राज्य आणि रेल्वेही त्यासाठी खर्चाचा वाटा उचलणार आहेत.

पुणे, नगर आणि नाशिक या तीन जिल्ह्यांतून हा रेल्वे मार्ग जाणार आहे. या तीनही जिल्ह्यांत १४७० हेक्टर जागा संपादित करावी लागणार आहे. पुणे जिल्ह्यात हवेली, खेड, आंबेगाव आणि जुन्नर या तालुक्यांतील सुमारे ५७५ हेक्टर जागा संपादित केली जाणार आहे. भूसंपादनाची ही प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश काही दिवसांपूर्वीच विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी दिले होते. संबंधित जमिनी ताब्यात घेण्याबाबत रेल्वे विभागाकडून प्रस्तावही दाखल करण्यात आले असून, भूसंपादनासाठी १५०० कोटी रुपयांचा निधी अपेक्षित आहे.

# पायाभूत सुविधांचा बिकट प्रश्न

**प्रथमेश गोडबोले, लोकसत्ता**

**पुणे :** शहरापासून जेमतेम पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या महापालिकेच्या कोंढवा खुर्द-मीठानगर (प्रभाग क्रमांक- २७) या प्रभागात पाणी, वीज, रस्ते अशा मूलभूत सुविधा पूर्णपणे पोहोचलेल्या नसल्याची वस्तुस्थिती आहे. या भागाचा सर्वांगीण विकास नगरसेवकांना करता आलेला नाही. त्यामुळे पायाभूत सुविधांचे प्रश्न कायम असल्याचे दिसून येते. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटलेला नसून ठोस उपाययोजना राबविल्या जात नसल्याची नागरिकांची तक्रार आहे.

कोंढवा खुर्द-मीठानगर प्रभागातील विकास आराखड्यातील रस्त्यांची कामे मार्गी लागलेली नाहीत. अपुरे रस्ते आणि त्यामुळे होणारी वाहतूककोंडी नित्याची आहे. विजेच्या तारा भूमिगत केलेल्या नाहीत. त्यामुळे या परिसरातील नागरिकांच्या जिवाला धोका आहे. पावसाळी वाहिन्यांची कामे झाली नसल्याने दरवर्षी पावसाळ्यात पाणी साचून नागरिकांच्या घरात पाणी येण्याच्या घटना घडतात. पिण्याच्या पाण्याची समस्याही कायम आहे. या भागातील सोसायट्यांना टँकरने पाणीपुरवठा केला जातो.

प्रभागात ओढे, नाले आहेत. त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा, राडारोडा टाकण्यात येतो. त्यामुळे स्थानिक नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नही गंभीर आहे. अरूंद आणि खराब रस्ते असल्याने अत्यवस्थ नागरिकांना रुग्णालयात नेण्यासाठी रिक्षा किंवा रुग्णवाहिका प्रभागातील काही भागात जाऊच शकत नसल्याचे चित्र आहे. गटार, कचऱ्याची समस्याही कायम आहे. गटारे वेळोवेळी साफ केली जात नाहीत, तसेच कचराही महापालिकेकडून कित्येक दिवस उचलला जात नसल्याची स्थानिक नागरिकांची तक्रार आहे. पावसाळी वाहिन्यांची कामे झालेली नसल्याने पावसाळ्यात पाणी साचून राहते, तसेच जास्त पाऊस झाल्यास पावसाचे पाणी घरांमध्येही शिरते.

प्रभागातील नागरिकांना गढूळ पाणीपुरवठा होत असल्याचीही तक्रार कित्येक वर्षांपासून आहे. कचरा घेऊन जाण्यासाठी महापालिकेची गाडी दररोज येत नसल्याने कचराकुंड्या भरून वाहत असतात. त्यामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. प्रभागात अनेक ठिकाणी पथदिवेच नाहीत, तर पथदिवे असलेल्या ठिकाणी पथदिवे लागत नसल्याने सायंकाळनंतर अंधाराचे साम्राज्य असते, अशा नागरिकांच्या तक्रारी आहेत.



## नगरसेवकांचे दावे

- दोन पाण्याच्या टाक्या पूर्ण
- पावसाळी वाहिन्यांची कामे प्रगतिपथावर
- लुल्लानगर उड्डाणपूल मार्गी
- सर्व घटकांसाठी विविध उपक्रम
- नागरिकांशी दैनंदिन संवाद

### नगरसेवक

- अब्दुल पठाण
- परवीन शेख
- हमिदा सुंडके
- साईनाथ बाबर




**कोंढवा खुर्द - मीठानगर**
**प्रभाग क्रमांक २७**

## प्रभागातील महत्त्वाची ठिकाणे

शिवनेरीनगर, भाग्योदय नगर, मीठानगर, कोंढवा खुर्द, शाह इस्टेट, अमर रेसिडेन्सी, लुल्ला नगर

## नागरिक म्हणतात

“ गेल्या चार वर्षांत कोणत्याही प्रकारची ठोस कामे प्रभागात झालेली नाहीत. पावसाळी वाहिन्यांची कामे झाली नसल्याने दरवर्षी पावसाळ्यात प्रभागातील अनेक भागात पाणी साचते, तसेच घरांमध्येही पाणी येते. वीज आणि पाणीपुरवठ्याचा प्रश्न अतिशय गंभीर असून सातत्याने ज्योती चौक, कोंढवा खुर्द भागात वीजपुरवठा खंडित होतो. प्रभागात रस्ते, पाणी, वीज, कचरा अशा पायाभूत सुविधांची वानवा आहे.

– **प्रवीण जगताप**, मीठानगर

“ प्रभागात कचराकुंड्यांमध्ये साचलेला कचरा कित्येक दिवस उचलला जात नाही. कचरा साचून राहिल्याने त्यातून दुर्गंधी सुटून लहान मुले, ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रभागात लहान मुलांना खेळण्यासाठी पुरेशी मैदाने नाहीत. दरवर्षी पावसाळ्यात अनेक भागांत पाणी साठते. पावसाच्या पाण्याचा निचरा न झाल्याने घरांमध्येही पाणी येण्याच्या घटना घडतात.

– **माणिक गुर्जर**, कोंढवा खुर्द



प्रभागातील मोकळ्या जागेत अशाप्रकारे उघड्यावर कचरा आणि बंद पडलेली वाहने दिसून येतात.

## राजकीय प्रतिनिधी म्हणतात

“ अतिक्रमणे हटवल्यास प्रभागात पीएमपीची सेवा सुरू होऊ शकते. प्रभागातील डीपी रस्ते रखडले आहेत. तसेच वीज, सांडपाणी आणि पावसाळी वाहिन्यांची कामे न करताच सिमेंटचे रस्ते केले आहेत. शिवनेरीनगर, भाग्योदय नगर, मीठा नगर येथे ६० हजार लोकसंख्या असताना केवळ दहा हजार लोकसंख्येसाठीची वीज यंत्रणा अस्तित्वात आहे.

– **अमर गव्हाणे**, भाजप

“ गेल्या चार वर्षांत विद्यमान नगरसेवकांकडून एकही मोठे काम झालेले नाही. सिमेंटचे रस्ते, पावसाळी व सांडपाणी वाहिन्यांची काही कामे झाली आहेत. शाळा, रस्ते, भाजी मंडई, उद्यान यांची केवळ उद्घाटने झाली असून त्यानंतर या सुविधांकडे नगरसेवक आणि महापालिका प्रशासनाकडून पाहिले देखील नाही. प्रभागात पायाभूत सुविधांचा अभाव जाणवतो.

– **नूर शेख**, काँग्रेस



रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी अशाप्रकारे दुकाने, पथारीवाले, फळ विक्रेत्यांनी अतिक्रमण केले आहे.

## तक्रारींचा पाढा

- कचरा, पाणी, वीज, रस्ते, विजेची वानवा
- उच्चदाब वीजवाहिन्या भूमिगत न केल्याने नागरिकांना धोका
- सांडपाणी वाहिन्यांचा अभाव
- विस्कळीत पाणीपुरवठा

## लोकप्रतिनिधी म्हणतात

गेल्या २५ वर्षांपासून कोंढवा आणि परिसराचा विकास झालेला नाही. त्यामुळे या भागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी दरवर्षी २० कोटी रुपयांचा निधी आवश्यक आहे. मात्र, विरोधी पक्षाचा नगरसेवक असल्याने कमी निधी मिळत असूनही प्रभागात रस्ते, पाणी, वीज, उद्याने अशा पायाभूत सुविधा देण्याचा प्रयत्न केला आहे. काही प्रकल्प अंतिम टप्प्यात असून लवकरच पूर्ण करू.

– **अब्दुल पठाण**, नगरसेवक

कोंढवा खुर्द येथे वसतिगृह आणि सांस्कृतिक केंद्राचे काम प्रगतिपथावर आहे. लुल्लानगर येथे पाण्याच्या वाहिन्या टाकण्याचे काम पूर्ण केले. सिमेंटचे रस्ते, अहिल्यापेठ मशिद येथे पावसाळी वाहिन्यांची कामे पूर्ण केली आहेत. शीतल पेट्रोल पंपामागे भाई मंडई प्रस्तावित केली आहे. मीनाताई ठाकरे रुग्णालयात २० खाटांचे करोना केंद्र, सोनोग्राफी केंद्र सुरू केले आहे.

– **परवीन शेख**, नगरसेविका

शिवनेरीनगर येथे स्वनिधीतून ७० लाख लिटरच्या दोन पाण्याच्या टाक्या पूर्ण केल्या. बॅटमिंटन सभागृहाचे काम पूर्ण झाले असून ई-लर्निंग स्कूलचे काम अंतिम टप्प्यात आहे. बहुउद्देशीय सभागृह तयार असून दुसऱ्या सभागृहाचे कामही प्रगतिपथावर आहे. मीठानगर येथे दवाखाना सुरू केला आहे. दोन स्वतंत्र उद्याने सुरू केली आहेत. ३५ कि.मी. पाणी वाहिन्यांची कामे पूर्ण केली.

– **साईनाथ बाबर**, नगरसेवक

## प्रभागातील समस्यांचा लेखाजोखा

- महापालिकेच्या गेल्या निवडणुकीत सर्वच पक्षांनी नागरिकांना भरघोस आश्वासने दिली होती. या आश्वासनांचे काय झाले, कोणती कामे झाली, कोणत्या योजना प्रत्यक्षात आल्या याचा आढावा ‘प्रभागाचे प्रगतिपुस्तक’ या वृत्तमालिकेतून दररोज घेतला जात आहे.
- प्रभागांमधील नागरिकांना कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे, नागरिकांचे प्रश्न, समस्या सोडविण्यासाठी प्रभागाचे नगरसेवक काय करत आहेत, गेल्या साडेतीन वर्षांत कोणत्या समस्या सुटल्या, कोणती कामे रखडली, कोणती कामे झाली याची सविस्तर माहिती या वृत्तमालिकेतून देण्यात येत आहे. वृत्तमालिका सुरू झाल्यानंतर नागरिकांकडून त्याला प्रतिसाद मिळत असून विविध प्रभागातील नागरिकांनी त्यांना दैनंदिन भेडसाविणाऱ्या समस्या कळविल्या आहेत. यातील काही निवडक समस्यांची माहिती या सदरातून प्रसिद्ध केली जात आहे.
- नागरिकांनी आपल्या भागातील समस्या, प्रश्न पुढील ई-मेल पत्त्यावर पाठवावेत. समस्यांचे छायाचित्रही पाठविता येईल. आपले नाव आणि संपर्क क्रमांकही अवश्य द्यावा.

● इ-मेल - lokpune4@gmail.com

# ‘समरसता हा भाषणाचा नाही, तर आचरणाचा विषय’



श्रीगुरुजी पुरस्कार प्रदान कार्यक्रमात (डावीकडून) राजेशजी, सुहास हिरेमठ, के. सुब्रह्मण्यम, निखिल सोमपुरा, डॉ. रवींद्र साताळकर, नितीन देसाई आणि नानासाहेब जाधव.

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** समरसता ही केवळ भाषणात उच्चारण्यापुरती नव्हे तर जीवनात आचरण करण्याची गोष्ट आहे. समरस असलेला समाजच संघटित होऊ शकतो. अस्पृश्यता, भेदाभेद असलेला समाज संघटित होऊ शकणार नाही, असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य सुहास हिरेमठ यांनी व्यक्त केले.

रा. स्व. संघ जनकल्याण समितीतर्फे हिंदू मुन्नाणी संघटना आणि ज्येष्ठ वास्तुशिल्पकार चंद्रकांतभाई सोमपुरा यांना पूजनीय श्री गुरुजी पुरस्काराने गौरविण्यात आले. संघटनेचे के. सुब्रह्मण्यम आणि सोमपुरा यांचे पुत्र निखिल सोमपुरा यांनी हा पुरस्कार स्वीकारला. त्याप्रसंगी हिरमेठ बोलत होते. प्रसिद्ध कला दिग्दर्शक नितीन चंद्रकांत देसाई, समितीचे अध्यक्ष डॉ. रवींद्र साताळकर, संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघचालक नानासाहेब जाधव या वेळी उपस्थित होते.

हिरेमठ म्हणाले, पवित्रता, उदात्तता आणि विशालता ही मंदिरांची वैशिष्ट्ये आहेत. मंदिरांमधून घडणारा हा संस्कार आहे. आपल्या पूर्वजांच्या श्रेष्ठ संस्कृती, जीवनमूल्य आणि संस्कारातून राष्ट्र व समाजाची निर्मिती झालेली आहे.

भारत एक खोज ही मालिका करताना मनातील हिंदुत्व जागे झाले. परदेशात न जाता आपल्या संस्कृती आणि कलेचे जतन करण्याचा निर्णय घेतला. कर्जतच्या स्टुडिओमध्ये अशा अनेक कलाकृती निर्माण करण्याची प्रेरणा मिळाली, असे देसाई यांनी सांगितले.

डॉ. साताळकर यांनी प्रास्ताविक, स्नेहल दामले यांनी सूत्रसंचालन आणि सहकार्यवाह अरूण डंके यांनी आभार प्रदर्शन केले.

# विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे/पिंपरी :** विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करून शहर आणि पिंपरी-चिंचवडमध्ये जागतिक महिला दिन सोमवारी उत्साहात साजरा करण्यात आला.

महाराष्ट्र नवनिर्माण महिला सेना आणि जनहित कक्षातर्फे प्रभाग क्रमांक १८ मधील सावित्रीबाई फुले दवाखाना येथील डॉक्टर आणि परिचारिकांचा सन्मान नीता पालवे आणि समीर पालवे यांच्या हस्ते करण्यात आला. भाजप प्रभाग क्रमांक २८ मध्ये एकता प्रतिष्ठानच्या सहकार्याने आयोजित कार्यक्रमात मेधा राऊत, सुनंदा मोरे, पुष्पा कटारिया, सोनाली खंडागळे, सपना बेटाळा, आशा भालशंकर, रईसा मोमीन आणि लावण्या आरकल यांचा सत्कार भाजप महिला राष्ट्रीय संयोजक उषा वाजपेयी यांच्या हस्ते करण्यात आला. उपमहापौर सरस्वती शेंडगे, श्रीनाथ भिमाले, कविता वैरागे, गणेश शेरला या वेळी उपस्थित होते. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या साबळे फार्मसी महाविद्यालयामध्ये रेल्वे पोलीस निरीक्षक दीपाली भुजबळ, कवयित्री माधुरी विधाते यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधला. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण, प्रा. जयश्री जगताप, प्रा. अश्विनी कुंजीर, प्रा. शीतल जगताप यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

शहर जिल्हा काँग्रेसतर्फे शहराध्यक्ष रमेश बागवे यांच्या हस्ते उद्योजिका रितू छाब्रिया, डॉ. मनीषा छाजेड, अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड, ॲड. नीलिमा वर्तक, प्रकाशिका सुनीताराजे पवार, पत्रकार चैत्राली चांदोरकर, फॅशन डिझायनर सुहानी पवार, पोलीस निरीक्षक क्रांती पवार, सामाजिक कार्यकर्त्या अलका गुजनाळ यांचा सत्कार करण्यात आला. शहर युवक काँग्रेसतर्फे महापालिकेच्या महिला सेविका, आरोग्य विभाग, पोलीस दलातील महिलांचा नीलेश सांगळे आणि सौरभ शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेस कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघातर्फे माजी आमदार जयदेव गायकवाड यांच्या हस्ते ५० महिला सफाई कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. रेल्वेतर्फे विभागीय रेल्वे व्यवस्थापक रेणू शर्मा यांच्या हस्ते विविध विभागातील ३४ महिला कर्मचाऱ्यांचा उल्लेखनीय सेवेबद्दल सत्कार करण्यात आला.

## १५७ महिलांची तपासणी

निगडी येथे महापालिका आरोग्य विभागाच्या सर्व महिलांचा गुलाब पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात मनसेच्या माजी नगरसेविका अश्विनी चिखले यांनी डॉ. सुरेखा दिवाण आणि परिचारिकांचा सन्मान केला. सांगवी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रतिष्ठानतर्फे किसन फसके आणि प्रदीप गायकवाड यांच्या हस्ते महिला सफाई कामगारांचा सत्कार करण्यात आला. किवळे येथे राजेंद्र तरस सोशल फाऊंडेशनतर्फे घेण्यात आलेल्या नेत्र तपासणी शिबिरामध्ये १५७ महिलांची तपासणी करून चष्मेवाटप करण्यात आले.

# एडीवायपीयूच्या कुलगुरूपदी प्रा. हृदयेश देशपांडे यांची निवड



**पुणे :** अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या (एडीवायपीयू) कुलगुरूपदी प्रा. हृदयेश देशपांडे यांची नियुक्ती करण्यात आली. प्रा. देशपांडे गेली २७ वर्षे शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत.

अभिनवता, डिझाईन थिंकिंग, धोरणात्मक नियोजन आणि शैक्षणिक व्यवस्थापन अशा विषयांमध्ये प्रा. देशपांडे यांचे नैपुण्य आहे. त्यामुळे त्यांचा शिक्षण क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव आणि ज्ञानाचा फायदा विद्यापीठाला होईल. त्यांच्या कारकिर्दीत विद्यापीठ नवी उंची गाठेल असा विश्वास वाटतो, असे अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठाचे अध्यक्ष डॉ. अजिंक्य डी. वाय. पाटील यांनी सांगितले.

# बाईला कर्ती महिलेचा दर्जा द्यावा

## कष्टकरी महिलांचे महापालिकेला साकडे

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** ‘बाईला कर्ती महिलेचा दर्जा द्यावा’, असे साकडे कष्टकरी महिलांनी महापालिकेला सोमवारी घातले. महापालिकेच्या विधवा सहाय्य योजनेमध्ये कर्त्या महिलेच्या निधनानंतर मुला-मुलींना सहाय्य योजनेतील रक्कम दिली जावी, अशा मागणीचे निवेदन कागद-काच-पत्रा कष्टकरी महिलांनी महापालिकेच्या महिला आणि बालकल्याण समितीच्या अध्यक्षा माधुरी सहस्रबुद्धे यांच्यासह समितीच्या सभासदांना दिले.

महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत विधवा सहाय्य योजना राबवली जाते. नवऱ्याच्या मृत्युपश्चात पत्नीला काही उद्योग सुरू करण्यासाठी मदत म्हणून एकदा १५ हजार रुपये दिले जातात. मात्र, या योजनेमध्ये कर्ती बाई वारली तर तिच्या मुलांना काहीच मिळत नाही. महिला रोजगार, नोकरी अथवा व्यवसाय करत असल्या तरी त्यांना समाजात कर्तीचा दर्जा दिला जात नाही, या वास्तवावर बोट ठेवत महिलांनाही कर्ती हा दर्जा द्यावा, अशी मागणी पंचायतीच्या शोभा बनसोडे आणि पूर्णिमा चिकरमाने यांनी केली.

कष्टकरी बाया या कर्त्या असतात. अर्थार्जनात सहभागी झाले नाही तर त्यांची कुटुंब चालणार नाहीत. कचरा उचलणे, काच पत्रा भंगार गोळा करणे, घरकामगार या कामात महिलांचा सहभाग असून सुद्धा महिलांचे श्रम पुरुषांच्या श्रमामध्येच मोजले जातात. शेतकरी आंदोलनात आम्ही पण शेतकरी आहोत म्हणत खूप साऱ्या महिला उतरल्या आहेत. तसेच इतर व्यवसायात आणि नोकरी करणाऱ्या बाया पण कर्त्याच आहेत. कर्त्या आहोत म्हणून मृत्यू झाल्यास मुलामुलींना विधवा सहाय्य योजनेतील रक्कम दिली जावी अशी मागणी कागद काच पत्रा कष्टकरी पंचायतीने केली आहे.

# सव्वा लाखांचा ऐवज लांबविला

**लोकसत्ता प्रतिनिधी**

पुणे : नाना पेठेतील राजेवाडी परिसरात बंद घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी कपाटातील ५० हजारांची रोकड आणि दागिने असा १ लाख २७ हजारांचा ऐवज लांबविल्याची घटना घडली.

याबाबत एका महिलेने समर्थ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार महिलेचे नाना पेठेतील राजेवाडी परिसरात दुमजली घर आहे. चोरट्यांनी दुसऱ्या मजल्यावरील खोलीच्या दरवाज्याचे कुलूप तोडले. लोखंडी पेटीचे कुलूप उचकटून पेटीतील ५० हजारांची रोकड आणि सोन्याचे दागिने असा १ लाख २७ हजारांचा ऐवज लांबविला.

# विक्रीकर निरीक्षक महिलेला गंडा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** समाजमाध्यमावर झालेल्या ओळखीतून विक्रीकर विभागातील निरीक्षक महिलेला परदेशातून भेटवस्तू पाठविण्याच्या आमिषाने चोरट्याने पाच लाख रुपयांचा गंडा घातल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

याबाबत महिलेने लष्कर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार महिला विक्री कर विभागात निरीक्षक आहे. गेल्या वर्षी त्यांची समाजमाध्यमावर चोरट्याची ओळख झाली होती. चोरट्याने परदेशात वास्तव्यास असल्याची बतावणी केली होती. त्यानंतर समाजमाध्यमातून त्यांच्यातील संवाद वाढला. चोरट्याने त्यांना परदेशातून कपडे तसेच चीजवस्तू पाठविण्याचे आमिष दाखविले होते. भेटवस्तू भारतात पाठविण्यात आल्याची बतावणी चोरट्याने केली. भेटवस्तू ताब्यात घेण्यासाठी काही रक्कम भरावी लागेल, अशी बतावणी चोरट्याकडून करण्यात आली होती. चोरट्याने महिलेला एका बँक खात्यात पैसे भरण्यास सांगितले होते.

महिलेकडे वेळोवेळी बतावणी करून चोरट्याने पाच लाख रुपये उकळले. दरम्यान, भेटवस्तू न मिळाल्याने महिलेला संशय आला. त्यानंतर त्यांनी नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक कविराज जांभळे तपास करत आहेत.

### पोलिसांच्या सूचनांकडे काणाडोळा

समाजमाध्यमावर अनोळखी व्यक्तीने मैत्रीची विनंती पाठविल्यानंतर त्याला प्रतिसाद देऊ नका. परदेशातून भेटवस्तू पाठविण्याच्या आमिषांना बळी पडू नका, असे आवाहन पोलिसांनी वेळोवेळी केले. मात्र, पोलिसांच्या सुचनांकडे काणाडोळा करून सामान्य चोरट्यांच्या जाळ्यात सापडत आहेत.

# मोफत शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

**प्रतिनिधी लोकसत्ता**

**पुणे :** निगडीतील स्टर्लिंग मल्टिस्पेशालिटी रुग्णालयातर्फे मोफत शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. बडवे ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजच्या संचालिका सुप्रिया बडवे यांच्या हस्ते आणि अनिल मित्तल, डॉ. माया भालेराव आणि डॉ. रागिणी पाटील यांच्या उपस्थितीत या शिबिराचे उद्‌घाटन झाले. एक आठवडा चालणाऱ्या या शिबिरात सर्व तपासण्यांवर ५० टक्के सवलत दिली जाणार आहे. सर्व नियमित शस्त्रक्रिया, कर्क रोग शस्त्रक्रिया तसेच दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रियांचा या शिबिरात समावेश आहे. डॉ. तृप्ती टोणपे, डॉ. रवींद्र शेलमोहकर, डॉ. राकेश नेवे आणि डॉ. श्रीकांत अंकोलिकर या शस्त्रक्रिया करणार आहेत. कर्क रोगावरील विविध तपासण्या मोफत केल्या जाणार आहेत. शिबिरासाठी स्टर्लिंग रुग्णालय निगडी येथे ७७२००१९५०१ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन रुग्णालयाकडून करण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांसाठी ‘संजीवनी’

पुणे : श्यामची आई फाऊंडेशन आणि उदय गुजर फाउंडेशन यांच्यातर्फे राज्यातील ग्रामीण भागातील सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी संजीवनी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. त्यात दहावीच्या साठ विद्यार्थ्यांना शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या मदत करण्यात येणार आहे.

राज्यभरातील लाखो विद्यार्थ्यांतून साठ विद्यार्थ्यांची निवड करून पुढील तीन ते चार वर्षे त्यांना शिक्षणासाठी, त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात करिअर करण्यासाठी मार्गदर्शन केले जाईल. कौशल्य विकास केंद्रात शिकणाऱ्या सुमारे शंभर विद्यार्थ्यांसाठी भोरजवळच्या विंग येथे तीन वसतिगृहे बांधली आहेत. या विद्यार्थ्यांना मार्गदर्शनासाठी वर्षभरात तीनवेळा तीन दिवसीय निवासी शिबिर होईल.



## NOTICE

Clover Watergarden Co-Operative Housing Society Limited
Plot No 69, Road No 7, Kalyani Nagar, Pune – 411006.
(Registration No PNA/PNA(2)HSG/(TC)/5370/2001)
Shall conduct its Annual General Body Meeting, for FY 2019-20
(Only through Video Conferencing on ZOOM),
on Sunday, 28th March, 2021, commencing 1000 hrs.
Contact - 020 26608661
E-mail: cloverwatergarden@gmail.com
(Ref Govt of Maharashtra letter No. Misc. – 2020/Case No 24/13-S Dt 25 Feb, 2021)

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

उप प्रादेशिक कार्यालय पुणे-१

### पर्यावरण विषयक जन सुनावणीची सूचना

मे.निरा भिमा सहकारी साखर कारखाना लि., शहाजीनगर, पो.रेडनी, ता.इंदापूर, जि.पुणे., येथील अस्तीत्वात असलेल्या ३५०० टन प्रतिदिन क्षमतेचा साखर कारखाना, १८ मे. वॅट क्षमतेचा सहवीज प्रकल्प व ३० किलो लिटर प्रतिदिन मळीवर आधारित असलेल्या आसवणी प्रकल्पामध्ये, आसवणी प्रकल्पाची क्षमता ३० किलो लिटर प्रतिदिन पासुन १०५ किलो लिटर प्रतिदिन विस्तारिकरण करण्याबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करणेकामी प्रस्ताव मंडळाकडे प्राप्त झालेला आहे.

सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरणविषयक सूचना, विचार, टिका-टिप्पणी तसेच आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर पर्यावरणविषयक जनसुनावणीचे आयोजन पुढीलप्रमाणे करण्यात आलेले आहे.

**दिनांक- १५/०४/२०२१ (गुरुवार)**

**वेळ- दुपारी १२.०० वाजता**

**ठिकाण- प्रकल्प स्थळी मे. निरा भिमा सहकारी साखर कारखाना लि., शहाजीनगर, पो. रेडनी, ता. इंदापूर, जि. पुणे.**

सदर नियोजित प्रकल्पाच्या परिसरातील रहिवासी, पर्यावरण विषयी काम करणाऱ्या संस्था, सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवासी यांना प्रकल्पासंबंधी सूचना, टिका-टिप्पणी तसेच आक्षेप तोंडी किंवा लेखी स्वरुपात नोंदवता येतील.

सदर प्रकल्पाबाबत लेखी स्वरुपात सूचना ही जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत खालील पत्त्यावर पाठविण्यात याव्यात-

**प्रादेशिक अधिकारी/उप-प्रादेशिक कार्यालय पुणे-१,**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जोग सेंटर,**
**२ व ३ रा मजला, वाकडेवाडी, पुणे-मुंबई रस्ता, पुणे- ४११ ००३.**

सदर प्रकल्पासंबंधी माहिती असलेले कार्यकारी सारांश अहवाल मराठी व इंग्रजी भाषेमध्ये तसेच पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल खालील कार्यालयांमध्ये उपलब्ध आहेत. संबंधित व्यक्ती या कार्यालयांमध्ये कार्यालयीन वेळेत सदर कागदपत्रे अभ्यासू शकतील.

१) जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे.
२) जिल्हा परिषद कार्यालय, पुणे.
३) जिल्हा परिषद उद्योग केंद्र, पुणे.
४) प्रादेशिक कार्यालय व उप प्रादेशिक कार्यालय पुणे- १, मप्रनि मंडळ, जोग सेंटर, २ रा व ३ रा मजला, वाकडेवाडी, पुणे-मुंबई रस्ता, पुणे- ४११ ००३.
५) मा. सदस्य सचिव, मप्रनि मंडळ (मुख्यालय), कल्पतरू पॉईंट, तिसरा मजला, सायन-माटुंगा स्किम रोड क्र. ७, सिनेप्लॅनेट समोर, सायन सर्कलजवळ, सायन (पूर्व), मुंबई- २२.
६) झोनल कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यू सेक्रेटरीयाट बिल्डींग, तलमजला, ईस्ट विंग, सिव्हील लाईन, नागपूर- ४४० ००१.
७) पर्यावरण विभाग, नविन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई- ३२.
८) उपविभागीय कार्यालय,बारामती, ता. बारामती, जि. पुणे.
९) तहसिल कार्यालय- इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे.
१०) पंचायत समिती कार्यालय, इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे.
११) ग्रामपंचायत कार्यालय, रेडनी, भोडणी, रेडा, ता. इंदापूर, जि. पुणे.

**टिप:-** भारत सरकारच्या दि.२९/०८/२०२० रोजीच्या ''अनलॉक-४'' च्या नियमावलीनुसार एका वेळेस १०० लोकांची उपस्थिती ठेवून नागरीकांमध्ये सामाजिक अंतर राखून व संबंधित नियमांचे पालन करुन जनसुनावणी घेण्यात येणार आहे. जनसुनावणीच्या दिवशी १०० पेक्षा जास्त नागरीक जमल्यास टप्प्या-टप्प्याने सदर जनसुनावणीची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

सही/-
(एस. जे. शिंदे)
उप प्रादेशिक अधिकारी पुणे-१
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,

## पुणे छावनी परिषद
## PUNE CANTONMENT BOARD

गोलीबार मैदान, पुणे – ४११ ००१, दूरभाष - 26453696 / 26452159
Golibar Maidan, Pune - 411 001. Tel - 26453696 / 26452159

संख्या:1/2/Tax/E-tender/PAY & PARK /2021 Date: 05 March 2021.

### NOTICE INVITING E-TENDERS

Online tenders are invited by Pune Cantonment Board, Pune Golibar Maidan, Pune -1 from the experienced individuals/firms/Companies with sound financial base for collection of pay & parking fee and provision of specified services in Pune Cantonment Board for a period of one year from the date of Handing over the sites. Experienced firms are defined to have experience in the field of collection of any type of fees outsourced by PMC/PCMC/Cantonments Boards/Civic bodies/Central Government or State Government for consecutive two years in the last ten years starting from 2009-10 onwards. The sound financial base is defined to have not less than 1 crores Net worth in the last three consecutive years out of last five financial years starting from 2015 onwards and should have turnover not less than 1 croresduring three years during last five financial years.

Interested firms may download online e-tenders from webesite https://www.eprocure.gov.in. **NO MANUAL BID WILL BE ACCEPTED.**

Dates and time for Bid download, Bid submission, Technical bid opening:

| Sr. No. | Particulars | Date | Time |
|---|---|---|---|
| 1 | Publication | 05.03.2021 | 1600 hrs |
| 2 | Bid submission starts on | 05.03.2021 | 1600 hrs |
| 3 | Bid submission ends on | 25.03.2021 | 1200 hrs |
| 4 | Opening of Technical bid | 26.03.2021 | 1200 hrs |

CHIEF EXECUTIVE OFFICER
PUNE CANTONMENT BOARD
Date : 05 March 2021. **(AMIT KUMAR)**

## TENDER NOTICE

Sealed Tender offers are invited for work of Supply, installation & commissioning of Evaporative condenser at our Lingnoor Chilling Center Tal. Gadhinglaj Dist. Kolhapur. Tender details alongwith scope of work, technical specifications & Terms conditions are available on web site **www.gokulmilk.coop** and also at our Gokul Shirgaon, Kolhapur office. Sealed Tender offer duly marked as **"TENDER FOR SUPPLY, INSTALLATION & COMMISSIONING OF NEW EVAPORATIVE CONDENSER"** is to be submitted at our Gokul Shirgaon, Kolhapur office on or before **20/03/2021.** Right to accept or reject any or all Tenders is reserved.

**Managing Director** **Chairman**
Gokul
**Kolhapur Zilla Sahakari Dudh Utpadak Sangh Ltd., Kolhapur**
B-1, M.I.D.C, Gokul Shirgaon, Kolhapur. 416234.

## ई–लिलाव विक्री सूचना

**अस्मि मेटल प्रॉडक्टस् प्रायव्हेट लिमिटेड**
**(निरवानिरवीमध्ये)**
नोंदणीकृत कार्यालय : गट क्र. ११० ते ११२ आणि गट क्र. ११५ ते ११७
इंद्रायणी इंडस्ट्रीयल इस्टेट, टाकवे, पुणे, महाराष्ट्र. ४१२१०६
निवारक : मिलिंद बाळकृष्ण कासोदेकर
निवारकाचा पत्ता : तिसरा मजला, सत्यगिरी अपार्टमेंट, ७७, विजयानगर कॉलनी, २१४७, सदाशिव पेठ, पुणे-४११०३०
ई-मेल : milind.kasodkekar@kmdscs.com
संपर्क क्र. : ९१-९१७५९२५०७५

**ई : लिलाव**

**इन्सॉल्वन्सी आणि दिवाळखोरी कोड, २०१६ अनुसार मालमत्तेची विक्री लिलावाची तारिख व वेळ**
**दिनांक १६.०३.२०२१ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी १.००**
**(प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित वाढीसह)**

माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई यांच्या दिनांक २१.०१.२०२१ च्या आदेशानुसार नियुक्त निवारकाच्या ताब्यातील अस्मि मेटल प्रॉडक्टस् प्रायव्हेट लिमिटेडच्या निरवानिरव मालमत्तेचा भाग असलेल्या, अस्मि मेटल प्रॉडक्टस् प्रायव्हेट लिमिटेडच्या (निरवानिरवीमध्ये) मालकीच्या मालमत्ता आणि संपत्तीची विक्री. मालमत्तेची विक्री अधोरिखीत स्वाक्षरीकर्त्यामार्फत ई-ऑक्शन प्लॅटफॉर्मव्दारे केली जाईल. https://ncltauction.auctiontiger.net.

| मालमत्ता | राखीव किंमत व इ एम डी (रुपये लाखात) | वाढीव मूल्य (रुपये लाखात) |
|---|---|---|
| जमीन व कारखाना शेड प्लॉट क्रमांक ११०,१११,११२, ११५,११६ आणि ११७, गट क्र.४५२ (पी), टाकवे बुद्रुक, ता.मावळ, पुणे-४१२१०६ | राखीव किंमत १२५ (एक कोटी पंचवीस लाख रुपये फक्त) **इ एम डी** १२.५ (बारा लाख पन्नास हजार रुपये फक्त) | ५ (पाच लाख रुपये फक्त) प्रत्येकी |

ई-लिलावाचे नियम व अटी खालील प्रमाणे :
1. ई लिलाव, मंजूर सेवा प्रदाता, मे. ई प्रोक्यूअरमेंट टेक्नॉलॉजीज लिमिटेड (ऑक्शन टायगर) व्दारे ''जसे आहे तसे'', ''जे आहे ते आहे'' आणि ''तेथे जे आहे त्या आधारे'' या तत्वावर केला जाईल.
2. ई-लिलावाचा संपूर्ण प्रक्रिया दस्तऐवज, ज्यामध्ये मालमत्तेचा तपशील, ऑनलाइन ई-ऑक्शन बीड अर्ज, डिक्लेरेशन व अंडरटेकिंग अर्ज तसेच ऑनलाईन लिलाव विक्रीच्या सर्वसाधारण नियम व अटी पुढील वेबसाईटर उपलब्ध आहेत https://ncltauction.auctiontiger.net.

संपर्क: श्री. रामप्रसाद शर्मा +९१-६३५१८९६८३४/७९-६८१३६८८०/०७९-६८१३६८३७
ई–मेल : ramprasad@auctiontiger.net / nclt@auctiontiger.net / support@auctiontiger.net

**मिलिंद बाळकृष्ण कासोदेकर**
निवारक
IBBI/IPA-002/IP-N00116/2017-18/10285
**दिनांक :** ०९.०३.२०२१
**ठिकाण :** पुणे.

## MAHAVITARAN — SHORT TENDER NOTICE

Digitally Sealed & signed offers are invited in two bid system by e-tender method from eligible registered firms for **"Providing skilled/semi-skilled/un-skilled labour for performing day to day duties under the jurisdiction of Sanagmner Division, Ahmednagar in Ahmednagar Circle through outsourcing against tender Nos. EE/SNGR/OUSOURCE/ 2021-22/T-01 "**, For details such as Description of the Works, specified area, estimated cost, EMD, etc bidders are requested to refer Employers web-site **http://works.mahadiscom.in/eTender/etender.** The tenders are available from 09.03.2021 to 16.03.2021 on website in latest by 17.03.2021 up to 23.00HRS. Contact Nos:02425-225556.

**PRO:049** **Executive Engineer, Sangamner.**

## सबॉर्डिनेट इंजिनिअर्स असोसिएशन (एम.एस.ई.बी.) को- ऑप. क्रेडीट सोसायटी लि., पुणे

३५१, रास्ता पेठ, सिताराम अपार्टमेंट, पुणे ४११०११ फोन : २६०६४९४८
रजि. नं. पी.एन.ए. / बी.एन.के. /२६०/८३
जा.क्र./एस.ई.ए.-सोसायटी/पुणे/जी.बी./२०९/२०२०-२०२१ दि. ०८.०३.२०२१

**वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

सबॉर्डिनेट इंजिनिअर्स असोसिएशन (एम.एस.ई.बी.) को- ऑप. क्रेडीट सोसायटी लि., पुणे या संस्थेची वर्ष २०१९-२०२० ची वार्षिक सर्वसाधारण सभा पुढील विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्यासाठी

**रविवार दि. २८.०३.२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता**
**स्थळ: एस. एम. जोशी सोशलिस्ट फौंडेशन, स. नं. १९१/१९२, नवी पेठ, गांजवे चौक, पत्रकार भवन शेजारी, पुणे ३० फोन: ०२०-२४५३९२३८**

येथे आयोजित करण्यात आली आहे.

**सभेपुढील विषय**

१. मागील सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२. व्यवस्थापन समितीने सादर केलेल्या अहवालास मंजूरी देणे.
३. वैधानिक लेखापरिक्षण अहवाल वर्ष २०१९-२०२० वाचून स्विकारणे.
४. वर्ष २०१९-२०२० चे वैधानिक लेखापरिक्षण अहवालाचे दोषदुरुस्ती अहवाल वाचून स्विकारणे.
५. वर्ष २०१९-२०२० साठीचे अकाऊंटस् वाचून मंजूरी देणे.
६. वर्ष २०१९-२०२० साठीचे नफा विनियोग पत्रकास मंजूरी देणे.
७. वर्ष २०१९-२०२० या वर्षाच्या मंजूर अंदाजपत्रक तरतूदीपेक्षा कमी/जास्त झालेल्या जमाखर्चास मान्यता देणे.
८. निबंधकांनी जाहीर केलेल्या नामतालिकेमधील पात्र वैधानिक लेखापरिक्षकाची वर्ष २०२०-२०२१ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करण्यासाठी नियुक्ती करणे.
९. वर्ष २०२०-२०२१ साठी तयार केलेल्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
१०. संस्थेच्या पोटनियम दुरुस्ती प्रस्तावास मंजूरी देणे.
११. वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या संस्था सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
१२. गुणवंत पाल्यांचा सत्कार समारंभ.
१३. निवृत्त अभियंत्यांचा सत्कार समारंभ.
१४. आयत्या वेळी येणाऱ्या विषयांवर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने विचार करणे.
१५. आभार प्रदर्शन व समारोप.

या सर्वसाधारण सभेस सर्व सभासदांनी उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

**अभि. उदय साठे**, अध्यक्ष **अभि. शिवाजीराव लाड**, सचिव

सूचना : कोरम अभावी सभा तहकूब करावी लागल्यास ती त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्धा तास तहकूब करून संस्थेच्या पोटनियमांनुसार घेण्यात येईल.
टिप: १. कोविड-१९च्या अनुषंगाने शासकीय दिशानिर्देशानुसार मास्क बांधणे, सुरक्षित अंतर राखणे व सॅनिटायझरचा वापर करणे बंधनकारक केले आहे. तरी सन्माननीय सभासदांनी शासकीय दिशानिर्देशाचे पालन करुन सदरील सभेस उपस्थित रहावे हि विनंती.
२. कोविड-१९च्या तत्कालीन प्रतिकुल परिस्थितीत जर सदरची सभा होणार नसेल तर त्या दिवशी, त्याचवेळी व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे सभा घेतली जाईल. त्याची लिंक (Link) सभेपूर्वी सभासदांना मेलद्वारे कळविण्यात येईल.
३. ज्या सभासदांनी आपला Email ID किंवा मोबाईल क्रमांक याबाबतची माहिती आपल्या संस्थेकडे अद्याप नोंद केली नसेल त्यांनी त्वरीत संस्थेच्या ईमेल आयडी (sea.mseb.society.pune@gmail.com) वर पाठवावी.

## TATA — टाटा कॅपिटल फायनॅन्शीअल सर्व्हिसेस लि.

नोंदणीकृत कार्यालयः अकरावा मजला, टॉवर ए, पेनिन्सुला बिझनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परळ, मुंबई-400013 CIN क्र.: U67190MH2008PLC187552
शाखेचा पत्ताः नववा मजला, आयरीझ, बाणेर-पाषाण लिंक रोड, बाणेर,पुणे-411021

**अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना**
**(सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) अंतर्गत)**

सिक्युरिटी इंटेरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) मधील तरतुदीसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

**कर्ज खाते 7410953 श्री श्रीनिवास नंदकिशोर लड्ढा**

याद्वारे कर्जदार/सह-कर्जदार व सर्व लोकांना सूचित करण्यात येते की टाटा कॅपिटल फायनॅन्शीअल सर्व्हिसेस लि. (सुरक्षित धनको/टीसीएफएसएल) कडे तारण असलेल्या खालील वर्णनाच्या मालमत्तेचा टाटा कॅपिटल फायनॅन्शीअल सर्व्हिसेस लि. (सुरक्षित धनको) यांनी ताबा घेतलेला असून तिची **दि. 26 मार्च, 2021 रोजी** ''जशी आहे जेथे आहे'' आणि ''जशी आहे जे काही आहे आणि तेथे जे काही आहे व इतर कोणताही उपाय नाही'' तत्त्वावर विक्री करण्यात येईल.

ज्याअर्थी, सुरक्षित कर्जाच्या वसुलीसाठी अनामत मतेची विक्री करावयाची असल्याने आणि दि. 14 नोव्हेंबर, 2019 नुसार कर्जदार/सह-कर्जदार म्हणजे **1. श्री श्रीनिवास नंदकिशोर लड्ढा, 2. श्रीमती वंदना श्रीनिवास लड्ढा, 3. मे. उज्ज्वल मोटर्स, 4. मे. दीपाली ट्रान्सपोर्ट सर्व्हिसेस अँड टूर्स अँड ट्रॅव्हल्स,** राहणार सदनिका क्र. 306, तिसरा मजला, एच-1, गंगाधाम, मार्केट यार्ड, पुणे- 411037, तसेच येथेः द्वारे दीपाली ट्रान्सपोर्ट सर्व्हिसेस अँड टूर्स अँड ट्रॅव्हल्स, दुकान क्र. 20, स.क्र. 30/311, सुमीत प्लाझा, मार्केट यार्ड, पुणे- 411037 यांचेकडे **रु. 1,13,71,023/- (रुपये एक कोटी तेरा लक्ष एक्काहत्तर हजार तेवीस फक्त)** ची थकबाकी आहे.

याद्वारे सूचित करण्यात येते की विक्री पुढे ढकलण्यात/खंडित करण्यात न आल्यास सदर मालमत्तेची टीसीएफएसएल द्वारे **दि. 26 मार्च, 2021 रोजी दु. 2 वाजता** त्यांचे शाखा कार्यालय नववा मजला, आयरीझ, बाणेर-पाषाण लिंक रोड, पुणे-411045 येथे ई-लिलावाद्वारे विक्री करण्यात येईल. सदर मालमत्तेच्या खरेदीसाठी बयाणा रकमेच्या डिमांड ड्राफ्टसह मोहरबंद ई-लिलाव टाटा कॅपिटल फायनॅन्शीअल सर्व्हिसेस लि. यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे दि. 25 मार्च, 2021 रोजी सायं. 5 वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.

| अनामत मत्तेचे वर्णन | ताब्याचा प्रकार रचनात्मक/प्रत्यक्ष | आरक्षित किंमत (रु.) | बयाणा रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| सदनिका क्र. 306, क्षेत्रफळ सुमारे 71.37 चौ.मी., तिसरा मजला, बिल्डींग क्र. एच-1, गंगाधाम फेज-II, गंगाधाम (फेज II) घरकुल सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, सदर इमारत सुमारे 25543 चौ.मी. जमिनीवर बांधलेली आहे, स.क्र. 612, हिस्सा क्र. 8+9, स.क्र. 625, हिस्सा क्र. 1/1, स.क्र. 615, हिस्सा क्र. 1/2, स.क्र. 615, हिस्सा क्र. 2 ते 8/1, सीटीएस क्र. 394, 395, 399, महसूल गाव मुन्जेरी बिबवेवाडी, ता. हवेली, जि. पुणे, पुणे महानगर पालिकेच्या स्थानिक हद्दीत आणि नोंदी जिल्हा, उप-निबंधक हवेली, जि. पुणे यांचे अधिकारक्षेत्रात. चतुःसीमाः पूर्वेसः एफ-4, पश्चिमेसः एफ-1, उत्तरेसः रस्ता, दक्षिणेसः अंतर्गत रस्ता. | रचनात्मक | रु. 54,40,000/- (रुपये चौपन्न लक्ष चाळीस हजार फक्त) | रु. 5,44,000/- (रुपये पाच लक्ष चौरेचाळीस हजार फक्त) |

विक्रीस काढण्यात आलेल्या मालमत्तेचा तपशील परिशिष्टात देण्यात आलेला आहे. प्राधिकृत अधिकाऱ्याकडे वर नमूद रक्कम, व्याज व शुल्काचा (विक्रीच्या खर्चासह) भरणा केल्यास किंवा सुरक्षित कर्ज, व्याज व शुल्काचा भरणा करण्यात आल्याचा समाधानकारक पुरावा त्यांना देण्यात आल्यास विक्री थांबविण्यात येईल. विक्रीच्या वेळी साधारणपणे लोकांना त्यांच्या निविदा स्वतः सादर करण्यास सांगितले जाते. सदर विक्रीच्या संदर्भात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणतीही भूमिका बजावणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा इतर व्यक्तीस विक्री करण्यात येणार असलेल्या मालमत्तेसाठी बोली देता येणार नाही, कोणत्याही हितसंबंधाचे अधिग्रहण किंवा अधिग्रहण करण्याचा प्रयत्न करता येणार नाही. सदर विक्री ही SARFAESI अधिनियम, 2002 मध्ये विहित करण्यात आलेल्या अटी/नियमांच्या अधीन राहून करण्यात येईल. सदर ई-लिलाव हा **दि. 26 मार्च, 2021 रोजी दु. 2.00 ते 3.00 वाजेपर्यंत https://disposalhub.com** या पोर्टलमार्फत घेण्यात येईल आणि यात प्रत्येकी 10 मिनिटांचे अमर्याद कालविस्तार असतील. मालमत्तेच्या खरेदीसाठी सादर करण्यात येणाऱ्या सर्व बोलींसोबत ''टाटा कॅपिटल फायनॅन्शीअल सर्व्हिसेस लि.'' यांचे नावे काढण्यात आलेल्या आणि पुणे येथे देय असलेल्या डिमांड ड्राफ्टच्या स्वरूपातील बयाणा रक्कम असावी. मालमत्तेची पाहणी **दि. 16 मार्च, 2021** रोजी स. 11 ते सायं. 5.00 वाजेपर्यंत करता येईल.

टीपः इच्छुक बोलीदार **प्राधिकृत अधिकारी श्री विकास अकोलकर**, ईमेल आयडी **vikas.akolkar@tata-capital.com** आणि मोबाईल क्र. 7066048167 यांचेशी संपर्क साधू शकतात.

विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया सुरक्षित धनकोच्या वेबसाईटवर म्हणजे https://www.tatacapital.com/content/dam/tata-capital/pdf/tcfsl/AUCTIONTERMS%26CONDITIONS.pdf भेट द्यावी किंवा प्राधिकृत अधिकारी किंवा सेवा पुरवठादाराशी संपर्क साधावा-नेक्सजेन सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड.

**स्थानः पुणे, महाराष्ट्र** **स्वा/– प्राधिकृत अधिकारी**
**दिनांकः 9 मार्च, 2021** **टाटा कॅपिटल फायनॅन्शीअल सर्व्हिसेस लिमिटेड**

## महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम 1963 चे कलम 11 (3) अन्वये नोटीस.

**– जाहीर नोटीस –**

**मानीव हस्तांतरण अर्ज क्र. २४/२०२१/६५७०**

भाग्य अपार्टमेंट सहकारी गृहरचना संस्था मर्यादित,
स.नं.३७/२/१, प्लॉट नं.९, सफायर पार्क जवळ, बालेवाडी, पुणे ४५ तर्फे
श्री.विवेकानंद रमेश महामुनी — अर्जदार

विरुध्द

1. मे. भाग्यश्री डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री.सतिश अरुण थोरात
रा.प्लॉट नं.३१, इंदिरानगर, प्रेमलोक पार्क जवळ, चिंचवड, पुणे ४११ ०३३.
2. श्री.विरेंद्र विजय ललवाणी
3. श्री.वसंत विजय ललवाणी
4. श्री.नितल विजय ललवाणी
5. श्रीमती निलीमा विजय ललवाणी
वरील २ ते ५ यांच्या वतीने कुलमुखत्यारधारक
श्री.सतिश अरुण थोरात,
रा.प्लॉट नं.३१, इंदिरानगर, प्रेमलोक पार्क जवळ, चिंचवड, पुणे ४११ ०३३. — गैरअर्जदार/ जमिनमालक

उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये भाग्य अपार्टमेंट सहकारी गृहरचना संस्था मर्या., स.नं.३७/२/१, प्लॉट नं.९, सफायर पार्क जवळ, बालेवाडी पुणे ४५ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र.२४/२०२१ दाखल आहे. सदर अर्जातील अर्जदार संस्थेच्या वतीने चेअरमन श्री.विवेकानंद महामुनी हजर. जमिनमालक/गैरअर्जदार क्र.1 ते 5 यांना नोंदणीकृत डाकेने नोटीस पाठवून ही गैरहजर. सबब गैरअर्जदार क्र.१ ते ५ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी **दिनांक १०/०३/२०२१ रोजी दु.३.०० वा.** जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर यांचे कार्यालय, साखर संकुल न.ता.वाडी, शिवाजी नगर पुणे ४११ ००५ या ठिकाणी ठेवण्यात आलेली आहे. सदर सुनावणीस गैरअर्जदार क्र. १ ते ५ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायद्यातील तरतुदीप्रमाणे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(एन. व्ही. आघाव)
आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त राज्यसभेत शून्य प्रहरात महिलांसंबंधित मुद्दे उपस्थित केले गेले. त्यानंतर, सभापती व्यंकय्या नायडू यांनी प्रश्नोत्तराचा तास पुकारताच, काँग्रेससह अन्य विरोधी सदस्यांनी घोषणाबाजी करत इंधनदरवाढीवर चर्चा करण्याची मागणी केली. हे सदस्य सभापतींच्या आसनासमोरील हौद्यात उतरले. नायडू हे प्रश्नोत्तराचा तासही महत्त्वाचा असल्याचे सांगत होते. या गोंधळात माहिती व प्रसारणमंत्री प्रकाश जावडेकर उत्तरे देत होते. गदारोळ वाढतच गेल्यामुळे नायडू यांनी, 'पहिल्याच दिवशी सदस्यांवर कठोर कारवाई करायची नाही', असे सांगत सभागृह तहकूब केले. लोकसभेतही विरोधकांनी गदारोळ केल्यानंतर अध्यक्ष ओम बिर्ला यांनी, महिला दिनानिमित्त महिला सदस्यांना मुद्दे उपस्थित करण्याची संधी मिळाली पाहिजे. त्यासाठी सभागृहाचे कामकाज सुरू राहिले पाहिजे, सदस्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले. गोंधळ न थांबल्याने बिर्ला यांनी कामकाज तहकूब केले.

### दुसरा टप्पा दोन आठवड्यांचा?



**पश्चिम बंगालसह पाच राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका असल्याने संसदेचे अधिवेशन स्थगित करण्याची मागणी तृणमूल काँग्रेसने सोमवारी केली. तृणमूलचे राज्यसभेतील खासदार डेरेक ओब्रायन यांनी सभापती नायडू यांना पत्र लिहिले असून निवडणुकीमुळे सदस्य अधिवेशनासाठी उपस्थित राहू शकणार नाहीत, असे नमूद केले आहे. अन्य पक्षांच्या सदस्यांनीही लोकसभा अध्यक्ष, राज्यसभेच्या सभापतींकडे अशी मागणी केल्याने अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा दोन आठवड्यांमध्ये गुंडाळला जाण्याची शक्यता आहे. लोकसभेच्या कामकाज सल्लागार समितीमध्ये या मुद्द्यावर चर्चा करण्यात आली असून लवकरच अंतिम निर्णय घेतला जाईल.**

**खरगे यांची मागणी फेटाळली**

राज्यसभेत नवनियुक्त विरोधी पक्षनेते व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मल्लिकार्जुन खरगे यांनी इंधनदरवाढीचा मुद्द्यावर चर्चेची मागणी केली. मात्र, विनिमय विधेयकावरील चर्चेदरम्यान आर्थिक मुद्दे उपस्थित करता येतील, असे सांगत नायडू यांनी खरगे यांची मागणी फेटाळली. पेट्रोलचे दर १०० रुपये, तर डिझेलचे ८० रुपये लीटर झाले आहेत. स्वयंपाकाच्या गॅसच्या किंमतीही भरमसाट वाढल्या आहेत. उत्पादन शुल्क-उपकरातून केंद्र सरकारने २१ लाख कोटी जमा केले आहेत. वाढत्या किंमतींमुळे शेतकरीही भरडले जात आहेत, असा आरोप खरगे यांनी केला. लोकसभेत या प्रश्नावर शिवसेना, इंडियन युनियन मुस्लिम लिगने स्थगन प्रस्ताव दिला.

मंगळवारपासून दोन्ही सदनांच्या कामकाजाचे तास वाढवण्यात आले असून ते सकाळी ११ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत करण्यात आले आहेत. करोनामुळे सध्या राज्यसभेचे कामकाज सकाळच्या सत्रात तर, लोकसभेचे दुपारच्या सत्रात घेतले जाते. आता दोन्ही सदनांचे कामकाज एकाचवेळी सुरू राहील. प्रत्येक सभागृहातील सदस्यांची बैठक व्यवस्था दोन्ही सदनांमध्ये विभागण्यात आली होती. त्यात बदल करून त्या-त्या सभागृहातील सदस्य त्याच सदनात व तिच्या कक्षांमध्ये बसतील.

**ग्रंथालयात जा!**

संसदेतील ग्रंथालयाला यावर्षी शंभर वर्ष पूर्ण होत असून १४ लाख पुस्तके, शेकडो नियतकालिकांचा अमूल्य ठेवा संसद सदस्यांना उपलब्ध आहे. पण, ग्रंथालयात फारसे कोणी फिरकत नाही, तिथे जाऊन माहिती घ्या, सभागृहात सखोल चर्चा करताना त्याची मदत होईल, असे आवाहन व्यंकय्या नायडू यांनी केले. कोणत्या विषयांचे कोणते महत्त्वाचे ग्रंथ इथे आहेत याची माहिती देण्यासाठी ग्रंथालय समिती मोठे फलक लावणार आहे, त्यातून सदस्याचे लक्ष वेधले जाऊ शकेल, असे नायडू यांनी सांगितले. काही सदस्य दिल्लीत असतात पण, सभागृहात उपस्थित राहात नाहीत, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

# 'राफेल'चे मालक ऑलिव्हिअर दसाँ यांचा हेलिकॉप्टर दुर्घटनेत मृत्यू

**एपी, पॅरिस**

**राफेल लढाऊ** विमाने तयार करणाऱ्या कंपनीचे मालक, फ्रान्सच्या संसदेचे सदस्य आणि अब्जाधीश उद्योगपती ऑलिव्हिअर दसाँ (६९) यांचा हेलिकॉप्टर दुर्घटनेत वैमानिकासह मृत्यू झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. स्थानिक वेळेनुसार रविवारी सायंकाळी ६ वाजता त्यांच्या हेलिकॉप्टरचा अपघात झाला.

फाल्कन खासगी विमाने आणि राफेल लढाऊ विमाने तयार करणाऱ्या कंपनीचे त्याचप्रमाणे ले फिगारो या वृत्तपत्राचे ते मालक होते. नॉर्मंडी



परिसरातील टॉक्स शहरात रविवारी हेलिकॉप्टर दुर्घटनेत त्यांचा मृत्यू झाला, त्याची न्यायालयीन चौकशी सुरू करण्यात आली आहे. फ्रान्सच्या संसदेचे सदस्य असल्याने राजकारण आणि उद्योग यावर एकमेकांचा प्रभाव पडू नये यासाठी त्यांनी कंपनीच्या व्यवस्थापकीय मंडळ पदाचा राजीनामा दिला होता.

खासगी हवाई तळावरून उड्डाण केल्यानंतर एअरबस एएस ३५० हेलिकॉप्टर कोसळले, असे बीईए या राष्ट्रीय हवाई दुर्घटना तपास संस्थेच्या वतीने सांगण्यात आले. बीईएच्या तपास अधिकाऱ्यांनी सोमवारी दुर्घटनास्थळाला भेट दिली. फोर्ब्स मासिकाने २०२० मध्ये जगातील ५०० धनिकांच्या यादीत ऑलिव्हिअर दसाँ यांचा समावेश केला होता.

फ्रान्स संसदेच्या कनिष्ठ सभागृहाचे ते २००२ पासून सदस्य होते. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युअल मॅक्रॉन यांनी दसाँ यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. दसाँ यांनी उद्योजक, स्थानिक लोकनियुक्त प्रतिनिधी, वायुसेनेचे कमांडर म्हणून देशाची सेवा केली, असे मॅक्रॉन यांनी ट्वीट केले आहे.

## ...तर देशालाही मोदींचे नाव– ममता बॅनर्जी

**कोलकाता :** पंतप्रधान नरेंद्र मोदी तृणमूल काँग्रेस सरकारविरुद्ध अपप्रचार करून अफवा पसरवत असल्याबद्दल पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सोमवारी मोदींना फटकारले. राज्यातील २९४ मतदारसंघांत या वेळी दीदी विरुद्ध भाजप असा सामना मतदार पाहतील, असेही त्या म्हणाल्या. इतकेच नव्हे तर एक दिवस देशाला नरेंद्र मोदी यांचे नाव दिले जाईल आणि तो दिवसही दूर नाही, असेही त्या म्हणाल्या. कोविड-१९च्या प्रमाणपत्रांवर मोदी यांचे छायाचित्र छापण्यात आले त्यावरून ममतांनी हा हल्ला चढविला.


## NOTICE

Vitoria Premises Co-Operative Society Limited
Survey No. 210 (Part), Central Avenue, Kalyani Nagar,
Pune – 411 006
(Reg. No. PNA/ PNA (5)/GNL/(C)/908/2014-15 dated 21/07/2014)
Shall conduct its Annual General Body Meeting, for FY 2019-20
(Only through Video Conferencing),
on Thursday, 25 th March, 2021, commencing 11:00 am.
Contact - 020-26600444 / E-mail: vitoriapremises@gmail.com
(Ref Govt of Maharashtra letter No. Misc. – 2020/Case No 24/13-S Dt 25 Feb, 2021)

## NOTICE

Rohan Mithila-2 Co-Operative Housing Society Limited
Survey No. 229, Plot No. 'E', Lohegaon (Viman Nagar),
Pune – 411 032
(Registration No PNA/PNA(5)/HSG (TC)/15931/2014-2015)
Shall conduct its Annual General Body Meeting, for FY 2019-20
(Only through Video Conferencing),
on Saturday, 27th March, 2021, commencing 4:00 pm.
Contact - 020-66245570 / E-mail: mithila2.property@gmail.com
(Ref Govt of Maharashtra letter No. Misc. – 2020/Case No 24/13-S Dt 25 Feb, 2021)


## नोटीस

**फॉर्म क्रमांक सीएए २**

[कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २३० (३) आणि कंपन्यांच्या नियम ६ आणि ७ (तडजोडी, व्यवस्था आणि एकत्रिकरण) नियम, २०१६ च्या अनुषंगाने]

**नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल**
**मुंबई बेंच समक्ष**
**कंपनी अनुप्रयोग क्रमांक १११९ (MB)/२०२०**

कंपनी ॲक्ट, २०१३ च्या बाबतीत;
आणि
कलम २३० ते २३२ च्या बाबतीत;
कंपन्या कायदा, २०१३
आणि
इलेक्ट्रॉनिका हायटेक मशीन टूल्स प्रायव्हेट लिमिटेड [CIN U29210PN 2011PTC139073 (दिमर्ज्ड कंपनी)] आणि कासखेडिकर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड [CIN U74110PN2019PTC183424 (फर्स्ट रिझल्टिंग कंपनी)] आणि धर्माधिकारी सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड [CIN U24100PN2019PTC183211 (सेकंड रिझल्टिंग कंपनी)] आणि त्यांचे संबंधित भागधारक यांच्या कलम २३० ते २३२ अंतर्गत व्यवस्था योजनेच्या बाबतीत

**धर्माधिकारी सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड ----- अर्जदार कंपनी**

**इक्विटी शेअर्सधारकांना भेटण्याच्या नोटिसीची जाहिरात**

१६ फेब्रुवारी २०२१ च्या आदेशानुसार नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्यूनलच्या ("एनसीएलटी") च्या मुंबई बेंचने धर्माधिकारी सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडच्या इक्विटी भागधारकांच्या बैठकीचे आयोजन करण्याचा आदेश दिला आहे. ही बैठक इलेक्ट्रॉनिका हायटेक मशीन टूल्स प्रायव्हेट लिमिटेड (डिमर्ज्ड कंपनी) आणि कासखेडिकर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड (फर्स्ट रिझल्टिंग कंपनी) आणि धर्माधिकारी सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड (''अर्जदार'' / सेकंड रिझल्टिंग कंपनी) आणि त्यांचे संबंधित भागधारक यांच्या अंतर्गत व्यवस्था योजनेचा ठराव सहमतीने किंवा काही बदलांसोबत मंजूर करण्याच्या उद्देशाने ठेवली आहे.

या आदेशाच्या अनुषंगाने आणि त्यातील निर्देशानुसार पुढील सूचना देण्यात आली आहे की धर्माधिकारी सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडच्या इक्विटी भागधारकांची बैठक खालील प्रमाणे आयोजित केलेली आहे. त्यात भागधारकांना उपस्थित राहण्याची विनंती केली आहे.

कंपनीचे नाव – धर्माधिकारी सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड

| अनु. | सभासद | सभेचा दिवस | सभेची वेळ | सभेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | इक्विटी भागधारक | ८ एप्रिल २०२१ | दु. ३ वाजता | ४ था मजला, विंग सी, कार्यालय क्रमांक बी ३०+बी३१ हेरेकर पार्क समोर, भांडारकर रोड, पुणे ४११००४ महाराष्ट्र, भारत. |

अर्ज केलेल्या कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात किंवा त्यांचे वकिल हेमंत सेठी अँड को., १६०२, नव परमाणू, अमर सिनेमाच्या मागे, चेंबूर, मुंबई – ४०००७१ येथे कलम २३० नुसार नमूद केलेल्या योजनेच्या प्रती आणि निवेदनाची प्रत विनामूल्य मिळू शकते. बैठकीला हजर राहण्यास व मतदानाचा हक्क असणाऱ्या व्यक्ती व्यक्तिशः किंवा प्रॉक्सीद्वारे मतदान करू शकतात जर त्यांनी बैठकीच्या ४८ तासांच्या आत विहित नमुन्यातील सर्व प्रॉक्सींनी विधिवत सही करुन प्रॉक्सि फॉर्म कंपनीचे नोदणीकृत कार्यालय ४ था मजला, विंग सी, कार्यालय, क्रमांक बी ३०+बी३१ हेरेकर पार्क, समोर, भांडारकर रोड, पुणे ४११००४ महाराष्ट्र, भारत.येथे जमा केली असेल तर.

अर्जदार कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातून प्रॉक्सीचे फॉर्म मिळू शकतात.

ट्रिब्युनलने श्री. अद्वैत धर्माधिकारी, कंपनीचे संचालक किंवा श्री. चंद्रकम विठ्ठलराव निकम, कंपनीचे अकॉंटस् मॅनेजर किंवा श्री निवृत्ती नामदेव पालवे, अधिकृत प्रतिनिधी यापैकीची अधिकृत सभापती म्हणून नियुक्ती केली आहे. बैठकीत मंजूर झाल्यास वर नमूद केलेली व्यवस्था त्यानंतरच्या ट्रिब्युनलच्या मान्यतेच्या अधीन असेल.

दि: ८ मार्च, २०२१ सही–
ठिकाण: पुणे सभेसाठी नियुक्त अध्यक्ष


## NOTICE

Marvel Enigma Co-Operative Housing Society Limited
S. No. 68, H. No. 1A, East of Eon IT Park, Kharadi, Pune – 411014.
(Reg, No.PNA/PNA(5)/HSG (TC)/17333/2015-2016 Dt. 12/02/2016)
Shall conduct its Annual General Body Meeting, for FY 2019-20
(Only through Video Conferencing),
on Sunday, 28th March, 2021, commencing 5:00 pm.
Contact – 020- 27042457
E-mail: marvelenigma.kharadi@gmail.com
(Ref. Govt of Maharashtra letter No. Misc. – 2020/Case No 24/13-S Dt 25 Feb, 2021)


**OMPRAKASH DEORA PEOPLE'S CO-OPERATIVE BANK LTD., HINGOLI.**
**ओमप्रकाश देवडा पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि. हिंगोली**
**(MULTI STATE BANK)**
HINGOLI - 431513 Dist. Hingoli (Maharahtra)

परिशिष्ट-IV-नियम ८(१) पहा)

## स्थावर मालमत्तेचा ताबा घेतलेली नोटीस

जसे की,

खाली स्वाक्षरी करणारे ओमप्रकाश देवडा पीपल्स को-ऑप. बँक लि. हिंगोली, मुख्य कार्यालय मेन रोड हिंगोली दि सेक्युरिटायझेशन ॲण्ड इन्फोर्समेन्ट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अंतर्गत प्राधिकृत अधिकारी आहेत व त्यांनी सदर कायद्याचे कलम १३ (१२) व नियम-९ सेक्युरीटी इन्टरेस्ट इन्फोर्समेनट रुल्स २००२ नुसार दि. १०/०९/२०२० रोजी बँकेचे थकबाकीदार कर्जदार आयफेल ॲटोमेशन प्रा.लि. संचालक - वैभव कुलकर्णी व सुरभी कुलकर्णी यांनी नोटीस मध्ये नमुद केलेली रक्कम कर्ज रुपये ६३९५४०.०० (रु. सहा लाख एकोणचाळीस हजार पाचशे चाळीस रुपये केवळ) ६० दिवसाच्या आत भरणा करण्यासाठी डिमांड नोटीस दिली आहे.

सदर कर्जदारांनी वरील नोटीस मध्ये नमुद केलेल्या रक्कमेचा भरणा न केल्यामुळे सदर नोटीसीद्वारे संबंधित कर्जदार व सर्व जनतेस याद्वारे सुचित करण्यात येते की, खालील सही करणाऱ्यांनी सदरहू कायद्यान्वये कलम १३(४) व नियम ९ नुसार त्यांना असलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील नमुद स्थावर मालमत्तेचा ताबा दि.०२/०३/२०२१ रोजी बोधीकृत (सिम्बॉलीक) ताबा घेतलेला आहे. कर्जदार व प्रॉपर्टीधारक व सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, त्यांनी सदर स्थावर मालमत्ते संदर्भात कोणत्याही खरेदी/विक्रीचा व्यवहार किंवा करार इ. करु नये. ताबा घेतलेल्या सदर मालमत्तेच्या संदर्भात असा कोणताही व्यवहार केल्यास त्यावर बँकेचे कर्ज रु/ ६९४००२/- (रु. सहा लाख चौऱ्यानो हजार दोन रु.केवळ)व त्यावर पुढे होणारे व्याज याचा बोजा असेल. तसेच दि. ०१/०३/२०२१ पासुनचे व्याज व इतर खर्च बाकी. ताबा घेतलेल्या स्थावर मालमत्तेचा तपशील खालील वर्णनाची संपुर्ण स्थावर मालमत्ता :-
१) घर क्र./प्लॉट श्री. रवी किसनराव कुलकर्णी व सौ. ऋतुजा रवी कुलकर्णी यांच्या मालकीची पुणे महानगर पालिका व सब रजिस्टार हवेली, पुणे यांच्या हद्दीतील सर्व्हे नं. ६१, सी.टी.एस नं. ३४४६ ह्या जागेचा भाग मध्ये बांधलेले ट्रेझर पार्क बिल्डिंग मधील (एच) १२ व्या मजल्यावरील फ्लॅट क्र. १२०३ ज्यांचे क्षेत्रफळ (कारपेट) ६६.५१ चौ.मिटर अधिक लगत असलेले क्षेत्रफळ १८.३९ चौ.मिटर आणि फ्लोअर पार्किंग नं. ३४५ मधील मालमत्ता. यांच्या नावाने आहे.

**चर्तुसिमाः**
१) पुर्वेस - मोकळी जागा
२) पश्चिमेस - पॅसेज, पायऱ्या आणि फ्लॅट क्र. १२०२
३) दक्षिणेस - लिफ्ट व मोकळी जागा
४) उत्तरेस - मोकळी जागा

स्थळ - पुणे सही
दिनांक - ०२/०३/२०२१ अधिकृत अधिकारी
**प्रकाश बी. निमजे**
(ओमप्रकाश देवडा पीपल्स को-ऑप. बँक लि. हिंगोली)


लोकसत्ता Classifieds
FROM ANYTHING TO EVERYTHING.

### व्यवसाय

**स्वत:चा जेसीबी, डंपर, पोकलेन, टेम्पो, कार खरेदी करून मासिक खात्रीशीर ४०,०००- ४,००,०००/- कमवा. खात्रीशीर कामाची ऑर्डर मिळेल. पर्सनल/ गृह/ अनसिक्योर्ड/ मॉर्डगेज लोन – ५,००,००० - ५०,००,००,०००/- फायनान्स उपलब्ध. संपर्क : 7715051159.**
0070734364-1

**भोसरीत** मध्यवर्ती ठिकाणी भरपुर व्यवसाय असलेली जागा झेरॉक्स, जॉबवर्क, इंटरनेट व ऑनलाईन व्यवसायासाठी चालविण्यास देणे. ९५९५३१८१०१/ ९७६३१६३२८५
0090283032-1

### शेअर्स

**महिला** विशेष शेअर्स बॅच ८ मार्चपासून ७-८.३० इंट्राडे लाईव एक दिवस एकच स्टुडंट बॅच. चौकशी वॉटस्अप 9930002010 Youtube MY MARKET FRIEND
0070734359-1

जाहिरात छोटी प्रतिसाद मोठा

### नोकरीविषयक

**प्रेस** जाहिराती तसेच प्रॉपर्टी फिल्डवर मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह ऑफिसर मुले/ मुली पाहिजेत. राहण्याची सुरक्षित सोय. रिझ्युम पाठवा वॉट्सएप- 9867931341.
0070734525-1

प्रसिद्ध वकिलांच्या ऑफिसमध्ये कामासाठी झेरॉक्स, ऑनलाईन इंटरनेट, मराठीत जॉबवर्क ऑपरेटर, क्लार्क त्वरीत पाहिजेत. अनुभवास प्राधान्य. गुरुकृपा भोसरी. ९५९५३१८१०१/ ९७६३१६३२८५
0090283032-2

### सर्व्हिसेस

**दैनिक** 'लोकसत्ता', 'इंडियन एक्स्प्रेस'सह महाराष्ट्रातील सर्व भाषेतील, कुठल्याही वृत्तपत्रांमध्ये छोट्या/मोठ्या जाहिराती अधिकृत दरात बुकिंगसाठी संपर्क- संजय धिवर, ९११२८२१२३३/ ९४२२७३४०६२
0090281616-1

**लोकसत्ता** + सर्वच वर्तमानपत्रांत स्कीम+ डिस्काउंट विवाहविषयक, जागाविषयक, श्रद्धांजली, शैक्षणिक, पाहिजेतच्या जाहिराती प्रसिद्धीसाठी 'सर्वोदया ॲडव्हर्टायझिंग' (Professional Management, Prompt Service, Economical, Error Free). 9321989026/ 9322139909.
0070734021-1

### अंतर्गत सजावट

**We** provide steam cleaning services for cleaning of mattresses and beds which kills all germs. Other services available Sofa and Carpet cleaning.Contact City Interiors 7066978800.
0090283013-1

### इतर जाहिराती

**माझे** जुने नाव सुनिता दिलीप बागडे असे होते ते आता बदलून नवीन नाव सुनीला दिलीप बागडे असे झाले आहे. आधारकार्ड नं.- २६९९८८३१९५८८, ॲफि.नं.- ७५५/४/३/२०२१
0090283081-2

**My** old Name Pallavi Ashok Palvi To New Name As Pallavi Abhijeet Shinde Vide Aadhar Card No.7804 5876 3083 Dated 08/03/2021
0090283103-2

**I have** changed my old name Baronia Tanima to new name Tanima Rajeshwar Aadharcard No.765760623200
0090283104-1

**My** Old name Auti Gorksha Balu Changed to New name as Goraksh Balu Auti as Per Aadhar Card No. 433242534735
0090283103-1

**I,** JC-733920K Nb Sub Chaudhari Sunil Dattatraya Have change my Daughter's Name from Anagha to Anagha Sunil Chaudhari vide Affidavit No A120/2021 Dt 05Mar2021 Before Pune District Court.
0090283103-3

I have changed my name Yuzud Burjor Karanjia (new name) My old name Yuzdezurd Burjor Karanjia as Aadhaar 358935648396
0090283105-2

I have changed my name Jehan Yuzud Karanjia (new name) My old name Jehan Yuzdezurd Karanjia as Aadhaar no 665379100529.
0090283105-1

I have changed my name from Namdeo Vitthal Sodal to Namdev Vitthal Sodal with respect to below documents.
0070734555-1

स्थावर मालमत्ता?
तुमच्या अपेक्षेप्रमाणे व्यवहार होण्यासाठी 'लोकसत्ता'त एक छोटी जाहिरात पुरेशी आहे!

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर (ॲडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

visit us at : WWW.LOKSATTA.COM

# महिला कर्जदारांचा टक्काही वधारतोय!

## वार्षिक २१ टक्क्यांची वाढ; पुरुषांच्या तुलनेत पाच टक्के सरस

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई :** वाढत्या आर्थिक सर्वसमावेशकतेसह महिलांमध्ये कर्जबाजारीपणाही वाढत असून, २०१४ पासून मागील सहा वर्षांत महिलांकडून कर्जाची उचल करण्याचे प्रमाण हे वार्षिक २१ टक्के दराने वाढत आले आहे, असे उपलब्ध अधिकृत तपशील स्पष्ट करतो.

देशातील एकूण कर्जदारांमध्ये महिला कर्जदारांचे प्रमाण हे सप्टेंबर २०२० अखेर २८ टक्क्यांवर गेले आहे. सहा वर्षांपूर्वी सप्टेंबर २०१४ मध्ये महिला कर्जदारांचा टक्का २३ टक्के असा होता. वार्षिक वाढीचा हा दर २१ टक्के असून, पुरुष कर्जदारांचे प्रमाण वार्षिक १६ टक्के दराने वाढत आहे. कर्जदारांच्या पतविषयक माहिती ठेवणारी सर्वात मोठी संस्था 'ट्रान्सयुनियन सिबिल'कडून उपलब्ध माहितीनुसार, महिला कर्जदारांची एकूण संख्या चार कोटी ४७ लाखांवर गेली आहे. २०१४ मध्ये हे प्रमाण दीड कोटीच्या घरात होते.



महिला कर्जदारांना वितरित कर्जाचे प्रमाण हे १५.१ लाख कोटी रुपयांच्या घरात जाणारे आहे. मागील सहा वर्षांत या रकमेतही वार्षिक १२ टक्के दराने वाढ होत आल्याचे सिबिलची पाहणी सांगते.

महिलांमधील वाढत्या आर्थिक स्वावलंबनाचे हे द्योतक असून, त्यांच्या आर्थिक सहभागीतेतील वाढीसह त्यांना अर्थकारणात वाढत्या संधीही उपलब्ध होत असल्यामुळे महिलांकडून कर्जाच्या मागणीत इतक्या तीव्र स्वरूपाची वाढ सुरू असल्याचे हा पाहणी अहवाल सांगतो.

### करोनाकाळात नवीन साडेचार कोटी कर्ज खाती

आर्थिक संकट बनून आलेल्या करोना टाळेबंदीच्या काळात महिलांकडून साडेचार कोटी नवीन कर्ज खाती उघडली गेल्याचे पाहणी अहवाल सांगतो. म्हणजे कोणते तरी एक सुरू असलेले कर्ज खाते अथवा क्रेडिट कार्ड वापरत असलेल्या महिलांचे प्रमाण या काळात ४.५ कोटींनी वाढले. २०२० सालात कर्जासाठी अर्ज करणाऱ्या महिलांमध्ये व्यक्तिगत कर्ज आणि ग्राहकोपयोगी वस्तूंच्या खरेदीसाठी कर्ज याचे प्रमाण सर्वाधिक जवळपास २.९ कोटी इतके होते. अशा कर्ज प्रकाराच्या मागणीतील ही वाढ २६ टक्के इतकी होती.

श्रमशक्तीत महिलांचा वाढता सहभाग, शिवाय सरकारने जाणीवपूर्वक स्वीकारलेल्या धोरणातून महिलांसाठी खुल्या झालेल्या अतिरिक्त आर्थिक संधी याचा एकत्रित परिणाम म्हणून स्वतःसाठी तसेच कुटुंबासाठी आर्थिक उद्दिष्टे ठरविण्यात महिला पुढाकार घेऊ लागल्या असून, त्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी त्यांची कर्जावरील भिस्तही वाढली आहे.

– हर्षला चांदोरकर,
मुख्य परिचालन अधिकारी,
ट्रान्सयुनियन सिबिल

# सार्वजनिक उपक्रमांच्या मालमत्ता विक्रीबाबत आज उच्चस्तरीय बैठक

**पीटीआय, नवी दिल्ली**



**सार्वजनिक क्षेत्रातील** विविध कंपन्यांच्या मालमत्तांच्या विक्रीबाबत मंगळवारी बैठक होत असून सरकारच्या निर्गुंतवणूक मोहिमेनुसार त्याबाबतची चाचपणी केली जाणार आहे.

केंद्रीय अर्थ मंत्रालय, निती आयोग तसेच दीपम विभागाचे वरिष्ठ अधिकारी दिल्लीत होणाऱ्या या बैठकीत सहभागी होतील. यानिमित्ताने एका कार्यशाळेचे आयोजनही केले जाणार आहे.

गेल्याच महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सार्वजनिक क्षेत्रातील विविध आजारी १०० मालमत्तांची विक्री करण्याचे स्पष्ट केले होते. या माध्यमातून २.५० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक संधी असल्याचेही त्यांनी नमूद केले होते. यातील अनेक कंपन्या या तेल व वायू तसेच ऊर्जा क्षेत्रातील आहेत.

येत्या महिन्यापासून सुरू होणाऱ्या नव्या वित्त वर्षाचा - २०२१-२२चा अर्थसंकल्प सादर करताना केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी विद्यमान सार्वजनिक पायाभूत कंपन्यांच्या विक्रीतून नव्या पायाभूत बांधकामासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होईल, असे स्पष्ट केले होते. पायाभूत मालमत्तेसाठी राष्ट्रीय कंपनी वाहिनी स्थापन करण्यात येणार आहे.

# 'केर्न' करविवादप्रकरणी पाच देशांच्या न्यायालयात भारताविरोधात निवाडा

## अमेरिका, ब्रिटनसह पाच देशांकडून आंतरराष्ट्रीय लवादाचा निर्णय कायम

**पीटीआय, नवी दिल्ली**

**आंतरराष्ट्रीय लवादाने** केर्न एनर्जी करविवादाप्रकरणी दिलेल्या भारताविरूद्ध निवाड्यावर विविध पाच देशांच्या न्यायालयांनी शिक्कामोर्तब केले आहे. याबाबत विविध ९ देशांच्या न्यायालयात धाव घेतलेल्या केर्न एनर्जीला पैकी अमेरिका, ब्रिटनमधील न्यायालयांनी कंपनीची बाजू घेतली आहे.

यामुळे युरोपातील केर्न एनर्जीद्वारे भारताकडून १.४ अब्ज डॉलर रक्कम परत मिळवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. भारताने ही रक्कम परत न केल्यास देशातील विविध मालमत्ता जप्त करण्याची तयारी केर्न एनर्जीने केली आहे.

भारताकडून होणाऱ्या रक्कम तगाद्याला केर्न एनर्जीने विविध नऊ देशांमध्ये न्यायालयीन आव्हान दिले आहे. पैकी अमेरिका, ब्रिटन, नेदरलँड, कॅनडा व फ्रान्सच्या न्यायालयाने या प्रकरणात यापूर्वी आंतरराष्ट्रीय लवादाने दिलेल्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले आहे.

उर्वरित सिंगापूर, जपान, संयुक्त अरब अमिरात व केमन आयलँड येथील न्यायालयातही कंपनीचा विजय होईल, असा विश्वास या निमिताने केर्न एनर्जीने व्यक्त केला आहे. पाच देशांच्या न्यायालयाच्या निर्णयामुळे भारताकडून मिळवावयाच्या रकमेबाबत कंपनीला आशा निर्माण झाली आहे.

यानंतर भारतातील केंद्र सरकारची बँक खाती, सरकारी कंपन्यांना द्यावयाची रक्कम, सरकारच्या मालकीची विमाने तसेच जहाजे आदी मालमत्ता जप्त करण्याबाबत कायदेशीर प्रक्रिया सुरू केली जाईल, असे कंपनीच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.

# महाकाय पायाभूत प्रकल्पांच्या राज्यातील प्रगतिपथाचे 'कन्स्ट्रक्ट महाराष्ट्र'द्वारे प्रदर्शन

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई :** भारतात जागतिक दर्जाच्या बांधकाम व पायाभूत सुविधांसह उद्योग क्षेत्राला एका नवीन उंचीवर घेऊन जाणारी कामे सर्वत्र सुरू असून, देशातील एक प्रगत राज्य म्हणून महाराष्ट्राचा त्यात मोठा वाटा आहे. राज्यातील अशा १५ महाकाय पायाभूत प्रकल्पांच्या प्रगतिपथाचे बांधकाम तंत्रज्ञानावरील प्रदर्शन तसेच परिषद 'कन्स्ट्रक्ट महाराष्ट्र २०२१'द्वारे घडविले जाईल.

या प्रदर्शन व परिषदेतून २४० अब्ज डॉलर मूल्याचे (सुमारे १७.६ लाख कोटी रुपये) विशाल पायाभूत प्रकल्पांचे दर्शन घडविले जाईल. या प्रकल्पांमधून २०२५-२७ या काळात महाराष्ट्रभरात आणि भारतात दोन कोटी ६० लाखांहून अधिक नवीन रोजगार निर्माण होणे अपेक्षित आहे. या प्रकल्पांमध्ये सहभाग घेणाऱ्या सहयोगी राष्ट्रांमध्ये आणखी ६०,००० नवीन रोजगार निर्माण होणे अपेक्षित आहे. येत्या १८ ते २० मार्च २०२१ या काळात गोरेगावस्थित एनएसई प्रदर्शन संकुलात होत असलेल्या उपक्रमातून राज्यातील बांधकाम, पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान व गुंतवणुकीवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

नेस्को एग्झिबिशन्स आणि एमआयडीसी यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या या तीन दिवसांच्या कार्यक्रमात सरकारी अधिकारी, गुंतवणूकदार, विकासक, वास्तुरचनाकार, डिझायनर्स, नियोजनकर्ते, इंजिनीअर्स, कॉंट्रॅक्टर्स, धोरणकर्ते व अभ्यासक सहभागी होणार आहेत. हे प्रदर्शन सर्वांसाठी खुले असेल.

# दोलायमान व्यवहारात निर्देशांकांत किरकोळ वाढ

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई :** सप्ताहाची सुरुवात करताना प्रमुख निर्देशांकांनी गेल्या सलग दोन सत्रातील घसरणीला रोखून, तेजी नोंदवली. तथापि दिवसातील कमालीच्या अस्थिर व्यवहारात सेन्सेक्ससह निफ्टीने दिवसअखेर किरकोळ वाढ नोंदविली. आंतरराष्ट्रीय स्तरावरील वाढत्या खनिज तेलाच्या किमतीने प्रमुख निर्देशांकांनी सत्रारंभीची भरीव वाढ दिवसअखेरपर्यंत कायम राखता आली नाही.

शुक्रवारच्या तुलनेत व्यवहारात ६६७ अंश झेप घेणारा सेन्सेक्स सत्रअखेर मात्र अवघ्या ३५.७५ अंश वाढीसह ५०,४४१.०७ वर स्थिरावला. तर १८.१० अंश वाढीने राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी १४,९५६.२० पर्यंत पोहोचला. निफ्टीने शुक्रवारीच त्याचा १५ हजारांचा स्तर सोडला होता.

आंतरराष्ट्रीय बाजारात खनिज तेलाच्या किमती प्रति पिंप ७० डॉलरनजीक पोहोचल्या आहेत. यामुळे ऊर्जा क्षेत्रातील समभागांना मागणी राहिली. त्याचबरोबर माहिती तंत्रज्ञान, औषधनिर्माण, सार्वजनिक बँक, पोलाद क्षेत्रातील समभागांनीही मूल्यवाढ नोंदवली.

सेन्सेक्समध्ये लार्सन अँड टुब्रो सर्वाधिक, ३.४३ टक्क्यांनी झेपावला. त्याचबरोबर ओएनजीसी, एचसीएल टेक, एनटीपीसी, ॲक्सिस बँक, इन्फोसिस ३ टक्क्यांपर्यंत वाढले. तर सत्रअखेरच्या तेजीनंतरही मुंबई निर्देशांकातील बजाज फायनान्स, इंडसइंड बँक, अल्ट्राटेक सिमेंट, बजाज ऑटो, एचडीएफसी लिमिटेड व एचडीएफसी बँक मात्र घसरले.

वाढलेल्या क्षेत्रीय निर्देशांकांमध्ये भांडवली वस्तू, बहुपयोगी आदी १२ निर्देशांक वाढले.

# 'नॉलेज मरीन'ची प्रत्येकी ३७ रुपयांनी आजपासून सार्वजनिक भागविक्री

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई :** सागरी पायाभूत सुविधांचे परिचालन, दुरुस्ती व देखभालीच्या व्यवसायात गुंतलेली कंपनी नॉलेज मरीन अँड इंजिनीयरिंग वर्क्स लिमिटेडची प्रारंभिक समभाग विक्री मंगळवारपासून (९ मार्च) सुरू होत असून, ती १२ मार्चपर्यंत खुली राहील. या प्रक्रियेत प्रत्येकी १० रुपये दर्शनी मूल्य असलेला कंपनीचा समभाग प्रत्येकी ३७ रुपये या निश्चित किमतीला विकला जाणार आहे.

मुंबई शेअर बाजाराच्या 'बीएसई एसएमई' या विशेष मंचावर सूचिबद्धतेसाठी होत असलेल्या भागविक्रीतून कंपनीकडून १०.६५ कोटी रुपयांचा निधी उभारला जाणे अपेक्षित आहे. एसएमई कंपनीची ही भागविक्री असल्याने गुंतवणूकदारांना किमान ३,००० समभागांसाठी बोली लावावी लागेल. देशातील सर्व प्रमुख बंदरे ही या कंपनीच्या सेवांची ग्राहक असून, गाळ उपसणी ते बंदर सुविधांच्या देखभाल, दुरुस्तीचे नॉलेज मरीन अँड इंजिनीयरिंग वर्क्स ही कंपनी काम पाहते. कंपनीच्या सध्याच्या मालमत्तांचे मूल्य २५ कोटींच्या घरात असून, तिची सध्या १०० कोटी रुपयांची कामे सुरू आहेत. हेम सिक्युरिटीज या भागविक्रीचे व्यवस्थापन पाहत आहे.

क्रीडा

## संक्षिप्त

### कामगिरी सुधारण्याचे भारतीय महिलांपुढे आव्हान

**लखनौ :** दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात दारुण पराभव पत्करल्यानंतर मंगळवारी होणाऱ्या दुसऱ्या लढतीत कामगिरी उंचावून मालिकेत बरोबरी साधण्याचे आव्हान भारतीय महिला संघापुढे आहे. कर्णधार मिताली राज, हरमनप्रीत कौर व झुलन गोस्वामीने भारतासाठी चांगली कामगिरी केली.

- सामन्याची वेळ : सकाळी ९ वा.
- थेट प्रक्षेपण : स्टार स्पोर्ट्स २

### फुटबॉल : मुंबई सिटी प्रथमच अंतिम फेरीत

**बाम्बोलिम :** मुंबई सिटी एफसीने पेनल्टी शूटआऊटपर्यंत रंगलेल्या उपांत्य सामन्यात एफसी गोवाचा ०-० (६-५) असा पाडाव करून प्रथमच 'आयएसएल'ची अंतिम फेरी गाठली. पहिला उपांत्य सामना २-२ असा बरोबरीत झाल्यानंतर दुसऱ्या लढतीत १२० मिनिटे गोलशून्य बरोबरी टिकली. त्यानंतर शूटआऊटमध्ये गोव्याच्या ग्लॅन मार्टिन्सचा प्रयत्न हुकला आणि रॉलिन बोर्जेसने गोल करीत मुंबईच्या विजयाची नोंद केली.

# भारताचे संघबांधणीसाठी प्रयोग!

## इंग्लंडविरुद्धच्या ट्वेन्टी-२० मालिकेत अंतिम ११ खेळाडूंत स्थान मिळवण्यासाठी चुरस

**पीटीआय, अहमदाबाद**

भारत-इंग्लंड ट्वेन्टी-२० मालिका

**मायदेशात होणाऱ्या** ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या संघबांधणीच्या दृष्टिकोनातून इंग्लंडविरुद्धच्या पाच ट्वेन्टी-२० सामन्यांच्या मालिकेकडे पाहिले जात आहे. ही संघबांधणी करताना शिखर धवन की के. एल. राहुल, दीपक चहर की भुवनेश्वर कुमार आणि श्रेयस अय्यर की सूर्यकुमार यादव असे पेच भारतीय संघ व्यवस्थापनापुढे उभे ठाकले आहेत.

शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या ट्वेन्टी-२० मालिकेसाठी १९ खेळाडू उपलब्ध असून, काही स्थानांसाठी दोन पर्याय उपलब्ध आहेत. त्यामुळे विश्वचषकासाठी सहा-सात महिने बाकी असताना कर्णधार विराट कोहली आणि मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री या मालिकेकडे गांभीर्याने पाहात आहेत.

भारताचा नियमित ट्वेन्टी-२० संघ खेळवून मालिका विजयानंतर प्रयोग करण्याचा एक मार्ग उपलब्ध आहे, तसेच पूर्णतः नव्याने संघरचना करण्याचा दुसरा मार्ग उपलब्ध आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवरच पाचही सामने होणार असल्यामुळे पहिल्या तीन सामन्यांसाठी संघरचनेत बदल होण्याची शक्यता कमी आहे.

### धवन सलामीला, राहुल मधल्या फळीत?

ऋषभ पंतच्या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे आघाडीच्या फळीत बदल होण्याची शक्यता आहे. काही महिन्यांपूर्वी ट्वेन्टी-२० क्रिकेटमधील प्रथमपसंतीचा यष्टीरक्षक गणल्या जाणाऱ्या के. एल. राहुलऐवजी यष्टीरक्षणाची जबाबदारी पंतकडे जाईल. शिखर धवन आणि रोहित शर्मा हे सलामीला उपलब्ध असले, तरी राहुल सलामीसाठी उत्तम पर्याय ठरत आहे. परंतु धवनने विजय हजारे करंडक स्पर्धेत दिल्लीकडून चमकदार कामगिरी बजावली आहे. त्यामुळे राहुलला मधल्या फळीत चौथ्या अथवा पाचव्या क्रमांकावर स्थान मिळण्याची दाट शक्यता आहे. कारण कोहली तिसऱ्या स्थानावर फलंदाजीला उतरणार, हे पक्के आहे.



शिखर धवन



के. एल. राहुल

मर्यादित षटकांच्या क्रिकेटमधील भारताचा सर्वोत्तम वेगवान गोलंदाज भुवनेश्वर कुमारचे पुनरागमन होत आहे. त्यामुळे दुसऱ्या स्थानासाठी दीपक चहर आणि शार्दूल ठाकूर यांच्यात स्पर्धा असेल. हाणामारीच्या षटकांत चहर टिच्चून गोलंदाजी करतो. मोटेराच्या खेळपट्टीवर

### ट्वेन्टी-२०मध्येही फिरकीचे त्रिकूट?

यजुर्वेंद्र चहल, वॉशिंग्टन सुंदर आणि अक्षर पटेल हे फिरकी गोलंदाजांचे त्रिकूट इंग्लिश फलंदाजांवर अंकुश ठेवेल. टी. नटराजन या यॉर्कर विशेषज्ञ गोलंदाजाचा पर्यायही उपलब्ध आहे. त्याला नवदीप सैनीचे आव्हान असेल. मोहम्मद शमी, रवींद्र जडेजा आणि जसप्रीत बुमरा या भरवशाच्या गोलंदाजांना इंग्लंडविरुद्ध मालिकेसाठी विश्रांती दिली जात असल्याने अन्य खेळाडूंना आजमावण्याची संधी मिळेल.

### मधल्या फळीत तीव्र स्पर्धा

मधल्या फळीतील स्पर्धा आता वाढली आहे. चौथ्या क्रमांकासाठी राहुल, श्रेयस आणि सूर्यकुमार यांच्यापैकी एकाची वर्णी लागेल. या स्थितीत श्रेयस आणि सूर्यकुमार यांच्यापैकी एकालाच संधी मिळेल, तर सहाव्या आणि सातव्या क्रमांकावर पंत आणि अष्टपैलू हार्दिक पंड्या या खेळाडूंना स्थान मिळू शकते.

## भारत–न्यूझीलंड अंतिम लढत साऊदम्पटनला

**नवी दिल्ली :** भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील जागतिक कसोटी अजिंक्यपदाची अंतिम लढत १८ ते २२ जून या कालावधीत साऊदम्पटन येथील एजेस बाऊल स्टेडियमवर खेळवण्यात येणार आहे, अशी माहिती सोमवारी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचा (बीसीसीआय) अध्यक्ष सौरव गांगुलीने दिली.

जागतिक कसोटी अजिंक्यपदाचा अंतिम सामना लॉर्ड्सवर होणार होता. परंतु स्टेडियमवरच उपलब्ध असलेल्या पंचतारांकित निवास व्यवस्थेमुळे एजेस बाऊलची निवड करण्यात आली. दोन्ही संघांना जैव-सुरक्षित वातावरणात येथे अधिक सुरक्षित ठरेल, असे इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट मंडळाने सांगितले.

बायपास शस्त्रक्रियेनंतर गांगुली सध्या वैद्यकीय सुटीवर असून, जागतिक कसोटी अजिंक्यपदाचा अंतिम सामना पाहण्यासाठी ते इंग्लंडला जाण्याची शक्यता आहे.

# अखेरच्या लढतीत भारताची ब्रिटनवर मात

## पुरुष हॉकी संघ युरोप दौऱ्यावर अपराजित

**वृत्तसंस्था, अँटवर्प (बेल्जियम)**

भारताचा युरोप हॉकी दौरा

**भारतीय पुरुष** हॉकी संघाने युरोप दौऱ्यावर अपराजित राहात विजयी सांगता केली. सोमवारी अखेरच्या लढतीत भारताने ग्रेट ब्रिटनवर ३-२ अशी मात केली.

हरमनप्रीतने पहिल्याच मिनिटाला गोल करीत भारताचे खाते उघडले. मग मनदीप सिंगने अनुक्रमे २८व्या आणि ५९व्या मिनिटाला गोल गोल करीत विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. ग्रेट ब्रिटनकडून जेम्स गॉलने २०व्या मिनिटाला आणि ॲडम फॉर्सिथने ५५व्या मिनिटाला गोल नोंदवले. याआधीच्या सामन्यात भारताने सिम्रनजीत सिंगने उत्तरार्धात केलेल्या गोलमुळे ग्रेट ब्रिटनला १-१ असे बरोबरीत रोखले होते.

याचप्रमाणे पी. आर. श्रीजेशच्या नेतृत्वाखालील भारताने जर्मनीचा पहिल्या लढतीत ६-१ असा धुव्वा उडवला, तर दुसऱ्या लढतीत १-१ बरोबरी साधली.

सोमवारच्या सामन्यात भारताने पहिल्याच मिनिटाला लाभलेल्या पेनल्टी कॉर्नरचे उपकर्णधार हरमनप्रीतने गोलमध्ये रूपांतरण केले. त्यामुळे पहिल्या सत्रात भारताला १-० अशी आघाडी मिळाली. दुसऱ्या सत्रात जेम्सने मैदानी गोल झळकावत ब्रिटनला बरोबरी साधून दिली. पण मनदीपने उत्तरार्धात पेनल्टी कॉर्नरच्या बळावर केलेल्या गोलमुळे भारताला २-१ अशी आघाडी मिळाली.

तिसरे सत्र मात्र गोलविरहित अवस्थेत संपले. दोन्ही संघांतील खेळाडूंनी या सत्रात पेनल्टी कॉर्नरवर गोल करण्याची संधी वाया घालवली. चौथ्या सत्रात ॲलनने पाच मिनिटे बाकी असताना गोल करीत ब्रिटनला बरोबरी साधून दिली. पण तीन मिनिटांनी मनदीपने गोल करीत भारताचा विजय निश्चित केला.

## शब्दकोडे - ३६५

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ■ | ४ | | ५ | ६ | ७ |
| ८ | | | ■ | ९ | | ■ | १० | | |
| | ■ | ११ | १२ | | ■ | १३ | | | ■ |
| ■ | १४ | ■ | | ■ | १५ | | ■ | १६ | |
| १७ | | १८ | | १९ | ■ | २० | २१ | | ■ |
| २२ | | | ■ | २३ | २४ | ■ | | ■ | २५ |
| ■ | २६ | | २७ | ■ | २८ | | ■ | २९ | |
| ३० | ■ | ३१ | | ३२ | | ■ | ३३ | | ■ |
| ३४ | ३५ | | ■ | | ■ | ३६ | | | ३७ |
| ३८ | | ■ | ३९ | | | | ■ | ४० | |

**आडवी विधाने :**
(१) आर्जव, तोंडपुजेपणा, हांजी हांजी
(४) पंधरा दिवसांचा समुदाय
(८) आमिष, प्रलोभन (९) खुबी, मर्म
(१०) बाप, जन्मदाता
(११) जून, न तुटणारे, चिवट
(१३) सुताराचे लाकूड तासण्याचे हत्यार
(१५) आनंद, हर्ष
(१६) लक्ष्मी, शोभा, कमला
(१७) आजन्म, जन्म असेपर्यंत
(२०) गोष्ट, कथा
(२२) उणीव, कमतरता
(२३) मच्छर, चिलट
(२६) कोंबडीचे पिल्लू
(२८) काळजी, फिकीर
(२९) कान (३१) घुबड
(३३) म्हातारपण
(३४) कोर्टात न्यायाची एक बाजू लावून धरणारा
(३६) तलम सुताचे कापड
(३८) सर, माळ, पानांचा भारा
(३९) युद्धातील डावपेच
(४०) टिकाव, निभाव

**उभी विधाने :**
(१) स्पष्टीकरण, तपशील
(२) सत्कारप्रसंगी उंची पांघरण्याचे वस्त्र
(३) होडी, नाव, तर
(४) पाच, लवाद (५) धोबी, परीट
(६) जंगलातील पाऊलवाट
(७) पत्र, टपाल
(९) दोष, उणीव, वाईट सवय
(१२) मुलगी, कन्या (१३) वाद्ये, वाजवणारा
(१४) श्रम, कष्ट
(१७) भाकरी भाजावयाचे गोल लोखंडी वा पोलादी साधन
(१८) चिंताग्रस्त, धीर सुटलेला
(१९) ओरखडा, भेग (२१) तोटा, नुकसान
(२४) अखंड, निरंतर
(२५) रंग (२७) रानरेडा
(२९) चमत्कार, अद्भुत गोष्ट
(३०) पांढरा, शुभ्र, सफेद
(३२) भयंकर (३३) पाणी, नीर
(३५) कीटक, कृमी (३६) बुद्धी, अक्कल
(३७) खांबावर टाकलेली आडवी तुळई

– सरोज ताठरे

## सुडोकू - ३६५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | ५ | | | ७ | | | |
| | ४ | | | २ | | १ | ८ | |
| | | | १ | ६ | | | | |
| | | ८ | २ | ३ | | ४ | | |
| | १ | ७ | | | | ६ | ३ | |
| | | ४ | | ७ | ६ | ८ | | |
| | | | | ९ | ४ | | | |
| | ६ | ९ | | ८ | | | ४ | |
| | | | ६ | | | २ | | ७ |

## सुडोकू - ३६४चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ६ | २ | ३ | १ | ७ | ८ | ९ | ५ |
| ५ | १ | ७ | ४ | ९ | ८ | ३ | २ | ६ |
| ३ | ८ | ९ | २ | ६ | ५ | १ | ७ | ४ |
| ६ | ७ | ४ | ५ | ८ | ३ | २ | १ | ९ |
| १ | ५ | ३ | ६ | २ | ९ | ७ | ४ | ८ |
| ९ | २ | ८ | ७ | ४ | १ | ६ | ५ | ३ |
| २ | ३ | १ | ९ | ५ | ६ | ४ | ८ | ७ |
| ७ | ४ | ५ | ८ | ३ | २ | ९ | ६ | १ |
| ८ | ९ | ६ | १ | ७ | ४ | ५ | ३ | २ |

## शब्दकोडे क्र. ३६४चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रा | ज | भ | व | न | ■ | प | रि | सी | मा |
| जी | व | ■ | खा | ■ | वि | र | क्त | ■ | हू |
| ना | ■ | वा | र | स | ■ | व | ■ | प | त |
| मा | न | स | ■ | भा | क | ड | क | था | ■ |
| ■ | त | ला | व | ■ | पी | ■ | ता | री | ख |
| वि | ■ | त | रा | जू | ■ | क | र | ■ | ल |
| वे | ग | ■ | ह | ■ | का | व | ■ | कों | ब |
| च | र | ण | ■ | व | न | च | र | ■ | त |
| न | ग | ■ | ब | स्ता | न | ■ | च | र | ■ |
| ■ | ट | र | ■ | द | ■ | ब | ना | व | ट |

# बजरंगाची कमाल!

## सुवर्णपदकासह जागतिक क्रमवारीत अग्रस्थानी



पीटीआय, रोम

**ऑलिम्पिकसाठी पात्र** ठरलेला भारतीय मल्ल बजरंग पुनियाने मॅट्टेओ पेलीकोन मानांकन कुस्ती स्पर्धेची अंतिम लढत ३० मिनिटांत जिंकून दुहेरी यश मिळवले. एक म्हणजे सुवर्णपदक टिकवले, तर दुसरे म्हणजे जागतिक क्रमवारीतील अग्रस्थान पुन्हा प्राप्त केले.

६५ किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीआधी मोंगोलियाच्या तुल्गा तुमूर ओशिरचे बजरंगविरुद्ध पारडे जड मानले जात होते. कारण आधीच्या दोन्ही लढतींत ओशिरकडून बजरंगने पराभव पत्करला होता. परंतु या अंतिम लढतीत ३० सेकंदांत बजरंगने बरोबरी साधली. परंतु अखेरचा गुण बजरंगने कमावल्यामुळे त्याला विजेता घोषित करण्यात आले.

**मॅट्टेओ पेलीकोन मानांकन कुस्ती स्पर्धा**

करोनाच्या साथीमुळे एक वर्षाच्या विश्रांतीच्या कालावधीत बजरंगने पायाच्या बचावात वैशिष्ट्यपूर्ण सुधारणा केली. परंतु टोक्यो ऑलिम्पिकमध्ये पदक मिळवण्यासाठी बचावावर अधिक मेहनत घ्यायला हवी, असे २७ वर्षीय बजरंगने सांगितले. बजरंग ९ ते ११ एप्रिल या कालावधीत कझाकस्तानला होणाऱ्या आशियाई अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत सहभागी होणार आहे. त्याआधी मात्र राष्ट्रीय शिबिरात त्याला सरावासाठी दाखल व्हावे लागेल. या स्पर्धेआधी ६५ किलो गटात बजरंग जागतिक क्रमवारीत द्वितीय स्थानी होता. परंतु या स्पर्धेत १४ गुणांची कमाई करून त्याने अग्रस्थान मिळवले आहे.

बिगरऑलिम्पिक ७० किलो वजनी गटात विशाल कलिरमणाने कझाकस्तानच्या सिरबाझ तलगतचा ५-१ असा पाडाव करून कांस्यपदक पटकावले. चार वर्षांच्या बंदीनंतर स्पर्धात्मक कुस्तीमध्ये पुनरागमन करणाऱ्या नरसिंग यादवला कांस्यपदकाने हुलकावणी दिली. कझाकस्तानच्या डॅनियार कॅसानोव्हने त्याचा ५-० असा पराभव केला.

**७** पहिल्या आंतरराष्ट्रीय मानांकन कुस्ती स्पर्धेत भारताने ७ पदके कमावली.

### परदेशी प्रशिक्षणाबाबत साशंका!

ऑलिम्पिकसाठी परदेशी प्रशिक्षणाचा मी विचार करीत होतो. परंतु करोना रुग्णांची संख्या वाढल्याने युरोपात पुन्हा कडक निर्बंध लागू झाल्यामुळे त्याबाबत शंका निर्माण झाली आहे. कारण सद्य:स्थितीत प्रवास करण कठीण झाले आहे, असे मत बजरंगने व्यक्त केले.

''६५ किलो वजनी गट हा स्पर्धात्मकदृष्ट्या आव्हानात्मक गट मानला जातो. मंगोलियाचा तुल्गा तुमूर ओशिर हासुद्धा टोक्यो ऑलिम्पिकसाठी पात्र ठरला आहे. त्यामुळे तो कमकुवत प्रतिस्पर्धी मुळीच नव्हता. ऑलिम्पिकमध्ये सर्वोत्तम कामगिरीच्या तयारीसाठीच सर्व कुस्तीपटू या स्पर्धेत सहभागी झाले होते. त्यामुळे आव्हान खडतर होते,'' असे बजरंगने सांगितले.

''कुस्ती या खेळात चढ-उतार असतो. मी पुन्हा मॅटवर परतून स्पर्धांमध्ये खेळतो आहे, हे माझ्यासाठी दिलासादायी आहे,'' असे त्याने आवर्जून सांगितले.










**Honda Motorcycle & Scooter India Pvt. Ltd., Registered Office:** Commercial Complex II, Sector - 49-50, Golf Course Extension Road, Gurugram - 122018 (Haryana), India; **Website:** www.honda2wheelersindia.com; **Customer Care:** customercare@honda2wheelersindia.com

या चित्रात दाखवलेले उत्पादन प्रत्यक्ष उत्पादनापेक्षा वेगळे असू शकते. चित्रात दाखवलेल्या ॲक्सेसरीज स्टँडर्ड इक्विपमेंटचा भाग नाहीत. सर्व वैशिष्ट्ये सर्व प्रकारांमध्ये उपलब्ध असतीलच असे नाही. #अर्थसहाय्य योजना वित्तीय कंपन्यांच्या धोरणावर अवलंबून आहेत आणि प्राधान्याच्या वित्तीय भागीदारांच्या विवेकाधिकारानुसार उपलब्ध आहेत. वित्तीय कंपन्यांच्या धोरणानुसार अर्थसहाय्य योजना निवडक मॉडेल्सवर निवडक प्रोफाईल्सच्या ग्राहकांना उपलब्ध आहे. कोणत्याही दोन ऑफर्स एकत्र करता येणार नाहीत. सर्व योजना मर्यादित कालावधीसाठी उपलब्ध आहेत आणि कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय बाजारपेठेतून मागे घेतल्या जाऊ शकतात. ^कार्ड इएमआय ऑफर फक्त पाईन लॅब्ज पीओएसवर ब्रँड इएमआयच्या पर्यायांतर्गत उपलब्ध आहे. ऑफर बँकेच्या अटी आणि शर्तींनुसार आणि एका कार्डवर एकदा उपलब्ध आहे. योजना कोणत्याही वेळी कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय मागे घेतली जाऊ शकते. **अटी लागू. *SIAM डेटानुसार.

**Honda Exclusive Authorized Dealerships: PUNE: J M ROAD:** Pashankar Honda - 020-25512033, 9923005554/6/7; **AUNDH:** Pashankar Honda - 9923005552, 9923004453; **CAMP:** B.U. Bhandari Honda - 26205555, 9881196633; **HADPASAR:** Yash Honda - 020-26814333, 9049867133; **SASWAD:** Balaji Honda - 9822845599, 7385225599; **SWARGATE:** Aero Honda - 020-41048888/04/05, 9881873849; **WADGAON:** Aero Honda - 8149314314, 020-65422999; **DHANKAWADI:** Aero Honda - 020-41043301/02, 8793356535; **KOTHRUD:** My Wings Honda - 41469696, 7755984699; **SINHGAD ROAD:** My Wings Honda - 020-24308200, 8600700720; **PIRANGUT:** Pashankar Honda - 9049011000, 265000700; **VISHRANTWADI:** Shanti Honda - 020-66863600, 8380010682/84/85; **ALANDI:** Shanti Honda - 8237085609,8380011583; **BANER:** Aman Honda - 9511910048, 7774075847; **BAVDHAN:** Aman Honda - 7745029929, 9511910048; **VIMAN NAGAR:** B.U. Bhandari Honda - 66004400, 8888011555; **MANJRI:** Sky Honda - 9209500200, 7447487666 , 7447485666; **UNDRI:** Kanade Honda - 7887886389/90; **KONDHWA:** Kothari Honda - 020-65299000/1/2, 9373720055, 7721089966; **TILAK ROAD:** Kothari Honda - 020- 41040100, 9373720053; **PIMPRI:** Sterling Honda - 8380004515, 9689925024; **WAKAD:** Yug Honda - 7719878618, 7719978618; **HINJAWADI:** Yug Honda - 9766017618; **CHINCHWAD:** Sterling Honda - 9822436666, 9822036666; **NIGDI:** Sterling Honda - 9011078308; **DAPODI:** Rohan Honda - 020-27143000, 9552582729; **PIMPLE SAUDAGAR:** Rohan Honda - 07709000079; **TALEGAON:** OM Wheels Honda - 9130087410, 9130087406; **KAMSHET:** OM Wheels Honda - 9130087415; **LONAVALA:** Samarth Honda - 08007830044/55; **MOSHI:** Parineeti Honda - 020-27302730, 8390300300; **CHAKAN:** Rohan Honda - 9657021555; **RAJGURUNAGAR:** Parineeti Honda - 8956453411, 8956453412; **WAGHOLI:** Gagan Wings Honda - 7768009020, 7768009040; **KHARADI:** Gagan Wings Honda - 07768009029, 7768009036; **MANCHAR:** Apurva Honda - 021-33223717, 9359586631; **NARAYANGAON:** Advait Honda - 7720947773/71; **JUNAR:** Gurudatta Honda - 9175038678; **SHIRUR:** Krishaa Honda - 02138-222199, 9146195099; **BARAMATI:** Saraf Honda - 02112-226066, 228120, 9822536570; Shreenath Honda - 9359070408; **DAUND:** Saraf Honda - 8380044972; **CHAUFULA:** Yashraj Honda - 8657083400; **INDAPUR:** Vitthal Honda - 02111-224555, 9689011155, 9960193555; **BHIGWAN:** Atharava Honda - 9823357474, 9011349939; **RANJANGAON:** Morya Honda - 020-65201225, 9921381111; **SHIKRAPUR:** Theurkar Honda - 02137-606464, 9822256464; **FURSUNGI:** Yash Honda - 9850848303; **URULI KANCHAN:** Shelar Honda - 9764452650.

**For Bulk/Institutional enquiries, please write us at: institutionalsales@honda2wheelersindia.com**

हे पत्र **वैदेही ठकार** यांनी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा) लिमिटेडकरिता (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) इंडियन एक्स्प्रेस प्रेस, सर्व्हे क्र. २८८, प्लॉट नं. १ व २, रायसोनी इंडस्ट्रीयल पार्क, मु. पो. माण, ता. मुळशी, जि. पुणे ४११०२७ येथे छापून द इंडियन एक्स्प्रेस (प्रा) लिमिटेड, 'एक्स्प्रेस हाऊस', प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे-४११००४ येथे प्रसिद्ध केले. **दूरध्वनी**- ६७२४१०००. **फॅक्स** - ६७२४११४७. **लोकसत्ता मुंबई कार्यालय** : मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : ०२२- २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : ०२२-२२८२२१८७. **महापे कार्यालय** : प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४००७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **नागपूर कार्यालय** : प्लॉट. न. ३८, ऑडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७, **अहमदनगर** ०२४१- २४५१९०७, फॅक्स -२४५१६०७. **कोल्हापूर** ०२३१- २६४४९९४.
■ अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका ■ कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार ■ संपादक : गिरीश कुबेर ■ सहायक संपादक : मुकुंद संगोराम * (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Regd, No. RNI 56975/92
© द इंडियन एक्स्प्रेस (प्रा) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशत: पुन:प्रकाशनास वा पुन:प्रसारणास मनाई.